# भट्टि

## व्यक्ति आणि वाङ्मय

डॉ. सौ. प्रज्ञा देशपांडे



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# भक्ति, व्यक्ति आणि वाङ्मय


**लेखिका**

**डॉ. सौ. प्रज्ञा देशपांडे**

एम्. ए. पीएच्. डी.

अधिव्याख्याता,

स्नातकोत्तर संस्कृत विभाग

नागपूर विद्यापीठ

नागपूर



**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**


## अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती** — ऑगस्ट, १९८९

**प्रकाशक** — सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
नवीन प्रशासन भवन,
मुंबई—४०० ०३२.

© प्रकाशकाधीन

**मुद्रक** — चंद्रकांत तापस,
श्री प्रसाद मुद्रण,
८ वर्धा मार्ग,
नागपूर—४०० ०१२.

**किंमत** — रु. २६/-

## अनुक्रमणिका

# निवेदन

मराठी भाषा व साहित्य यांचा सर्वांगिण विकास व्हावा; समाजाची भाषाविषयक आणि साहित्यविषयक जाण समृद्ध व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्याचे साहित्य आणि संस्कृती मंडळ कार्य करीत आहे. आधुनिक शास्त्रे, ज्ञान-विज्ञाने, तंत्र, प्राचीन भारतीय संस्कृती, इतिहास, कला अशा सर्वच क्षेत्रांमध्ये मराठी भाषेला वैभवशाली करावे असे मंडळाला वाटते. विद्यापीठीय पातळीवर शिकणाऱ्या आणि शिकवणाऱ्याही मंडळींना विपुल सामग्री त्या त्या अभ्यासक्षेत्रामध्ये प्राप्त व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ कार्य करीत आहे. या संदर्भात अनेक कार्यक्रम मंडळाने आजवर राबविलेले आहेत.

राजशेखराने शास्त्रकवी, काव्यकवी व उभयकवी असे कवींचे तीन प्रकार केले आहेत. क्षेमेन्द्राने वाङ्मयाचे शास्त्र, काव्य, शास्त्रकाव्य व काव्यशास्त्र असे चार प्रकार पाडलेले आहेत. संस्कृत वाङ्मयात जशी अनेक शास्त्रकाव्ये आहेत तशी व्याकरणशास्त्राची माहिती करून देण्याच्या उद्देशानेही लिहिली गेलेली अनेक काव्ये आहेत. अशा काव्यांमध्ये भट्टिकाव्य, वासुदेवविजय, धातुकाव्य व कविरहस्य यांचा समावेश करता येईल.

'भट्टि : व्यक्ती आणि वाङ्मय' हा प्रस्तुत ग्रंथ नागपूरच्या प्रा. सौ. प्रज्ञा देशपांडे यांनी लिहिलेला आहे. सदर ग्रंथात प्रा. देशपांडे यांनी भट्टिकाव्याची ओळख करून दिलेली आहे. शास्त्रकाव्य व व्याकरणप्रधान काव्यात भट्टिकाव्याचे स्थान अनन्यसाधारण आहे. अशा या एवगुणविशिष्ट भट्टिकाव्याच्या विविध अंगांचा उहापोह या ग्रंथात लेखिकेने केला आहे.

प्रा. सौ. प्रज्ञा देशपांडे यांनी सदर ग्रंथ मंडळाकडे प्रकाशनासाठी दिल्याबद्दल मंडळ त्यांचे आभारी आहे. अभ्यासक आणि जिज्ञासू वाचक या ग्रंथाचे स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

**यशवंत मनोहर**

मुंबई — अध्यक्ष,

दिनांक ४ एप्रिल १९८९ — महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

# पुरस्कार

डॉ. सौ. प्रज्ञा देशपांडे (पूर्वाश्रमीची कु. बेबी शामराव गोडसे) ही नागपूर विद्यापीठाच्या संस्कृत विभागांत १९६७ ते ६९ या वर्षी एम्. ए. ची विद्यार्थिनी होती. एम्. ए. करिता तिने व्याकरणशास्त्र हा विषय घेतलेला होता. व्याकरणशास्त्र हा विषय घेऊन ती १९६८-६९ या वर्षी प्रथम श्रेणीत दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. त्यानंतर तिने संशोधक विद्यार्थी म्हणून आपलें नांव नोंदविले व माझ्या मार्गदर्शनाखाली तिने 'वैयाकरणाच्या दृष्टिकोनांतून लिहिलेल्या कांही संस्कृत काव्यांचा अभ्यास' या विषयावर प्रबंध लिहिला. त्यामध्ये मुख्यतः संस्कृतांतील प्रसिद्ध भट्टिकाव्य, वासुदेवविजय, धातुकाव्य व कविरहस्य या काव्यांचा अभ्यास करून प्रबंध तयार केला. या प्रबंधाचे परीक्षक पुण्याचे डॉ. एस्. डी. जोशी व मुंबईचे डॉ. महाशब्दे हे होते. त्या दोघांनी सौ. प्रज्ञा देशपांडे त्यावेळच्या कु. गोडसे यांच्या प्रबंधाबद्दल कौतकास्पद उद्‌गातर काढले. तिची मौखिक परीक्षा प्रो. महाशब्दे यांनी घेतली आणि एकंदर तिच्या तयारीचे मोकळ्या मनाने कौतुक केले –

"No student of Sanskrit literature has done so far, such a valuable discussion at such a length as a candidate has done...."

सामान्यतः विद्यार्थ्यांचा कल व्याकरणाकडे नसतो. सौ. देशपांडे यांनी व्याकरणशास्त्राचा अभ्यास करण्यामध्ये एक प्रकारें धाडसच दाखविले आहे.

सौ. प्रज्ञा देशपांडे यांनी नागपूर विद्यापीठास प्रबंध सादर केला त्यापूर्वीच त्यांची नेमणूक नागपूर विद्यापीठांतील संस्कृत विभागात झाली होती. डॉक्टरेट् मिळाल्यानतरहि त्यांनी आपले व्याकरणाचे मौलिक अध्ययन सुरूच ठेवले. डॉक्टरेट्‌ची पदवी मिळविणे म्हणजे शेवट नसून संशोधनाचा प्रारंभ आहे. डॉ. सौ. प्रज्ञा देशपांडे यांनी ते व्रत सांभाळलेले आहे. याबद्दल मला मोठा संतोष होतो. त्यांचे आतापर्यंत - 'निरुक्त अध्याय १ व २,' तसेत 'ग्रंथ आणि ग्रंथकार' हे दोन ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. त्या ग्रंथातहि त्यांची मूलभूत संशोधक वृत्ति दिसून येते. भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे, विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक, नागपूर, स्वराज्य, मद्रास, प्रज्ञालोक नागपूर इत्यादिमध्ये त्यांचे संशोधनात्मक लिखाण वेळोवेळी प्रसिद्ध होत असते. यापूर्वीहि अनेकवार झाले आहे व अभ्यासकांनी त्यांच्या मूलभूत संशोधनाबद्दल वेळोवेळी प्रशंसेचे उद्‌गार काढले आहेत. या सर्वांचा परिपाक म्हणजे 'भट्टि व्यक्ति आणि वाङ्मय' हे पुस्तक होय. या पुस्तकांत डॉ. सौ. प्रज्ञा देशपांडे यांनी भट्टिकाव्यासंबंधी वैयाकरणाच्या दृष्टिकोनांतून आणि साहित्यिक दृष्टीनेहि मूलभूत विवेचन केले आहे ते विवेचन 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ' प्रसिद्ध करीत आहे. ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. या विवेचनाच्या प्रसिद्धीने भट्टिकाव्यासंबंधी व्याकरण व साहित्य मीमांसक या दोघांच्याहि दृष्टीतून चांगला ऊहापोह अभ्यासकांच्या समोर येईल व त्यांच्या अभ्यासांतील मूलभूत विचार अभ्यासकांच्या समोर येतील अशी माझी अपेक्षा आहे.

त्यांना सुयश लाभो अशी मी शुभेच्छा व्यक्त करतो.

अनुक्रमणिका

**ग. त्र्यं. देशपांडे**
सेवानिवृत्त प्राध्यापक व
संस्कृत विभाग प्रमुख, नागपूर विद्यापीठ
नागपूर.

दि. १५ मार्च १९८८.
मुंबई.

# अनुक्रमणिका

# ऋणनिर्देश

काव्यांची निर्मिती रसदृष्ट्या व्हावी आणि रसभावादींना समोर ठेवूनच महाकवींनी काव्य लिहावी असा साहित्यशास्त्राचा दंडक असला तरीहि संस्कृतांतील कांही कवींनी व्याकरणाची दृष्टि समोर ठेवून आपलीं काव्यें रचलेली आहेत. अशा काव्यांत भट्टिकाव्य हें प्रधान महाकाव्य आहे. या काव्यांत प्रकीर्ण, अधिकार, प्रसन्न व तिङन्त असें व्याकरणाच्या दृष्टीने भाग पाडतात. भट्टिकाव्याचा परामर्श अनेक लेखकांनी घेतलेला आहे. परंतु तो घेतांना त्यांनी त्याची परीक्षा रसभावदृष्ट्याच करण्याचा प्रयत्न केला आहे. आणि इतर महाकाव्यांच्या तुलनेंत त्याचें स्थान ठरविण्यांत आले आहे. व्याकरणाच्या दृष्टीने त्याचा विचार करणारे लेख किंवा प्रबंध लिहिले गेल्याचे अवलोकनांत नाही, कवीनेच "मी व्याकरणाच्या दृष्टीतून लिहित आहे असें म्हटले आहे त्यामुळे त्याचे परीक्षण त्या दृष्टिकोनांतून होणे अधिक उचित होईल. या कारणास्तव भट्टिकाव्याच्या अध्ययनाची पुनः आवश्यकता आहे म्हणून पाणिनीय सूत्रांशी संबंधित असलेले भट्टिकाव्य अभ्यासार्थ घेऊन ते पाणिनीय सूत्रांचे निदर्शन कसें होते हे दाखविण्याचा प्रस्तुत प्रयत्न आहे. व्याकरण आणि काव्य त्यांतहि प्रामुख्याने व्याकरणाच्या दृष्टीने भट्टिकाव्याचा परामर्श प्रस्तु पुस्तकांत अभ्यासकांना बघायला मिळेल.

भट्टिकाव्याची विभागणी मुख्यतः चार प्रकारची आहे ती अशी – प्रकीर्ण कांड हा पहिला विभाग आहे. त्यांत भट्टिकाव्याची सर्ग १ ते सर्ग ५ मधील ९६ श्लोकांचा अंतर्भाव दिसतो. त्यांत कुठलाहि सलगपणा नाही म्हणजे या विभागांतील श्लोकांची रचना प्रकीर्ण आहे असें परंपरेने समजण्यांत येते. परंतु अभ्यासांती असें लक्षांत येते की, पाणिनीय अष्टाध्यायीनुसार त्यांतील सूत्रांची रचना झालेली नसली तरी या प्रकीर्ण कांडांत भट्टीने व्याकरणविषयक वैशिष्ट्यें, कठीण रूपें इत्यादींचा परिचय घडविला आहे. हा आणि अशाच प्रकारचा विचार प्रस्तुत पुस्तकांतील प्रकीर्ण कांड आणि "दीपतुल्यः प्रबन्धोयम्' या भागांत केलेला दिसेल.

व्याकरणाची दृष्टि समोर ठेवून भट्टीनें भट्टिकाव्याची रचना केली असली तरी त्यांत कांही दोष दिसतात. वेगवेगळ्या टिकाकारांनी ते दोष म्हणजे दोष नाहीत असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि मुळांतील दोष त्यामुळे दूर होऊ शकले नाहीत. प्रस्तुत पुस्तकाच्या दृष्टीने त्यांचा विचार होणे महत्त्वाचे आहे. म्हणून त्यांचाहि ऊहापोह याच भागांत केलेला आहे.

अशारीतीने अनेक वैयाकरणांच्या व साहित्यिकांच्या बुद्धीच्या कसोटीवर उतरलेले हे भट्टिकाव्य अभ्यासकांना मुर्धाभिषिक्त वाटत असेल तर त्यांत नवल ते काय! भट्टिकाव्यांतील वचनांचा म्हणूनच अनेक लेखकांनी त्यांच्या ग्रंथांत प्रमाण म्हणून उल्लेख केला आहे. निदर्शनात्मक अशा माधवीय धातुवृत्ति, सिद्धांत कौमुदी व तत्त्वबोधिनी या ग्रंथांमध्ये उद्धृत केलेल्या वचनांचा विचार या पुस्तकांत केला आहे.

भट्टिकाव्याचा दुसरा विभाग म्हणजे अधिकार कांड होय. त्यांत सर्ग ६ ते सर्ग ९ मधील श्लोकांचा अंतर्भाव होतो. त्यांत पाणिनीय अष्टाध्यायीतील सूत्रांच्या क्रमाने निदर्शनें मिळतात. ही सर्व रूपें त्यांतील प्रकृती आणि प्रत्यय या दृष्टीने पाणिनीने अष्टाध्यायीत तीन ते पांच अध्यायांतून विवेचिलेली आहेत आणि पदांपदांतील कारक संबंध आणि सामासिक विशेष हें दुसऱ्या अध्यायांत आले आहेत. या सर्वांची ओळख भट्टीने शक्यतोवर सूत्रक्रमाने करून दिलेली आहे. हा भट्टिकाव्याचा महनीय विशेष आहे. म्हणूनच या काव्याच्या अध्ययनाने पाणिनीय

व्याकरणांतून आलेल्या पहिल्या पांच अध्यायांतील सर्व विशेषांची तयारी होते एवढेच नाही तर त्यांत सहजतेने व्युत्पन्नता प्राप्त होते. या पांच अध्यायांत आलेले संज्ञा, नियम, पदविधि धातूंना लागणारे प्रत्यय, प्रातिपदिकें व त्यांचे विकार, नामसाधित प्रातिपदिकें या सर्वांची त्या त्या वैशिषष्ट्यासह निदर्शने भट्टिकाव्यांत आलेली आहेत. आणि प्रस्तुत काव्यांत शब्दांची योजना अशाच प्रकारें केला आहे कीं, ज्यामुळे या पांच अध्यायांतील विशेषांचे दर्शन या काव्यांतून व्हावे तेव्हा भट्टीने आपल्या काव्यांतून केलेले पाणिनीय सूत्रांचे अनुसरण हे भट्टिकाव्याने शास्त्र व्युत्पन्नतेला दिलेल्या प्राधान्याचेच निदर्शन ठरतात आणि त्याच्या काव्याचे प्रतिपादक ठरतात.

भट्टिकाव्याचा तिसरा विभाग म्हणजे प्रसन्न कांड होय. त्यांत सर्ग १० ते सर्ग १३ मधील श्लोकांचा अंतर्भाव होतो. वरील विवेचनावरून असा ग्रह होऊ नये कीं, भट्टिकाव्यांतील पद्यें म्हणजे व्याकरणाच्या शुष्क कारिका आहेत. भट्टिकाव्याच्या प्रसन्न कांडांतील निदर्शनांवरून त्याचे अलंकारशास्त्राचे नैपुण्य प्रतीत होते व असेहि म्हणावेसे वाटते की, भट्टिकाव्य ज्याप्रमाणे व्याकरणाचे निदर्शन आहे त्याप्रमाणे तत्कालीन अलंकार शास्त्राचेहि निदर्शन आहे. भट्टि हा भामहपूर्वकालीन आहे असें अभ्यासकांचे मत असल्याचे मी प्रस्तुत पुस्तकांत सांगितलेले आहे. भरतोत्तर परंतु भामहपूर्वकालीन अलंकार शास्त्राचे स्वरूप कसें होते हे पाहावयाचे असल्यास भट्टीचे प्रसन्नकांड हे एक महत्त्वाचे साधन होईल, असें म्हणता येते. कांही ठिकाणी तर दंडि व भामह यांच्या अलंकारांच्या लक्षणांचे चांगल्या प्रकारची निदर्शने म्हणून भट्टीचें प्रसन्न कांडांतील श्लोक देता येतील इतके चांगलें हे कांड उतरले आहे. तेंव्हा भट्टि हा केवळ क्लिष्ट आणि शुष्क पद्यरचना करणारा एक लेखक आहे असें न मानता त्याच्या ठिकाणी काव्यज्ञता व अलंकारांतील वैचित्र्यनिर्मितीचे सामर्थ्य आहे हें स्पष्ट दिसून येईल. भट्टि हा व्याकरणशास्त्रांत निष्णात आहे पण तो शुष्क वैयाकरण नाही, तो आलंकारिकहि चांगल्या प्रकारचा आहे. हे प्रसन्न कांडावरून दिसते पण तो केवळ अलंकारांच्या व्याख्या देणारा आलंकारिकही नाही. या दोनहि शास्त्रांतील त्याची निपुणता दिसते. पण तो नीरस शास्त्रज्ञ नाही. भट्टिकाव्यांतील माधुर्य गुणाकरिता लिहिलेले प्रभातवर्णन, द्वितीय सर्गातील शरद्वर्णन, इ. वर्णनें विचारांत घेता भट्टिकाव्यांत रसवत्ता आहे हे निश्चित प्रत्ययास येते.

भट्टिची ही रसवत्ता प्रस्तुत पुस्तकाच्या प्रसन्नकांड या भागात अ, आ, इ, उ असें पोटविभाग करून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भट्टिकाव्याचा चवथा विभाग म्हणजे तिङन्त कांड होय. त्यांत सर्ग १४ ते सर्ग २२ मधील श्लोकांचा अंतर्भाव होतो. वैयाकरणांनी एकूण लट् लिट् आदि दहा लकार मान्य केले आहेत. परंतु लेट् लकार केवळ वेदांत प्रयुक्त होतो म्हणून नऊ लकारांचा लौकिकांत वापर होत असतो. त्या नऊ लकारांची भट्टीने या तिङन्त कांडांत वेगवेगळी निदर्शने दिलीं आहेत. प्रत्येक लकारासाठी त्याने एक सर्ग याप्रमाणे नऊ लकारांसाठी नऊ सर्गांची रचना केली आहे. धातुपाठांतील विविध धातूंच्या लकारांचा त्या विशिष्ट सर्गामधून विलास केला आहे. या सर्वांचा विचार प्रस्तुत पुस्तकाच्या तिङन्त कांडांत केलेला आहे.

याप्रमाणे भट्टिकाव्याचें चार विभाग आहेत म्हणून प्रस्तुत पुस्तकांत देखील चार विभागांतून विवरण करण्याचा ह नम्र प्रयत्न केलेला आहे.

अनुक्रमणिका

चारहि भागांतून आलेले कथानक व वाल्मीकींच्या मूळ रामायणकथेच्या भट्टीने आपल्या रचनेसाठी केलेला संकोच वा विस्तार हा त्या कथानकाला जोडूनच "रचनापद्धती" या उपशीर्षकाखाली दिलेला आहे. म्हणून प्रत्येक विभागाच्या आरंभी कथानक व रचनापद्धती असा एक भाग दिलेला आहे तसेच त्या त्या कांडांतील वैशिष्ट्यें देखील त्याच भागांत दिली आहेत. मग ती वैशिष्ट्यें व्याकरणविषयक असो अथवा साहित्यविषयक असोत.

याप्रमाणे प्रस्तुत पुस्तक तयार झाले. त्याचे श्रेय माझा या प्रांतांत प्रवेश करून देणाऱ्या माझ्या गुरुजनांना आहे मी हायस्कूलमध्ये असतांना स्व. दादाशास्त्री गाडगे यांनी मी व्याकरणाचा अभ्यास करावा असें बोलून दाखविले. संस्कृत श्लोकांचे सौंदर्य कसें आस्वादावे हे त्यांनीच मला शिकविले. त्यांचे मला याप्रसंगी स्मरण होत आहे.

गुरुवर्य डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांनी तर अजूनसुद्धा माझ्याबद्दल पूर्वीइतकीच आस्था ठेवली आहे. माझ्या स्वाध्यायांत खंड तर पडत नाहीना हें ते दक्षतेने पाहतात. माझा लहानसा लेख कां असेना लागलीच वाचून त्याबद्दल ते समाधान व्यक्त करतात व मला प्रोत्साहित करतात. यावेळी देखील मी प्रस्तुत पुस्तक त्यांच्याकडे घेऊन गेले त्यावेळी खरें, तर त्यांची शरीरयष्टी पूर्वीइतकी काम करीत नसेल कदाचित् परंतु हें पुस्तक हातांत पकडून त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडणारा आनंद बघून आपण धन्य झालो असे वाटलें अन् स्वतःशीच अंतर्मुख होऊन मन म्हणू लागले या आनंदाचा धनी होण्यास आपण खरेच लायक आहो काय? मोठ्या समाधानाने लिहून दिलेला त्यांचा पुरस्कार या पुस्तकास जोडला आहे. त्यांनी अत्यंत आपुलकीने हा ग्रंथ अभ्यासकांसमोर ठेवला आहे. त्यांची उतराई मी कशी होऊ? केवळ एवढेच म्हणते —

"वस्तु त्वदीयमाचार्य तुभ्यमेव समर्पयें"।

डॉ. गुणाकरराव पिंपळापुरे, संस्कृत विभाग प्रमुख, धरमपेठ महाविद्यालय यांचेहि मला मोलाचे साहाय्य झाले. त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करते.

हे पुस्कत तयार झाले किंवा नाही याची आस्थेने चौकशी करणारे डॉ. वा. शि. उपाख्य दादासाहेब बारलिंगे यांचीहि मी ऋणी आहे.

आपल्या माणसांचे प्रयत्न हे बहुधा नेहमी मागे पडतात. कारण प्रगटपणें त्यांचा उल्लेख करिता येत नाही, करतांना संकोचहि वाटतो. तरीपण मला माझ्या कुटुंबियांचा मोठा आधार वाटतो. माझे यजमान ॲड्. विजय देशपांडे यांचा माझे जे काय श्रेय असेल त्यांत सिंहाचा वाटा असतो. अगदी लिखाणापासून तो त्यासाठी बाहेरगांवी किंवा नागपुरांत देखील जावे लागले तरी ते कधीहि नापसंती दाखवित नाहीत. त्यांच्याविषयी अधिक काय लिहूं?

माझा हा अल्पसा प्रयत्न 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ' छापणार आहे ही कल्पनाच मुळी माझा उत्साह द्विगुणीत करणारी ठरली. एरवी कौटुंबिक अडचणी अन् वडिलांच्या मृत्युसारखे आघात मी पचवूं शकले

नसतें. डॉ. त्र्यं. कृ. टोपे आणि डॉ. सुरेन्द्र बारलिंगे यांनी वेळोवेळी माझा अडचणींचा मार्ग प्रकाशित केला, मी त्यांची अत्यंत आभारी आहे.

या पुस्तकांतील दोष व उणिवा मात्र माझ्याच आहेच. पूर्वसूरींशी त्यांचा संबंध नाही. त्या दोषांची मला जाणीवही आहे. अनेक स्थळी यांत अनुक्तदुरुक्तें असतील काही मुद्रणदोषांचीहि भर कदाचित् पडेल. कांही पानांत नव्या जुन्या लेखन पद्धतीची गल्लत झाली असेल. हे सर्व दोष मला दिसत आहेत. अभ्यासकांनी तिकडे क्षमाबुद्धीने पहावे.

पण हें सर्व करूनहि पुस्तक पूर्ण व निर्दोष झाले असें म्हणवत नाही. दोन डोळ्यांना कितीसे दिसणार व दोन हातांनी किती काम होणार? विश्वांत पूर्ण व निर्दोष असा परमेश्वरच आहे. पण त्यालाहि त्याकरिता सहस्राक्ष व सहस्रबाहु व्हावे लागले. या पुस्तकांतील दोष व उणिवा अभ्यासकांनी माझ्या नजरेला आणाव्यांत अशी विनंती आहे. मी त्या काढून टाकण्याचा प्रयत्न करीन.

नागपूर :
गुढीपाडवा
१८ मार्च १९८८

**सौ. प्रज्ञा व्ही. देशपांडे**

**अनुक्रमणिका**

# चार शब्द

डॉ. सौ. प्रज्ञाताई देशपांडे. प्राध्यापक, संस्कृत विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे, 'भट्टिः व्यक्ति व वाङ्मय' हे पुस्तक महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाद्वारा प्रकाशित होत आहे. याचा मला आनंद वाटतो. भट्टिकाव्य हे संस्कृतातील स्वतंत्र दालन आहे व ते तसे ठेवण्यात औचित्यहि आहे. भट्टि-काव्यात राम-कथा गुंफली असली तरी काव्याला मात्र कवीच्याच नावे प्रसिद्धि लाभावी हा एक आगळा वेगळा प्रकार आहे. माघकवीचे काव्य माघकाव्य या नावाबरोबर शिशुपालवध या दुसऱ्या नावाने तरी प्रसिद्ध आहे. भट्टि-काव्य मात्र भट्टिकाव्य म्हणूनच गाजले. भट्टि-कवीच्या प्रौढतेचा हाच मोठा निकष होय.

अर्थात् हा चमत्कार यदृच्छेने घडला असे मात्र कोणीहि म्हणणार नाही. त्यामागे स्वतः कवीचे एक दणकट व्यक्तिमत्त्व कारणीभूत झाले आहे. भट्टिकवीने मोठ्या निर्धाराने संस्कृत सारस्वतात एक नवी वाट चोखाळली. त्या वाटेचे तेच एकमेव वाटसरू राहिले दुसरे काही तुरळक, त्यांच्या मागे चालून बघत होते. फार अंतर त्यांनाहि चालता आले नाही. भट्टिकवीच्या वाटेवर केवळ त्यांच्याच खोल पाऊलखुणा उमटल्या आहेत.

व्याकरण व साहित्य यांच्या संबंधात एक नवीच दिशा भट्टिकवि दाखवीत आहेत हेच त्यांचे 'एकुलतेपण' होय. साहित्य हे व्याकरणाचे पुच्छ म्हणजेच प्रतिष्ठा होय. व्याकरणाने दिलेल्या शुद्ध शब्दांचा ललित आविष्कार काव्यात आढळतो आणि त्या शब्दांना व त्यामागोमाग व्याकरणालाहि त्यामुळे प्रतिष्ठा लाभते. ललित साहित्य हे याप्रमाणे व्याकरणाचे मोरपीस म्हणता येईल. परंतु या व्यवस्थेत एक साचलेपण निर्माण झाले व व्याकरणातील निवडक रूपे निवडक धातू व निवडक काळ यांचाच साहित्यात आविष्कार होत राहिला. शब्द-निर्मितीची संस्कृत व्याकरणाची अजोड क्षमता लक्षात घेतली तर भट्टिकविसारख्या व्याकरणपंडिताला ही 'ठराविकांची' साहित्यातील मक्तेदारी सलणे स्वाभाविकच होते. या साठी भट्टिकवीने पाणिनीच्या अष्टाध्यायीचा अजोड व्यासंग करून साहित्याच्या प्रांगणात तो साऱ्याचा सारा सादर करण्याचा संकल्प सोडला. यातहि भट्टिकवीची एक वेगळी दृष्टि दिसते. व्याकरणातील सारीच सूत्रे व तीहि स्वैरपणे उपयोगात आणून सिद्ध झालेल्या शब्दरूपांनी आपल्या काव्याला भट्टिकवि सजवू इच्छित नाहीत. त्यांनी काही निवडक सूत्रे – आपण त्याला प्रतिनिधिक किंवा प्रतीकरूप मानू – ध्यानी घेऊन व तीहि यथाशक्य क्रमानेच ध्यानी घेऊन बनलेल्या शब्दांचा आपल्या काव्यात फार मोठ्या प्रमाणात विनियोग केला. या संदर्भात भट्टिकवीने कोणतीहि जरठता पत्करली नाही व तशी पत्करणे शक्यहि नव्हते. रामकथेच्या माध्यमानेच भट्टीला आपले व्याकरणप्रभुत्व प्रकट करायचे असल्याने अष्टाध्यायीच्या क्रमानेच शब्दसिद्धि करून ती काव्यात सादर करायची कवीने ठरविली असती तर कथेचा सारा तोलच बिघडून गेला असता. यासाठी कवीने एक अभिनव युक्ति योजिली. अष्टाध्यायीच्या क्रमानुसार रूपसिद्धि काव्यरचनेत सादर केलेला एक विभाग तर तो क्रम विचारात न घेता रूपसिद्धि सादर केलेला दुसरा विभाग असे दोन विभाग भट्टि कवींनी योजिले याचीच नावे आहेत अधिकार काण्ड व प्रकीर्ण काण्ड. या व्यक्तिरिक्त तिङन्त काण्ड व प्रसन्न काण्ड असेहि दोन वर्ग त्याने योजले. याप्रमाणे बावीस सर्गाच्या व सोळाशे पंचवीस श्लोकाच्या या भट्टिकाव्याचे एकून चार विभाग पडतात. ऋग्वेदात मण्डलात्मक वर्गीकरण व अष्टकात्मक वर्गीकरण अशी दोन्ही वर्गीकरणे आढळतात. भट्टिकाव्यात देखिल तसेच काहीसे झाले आहे.

अनुक्रमणिका

सर्गात्मक वर्गीकरण केवळ कथानकाच्या दृष्टीने आहे. ज्यांना केवळ संविधानाचा विकास अभ्यासायचा असेल त्यांना प्रत्येक सर्गाच्या शेवटी दिलेल्या नामाभिधानावरून श्रीराम संभवो नाम प्रथमः सर्गः, मारुति-संयमो नाम नवमः सर्गः, शरबन्धो नाम चतुर्दशः सर्गः, अयोध्या प्रत्यागमनं नाम द्वार्विंशः सर्गः – इत्यादि नामाभिधानावरून तो अभ्यास करता येईल; पण तो अगदीच जेमतेम,. कारण भट्टिकवीच्या व्याकरणपांडित्याचे वैभव ज्यांनी प्रथम जाणून घेतले नसेल त्यांना सर्गान्त नांवावरून संविधानाच्या विकासाची कितीशी कल्पना येईल याची शंकाच आहे. भट्टिकाव्याचा सुप्रसिद्ध टीकाकार जयमङ्गल. तो भट्टिकाव्यातील कथानकाला लक्ष्यरूप म्हणतो तेहि एका दृष्टीने बरोबर आहे. परंतु तेवढ्यावरून भट्टि-काव्याच्या स्वरूपाची ओळख होणार नाही याचीहि त्याला कल्पना आहे. म्हणूनच प्रत्येक सर्गाच्या शेवटी भट्टिकाव्याची दोन तऱ्हेने त्याने ओळख करून दिली.

१ श्रीभट्टिकाव्ये प्रथमे ‘प्रकीर्ण-काण्डे’ लक्षणरूपः प्रथमः परिच्छेदः (वर्गः) तथा लक्ष्यरूपे कथानके श्रीरामसंभवो नाम प्रथमः सर्गः ।

२ श्रीभट्टिकाव्ये द्वितीयेऽधिकारकाण्डे लक्षणरूपे द्वितीयः परिच्छेदः (वर्ग) तथा लक्ष्यरूपे कथानके सीताऽन्वेषणं नाम सप्तमः सर्ग पर्यनसितः ।

३ श्रीभट्टिकाव्ये तृतीये प्रसन्नकाण्डे लक्षणरूपे प्रथमः परिच्छेदः (वर्गः) तथा लक्ष्यरूपे कथानके सीताऽभिज्ञानदर्शनं नाम दशमः सर्ग ।

४ श्रीभट्टिकाव्ये चतुर्थे तिङन्तकाण्डे लक्षणरूपे द्वितीयः परिच्छेदः (वर्गः) तथा लक्ष्यरूपे कथानके कुम्भकर्णवधो नाम पञ्चदशः सर्ग ।

कोणत्याहि संस्कृत महाकाव्यात या तऱ्हेची ओळख आढळत नाही. हेच या काव्याचे वैशिष्ट्य होय. भट्टिकाव्याला लक्ष्य-लक्षणकाव्य म्हणतात ते यासाठी.

इथे कथानकाला लक्ष्य म्हणून संबोधिले असले तरी ते तांत्रिकदृष्टीने . कारण खरा भर लक्ष्यरूप कथानकावर नसून लक्षणरूपावरच आढळतो. लक्षणाचे भट्टीने दोन प्रकार केले आहेत. शब्दलक्षण व काव्यलक्षण. त्यापैकी दहा ते तेरा सर्गापर्यंतच त्याने काव्यलक्षणाचा विनियोग केला. इतरत्र मात्र शब्दलक्षणाचा भट्टि स्वतः शब्दसिद्धीचा मोठा शिल्पकार असला तरी ललितसाहित्याची गुणालंकारादि अंगे देखील त्याने तेवढ्याच साक्षेपाने जोपासली होती. या गोष्टीचा प्रत्यय वरील चार सर्गात चांगलाच येतो. अनुप्रास-यमकासारख्या शब्दालंकाराचे अवान्तर प्रकार व अर्थालंकारातहि बरेचसे अप्रसिद्ध अलंकार या प्रसन्नता कांडात आपली उपस्थिति लावीत आहेत याचा आनंद होतो. व्याकरणाची साहित्यात नवी ‘प्रतिष्ठा’ निर्माण करण्याचे कंकण जर भट्टीने घेतले नसते तर निखालस ललित रचना इतरहि कांडात त्याला सहज करून दाखविता आली असती असे सहज म्हणता येते. दुसऱ्याच सर्गातील पुढील श्लोक या गोष्टीची साक्ष देईल.

न तज्जलं यन्न सुचारु पङःकजं
न पङ्कजं तद् यदलीनषट्पदम् ।

अनुक्रमणिका

न षट्पदोऽसौ न जुगुञ्ज यः कलं
न गुञ्जितं तन्न जहार यन्मनः ॥

मम्मटाचार्यांनी एकावली अलंकारासाठी प्रस्तुत श्लोक निवडला हे येथे लक्षात घेण्याजोगे आहे.

परंतु त्या काळाचे 'विदग्ध-मानस' सौष्ठवापेक्षा 'सम्यक्ते' कडे व कलात्मकतेपेक्षा कठोर शास्त्रनिष्ठतेकडे अधिक वळाले असावे असे दिसते. प्रसन्नता काण्डाच्या आरंभी जयमंगलाने केलेली प्रसन्नतेची व्याख्या या दृष्टीने मोठी उद्‌बोधक आहे.

"प्रसन्नता नाम अविद्वदंगना-बाल प्रतीतार्थम्" त्याकाळी प्रसाद गुणाचे समीक्षकांच्या मनात कोणते चित्र' उभे ठाकत असे हे या व्याख्येवरून सहज लक्षात येते. भट्टिकवीला त्या काळालाच सामोरे जायचे असल्याने स्वाभाविकच प्रसन्नता कांडाला कुठेतरी मध्ये घालून आदि-मध्यान्ती मात्र व्याकरणालाच त्याने निरंकुख सत्ता व प्रतिष्ठा मिळवून दिली. साहित्य ही व्याकरणाची केवळ कौतुकभूमीच नव्हे तर मी 'व्यायामभूमि' देखील होय हे भट्टीनेच प्रथम व शेवट संस्कृत साहित्यकारांना दाखवून दिले.

भट्टिच्या काव्याची परामर्श ही एक अत्यंत आवश्यक व अवघड गोष्ट होती. आवश्यक यासाठी की संस्कृत वाङःमयाच्या चिरप्रवासाचा तो एक महत्त्वाचा टप्पा असल्याने बाणभट्टाच्या कादंबरीप्रमाणे आदळआपट करीत का असेना, त्या काव्याची (विशिष्ट आस्वादासाठी) ओळख करून घेणे योग्यच होय, व अवघड यासाठी की व्याकरणाकडे व त्यातहि रूपसिद्धीकडे आता फारसे लक्ष उरले नाही. अशा वेळी या उपेक्षित व जटिल अभ्यासाकडे स्वतः वळून डॉ. सौ. देशपांडे यांनी ही महत्त्वाची कामगिरी बजावली आहे; या दिशेने झालेला हा मराठीतील पहिलाच प्रयत्न असावा. कोणत्याहि प्रथम प्रयत्नाला मर्यादा येऊन पडतात पण नव्या दिशेने वाटचाल करण्याचे त्यात प्रोत्साहन असते हेही विसरता येत नाही.

या दृष्टीने प्रस्तृत पुस्तकाचे मी मनःपूर्वक स्वागत करतो. वस्तुतः व्याकरणाची माझी बाजू अत्यंत दुबळी असल्याचे माहिती असूनहि लेखिनेके पुस्तकाला चार शब्द जोडण्याचे मला सांगावे हाहि मला बहुमान वाटतो. लेखिकेचे अभिनन्दन !!

**डॉ. गु. वा. पिंपळापुरे**
सेवानिवृत्त, संस्कृत विभाग प्रमुख,
धरमपेठ महाविद्यालय,
नागपूर.

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


निवेदन ........ 4

पुरस्कार ........ 5

ऋणनिर्देश ........ 7

चार शब्द ........ 11

विषय प्रवेश ........ 16

–भट्टि॰विषयी माहिती ........ 22

प्रकीर्ण कांड ........ 30

कथानक व रचनापद्धती ........ ३०

दीपतुल्यः प्रबन्धोऽयम् ........ 35

भट्टिकाव्यांतील कांही वैशिष्ट्यपूर्ण रूपें व दोष ........ ४४

भट्टिकाव्यांत आढळणारे कांही व्याकरणविषयक दोष ........ ५७

भट्टिकाव्यांतील वचनांचा इतर लेखकांनी केलेला उल्लेख ........ 60

अ)माधवीय धातुवृत्ति ........ ६०

आ) सिद्धांत कौमुदी ........ ७१

इ) तत्त्वबोधिनी ........ ७६

अधिकार कांड ........ 85

कथानक व रचनापद्धती ........ ८५

अधिकारवैविध्य ........ ८७

प्रसन्न कांड ........ 147

कथानक व रचनापद्धति ........ १४७

अ] अलंकारशास्त्राचें निदर्शन याद्दष्टीने भट्टिकाव्य ........ १४९

शब्दालंकार ........ १४९

अर्थालंकार ........ १५६

आ] माधुर्य ........ १८१

इ] भाविक ........ १८३

ई] भाषासम ........ १९५
उ] सौशब्दय ........ १९७
तिङन्त कांड ........ 199
कथानक व रचनापद्धती ........ १९९
लकारपरिचय ........ २०३
उपसंहार ........ 204
ग्रंथसूची ........ 208

# विषय प्रवेश

स्वादुकाव्यरसोन्मिश्रं शास्त्रमप्युपयुज्यते ।
प्रतमालीढमधवः पिबन्ति कटुभेषजम् ॥ [भामह, काव्यालंकार] ५/३

राजशेखर आपल्या काव्यमीमांसेत म्हणतो की, “प्रतिभाव्युत्पत्तिमांश्च कविः कविरित्युच्यते” । [राजशेखर, काव्यमीमांसा, काव्यपाककल्प, अध्याय ५.] प्रतिभा आणि व्युत्पन्नता ज्याच्या ठिकाणी असते त्याला कवि असे म्हणतात. पुढे तो म्हणतो, “स च त्रिधा । शास्त्रकविः, काव्यकविरुभयकविश्च” । राजशेखराने कवीचे शास्त्रकवि, काव्यकवि आणि उभयकवि असे तीन प्रकार दिले आहेत आणि ते त्या निकषाला धरून आहेत. प्रत्येक प्रकारची त्याने लक्षणे दिली आहेत. आपण केवळ शास्त्रकवीचे लक्षण बघून पुढे जाऊ कारण प्रस्तुत प्रकरणाशी त्याचा निकटचा संबंध आहे.

“शास्त्रकविः काव्ये रससम्पदं विच्छिनत्ति । शास्त्रकवि प्रतिपादनाचा विषय शास्त्रीय असल्याने त्यातील गांभीर्य सुसह्य होण्यासाठी आपल्या काव्यात उत्तम रस, ध्वनि इत्यादींच्या द्वारा रससंपत्तीची शोभा वाढवीत असतो. राजशेखराप्रमाणे क्षेमेन्द्राचे मत देखील असेच आहे त्याच्या सुवृत्तितिलकांत तो म्हणतो,

शास्त्रं काव्यं शास्त्रकाव्यं काव्यशास्त्रं च भेदतः ।
चतुष्प्रकारं प्रसरः सतां सारस्वतो मतः ॥
शास्त्रं काव्यविदः प्राहुः सर्वाकाव्यांगलक्षणम् ।
काव्यं विशिष्टशब्दार्थसाहित्यसदलंकृति ॥
शास्त्रकाव्यं चतुर्वर्गप्रायं सर्वोपदेशकृत् ।
भट्टिभौमकाव्यादि काव्यशास्त्रं प्रचक्षते ॥ [क्षेमेंद्र, सुवृत्ततिलक, तृतीय विन्यास २-४]

क्षेमेंद्राने वाङ्मयाचे शास्त्र, काव्य, शास्त्रकाव्य, काव्यशास्त्र असे चार प्रकार केले आहेत. काव्य व काव्यांगांच्या लक्षणांचा बोध करून देणारे ते शास्त्र होय. विशिष्ट शब्द व अर्थानी अलंकृत असणारें तें काव्य होय. चतुर्वर्गाचा उपदेश करून देणारे रामायण व महाभारतासारखे ग्रंथ शास्त्रकाव्य होत आणि भट्टि भौमकांच्या काव्यांना काव्यशास्त्र म्हणतात. क्षेमेंद्राच्या या लक्षणावरून स्पष्ट होते की, जो ग्रंथ काव्य असून देखील विशेष शास्त्राशी संबंध ठेवतो, त्याला क्षेमेंद्र काव्यशास्त्र म्हणतो. राजशेखर आणि क्षेमेंद्र या दोघांनी दिलेली लक्षणे (शास्त्रकाव्य व काव्यशास्त्राची) सारखीच आहेत. त्यात भेद एवढाच की, राजशेखर ज्या अर्थात शास्त्रकाव्य शब्द वापरतो त्याच अर्थात क्षेमेंद्र काव्यशास्त्र शब्द उपयोगांत आणतो. केवळ राजशेखरच नाही तर शास्त्रकाव्य हा शब्दप्रयोग अने साहित्यिक करीत असतात. म्हणून आपण देखील शास्त्रकाव्य हाच शब्दप्रयोग करू.

संस्कृत वाङ्मयात अशीं अनेक शास्त्रकाव्यें निर्माण झाली त्याचप्रमाणे व्याकरणशास्त्राचा बोध करून देण्याच्या उद्देशाने अनेक काव्ये लिहिली गेली त्यात भट्टिकाव्य, वास्सुदेवविजय, [या काव्यासंबंधी विस्तृत विवेचन – गोडसे, बी. एस्. “व्याकरणाच्या दृष्टिकोनातून लिहिलेल्या काही संस्कृत काव्याचा अभ्यास” आमच्या या प्रबधांत पहा.] धातुकाव्य, [या काव्यासंबंधी विस्तृत विवेचन – गोडसे, बी. एस्. “व्याकरणाच्या दृष्टिकोनातून लिहिलेल्या काही संस्कृत काव्याचा अभ्यास” आमच्या या प्रबधांत पहा.] कविरहस्य [या

अनुक्रमणिका

काव्यासंबंधी विस्तृत विवेचन – गोडसे, बी. एस्. "व्याकरणाच्या दृष्टिकोनातून लिहिलेल्या काही संस्कृत काव्याचा अभ्यास" आमच्या या प्रबधांत पहा.] यांचा समावेश होतो.

संस्कृतात असे अनेक वैयाकरण आहेत की, ज्यांनी लक्षण ग्रंथाची रचना केली व त्या लक्षणाची चरितार्थता दाखविण्यासाठी लक्ष्यरूप काव्यग्रंथ देखील रचले. काही वैयाकरण असेहि आहेत की, ज्यांनी लक्षण ग्रंथाचे स्वतंत्रपणे प्रवचन केले नाही. परंतु केवळ लक्ष्यरूप काव्यग्रंथांची रचना केली. प्रस्तुत प्रकरणांत आपण वरील दोनही वैयाकरणांच्या सृष्टीचा विचार करू.

### व्याकरणप्रधान काव्यें

व्याकरणप्रधान काव्यें लिहिणाऱ्या कवींमध्ये सर्वप्रथम पाणिनीचे नाव येते. आपणहि पाणिनिपासून प्रारंभ करू.

१. पाणिनि – पाणिनीच्या काव्याचें नांव "जाम्बवतीविजय" किंवा पातालविजय' असे आहे. या काव्यांत पाणिनीने श्रीकृष्णाचा पाताल लोकांतील विजय व जाम्बवतीच्या विवाहाची कथा वर्णन केली आहे.

डॉ. पीटर्सन इ पाश्चात्य व डॉ. भांडारकरांसारखे काही पौरस्त्य विद्वानांचे असे मत आहे की, उपलब्ध असलेली जाम्बवतीविजयाची लालित्यपूर्ण रचना व त्यातील क्वचित् व्याकरणनियमांचे उल्लंघन ही गोष्ट जुळत नाही. अर्थातच हे काव्य शुष्क वैयाकरण पाणिनींची कृति असणे संभवत नाही. परंतु युधिष्ठिर मीमांसकांना हे म्हणणे पटत नाही. "भारतीय वाङ्मयांत जाम्बवतीविजयाचा कर्ता म्हणून पाणिनींचा उल्लेख केलेला आहे. अनेक वैयाकरण अष्टाध्यायीने न साधणाऱ्या शब्दांचे साधुत्व सिद्ध करण्यासाठी या काव्याला पाणिनीचे काव्य मानून उद्धृत करतात. [मीमांसक युधिष्ठिर, संस्कृत व्याकरणशास्त्र का इतिहास, भाग –२ पृ. ३७२] ज्या ऋषींनी मन्त्र व ब्राह्मण ग्रंथांचे प्रवचन केले त्यांनीच धर्मसूत्र, आयुर्वेद, व्याकरण व महाभारतासारखी रचना केली आहे. विषय व रचना यांच्या भेदामुळे भाषेत फरक पडणे अगदी स्वाभाविक आहे. हर्षाने जेथे खण्डनखाद्यासारखा नव्यन्यायाचा ग्रंथ लिहिला त्यानेच नैषधासारखे सरस मधुर महाकाव्य देखील लिहिले. या दोन ग्रंथांतील भाषेच्या भेदामुळे ह्या रचना एका व्यक्तीच्या नाहीत असे म्हणावयाचे काय? हें काव्य सध्या उपलब्ध नाही. शरणदेवाने एका श्लोकाचा उल्लेख केला आहे तो असा –

> त्वया सहार्जितं यच्च यच्च सख्यं पुरातनम् ।
> चिराय चेतसि पुरुस्तरुणीकृतमद्यमे ॥ [शरणदेव, दुर्घटवृत्ति, सर्ग १८, ४/३/२३ पृ. ८२]

याप्रमाणे जवळपास सव्वीस ग्रंथांत जाम्बवतीविजयांतील उदाहरणे मिळतात असे अभ्यासकांचे मत आहे.

२. व्याडि - व्याडीचे नांव वैयकरण व व्याकरणासंबंधी लिहिणारा दार्शनिक ग्रंथकार म्हणून प्रसिद्ध होते. परंतु महाराज समुद्रगुप्ताच्या कृष्णचरित्राचा काही भाग प्रसिद्ध झाल्याने व्याडीचे महाकवित्व सिद्ध होते. कृष्णचरित्राचा लेखक मुनि कवि वर्णनाच्या प्रसंगांत असे लिहितो-

रसाचार्यः कविर्व्याडिः शब्दब्रबह्यैकवाङ्मुरनिः ।
दाक्षीपुत्रवचोव्याख्यापटुर्मीमांसकाग्रणीः ॥
बलचरितं कृत्वा यो जिगाय भारतं व्यासं च ।
महाकाव्यविनिर्माणे तन्मार्गस्य प्रदीपमिव ॥ [समुद्रगुप्त मुनि कविवर्णकृष्णचरित्र १६, १७]

यावरून महामुनि व्याडीने भारतापेक्षाही मोठे असे बालचरित लिहिले होते, असे स्पष्ट होते.

"कमपि भूभुवनाङ्गडणकोणम् इति व्याडिभाषासमावेशः [मद्रासमधील राजकीय हस्तलेखसंग्रहांत अमरकोशावरील एक टीका आहे. तिच्या १८५ पृष्ठावर प्रस्तुत पद्यांश मिळतो. असे युधिष्ठिर मीमांसक सांगतात. पृ. ३७८] ।

यावरून स्पष्ट होते कीं, व्याडीच्या काव्यांत देखील भट्टिकाव्याच्या १२ व्या सर्गाप्रमाणे 'भाषासमावेश' नांवाचा एक भाग होता.

३. कात्यायन – कात्यायनाने रचलेल्या काव्याचें नाव 'स्वर्गारोहण' काव्य असे आहे. असे समुद्रगुप्ताच्या कृष्णचरित्रांतील मुनिकविवर्णन प्रसंगात लिहिले आहे.

यः स्वर्गारोहणं कृत्वा स्वर्गमानीतवान् भुवि ।
काव्येन रुचिरेणासौ ख्यातो वररुचिः कविः ॥
न केवलं व्याकरणं पुपोष दाक्षीसुतस्येरितवार्तिकैर्यः ।
काव्येऽपि भूयोऽनुचकार तं वै कात्यायनोऽसौ कविकर्मदक्षः ॥

महाकाव्याशिवाय कात्यायनाने एक साहित्यविषयक लक्षणग्रंथ देखील लिहिला होता असे पुढील उल्लेखावरून लक्षांत येते. अभिनवगुप्त भरतनाट्यशास्त्राच्या टीकेत लिहितात 'यथोक्तं कात्यायनेन वीरस्य भुजदण्डानां वर्णने स्रग्धरा भवेत् । नायिकावर्णनं कार्यं वसन्ततिलकादिकम् ॥ शार्दूललीला प्राच्येषु मन्दाक्रान्ता च दक्षिणे ॥ [पृ. ५३] इति याप्रमाणे शृंगारप्रकाश [मीमांसक युधिष्ठिर, सं. व्याकरणशास्त्रका इतिहास, भाग-२ पृ. २४५, २४६], शारंगधर पद्धति, सदुक्तिकर्णामृत सुभाषितरत्नावली इ. ग्रंथात उल्लेख मिळतात असे अभ्यासकांचे [मीमांसक युधिष्ठिर, सं. व्याकरणशास्त्रका इतिहास, भाग-२ पृ. २४५, २४६] म्हणणे आहे. '

४. पतंजलि – महाभाष्यकार पतंजलीने महानन्द अथवा महानन्दमय नावाचा काव्यगंथ लिहिला आहे असे समुद्रगुप्ताने कृष्णचरित्रांत मुनिकविवर्णनांत लिहिले आहे.

महानन्दमयं काव्यं योगदर्शनमद्भुनतम् ।
योगव्याख्यानभुर्तं तद् रचितं चित्तदोषापहम् ॥

अनुक्रमणिका

५. भट्ट्भूम – भट्टाभूम, भूमक किंवा भौम याचे रावणार्जुनीय किंवा अर्जुनरावणीय नामक काव्य उपलब्ध आहे. मुद्रित प्रतीमध्ये रावणार्जुनीयाच्या पुष्पिकेत त्याचा अल्पसा परिचय मिळतो. तो असा –

> कृतिस्तत्रभवतो महाप्रभावश्रीशारदादेशान्तर्वर्तिवल्लभी –
> स्थाननिवासिनो भूमभट्टास्येति शुभम् । वल्लभीस्थानं
> उड्डू इति ग्रामो वराहमूलोपकण्ठस्थितः ।

या पुष्पिकेवरून असे लक्षात येते की, भट्टभूम काश्मीरी होता. त्याचे निवासस्थान वल्लभी होते. ते वराहमूलच्या जवळ उड्डू गाव होते क्षेमेंद्राने भौमक काव्याचा उल्लेख [क्षेमेंद्र, सुवृत्तितिलक ३/४] केला आहे. “भट्टिभौमकाव्यादि काव्यशास्त्रं. प्रजक्षते” या उल्लेखावरून एवढे कळते की, भट्टभूम वि. सं. १०९० च्या पूर्वीचा असला पाहिजे. ह्या कवीची अधिक माहिती आमच्या प्रबंधात [गोंडसे बी. एस्. वैयकरणाच्या दृष्टिकोनातून पृ. ९-१०] पहा.

रावणार्जुनीयावर वासुदेव नावाच्या विद्वानाने एक टीका लिहिली व ती मद्रासच्या राजकीय हस्तलेख संग्रहात असल्याचे पं. युधिष्ठिर मीमांसक सांगतात.

६. भट्टिकाव्यकार – साहित्य व व्याकरणविषयक वाङ्मरयात भट्टिकाव्य नावाचे महाकाव्य प्रसिद्ध आहे. लक्षणग्रंथाच्या अध्ययनाला कंटाळणाऱ्या अथवा घाबरणाऱ्या पण संस्कृताचे अध्ययन करणाऱ्यांसाठी दीर्घकालापासून भट्टिकाव्य उपयुक्त ठरले आहे. भट्टिकाव्यावर विविध टीकाग्रंथ झाले आहेत. त्यावरून या महाकाव्याचा संस्कृत शिक्षणाच्या दृष्टीने संपूर्ण भारतात व्यापक प्रचार होता असे दिसते. या दृष्टीने भट्टिकाव्याचे शास्त्रकाव्य अथवा व्याकरणप्रधान काव्यात अनन्यसाधारण स्थान आहे. भट्टिकाव्याच्या विविध अंगाचा विचार आपण प्रस्तुत पुस्तकात करणार आहोत.

७. हलायुध – या वैयकरण कवीने “कविरहस्य” नावाचे एक शास्त्रकाव्य लिहिले आहे या काव्यात धातूच्या रूपाचा विशेष निर्देश केला आहे.

हलायुध राष्ट्रकूटच्या तृतीय कृष्णराजाचा [सं. ९९७-१०१३] सभापंडित होता. पिंगल छंदः सूत्राच्या मृतसंजीवनी टीकते वाक्पतिराज [सं. १०३१-१०५२] मुंजच्या प्रशसेवर याचे अनेक श्लोक उपलब्ध होतात. यावरून असे म्हणतात की, कृष्णराजाच्या स्वर्गवासानंतर हलायुध मुंजाच्या सभेत गेला होता. म्हणून हलायुधाचा काल देखील ९७५ ते १०५० असा मानला जातो. हलायुधाने काव्याच्या आरंभी स्वतःसंबंधी असे म्हटले आहे.

> “धातुपारायणाम्भोधिपारोत्तीर्णधीः” ।

कविरहस्यात एकूण २७४ श्लोक आहेत. या काव्याची “कविगुह्य” व “अपशब्दाख्य काव्य” ही देखील नावे आहेत. हलायुधाचे आणखी दोन ग्रंथ प्रसिद्ध आहे.

अनुक्रमणिका

१] पिंगल छंद = सूत्रावरिल मृतसंजीवनी टीका व
२] अभिधानरत्नमाला नावाचा कोश.

८. हेमचन्द्राचार्य – आचार्य हेमचन्द्राने संस्कृत व प्राकृत दोनही प्रकारच्या लक्षणाच्या निदर्शनासाठी "कुमारपालित" नावाचे एक महाकाव्य लिहिले आहे. या काव्याचे प्रारंभीचे २० सर्ग संस्कृतात व शेवटचे ८ सर्ग प्राकृतात आहेत. म्हणून याला "द्वयाग्र्य काव्य" असेहि संबोधतात.

९. नारायण [ब्रह्मदत्तसूनु] – ब्रह्मदत्ताचा पुत्र नारायण कवीने सुभद्राहरण नावाचे एक शास्त्रकाव्य लिहिले होते. या काव्याचे दोन उल्लेख मद्रास राजकीय हस्तलेख संग्रहात आहेत. या काव्यात १६ सर्ग आहेत. अष्टाध्यायीच्या क्रमाने सूत्राची उदाहरणे ध्यानात घेऊन कवीने या काव्याची रचना केली आहे.त्याच्या काव्यातील "अव्यय कृद्विलसित" , "प्राग्दीव्यतीय विलसित" , इत्यादी नांवे आहेत.

या काव्यात भट्टभूमाप्रमाणे पाणिनीय सूत्रांच्या क्रमाचा आश्रय घेतला आहे. त्यावरून स्पष्ट होते की, या ग्रंथाची रचना पाणिनाय संप्रदायात प्रक्रिया ग्रंथाचे पठनपाठन सुरू होण्यापूर्वी झाली असावी. म्हणून हा ग्रंथ १५ व्या शतकापूर्वी झाला असावा. या काव्यावर ग्रंथकाराने स्वतःचे विवरण लिहिले आहे.

१०. वासुदेव कवि – कोण्या वासुदेव नावाच्या विद्वानाने लिहिलेले वासुदेवचरित्र अथवा वासुदेवविजय नांवाचे एक शास्त्रकाव्य उपलब्ध होते. या काव्यात ६ सर्ग आहेत. या काव्याच्या शेवटच्या तीन सर्गांना धातुकाव्य असेही म्हणतात.

११. नारेरी वासुदेव – संस्कृत म्यन्युस्क्रिप्ट प्रायव्हेट लायब्ररी साऊथ इंडियाच्या सूचिपत्रात नारेरी वासुदेव विरचित धातुकाव्याचे दोन हस्तलेख निर्दिष्ट आहेत. हा नारेरी वासुदेव वासुदेवविजयाचा ग्रंथकार वासुदेवकवि त्याहून भिन्न आहे किंवा नाही हे सांगणे कठीण आहे असे युधिष्ठिर मीमांसक म्हणतात. [संस्कृत व्याकरणशास्त्र का इतिहास, ग -२, पृ. ३९७]

१२. नारायण कवि – धातुपाठाच्या उदाहरणाकरिता "धातुकाव्य" नावाच्या काव्याची रचना झाली आहे. या काव्याचा व्याख्येसहित एक उल्लेख मद्रास शासकीय हस्तलेख संग्रहात आहे. या काव्याचा पहिला श्लोक असा –

उदाहृतं पाणिनिसूत्रमण्डलं प्राग्वासुदेवेन तदूर्ध्वतो परः।
उदाहरत्यद्य वृकोदरादितान् धातून् क्रमेणैव हि माधवसंश्रयात् ॥

या श्लोकात वासुदेवाचा निर्देश आहे. पण तो वासुदेव कोणता हे सांगणे कठीण आहे. युधिष्ठिर मीमांसकाचे असे मत आहे हा भट्टभूम विरचित रावणार्जुनीय काव्याचा व्याख्याता वासुदेव असावा. [सं. व्याकरणशास्त्र का इतिहास, भाग -२, पृ. ३९७.]

१३. दशाननवधम् – भट्टीच्या पद्धतीस अनुसरून योगींद्रनाथ तर्कचूडामणी याने दशाननवधम् काव्य लिहिले.

१४. पाण्डवचरितम् – भट्टीच्या संप्रदायास अनुसरून म. म. दिवाकर कवीने 'पाण्डवचरितम्' नावाचे १४ सर्गाचे महाकाव्य लिहिले प्रथम सर्गाच्या शेवटी कवि म्हणतो – इति लक्षणादर्शे पाण्डवचरिते महाकाव्ये पाणिनीये कुटादिभूवादिपादद्वयलक्षण- संग्रहः पाण्डवनिवासो नाम प्रथमः सर्गः। यावरून त्याच्या काव्याचे ध्येय स्पष्ट होते.

१५. यदुनाथकाव्यम् - यदुनाथ कवीने "यदुनाथकाव्यम्" नावाचे काव्य लिहिले.

१६. सुभद्राहरणम् – ब्रह्मपुत्रनारायणाने सुभद्राहरणम् नावाचे २० सर्गांचे काव्य लिहिले.

१७. पाणिनीसूत्रोदाहरणम्- एका अप्रसिद्ध कवीने भागवत कथा संबंधी प्रस्तुत काव्य लिहिले.

१८. श्रीचिन्हकाव्यम् – कृष्णलीला शक नामक कवीने श्रीचिन्हकाव्यम् या नावाचे काव्य लिहिले. या १२ सर्गाच्या काव्यातील अंतिम चार सर्ग कवीचा शिष्य दुर्गाप्रसाद याने लिहिले असून त्यामध्ये त्रिविक्रमकृत व्याकरणाच्या उदाहरणाचा उपयोग केला आहे.

आरंभीच्या सर्गात कृष्णलीलाशुकाने वररुचीच्या प्राकृत व्याकरणातील उदाहरणाचा उपयोग केलेला आहे.

अशाप्रकारे भट्टीने प्रवर्तित केलेली शास्त्रोदाहरणात्मक महाकाव्याची परंपरा १७ व्या शतकापूर्वीच्या कवींनी चालू ठेवली होती. त्यानंतर व्याकरणविषयक काव्ये लिहिल्या गेलेली दिसत नाहीत, असे अभ्यासकाचे मत आहे.

# ‘भट्टि’विषयी माहिती

संस्कृतच्या इतर कवीप्रमाणेच भट्टिकाव्याच्या कवीची माहिती संदिग्ध आहे. भट्टिने भट्टिकाव्यांमध्ये स्वतःविषयी काहीच लिहिले नाही. त्यामुळे इतर उपलब्ध प्रमाणावरूनच माहिती निश्चित करावी लागते.

**‘भट्टि’चा काळ**


वलभीमध्ये राज्य करणाऱ्या राजा धरसेनाच्या राजवटीत त्याने भट्टिकाव्य पूर्ण केले असे तो प्रस्तुत काव्याच्या अंतिम पद्यात म्हणतो.

काव्यमिदं विहितं मया वलभ्यां
श्रीधरसेननरेन्द्रपालितायाम् ।
कीर्तिरतो भवतान्नृपस्य तस्य
क्षेमकरः क्षितिपो यतः प्रजानाम् [भ. का २२ / ३५] ॥

यावरून असे दिसते की, वलभीच्या राजा श्रीधरसेनाच्या सभेमध्ये याचा सत्कार होत असावा. भट्टि त्याचा सभापंडित असावा. शिलालेखावरून वलभीमध्ये राज्य करणारे एकूण चार राजे होऊन गेले. त्यापैकी भट्टि कोणत्या श्रीधरसेनाच्या राजवटीत होऊन गेला?

वलभीची [काठियावाडातील अर्वाचीन वला] परंपरा दाखविणारे असे जवळपास शंभर ताम्रपट आजपर्यंत अभ्यासकांनी शोधून काढले. त्यातील तेरा ताम्रपट द्वितीय धनसेनाचे आहेत. द्वितीय श्रीधरसेनाच्या शिलालेखात कोण्या भट्टि नावाच्या विद्वानाला भूमिदान केल्याचा उल्लेख मिळतो. पुढील आराखड्यावरून चार धरसेनाचा संबंध आपल्या लक्षात येईल. तो आराखडा असा –

‘भट्टि’विषयी माहिती




अनुक्रमणिका

पलिटन ताम्रपटामध्ये द्वितीय धरसेनाचा काळ [571 A. D.] गुप्तवलभी संवत् २५२ असा दिलेला आहे भटार्क व प्रथम धरसेन यांना सेनापती तर द्वितीय धरसेनाला महाराज असे बिरुद लावलेले दिसते [Vide I.A. Vol. 15, PP 335ff.]. चतुर्थ धरसेनाचा काळ वलभी संवत् ३०० [648 A.D.] असा दिला असून त्याला चक्रवर्तिन् असे बिरुद लावलेले दिसते. जिनभद्राच्या विशेषावश्यक भाष्यांत असे म्हटले आहे की, शीलाद्वित्याच्या राजवटींत वलभी शक ५३१ [608-609 A.D.] मध्ये प्रस्तुतचे काव्य पूर्ण झाले होते. [Vide P.O. Vol. XI, parts-3-4, PP, 29]

द्वितीय धरसेनाच्या स्वतःच्या शिक्क्यावर महाराजाधिराज अशी उपाधी लावलेली आहे [Vide Mr. A.S. Gadre's paper on five Valbhai grants in Journal of the Bombay University Vol. III, Part-I. PP 74, ff.] पांचवा ताम्रपट दिविरपतीच्या मुलाने स्कन्धभट्टाने लिहिला आहे. चतुर्थ धरसेन स्वतःला महाराजाधिराजपरमेश्वर चकवर्तिन्" असे संबोधतो. [Vide I.A. Vol. 15 P-335, Valbhi Savatt, 330, 649 A.D. Vide I.A. Vol. VI P.9, a grant of Dharsen II, Valbhi Savatt, 269, 588 A.D.]

प्रथम ध्रवसेनाच्या ताम्रपत्रांत –'दीपनाथोपजीव्यमानविभवः परममाहेश्वरः सेनापति धरसेनः', असे बिरुद मिळते. भट्टीच्या वर दिलेल्या पद्यांत देखील त्याने श्रीधरसेनाला "प्रजानां क्षेमकरः" म्हणजे प्रजांचे कल्याण करणारा अशी उपाधि दिली आहे. ही उपाधि पूर्वी दिलेल्या विरुदासारखीच आहे. म्हणून पुष्कळ विद्वानांचे असे मत आहे की, भट्टि प्रथम धरसेनाच्या समकालीन असावा. अगदी सरळपणाने भट्टि "नरेन्द्र" संबोधून उल्लेख करतो त्यावरून असे वाटते की, त्याला प्रथम धरसेनाचा उल्लेख अभिप्रेत नसावा असे काही अभ्यासकांचे मत आहे. याच प्रथम धरसेनाला कांही वलभी दानपत्रांमध्ये केवळ सेनापति असे म्हटलेले आढळते. तर त्याचे लहान भाऊ द्रोणसिंह आणि धरपट्ट यांना महाराज व द्वितीय धरसेनाला "महासामन्तमहाराज" असे म्हटले जाते. प्रथम ध्रुवसेनाच्या पलिटन ताम्रटपटामध्ये [Vol. XI P-109] आणि भावनगर ताम्रपटामध्ये प्रथम धरसेनाच्या लहान भावाला महासामन्त महाराज ध्रुवसेन असे संबोधिले आहे. दोघांचाही काळ वलभी २१७ [536 A.D. ] मधील असून त्यांना "महाप्रतीहारमहादण्डनायकमहाकार्ताकृतिकमहासामन्त" असे बिरुद लावलेले दिसते [J.R.A.S. 1895, P-379]३.

प्रथम धरसेनाला जिंकणारा व प्रथम ध्रुवसेन याचा मोठा भाऊ द्रोणसिंह याच्या दानपत्राचा काळ गुप्त संवत् १८३ [502 A.D.] हा आहे म्हणूनच प्रथम धरसेन त्याच्या निश्चितपणे काही वर्ष अगोदर असला पाहिजे असेही काही विद्वानांचे मत दिसते.

द्वितीय धरसेनाची कारकीर्द दीर्घकाळ म्हणजे ५६९ ते ५९९ पर्यंत दिसते. वलभीचे अगदी अर्वाचीन दानपत्र चतुर्थ धरसेनाचे असून त्याचा काळ संवत् ३३२ [651 A.D.] हा आहे. म्हणून भट्टि प्रथम धरसेनाच्या राजवटीत झाला असेल तर तो इ.स. ५०० च्या नंतर नाही. द्वितीय धरसेनाच्या कारकीर्दीत झाला असेल तर इ.स. ६०० च्या नंतर नाही. व चतुर्थ धरसेनाच्या वेळी झाला असेल तर इ.स. ६५० च्या नंतर नाही.

तात्पर्य वलभीच्या प्रथम ते चतुर्थ धरसेनाच्या म्हणजेच इ.स. ५०० ते ६५० ह्या अवधीत भट्टि होऊन गेला असावा.

भट्टि विषयीची एक घटना आजपर्यंत कोणत्याही विद्वानाने विचारात घेतल्याचे आढळत नाही. पाणिनींच्या अष्टाध्यायीवर वामन व जयादित्य यांची काशिका नावाची एक वृत्ती आहे तिचा प्रारंभीचा श्लोक व त्यावरील टीका यादृष्टीने विचारणीय आहे, तो श्लोक असा –

वृत्तौ भाष्ये तथा धातुनामपारायणादिषु ।
विप्रकीर्णस्य तन्त्रस्य क्रियते सारसंग्रहः ॥ १ ॥

काशिकाविवरणपंजिकेचा [न्यास] टीकाकार जिनेन्द्रबुद्धी या श्लोकावर टीका करितांना असे म्हणतो –

चुल्ली भट्टि आणि नल्लूर यांनी काशिकेच्या पूर्वीच पाणिनींच्या सूत्रांचे स्पष्टीकरण दिले आहे [वामन – जयादित्य, काशिका पृ. १ चौखम्बा संस्कृत सीरीज आफिस वाराणसी.] इ.स. ९१ मध्ये लेखन करणारा इत्सिंग सांगतो की,पाणिनींच्या सुत्रांची निदर्शने देण्यासाठी ज्या भट्टीने महाकाव्य लिहिले त्यानेच एखादी टीका देखील लिहिली असेल जर हे मानले तर भट्टि काशिकेच्या पूर्वी म्हणजे इ.स. ६०० ते ६४० मध्ये होऊन गेला असावा. अर्थात् हे एक अनुमान आहे. त्याची सत्यासत्यता भट्टि व न्यास टीका लिहिणारा भट्टि हे एकच आहेत किंवा नाही यावर अवलबूंन आहे.

## 'भट्टि'च्या पित्याविषयी

भट्टीच्या पित्याची दोन नांवे दिसतात. १) श्रीधरस्वामी व २) श्रीस्वामी नारायणविद्याविनोद भट्टीच्या पित्याचे नाव श्रीधरस्वामी असे सांगतो. तर जयमंगल श्रीस्वामी असे सांगतो. जयमंगला टीकेच्या सुरुवातीला त्याने असे लिहिलेले आहे. लक्ष्यं लक्षणं चोभयमेकत्र विदुषः प्रदर्शयितुं श्रीस्वामिसूनुः कविर्भट्टिनामा रामकथाश्रयमहाकाव्यं चकार" शेवटी देखील तो म्हणतो –

श्रीस्वामिसूनोर्भट्टमहाब्राह्मणस्य .." ।

सुबोधिनी टीकेचा टीकाकार कुमुदानन्द जयमंगलाचे वरील मत मान्य करतो. ते असे की, "अत्र कविना श्रीस्वामिसूनुना सर्गबन्धलक्षण प्रकीर्णकाण्डं प्रथमं दर्शयितुं तस्य विषयव्यापकत्वात् तत्रादौ वस्तुनिर्देशं कुर्वन् इष्टदेवतास्मरणात्मकं मंगलं विघ्नोपशान्तये क्रियते इत्यादी" ।

या संदर्भात श्री त्रिवेदीचे मतही लक्षात घेण्यासारखे आहे. [भट्टिकाव्यावरील प्रस्तावनेत श्री त्रिवेदी म्हणतात की, अनेक टीकाकारानी भट्टीच्या पित्याचे नाव श्रीधरस्वामिन् किंवा श्रीस्वामिन् असे सांगितले आहे. शक १३२६ मधील हस्तलिखितावर श्री. त्रिवेदींची प्रत आधारलेली असून ती सर्वात प्राचीन आहे. तीत "श्रीधरस्वामिसूनोर्भट्टिब्राह्मणस्य कृतौ" असे म्हटले आहे.] त्यांच्याही मताप्रमाणे भट्टीच्या पित्याचे नाव श्रीस्वामी असेच होते. या सर्व प्रमाणावरून भट्टीचे पितृत्व श्रीस्वामी या नामाकडे जाते.

## 'भट्टि'च्या नावाविषयी

"भट्टि" या नावासंबंधी देखील विद्वज्ञनांत एकवाक्यता दिसत नाही.

काही विद्वानांचे म्हणणे असे की, "भट्टी" हे भर्तृ या शब्दाचे अपभ्रंश रूप आहे. प्रो. आफ्रेटने शिलालेखाच्या बृहत् सूचीमध्ये भट्टीची चार नावे दिली आहेत. ती अशी-

भट्टि, भर्तृस्वामी, भट्टस्वामी, आणि स्वामिभट्ट

श्री. त्रिवेदी यांच्या भट्टिकाव्यांवरील प्रस्तावनेत भट्टिची तीन नांवे दिले आहेत [प्र. १५-१७]. ती अशी – भट्टि, भट्टस्वामिन् आणि भर्तृस्वामिन्.

भट्टिकाव्याचा कर्ता भट्टि व मन्दसोर शिलालेखांतील वत्सभट्टि हे दोघे वेगळे नाहीत असेही काही अभ्यासक मानतात. त्याचे खंडन करीत डॉ. पी. व्ही. काणे म्हणतात की, केवळ मन्दसोर शिलालेखांतील काही श्लोकाच्या साम्यावरून वत्सभट्टि व भट्टिकाव्याचा कर्ता एकच आहे असे मानणे अयोग्य आहे" [Kane P.V., History of Sanskrit Poetics, P – 78].

भट्टि कोण?

आणखी एका मुद्याचा विचार केल्याशिवाय प्रस्तुत प्रकरण पूर्ण होणार नाही. तो म्हणजे भट्टिकाव्याचा कवी भट्टि की भर्तृहरी? प्रथम आपण भर्तृहरीला भट्टिकाव्याचा रचयिता मानणाऱ्यांचा परामर्श घेऊ.

भट्टिकाव्यावर "भट्टिबोधिनी" टीका लिहिणारा नारायण विद्याविनोदाचार्य भर्तृहरीला भट्टिकाव्याचा कर्ता मानतो. प्रस्तुत टीकेच्या प्रारंभी तो लिहितो-

नत्वा रामपदद्वन्द्वमरविन्दं भवच्छिदम् ।
विद्याविनोदनाचार्यः कुरुते भट्टिबोधिनीम् ॥

अथ पाणिनिलक्षणार्थानवगन्तुमशक्नुवतां भाष्यकारजिनेन्द्रप्रभृतिनानामतानुसारिणां सन्देहसन्दोहव्याधिपीडितानां शिष्यप्रशिष्याणामुद्दिषुर्भगवान श्रीधरस्वामिसूनुर्भर्तृहरिः काव्यच्छलेन समस्तं व्याकरणार्थ दर्शयन् रामकथयैवात्र मंगलान्तरमनादृत्य काव्यमिदमारब्धवान् । मुग्धबोधिनीकार भरतमल्लिक [नत्वा शंकरमम्बौष्ठगौरांगमल्लिकात्मजः । भट्टिटीकां प्रकुरुते भरतो मुग्धबोधिनीम् ॥ ], वैजयन्तीकार कन्दर्प चक्रवती [अत्र तावन्महामहोपाध्यायश्रीभर्तृहरिकविना शब्दकाण्डयोः लक्षणम् ।] भट्टिचन्द्रिकाकार विद्याविनोद [अत्र कविना श्रीधरस्वामिसूनुना भर्तृहरिणा सर्गबन्धः ।], हे टीकाकारही भर्तृहरीलाच भट्टिकाव्याचा रचयिता मानतात. याशिवाय काही समालोचकही भर्तृहरीला भट्टिकाव्याचा कर्ता समजतात. त्यांत कोलबूक [कोलबुक एसे वा हिन्दी अनुवाद, पृ. ११५ – ११६], वाहलेन [वाहलेन्स प्रिफेक्स टु दी शतक्स्, हिन्दी अनुवाद, पृ. ६], महेशचन्द्र [संस्कृत साहित्यका इतिहास, पृ. २६५], मॅकडोनेल [ए हिस्ट्री ऑफ संस्कृत लिटरेचर, हिन्दी अनुवाद, पृ, ३२९.] यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

वर दिलेली सर्व मते भर्तृहरीला भट्टिकाव्याचा प्रणेता मानणारी आहेत. परंतु थोड्या विचारांती हे सर्व मते निराधार वाटायला लागतात. नारायणविद्याविनोदाचार्य, भरतमल्लिक, कन्दर्पचक्रवर्ती, विद्याविनोद इ. टीकाकार ग्रंथाचे नांव "भट्टिकाव्य" सांगतात व त्याच्या कर्त्यांचे नांव मात्र भर्तृहरि असे सांगतात. हे प्रतिकूल वाटते प्रस्तुत काव्याचा कवि जर भर्तृहरि असेल तर काव्याचे नांव भट्टिकाव्य कसे? भर्तृहरिच्या काव्याचे नांव भर्तृहरिकाव्य किंवा भर्तृकाव्य असणे अधिक योग्य वाटते. भट्टिकाव्य या नांवावरून प्रस्तृत काव्याचे भट्टिकाव्य हे

अनुक्रमणिका

अभिधान असावे अन्यथा रामकथा किंवा रामकाव्य हे शीर्षक योग्य झाले असते. याच दृष्टीने प्रस्तुत काव्याचे रावणवध हे नांव समुचित वाटते.

यानंतर भट्टीला भट्टिकाव्याचा रचयिता मानणाऱ्यांचा परामर्श घेऊ.

प्रस्तुत प्रसिद्ध टीकाकार जयमंगल भट्टीलाच भट्टिकाव्याचा कर्ता मानतो. जयमंगला या त्याच्या टीकेच्या आरंभी तो लिहितो – "लक्ष्यं लक्षणं चोभयमेकत्र विदुषः प्रदर्शयितुं श्रीस्वामिसूनुः कविर्भट्टिनामा रामकथाश्रयं महाकाव्यं चकार" । मल्लिनाथ म्हणतो – 'अथ तत्रभवान् भट्टिनामा कविः काव्यं यशसेऽर्थंकृते व्यवहारविदे शिवेतरक्षयते । सद्यः परनिर्वृतये कान्तासंमिततयोपदेशयुजे "इत्यादी" । [जयमंगल, जयमंगला टीका, आरंभीचा अंश,] [मल्लिनाथ, मल्लिनाथी टीका, आरंभीचा अंश]

याशिवाय संस्कृताचे काही अर्वाचीन विचारवान् देखील भट्टिकाव्याचा कवि म्हणून भट्टीलाच मानतात. त्यात डॉ. एस. के डे [डॉ. एस के डे हिस्ट्री ऑफ संस्कृत लिटरेचर पृ. १८३], श्री. वरदाचार्य [वरदाचार्य वी., हि. ऑ. सं. लि. पृ. १०७], डॉ. भोलाशंकर व्यास [व्यास, भोलाशंकर, संस्कृत कवि-दर्शन पृ. १४३] इत्यादीचा समावेश होतो.

भट्टीचे नांव भोजप्रबंधाच्या [भोजप्रबंध – भट्टिर्नष्टोऽभारवियोऽपिनष्टो भिक्षुर्नष्टो भीमसेनोऽपि नष्टः । भुकुण्डोऽ हं. भूपतिस्त्वं च राजन् भम्मापंक्तावन्तकः सन्निधिष्टः ॥ ] एका श्लोकांत उपलब्ध होते. क्षेमेन्द्राने [सुवृत्ततिलक, शास्त्रकाव्यं चतुर्वर्गप्रायं, सर्वोपदेशकृत् । भट्टिभौमःकाव्यादि काव्यशास्त्रं प्रचक्षते ॥ ३ ।४] भट्टीचा उल्लेख केला आहे.

या सर्व समालोचकांच्या मताने भट्टि हाच भट्टिकाव्याचा कर्ता आहे ही गोष्ट सिद्ध होतो.

काही विद्वान भट्टि व भर्तृहरि ह्या दोघांना एकच मानतात. एकच व्यक्तीची ही दोन नावे असावीत असा त्यांचा अंदाज असून भट्टि भर्तृ या शब्दाचे विकृत रूप असावे भट्टि हाच भर्तृहरि असून वाक्यपदीय व शतकत्रयांचा रचयिता होता असे त्यांचे प्रतिपादन आहे. परंतु भट्टि व भर्तृहरि या दोघात तादात्म्य आणण्याची ही सारहीन कल्पना दोघामधील व्याकरणविषयक पांडित्यावर अवलंबून आहे. आधुनिक विचारक वाक्यपदीयकार आणि शतकत्रयकार भर्तृहरि यांना देखील भिन्न मानतात तेथे भट्टि व भर्तृहरि यां अभेद मानणे कसे शक्य आहे. [कीथ, शास्त्री, मंगलदेव, हिन्दी भाषांतर, संस्कृत साहित्य का इतिहास, पृ, २१७, भर्तृहरीची ... भट्टिकाव्याचा कर्ता भट्टि यांच्याशी अभिन्नता प्रस्थापित करण्यात कोणताही सत्यांश नाही.] डॉ. कीथ व आचार्य बलदेव उपध्यायांनी या मताचे खंडन केले आहे.[उपाध्याय, बलदेवप्रसाद, संस्कृत साहित्यका इतिहास, पृ, २९६ अधिकांश विद्वान् शतकत्रयकर्ता भर्तृहरीला महावैयाकरण भर्तृहरीहून अभिन्न मानतात. परंतु याकरिता पोषक प्रमाण नाही.]

डॉ. भाऊदाजी लोकप्रचलित आधारावर कविवर भट्टिला भर्तृहरीचा पुत्र मानतात. [इंडियन ॲण्टीक्वेरी वाल्यूम् प्रथम. पृ. ३१९] त्याच्याशिवाय अन्य कोणत्याही विचारकाने भर्तृहरि व भट्टि यांच्यात पिता-पुत्रसंबंध स्थापित करण्याचा अनर्गल प्रयत्न केला नाही.

शेषगिरी शास्त्रींनी भट्टीला भर्तृहरीचा केवळ भाऊ मानला नाही तर वररुचि, विक्रमादित्य, भट्टि व भर्तृहरि यांच्यात भ्रातृत्वसंबंध प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला आहे. ही एक अनाठायी कल्पना आहे.

अनुक्रमणिका

कसेही असले तरी भाऊदाजी व शेषगिरी शास्त्री यांच्या लिखाणावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, भट्टि व भर्तृहरि या दोन भिन्न व्यक्ति होत्या.

## ‘भट्टि’ची शास्त्रव्युत्पन्नता

भट्टिकाव्य व्याकरणाचा लक्षण ग्रंथ आहे. भट्टीचे व्याकरणाविषयक पांडित्य त्यात सर्वत्र आढळते हे खरे, तो स्वतः कवि असल्याने कवि म्हणूनही त्याचे नैपुण्य निदर्शनास येते. या दृष्टीने भट्टिकाव्याचा दहावा सर्ग अभ्यसनीय आहे. प्राकृताचा तो उत्तम जाणकार होता हे भाषासमाच्या निदर्शनासाठी त्याने लिहिलेल्या १३ व्या सर्गाहून दिसते. परंतु याशिवाय इतर अनेक ज्ञानशाखांचा तो अध्ययन करणारा होता त्याच्या ठिकाणी लोककाव्यशास्त्रव्युत्पन्नता होती असे दिसते. या दृष्टीने भट्टीचा काही विचार करून प्रस्तुत प्रकरण संपवू.

भट्टि वेदांगासह वेदाचा चांगला जाणकार होता असे त्याने वेद व वेदांच्या षडंगांचा जो उल्लेख [भट्टि, भ. का. १/२, ४/९, १९/१३] केला त्यावरून दिसते. उपनिषदे [भट्टि, भ. का. ५/६३, १/१८-१९], योग [भट्टि, भ. का. ५/६३, १/१८-१९] यांचाही निर्देश मिळतो.

भट्टिने पौराणिक कल्पना [भट्टि भ. का. १२/ ७१ ५९, ७३, ५/२२, ८७, ८८, २/४१, ३९, ४२, १/१३, ६, ८/२०, १६/३१, ३४, ३७, ६/११०, ११५, ६५, १८/१३, ८/५२, ५/११, ८/५३, ८/२४, ५/७, ९/७३, ५४, १८/१३, २०, ८/५३, ८/८४, ८९, ८/८, १०/१९, ७, १२/५८, १७/९७, ६९,५/२६, ५/७२, ७१, १०/७१, १०/६४, ७१, २१/१२, ११,१९, १३/१६.४] दिलेल्या आहेत. रामायणातील उत्तर कांडात ज्या कथा आहेत त्यांच्याशी प्रामुख्याने ह्या कथांचा संबंध आहे. कोणत्याही विशिष्ट देवतांची वैशिष्ट्ये भट्टि देत नाही. काही शब्द तर केवळ अष्टाध्यायीची निदर्शने देण्यासाठी त्याने वापरली आहेत.

कवि म्हणून त्याने काही परंपरा सांभाळलेल्या दिसतात व त्यांची कल्पना गृह्यसूत्रावरून येते भट्टि गृह्यसूत्राचा जाणकार होता. आचार्याला दिल्या जाणाऱ्या

मधुपर्क [भट्टि, भट्टिकाव्य – १/१७, २/२६] विधीचा तो उल्लेख विश्वामित्र दशरथाकडे जातात तेव्हा राजा मधुपर्काने त्याचे पूजन करतो. रामाच्या यौवराज्याभिषेकाची तयारी [३३, ३६] पिण्डोदक व अन्त्येष्टि संस्कार [३३, ३६], अवश्यपाव्य [३३, ३६] [३३, ३६], कुण्डपाय्य व अग्निपाय्य व अग्निचित्य [६/६४, ६५], यज्ञ, तसेंच अग्निष्टोम व ज्योतिष्टोम [९/७९], सूर्यपूजा [भट्टि, भट्टिकाव्य – ८/१३], देवतार्पण [१४/१८], यांचे उल्लेखही भट्टिकाव्यात येतात.

भट्टीने धर्मशास्त्रविषयक प्रत्यक्ष उल्लेख दिला नसला तरी धर्मशास्त्राच्या कल्पना [६/६५, १३४] त्याच्या काव्यात सर्वत्र दिसतात. तीन पुरुषार्थ [९/११५], पित्याच्या आज्ञेचे पालन [भट्टि, भट्टिकाव्य - ३/५२], पुनर्जन्म [१/१८] इ. विषयही भट्टिकाव्यात येतात.

राजकारणाशी संबंधित जेवढी भाषणे या काव्यात आहेत त्या सर्वामध्ये भट्टीचे राजकरणविषयक नैपुण्य दिसते. अर्थशास्त्र हा शब्द तो बहुवचनी [१५/१८] वापरतो. हनुमंत, विभीषण, रावण, सुग्रीव व इंद्रजित यांच्या संभाषणांच्या द्वारा त्याचे ज्ञान [भट्टि, भट्टिकाव्य - १२/२६-३०, ३२, ४३, ६२] प्रगट होते. कला [भट्टि, भट्टिकाव्य – २/७, १६, ३/४३, १४/२, ३,४] [गायन, वादन, नृत्य] इ. मनोविज्ञान [भट्टि, भट्टिकाव्य – २/६, ९, ६/७४-८६] [मानवी, पशुपक्षाविषयी],

शकुनापशकुन [भट्टि, भट्टिकाव्य - ८/१०६, ३/२४, १७/९, १५/२६, २७, १७/९] इत्यादि अनेकविध विषयांचे तलस्पर्शी ज्ञान भट्टिकाव्यांतून दिसून येते.

वरील सर्व उल्लेखांवरून व त्या त्या विषयांच्या वर्णनावरून असे म्हणावेसे वाटते की, भट्टि हा एक चतुरस्त्र कवि आहे.

अनुक्रमणिका

# प्रकीर्ण कांड

अनुक्रमणिका

# प्रकीर्ण कांड

## कथानक व रचनापद्धती

### कथानक

भट्टिचकाव्यांत मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामचन्द्राचे चरित्र वर्णन केले आहे. रामाच्या जन्मापासून तो राम रावणाचा वध करून अयोध्येत येतो येथपर्यंतचा कथाभाग त्यात आलेला आहे. तो असा आहे.

पूर्वी महापराक्रमी दशरथ नावाचा एक राजा होऊन गेला. अमरावती प्रमाणे सुंदर अशी अयोध्या नावाची त्याची राजधानी होती. कौसल्या, कैकेयी व सुमित्रा अशा त्या राजाच्या तीन राण्या होत्या, परंतु, मूल नव्हते. विभांडकाच्या सप्तश्रृंग नावाच्या ऋषिपुत्राला अयोध्येत आणून दशरथाने पुत्रेष्टि यज्ञ करविला. यज्ञ समाप्तीनंतर तीनही राण्यांनी पायस भक्षण केले. लवकरच त्या गर्भवती होऊन यथावकाश कौसल्येने रामाला, कैकेयीने भरताला आणि सुमित्रेने लक्ष्मण व शतृघ्नाला जन्म दिला. वसिष्ठांनी जातकर्मापासून उपनयनापर्यंत सर्व संस्कार त्या राजपुत्रांवर केले. नंतर त्यांनी सांगवेदाध्ययनपूर्वक धनुर्वेदाचाहि अभ्यास केला. पलीकडे यज्ञाच्या संरक्षणासाठी महर्षि विश्वामित्र रामलक्ष्मणांना घेऊन जाण्याकरिता राजा दशरथाकडे आले. पुत्रवियोगाच्या केवळ विचारानेच राजाला अतीव दुःख झाले परंतु विश्वामित्राने त्यांच्या पराक्रमाचे वर्णन करून दशरथाचे सांत्वन केले व रामलक्ष्मणांना ते घेऊन गेले. त्यावेळी सर्वत्र शुभशकुन दृष्टीला पडत होते.

मार्गामध्ये जगद्वंद्य रामच्न्द्राचे ने मुनिजन पूजन करीत होते. विश्वमित्रांनी जया व विजया नांवाच्या विद्या त्यांना शिकविल्या. तसेच अमोघ अस्त्रे त्यांना दिली. पलीकडे रामाने ताटका नांवाच्या राक्षसीला ठार केले व अनेक राक्षसांचा वध केला. त्यामुळे निर्भय झालेल्या त्या अरण्यांत ऋषिमुनींनी तपाला प्रारंभ केला. विश्वामित्रांनी त्या दोघांचीही प्रशंसा करून त्यांना मिथिलेला नेले. तेथे रामाने हसत हसतच शिवधनुष्याचा भंग केला. दशरथाला निमंत्रण देऊन त्याच्या चारही मुलांचा मैथिल कुमारींशी विवाह झाला. अयोध्येला परत येत असतांना परशुरामाने दशरथाला स्वतःच्या धनुष्यावर बाण चढविण्याचे आव्हान दिले. त्याहि दिव्यांतून पार पडून रामासहित सर्व लोक अयोध्येला परत आले.

राज्यकारभाराला योग्य झालेल्या रामाला राज्याभिषेक करण्याची घोषणा दशरथाने केली. ती ऐकून अयोध्येतील प्रजाजनांना अत्यंत आनंद झाला. परंतु राज्याभिषेकाची सर्व तयारी झाली असतांना सुद्धा कैकेयीने भरताला राज्य व रामाला वनवासात पाठविण्याचा हट्ट धरला. दशरथाने पुष्कळ समजाविले, अनेक प्रलोभनें दाखविली परंतु तिने आपला हट्ट सोडला नाही. राम, लक्ष्मण व सीतेसह वनवासाला गेले. सर्वांना अत्यंत दुःख झाले. राजाने तर तात्काळ प्राण सोडला. मामाकडून परतल्यावर भरताला जेव्हा ही घटना कळली तेव्हा त्याला अतिशय दुःख झाले. त्याने आपल्या आईची निर्भर्त्सना केली. सचिवांनी त्याचे सांत्वन केले व त्याच्याकडून दशरथाचे और्ध्वदेहिक संस्कार करविले. नंतर रामाला अयोध्येत परत आणण्यासाठी भरत प्रजाजनांसह वनांत गेला. परंतु अनेकदा सांगूनही रामाचा निश्चय ढळत नाही असे पाहून तो रामाच्या पादुका घेऊन अयोध्येत परत आला.

राम दंडकारण्यांत गेले. तेथे विराध नामक राक्षसाला त्याने ठार केले. नंतर त्यांनी शरभंग ऋषींच्या आश्रमात प्रवेश केला. त्यावेळी सुतीक्ष्ण मुनीचा आश्रम दाखवून शरभंगांनी अग्निप्रवेश केला. सुतीक्ष्णांच्या आश्रमाजवळच पर्णशाळेत राहत असतांना शूर्पणखा राक्षसीला त्यांनी पाहिले. राम सपत्नीक आहे असे पाहून तिने लक्ष्मणाकडे विवाहाची प्रार्थना केली. लक्ष्मणाने तिला रामाकडे परत पाठविले. रामाने तिला पुनः लक्ष्मणाकडे पाठविले असतां त्याने तिचे नाक कापून टाकले. तेव्हा दण्डकारण्यांत राहत असलेल्या खर-दूषण नांवाच्या भावांकडे जाऊन तिने खूप विलाप केला. चवदा हजार सैन्यानिशी खर व दूषण रामावर चाल करून आले असता रामाने त्या सर्वांना ठार केले. हे पाहून शूर्पणखेने रावणाकडे प्रयाण केले. त्याला इत्थंभूत माहिती सांगितली. आणि सीतेच्या सौंदर्याचे वर्णन केले. रामाचा पराक्रमहि तिने निवेदन केला. त्यावेळी रावणाने शूर्पणखेला सांत्वना देऊन आपल्या शौर्याचे वर्णन केले, रामाला दंड देण्याची त्याने प्रतिज्ञा केली, व तो स्वतः साहाय्य मागण्याकरिता मारीचाकडे निघून गेला. रामाला दंड देण्यापासून परावृत्त करण्याकरिता मारीचाने रामाच्या असाधारण पराक्रमाचे वर्णन केले. रामाचा पराक्रम जाणून मारीच मदत करण्यासाठी तयार होत नाही असे पाहून रावणाने त्याची कठोर शब्दांत निंदा केली. अखेर मारीच तयार झाला. रामलक्ष्मणांना सीतेपासून दूर घालवण्यासाठी त्याने सुवर्ण मृगांचे रूप धारण केले. सुवर्णमृगासाठी सीतेने हट्ट धरल्यामुळे राम त्याला पकडण्यासाठी दूर निघून गेला. सीतेचे रक्षण करण्याऱ्या लक्ष्मणाला देखील दूर नेण्याकरिता “हा लक्ष्मण” असे मारीच जोरांत ओरडला. हा रामाचाच आवाज आहे असे सांगून सीतेने लक्ष्मणाला जबरीने रामाकडे जायला भाग पाडले. ती संधी साधून रावणाने भिक्षुरूपाने सीतेचे अपहरण केले. आकाशमार्गाने तो लंकेला जात असतां सीतेचा आक्रोश गृध्रराज जटायूने ऐकला. तिला सोडवायला जटायूने रावणाशी कठोर शब्दांनी भाषण केले.

अनेक वाङ्मायीन कृतींप्रमाणें भट्टिवकाव्याचा मूलस्रोत वाल्मीकि रामायण हाच आहे. असे जरी असले तरी भट्टिकाव्य वाचत असतांना त्यांत प्रामुख्याने कांही वैशिष्ट्यांचा प्रत्यय येतो. त्यांचा आपण क्रमाने विचार करू.

रामायणाहून भट्टिकाव्याचे पहिले वैशिष्ट्य दिसते ते असें की रामायणांत ज्या घटना विस्ताराने वर्णन केल्या त्याच घटना कांही मोजक्या शब्दांत भट्टिकाव्यांत वर्णन केल्या आहेत. म्हणून “संक्षेपप्रियता” हा एक मोठा गुण या महाकाव्याच्या वाचनाने लक्षांत येतो. हे करीत असताना कोणत्याहि प्रकारचा रसभंग किंवा रसहानी किंवा इतर कोणता काव्यदोष झालेला आढळत नाही.

भट्टिरकाव्याचे दुसरे वैशिष्ट म्हणजे भट्टीने नवनव्या आधारांचा शोध घेतला आहे. आणि तिसरे वैशिष्ट्य म्हणून कथानकाला नाट्यमयता आणण्यासाठी कवीने कांही प्रसंग अजिबात गाळले. उदा. मंथरेचा तो उच्चारही करीत नाही. केवळ ‘कर्णेजपैः’ (भ. का. ३/७) एवढा एकच शब्द तो आपल्या काव्यांत घालतो. आपल्या महाकाव्याला उठाव आणण्यासाठी त्याने कांही प्रसंग नवीन घातले तर कांही नांवांमध्ये बदल केला. उदा. जया विजया, बलातिबला इत्यादी.

याविषयी अधिक विवेचन करण्याकरिता आपण या प्रकारणांत भट्टिकाव्याच्या रचनापद्धतीचा विचार करू.

## रचनापद्धती

**रामायण बालकांड :** रामायण व भट्टिकाव्य या दोन महाकाव्यांचा प्रारंभच वेगवेगळा आहे. नारदाने वाल्मीकींना रामकथा ऐकविली. या घटनेपासून वाल्मीकि आपल्या महाकाव्याची सुरुवात करतात. तर "अमुक गुणांनी संपन्न असा दशरथ राजा होऊन गेला" अशी भट्टि सुरुवात करतो. वस्तुतः दोनीहि महाकाव्यें आहेत. दोन्ही महाकाव्यांचा नायक मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामचन्द्र हाच आहे. असे असतांना हा फरक का पडला? माझ्या दृष्टीने रामायणात वाल्मीकींना सरळ सरळ रामचरित्र वर्णन करावयाचे आहे. भट्टिकाव्य या महाकाव्याच्या रचनेमागील भट्टीचा उद्देश केवळ रामाचे चरित्रवर्णन असा नसून त्याला पाणिनीय अष्टाध्यायीतील सूत्रांची निदर्शने देता येतील अशाप्रकारे रामचरित्र वर्णन करावयाचे आहे. त्याला लक्ष्य आणि लक्षण एकत्र प्रदर्शित करावयाचे आहे.

रामायणाचा उपक्रम, तमसेच्या तीरावर क्रौंचपक्षाचा वध पाहून दुःखित झालेल्या वाल्मीकीच्या मुखातून 'मा निषाद .....' अशा श्लोकमय वाणीचे प्रगटन, ब्रह्मदेवाने रामचरित्र वर्णन करावयास सांगितले. रामायणातील विषयांचा उल्लेख, वाल्मिकींनी रामायणाची रचना करून कुशलवांना ते शिकविले, तें ऐकून मुनिजनांनी प्रशंसा केली. रामाच्या सभेमध्ये ते ऐकविले इत्यादि भट्टीने विस्तार आपल्या महाकाव्यांत पूर्णपणे गाळला.

दशरथाने वर्णन वाचल्यानंतर भट्टि लगेच अयोध्येचे वर्णन (१/५-८ भ. का.) करतो. रामायणाच्या दृष्टीने हा क्रम बदलला आहे. वाल्मीकींनी प्रथम अयोध्येचे व नंतर अशा प्रकारच्या अयोध्येत राजा दशरथ राहत होता असे म्हणून दशरथाचे वर्णन केले आहे. (स. ५ . ६ बालकां. वा. रा.) भट्टीने प्रथम दशरथ व नंतर अयोध्येचे वर्णन केले आहे.

सर्व प्रकारचीं सुखें जणू पायाशी लोळत असतांना दशरथाला पुत्र नसल्याने त्याने ऋष्यशृगांकडून पुत्रेष्टि यज्ञाला प्रारंभ केला असे भट्टि सांगतो (१/२० भ का.), तर यज्ञ करण्याचा प्रस्ताव राजाने मंत्र्यांपुढे मांडला. नंतर सुमंत्राने ऋष्यश्रृंगाचे वर्णन केले, ऋष्यश्रृंग अंगदेशांत आला व त्याचा विवाह झाला, ऋष्यशृंगाला अयोध्येत आणले इत्यादींच्या वर्णनासाठी रामायणाचे सर्गचे सर्ग गुंफलेले आहेत. भट्टीने हया सर्व घटना एका श्लोकांतच आटोपल्या.

ऋषींनी राजाला व राजाने अमात्यांना यज्ञसामग्री जमवायला सांगितली, राजाने वसिष्ठांना यज्ञसमारंभासाठी अनुमती मागितली, त्याकरिता सेवकांना नियुक्त केले, यज्ञासाठी आलेल्या राजांचा सत्कार करण्याकरिता सुमंत्राला पाठविले व दशरथाने सपत्नीक यज्ञाची दीक्षा घेतली, दशरथाने अश्वमेधाचे सांगोपांग अनुष्ठान केले, ऋष्यशृंगाने पुत्रेष्टि यज्ञाला प्रारंभ केला. देवांच्या प्रार्थनेहून रावणाचा वध करण्यासाठी ब्रह्मदेवाने भगवान् विष्णूला आश्वासन मागितले, रावणवधासाठी विष्णूने नररूपाने अवतार घ्यावा अशी देवांनी प्रार्थना केली, प्राजापत्य पुरुषाने अग्निकुंडांतून प्रादुर्भूत होऊन राजाला पायस दिले व तें सेवन करून राण्यांना गर्भधारणा झाली, ब्रह्मदेवाच्या प्रेरणेने देवानी वानरांची उत्पत्ति केली, यज्ञाकरिता जमलेल्या राजांना व ऋष्यशृंगाला निरोप देऊन दशरथाने राण्यांसह अयोध्येत आगमन केले, राम, लक्ष्मण, भरत शत्रुघ्नांचा जन्म, संस्कार, शील इ. गुणांचे वर्णन व राजाच्या सभेत विश्वामित्राचे आगमन व सत्कार केला. यज्ञ संरक्षणासाठी

रामाला पाठव हे विश्वामित्राचे भाषण ऐकून दशरथाला दुःख व मोह झाला. राजा अंगीकार करीत नाही असे पाहून विश्वामित्रांना क्रोध आला, तो बघून वसिष्ठाने दशरथाला प्रबोधित केले. राजाने स्वस्त्ययनपूर्वक रामलक्ष्मणांना मुनींसोबत पाठविले व मार्गात त्यांना बलातिबला नावाच्या विद्या विश्वामित्रांनी शिकविल्या. हा सर्व भाग भट्टीने गाळला. (स. १२/ वा. रा.) कारण त्या वर्णनाने त्याच्या उद्दिष्टांची पूर्ति होत नव्हती असे दिसते.

शरद् ऋतूंचे (स. २/८-१९ भ.का. ) भट्टीने केलेले वर्णन हा केवळ त्याच्या प्रतिभेचा स्वतंत्र विलास आहे. रामायणांत हे वर्णन नाही.

यज्ञरक्षणासाठी विश्वामित्रांबरोबर जात असतांना त्यांनी रामलक्ष्मणांना दोन विद्या दिल्या असल्याचा उल्लेख रामायण व भट्टिकाव्य या दोहोतही येतो. परंतु त्यांची नांवे बदलली आहेत. वाल्मीकीने बला व अतिबला अशी त्या विद्यांची नांवे दिली (स्. २२/१३ वा.रा.) तर भट्टीने जया व विजया (स. २/८१ भ.का.) अशी नांवे दिली आहेत.

भट्टिकाव्यांत मारीच व रामाचा संवाद वर्णन केला आहे. (२/३२-३६ भ.का.) रामायणांत त्याचा उल्लेख नाही. संवादांतून रसनिष्पत्ति अधिक उत्कटतेने होते असे म्हणतात. म्हणून प्रस्तुत संवाद भट्टींने घातला असावा. ह्या सवादांच्या द्वारे रामाचा धीरगंभीर व मारीचाचा राक्षसी स्वभाव दिसून येतो. मारीचाच्या भाषणाने राक्षसांचा संहार करण्याकरिता रामाच्या ठिकाणी वीररस उत्पन्न होतो असे दिसते.

श्रीरामांना घेऊन विश्वामित्र मिथिला नगरीत गेले. त्यावेळी मार्गातील मुक्काम, गंगेची उत्पत्ति, सगर प्रजाची उत्पत्ति इत्यादि (३१-६६ सर्ग) वाल्मीकींनी वर्णन केलेले प्रसंग भट्टीने गाळले.

**अयोध्याकांड**

रामायणांतील मंथरा वृत्तांताचा (८ सर्ग) भट्टीने उच्चारहि केला नाही. त्याकरिता केवळ कर्णेजपैः (३/७ भ.का.) एवढा एकच शब्द तो योजतो.

पूर्वी देऊ केलेल्या दोन वरांची कैकयीने दशरथाजवळ मागणी केली. राजाची चिंता, विलाप, कैकयीची भर्त्सना वा सांत्वन, रामाचा वनवासांत जाण्याचा निश्चय, वनगमनासंबंधी कौसल्या, सीता यांच्याशी बोलणी, त्यांच्या मूर्छा, विलाप, वनवासाची तयारी, ब्राह्मण व आश्रितांना धनदान इ. (११-३२ सर्ग) वाल्मीकींनी वर्णन केलेल्या विषयांचा भट्टीने उल्लेखही केला नाही.

रामायणांतील श्रावणबाळाची कथा (६३- ६४ सर्ग) भट्टिकाव्यांत नाही.

दशरथाच्या आज्ञेने राम वनवासाला निघून गेले. त्यावेळी आजोळी असलेल्या भरताला अयोध्येत परत आल्यानंतर ही बातमी कळते. तेव्हा रामाला परत आणण्यासाठी व रामाला राज्याभिषेक करण्यासाठी तो रामाच्या

मागोमाग जातो. त्यावेळी भरताला कुशल प्रश्न विचारण्याच्या निमित्ताने राजनीतीचा उपदेश रामाने केला. (१०० सर्ग), हा भाग भट्टिरकाव्यांत नाही.

**अरण्यकांड**

रामायणांत वर्णन केलेले पंचाप्सरतीर्थ, माण्डककर्णि मुनींची कथा अगस्त्यांचा प्रभाव, (११ सर्ग) हेमंत ऋतूचे वर्णन (१० सर्ग) भट्टिकाव्यांत नाही.

## दीपतुल्यः प्रबन्धोऽयम्

भट्टीच्या काव्याचा उद्देश काव्याच्या माध्यमाने व्याकरण शास्त्रातील शुद्ध प्रयोग समजावून सांगणे हा आहे. व्याकरणाचे सिद्धांत व्युत्पन्न सुकुमारमति कुमारांना किंवा काव्यमार्गातील पथिकांना काव्याच्या मिषाने त्याला सांगावयाचे आहेत. म्हणूनच आपल्या काव्याच्या शेवटी तो असें म्हणतो :-

दीपतुल्यः प्रबन्धोऽयं शब्दलक्षणचक्षुषाम्
हस्ताऽऽ दर्श इवान्धानां भवेद्व्याकरणादृते ॥ २२ ॥ ३३ भ.का.

हे माझे काव्य वैयाकरणांसाठी एखाद्या दीपाप्रमाणे आहे. व्याकरणाशिवाय हे काव्य आंधळ्याच्या हातातील दर्पणवत् आहे.

ही गोष्ट लक्षात घेऊन डॉ. भोलाशंकर व्यास त्यांच्या पुस्तकांत म्हणतात, "पाणिनींची सूत्रे मुखोद्गत करून रूपसिद्धीवर लक्ष्य केंद्रित करणे. पाणिनींच्या नियमांना अपवादरूप किंवा पूरकरूप असलेली वार्तिके व आणखी पल्लवित अशा महाभाष्यांतील फक्किका आठवून शास्त्रार्थ करणे प्रत्येकाकरिता आवश्यक नव्हते. परंतु संस्कृत साहित्य सरितेत प्रवेश होण्यासाठी व्याकरण ज्ञानरूपी होडी शिवाय शकत नाही ही गोष्ट लक्षांत घेऊन भट्टीहने प्रस्तुत काव्याची रचना केली आहे." (पृ. १४१-१४२ सं. कविदर्शन) तात्पर्य भट्टिकाव्य हे एक काव्य आहे. नव्हे महाकाव्य आहे.

भट्टिकाव्यांतील प्रकीर्ण कांडाविषयी असे म्हणतात की, प्रकीर्ण कांडांतील पद्यांमध्ये व्याकरणाच्या नियमाविषयी कोणतीहि निश्चित योजना दिसून येत नाही परंतु प्रकीर्ण कांडांतहि कित्येक प्रयोग असे आहेत की, जे काही कठीण रूपांचे प्रकृतिप्रत्ययांचे दिग्दर्शन करतात. आपण कांही निदर्शनेचे बघू –

प्रयास्यतः पुण्यवनाय जिष्णो रामस्य रोचिष्णुमुखस्य धृष्णुः ।
त्रैमातुरः कृत्स्नजितास्त्रशस्त्रः सध्र्यङ्ङ्यतः श्रेयसि लक्ष्मणोऽभूत् ॥ (१ /२५ भ.का.)

प्रगल्भ संपूर्ण शस्त्रास्त्र घेतलेला कल्याणतत्पर, तीन मातांचा पुत्र लक्ष्मण देखील अयशील व उज्ज्वलानन आणि वनांत जाणाऱ्या रामचंद्राचा सहचर झाला.

या श्लोकात जिष्णूः, रोचिष्णुः धृष्णु ही रूपें क्रमशः जि, रुच्, धृष् या धातुपासून ग्स्नु, इष्णुच् आणि क्नु हे प्रत्यय लागून बनली आहेत. या तीनहि प्रत्ययांचा प्रयोग 'आक्वेस्तच्छीलतद्धर्मतत्साधुकारिषु' ३-२-१३४ या सूत्राप्रमाणे ताच्छील्य या अर्थात होतो. वरील तीनहि रूपांचा बरोबरीने प्रयोग करून भट्टि ही गोष्ट स्पष्ट करतो कीं, समान रूपाच्या समान अर्थांमध्ये प्रयुक्त होणाऱ्या, अनेक प्रत्ययांत अर्थाच्या व व्याकरणाच्या दृष्टीने कोणता तात्त्विक भेद आहे. पुढील श्लोक बघू –

लतानुपातं कुसुमान्यगृहणात् स नघवस्कन्दमुपास्पृशच्च ।

कुतूहलाच्चारुशिलोपवेशं काकुत्स्थ ईषत्स्मयमान आस्त ॥ (२-२२ भ. का.)

रामाने कौतुकाने थोडे हसून लते लतेजवळ जाऊन फुलें तोडलीं, नदीनदींत जाऊन आचमन केले, आणि सुंदर अशा दगडा दगडावर बसून विश्रांती घेतली.

या श्लोकांत लतानुपातम्, नद्यवस्कन्दम् व शिलोपवेशम् हे वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग केलेले आहेत. यांच्या द्वारा भट्टि ही गोष्ट दाखवू इच्छितों कीं, विश्, पद्, स्कन्द्, इत्यादि धातुहून "वीप्सा" हा अर्थ दाखवायचा असेल तर 'विशिपतिपदिस्कन्दा व्याप्यमानासेव्यमानयोः' ३-४-५६ या सूत्राने णमुल् प्रत्याय होतो. म्हणून लतानुपातम्चा अर्थ लतां लताम् अनुपात्य (आसाद्य) म्हणजे लते लतेजवळ जाऊन असा होतो. तर नद्यवस्कनदम्चा नदीं नदीं गत्वा म्हणजे नदी नदींत जाऊन असा होतो तर शिलोपवेशम्चा अर्थ शिलां शिलाम् उपविश्य म्हणजे दगडा दगडावर बसून असो होतो. पुढील श्लोक बघू –

सोऽध्यैष्ट वेदांस्त्रिदशानयष्ट पितृनताप्र्सीत्सममंस्त बन्धून् ।
यजेष्ट षड्वर्गमरंस्त नीतो समूलघातं न्यवधीदरींश्च ॥ (१-२ भ.का.)

दशरथाने वेदांचे अध्ययन केले, देवतांचे पूजन केले, पितरांना तर्पण केले, बांधवांचा सम्मान केला, कामक्रोधादि षड्व्र्गाला जिंकले, नीतीच्या ठिकाणी तो रममाण झाला व शत्रूचे त्याने समूळ उच्चाटन केले.

या श्लोकांत भट्टीने अध्यैष्ट, अयष्ट, अताप्र्सीत्, सममंस्त, व्यजेष्ट, अरंस्त, न्यवधीत् या सर्व क्रियापदांत सामान्य लुङ्लधकाराचा प्रयोग केला आहे. अध्यैष्ट व न्यवधीत् हीं दोन क्रियापदें वगळून बाकी सर्व आत्मनेपदी आहेत सर्व प्रयोग प्रथम पुरुषी एकवचनाचे आहेत. एवढेच नाही तर तृप् धातूच्या लुङ् लकारांत सिच् प्रत्यय लागतो म्हणून अताप्र्सीत् बनते तर मन् तथा रम् धातूच्या लुङाच्या रूपांत धातु आणि प्रत्ययांच्या मध्ये इकार येत नसल्याने नकार व मकारांचा अनुस्वार होतो. आणखी उदाहरण बघूं –

बलिर्बबन्धे जलधिर्ममन्थे जह्रेऽमृतं दैत्यकुलं विजिग्ये ।
कल्पान्तदुःस्था वसुधा तथोहे येनैष भारोऽतिगुरुर्नहेस्य ॥ (२-३९ भ.का.)

हे रामा, तू बळीला बांधलेस, समुद्रमंथन केलेस, अमृत हरण केलेस, दैत्यांना जिंकलेस, आणि प्रलयांतून राहिलेली दुःखी अशी पृथ्वी (वराहावतारात) वर आणलीस अशा तुझ्यासाठी हे यज्ञसंरक्षणाचे कार्य ज्यास्त गौरवपूर्ण नाही.

या श्लोकांत भट्टीने लिट्लकाराचा प्रयोग केला आहे. बबन्धे, ममन्थे, जह्वे विजिग्ये, ऊहे हीं अनुक्रमें बन्ध्, मन्थ्, ह्व. वह्, वि + जि धातूंची रूपें आहेत. या ठिकाणीं लक्षांत घेण्यासाखे असें कीं, भूतकाळांत घडलेल्या बंधनादि क्रिया त्या त्या विशिष्ट अवतारांतील असल्याने प्रस्तुत श्लोकांत भट्टीने मुद्दाम लिट् लकाराचा प्रयोग केला आहे. परोक्ष (अक्ष्णोःपरम्) ह्या अर्थातच लिट् लकार 'परोक्षे लिट्' (३-२-११५) या सूत्राने पाणिनीने सांगितला आहे. पुढील श्लोक बघूं-

ततो नदीष्णान्पथिकान् गिरिज्ञाह्ववायकान्भूमिपतेरयोध्याम् ।
दित्सुः सुतां योधहरैस्तुरंगैर्व्यसर्जयन्मैथिलमर्त्यमुख्यः ॥ (२-४३ भ.का.)

नंतर राजर्षि जनकाने रामाला कन्यादान करण्याच्या इच्छेने दशरथाला बोलविण्यासाठी नदी तरुन जाण्यांत निपुण, अनेक मार्गामध्यें कुशल, पर्वतमार्ग जाणणारें व बोलण्यात प्रवीण असणारे चतुर घोडेस्वार अयोध्येत पाठविले.

या श्लोकांत भट्टीने अनेक द्वितीयाबहुवचनी पदांचा प्रयोग केलेला आहे. त्यांतही नदीष्णान्, गिरिज्ञान्. आह्वातयकान्, अशी बह्वं श कृदंते आहेत. नदीष्णान् येथे 'सुपि स्थः' ३-२-४ । या सूत्राचा "सुपि" असा योगविभाग केल्याने क प्रत्यय होतो. गिरिज्ञान् येथे 'इगुपधज्ञाप्रीकिरः कः' ३-१-१३५ या सूत्राने या धातुहून क प्रत्यय होतो. आह्वागयकान् येथे आ+ह्वेइ या धातुहून 'ण्वुल्तृचौ' ३-१-१३३ या सूत्राने ण्वुल् प्रत्यय होऊन 'वु' ला अकादेश होतो. योधररैः येथे 'नन्दिग्रहिपचादिभ्यो ल्युणिन्यचः' ३-१-१३४ या सूत्राने पचाद्यच् झाला आहे. पुढील श्लोक बघू-

परेद्यव्यद्य पूर्वेद्युरन्येद्युश्चापि चिन्तयन् ।
वृद्धिक्षयो मुनीन्द्राणां प्रियम्भावुकतामगात् ॥ (४-१३ भ.का.)

रामचंद्र येणाऱ्या दिवशी, आजच्या दिवशी, गेलेल्या दिवशी आणि अन्य दिवशी देखील ऋषींच्या लाभ-नुकसानीची काळजी वाहात त्याचे प्रिय बनले.

या श्लोकांत एका सूत्राची जवळजवळ सर्वच निदर्शनें भट्टीने दिली आहेत. असेहि अनेक श्लोक त्याने रचिले आहेत. त्याचा हा एक नमुना आहे. या श्लोकांत परेद्यवि, अद्य, पूर्वेद्युः अन्येद्युः ही 'सद्यः परुत्परार्येषमः परेद्यव्यद्यपूर्वेद्युरन्येद्युरन्यतरेद्युरितरे द्युरपरेद्युरधरेधुरुभयेधुरुत्तरेद्युः' ।५-३-२२ या सूत्राप्रमाणे झालेली निपातने आहेत. पुढील श्लोक तर अत्यंत लहान असून त्यात एका सूत्राची अनेक निदर्शने मिळतात.

निराकरिष्णू वर्तिष्णू वर्धिष्णू परितो रणम् ।
उत्पतिष्णू सहिष्णू च चेरतुः खरदूषणौ ॥ (५-१, भ.का.)

खर व दूषण-शत्रूंचे निराकरण करण्याकरिता अतिशय प्रहार होत असतांना सुद्धा युद्धांत उत्साह धारण करीत. वर उडून प्रहार सहन करीत- रणांगणावर सर्वत्र संचार करू लागले.

या श्लोकांत निराकरिष्णू, वर्तिष्णू, वर्धिष्णू, उत्पतिष्णू सहिष्णू, हीं सर्व इष्णुच् प्रत्ययांत रूपें असून इष्णुच् प्रत्यय सांगणारे सूत्र आहे. 'अलंकृञ्निराकृञ्प्रजन....' ३-२-१३६ ञ् पुढील श्लोकांत सर्व स्त्री प्रत्ययांत रूपें भट्टीने दिली आहेत.

नैवेन्द्राणी न रुद्राणी न मनावी न रोहिणी ।

वरुणानी न नाग्नायी तस्याः सीमन्तिनी समा ॥ (५-२२ भ.का.)

(प्रत्यक्ष) इन्द्राणी, रुद्राणी, मनावी, रोहिणी, वरुणानी, व अग्नायी देखील रामचंद्राच्या पत्नीसारखी सुंदर नाही.

या श्लोकांत इन्द्राणी, रूद्राणी, वरुणानी ही सर्व रूपें इन्द्रवरुण.. ४-१-४९ या सूत्राने आनुक् आगम व ङीप् हा स्त्रीलिंगी प्रत्यय होऊन सिद्ध झाली आहेत. अग्नायी येथे 'वृषाकप्यग्नि...' ४-१-३७ या सूत्राने ऐकारादेश व ङीप् हा स्त्रीलींगी प्रत्यय तर 'मनोरी वा' ४-१-३८ या सूत्राने औकारांदेश व ङीप् हा स्त्रीलींगी प्रत्यय झाला आहे. सीमन्तिनी हा देखील ङीप् प्रत्ययांत स्त्रीलिंगी शब्द आहे. पुढील श्लोक बघू –

७४, ७५, ७६ या तीन श्लोकांत भट्टीने ज्यास्तीत ज्यास्त क्यङन्ताची रूपें योजिलेली दिसतील.

दुःखायते जनः सर्व स एवैकः सुखायते ।
यस्योत्सुकायमाना त्वं न प्रतीपायसेऽन्तिके ॥ (५-७४ भ.का.)

ज्याच्यां जवळ उत्कंढेमुळे तूं अनुकूल होतेस तो एकच सुखाचा अनुभव करतो व बाकीची सर्व माणसे दुःखाचे वाटेकरी होतात.

येथे दुःखायते, सुखायते, उत्सुकायमाना व प्रतीपायसे ही सर्व क्यङन्त रूपे आहेत. दुःखायते व सुखायते येथे 'सुखादिभ्यः कर्तृवेदनायाम्' ३-१-१८ या सूत्राने क्यङ् होतो तर उत्सुकायमाना व प्रतीपायसे येथे 'भृशादिभ्यो भुव्यच्वेर्लोपश्च हलः' ३-१-१२ वा सूत्राने क्यङ् झाला आहे. तसेच पुढील श्लोकांतहि भट्टि क्यङन्ताची रूपें देतो -

कः पण्डितायमानस्त्वामादायामिषसन्निभाम् ।
त्रस्यन्वैरायमाणेभ्यः शून्यमन्ववसद्वनम् ॥ (५-७५ भ.का.)

कोण पंडितमानी कोमलांगी तुला घेऊन वैर करणाऱ्यांना घाबरून या निर्जन वनांत राहतो.

या श्लोकांत पंडितायमानः येथे भृशादित्वामुळे (वरील सूत्राने) क्यङ् झाला आहे. तर वैरामयाणेभ्यः येथे वैरं कुर्वन्तीति वैरायते 'शब्दवैरकलह....' ३-१-१७ या सूत्राने क्यङ् प्रत्यय झाला आहे. पुढील श्लोकहि अशाच प्रकारचा आहे.

ओजायमाना तस्यार्घ्यं प्रणीय जनकात्मजा ।
उवाच दशमूर्धानं साऽऽदरा गद्गकदं क्चः ॥ (५-७६ भ.का.)

सीता तेजस्वी होत रावणाला अर्घ्यदान करून आदरपूर्वक भय किंवा लज्जेने अस्पष्ट अशी बोलू लागली.

**अनुक्रमणिका**

या श्लोकांत ओजायमाना येथे ओज इव आचरति इति ओजायते या अर्थात 'कर्तुः क्यङ् सलोपश्च' ३-१-११ या सूत्राने क्यङ् प्रत्यय होऊन नित्य सलोप झाला आहे. पुढील श्लोकांत एका सूत्राने णिनि झालेली अनेक कृदंत रूपें भट्टि देतो –

मा स्म भूग्राहिणी भीरु गन्तुमुत्साहिनी भव ।
उद्वासिनी च भूत्वा मे वक्षः संमर्दिनी भव ॥ (५-९३, भ.का.)

"हे भीरू मी येणार नाही" असे म्हणून आग्रही बनूं नकोस. लंकेत जाण्यासाठी उत्साह धारण कर, सुशोभित होऊन मला आलिंगण दे.

या श्लोकांत ग्राहिणी, उत्साहिनी, उदासिनी व वक्षःसंमर्दिनी ही णिनि प्रत्यय झालेलीं कृदंत रूपे आहेत. 'नन्दिग्रहिपचादिभ्यो ल्युणिन्यचः' ३-१-१३४ या सूत्राने णिनि होतो.

याप्रमाणे प्रकीर्ण कांडातील कांही पद्यांचा आपण विचार केला. अशी आणखी कांही पद्ये घेऊन विचार करता येईल. उदाहरणादाखल प्रस्तुत पद्यांचा विचार केलेला आहे.

दुसरें असें की, भट्टिकाव्यांत भट्टीने व्याकरणाच्या दृष्टीने जसा अष्टाध्यायीचा तसा कथानकासाठी रामायणाचा क्रम स्वीकारलेला दिसतो. वाल्मीकि रामायण हे भट्टिदकाव्याचे उपजीव्य आहे. वाल्मीकींनी रामाच्या जीवनांतील घटना ज्या क्रमाने वर्णन केल्या आहेत त्याच क्रमाने भट्टीनेही वर्णन केल्या आहेत. कोठेही त्याने क्रमभंग केलेला नाही.

तीसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सरस-नीरसतेचा. अष्टाध्यायीची सर्वांत प्राचीन वृत्ति म्हणून वामन-जयादित्य याची काशिकावृत्ति आहे. महाभाष्यांतहि अशा प्रकारचे विवेचन आहे. परंतु उदाहरणे वगैरे देऊन प्रतिपादन करण्याची पद्धति काशिकाकारांचीच सर्वात प्राचीन आहे.

पलीकडच्या ग्रंथकारांनी याच पद्धतीचा स्वीकार केलेला दिसतो. निदर्शनासाठी म्हणून आपण भट्टिलकाव्यांतील कारकाधिकाराचा विचार करूं त्यावरून आपल्याला असें दिसून येते कीं, भट्टीचे केवळ अष्टाध्यायीवरच नाही तर काशिकेवरही तेवढेच प्रभुत्व आहें. भट्टीचा कारकाधिकार याप्रमाणे आहे –

वृक्षाद् वृक्षं परिक्रामन् रावणाद् बिभ्यतीं भृशम् ।
शत्रोस्त्राणमपश्यन्तीमदृश्यो जनकात्मजाम् ॥ (८-७० भ.का.)

अशोकवनांत ज्या अवस्थेंत हनूमान सीतेला पाहतो त्या अवस्थेचे वर्णन भट्टि करीत आहे. रावणाला अत्यंत घाबरणाऱ्या, शत्रूकडून आपल्याला संरक्षण मिळूं शकत नाही असें समजणाऱ्या सीतेला, एका वृक्षावरून दुसऱ्या वृक्षावर उड्या मारीत हनुमंताने पाहिले. येथे भट्टीच्या प्रतिभेचा आविष्कारहि आपल्याला दिसतो.

या श्लोकांत 'ध्रुवमपायेऽपादानम्' १-४-२४ 'भीत्रार्थानां भयहेतुः' १-४-२५ ह्या सूत्रांची निदर्शने आली आहेत. काशिकेतील निदर्शनें अशीं ग्रामाद् आगच्छति, पर्वताद् अवरोहति, सार्थाद् हीनः, रथात् पतितः। तसेच चौरेभ्यः बिंभेति, चौरेभ्यः उद्विजते, चौरेभ्य त्रायते, चौरेभ्यः रक्षति।

तां. पराजममानां स प्रीते रक्ष्यां दशाननात्।
अन्तर्दधानां रक्षोभ्यो मलिनां म्लानमूर्धजाम्॥ ८-७१

वस्तुतः रावणाकडून संदेश मिळण्यास योग्य असलेल्या रावणाच्या प्रीतिपासून पराङ्मुतख होणाऱ्या, राक्षसींनी आपल्याला पाहू नये म्हणून अंतर्हित होणाऱ्या, मलिन व मलिन केंस असलेल्या सीतेला त्याने पाहिले. प्रतिभा असली तरी तारेवरची कसरत आहे असें येथे दिसते.

या श्लोकांत 'पराजेरसोढः' १-४-२६ 'वारणार्थानामीप्सितः' १-४-२७ 'अन्तर्धोयेनादर्शमिच्छति' १-४-६८ या सूत्रांची निदर्शनें आली आहेत. काशिकेतील निदर्शनें अशीं उपाध्यायात् अन्तर्धन्ते, उपाध्यायानिन्निलीयते।

रामादधीतसंदेशो वायोजातश्रुतस्मिताम्।
प्रभवन्तीमिवादित्यादपश्यत् कपिकुञ्जरः॥ ८-७२

रामाकडून संदेश मिळालेल्या हनुमंताने शोकामुळे हास्यरहित आणि तेजशस्वितेमुळे जणूं सूर्यापासून उत्पन्न झालेल्या सीतेला पाहिले.

या श्लोकांत, 'आरव्यातोपयोगे' १-४-२९, 'जनिकर्तुः प्रकृति' १-४-३० आणि 'भुवः प्रभवः' १-४-३१ ह्या सूत्रांची निदर्शनें आलीं आहेत. काशिकेंतोल निदर्शनें अशी :- उपाध्यायात् अधीते, गोमयात् वृश्चिको जायते, हिमवतो गंगा प्रभवति।

रोचमानः कुदृष्टिभ्यः रक्षोभ्य प्रत्तवान् श्रियम्।
श्लाघमानः परस्त्रीभ्यस्तत्रागाद्राक्षसाधिपः॥ ८-७३

नीच लोकांना आवडणारा (सज्ञनांना नव्हे), राक्षसांना संपत्ति देणारा व परस्त्रियांची स्तुती करणारा (कामुकतेमुळे) रावण अशोक वनिकेंत आला.

या श्लोकांत 'रुच्यर्थांनां प्रीयमाणः' १-४-३३, 'कर्मणा यमभिप्रैति स संप्रदानम्' १-४-३२ आणि 'श्लाघह्नुङ्स्थाशपां ज्ञीप्स्यमानः' १-४-३४ हया सूत्रांची निदर्शने आली आहेत काशिकेतील निदर्शनें अशी :-

उपाध्यायाय गां ददाति, माणवकाय भिक्षां ददाति, देवदत्ताय रोचते मोदकः, यज्ञदत्ताय स्वदतेऽपूपः, देवदत्ताय श्लाघते, देवदत्ताय ह्नुतते, यज्ञदत्ताय ह्नुसते, देवदत्ताय तिष्ठते, यज्ञदत्ताय शपते।

अशप्त निह्नुपवानोऽसौ सीतायै स्मरमोहितः ।
धारयन्निव चैतस्यै वसूनि प्रत्यपद्यत । ८-७४

काममोहित रावणाने सीतेपासून आपली दुर्जनता लपवून मी कधी अपराध करणार नाही अशी शपथ घेतली आणि सीतेचा जणूं ऋणी असल्याप्रमाणे तिला सर्वस्व देण्याचे कबूल केले.

या श्लोकांत 'श्लाघह्नुङ्स्था शपां...' १-४-३४ आणि 'धारेरु-त्तमर्णः' १-४-३५ या सूत्रांत्री निदर्शने आलीं आहेत. काशिकेतील निदर्शनें अशीं –

देवदत्ताय शतं धारयति, यज्ञदत्ताय शतं धारयति ।

तस्यै स्पृहयमाणीऽसौ बहु प्रियमभाषत ।
सानुनीतिश्च सीतायै नाक्रुध्यन्नाप्यसूयत ॥ ८-७५

आपल्याला सीतेने वश व्हावे म्हणून प्रिय भाषण केले, अनुनय करीत असतांना तो सीतेवर कुपित झाला नाही किंवा त्याने असूया केली नाही.

या श्लोकांत 'स्पृहेरीप्सितः' १-४-३६ आणि 'क्रुधद्हेतर्ष्यासुयार्थानां यं प्रतिकोपः' १-४-३७ या सूत्रांची निदर्शनें आलीं आहेत काशिकेतील निदर्शनें अशी – पुष्पेभ्यः स्पृह्यति, फलेभ्यः स्पृह्यति, देवदत्ताय क्रुध्यति, देवदत्ताय द्रुह्यति, देवदत्ताय ईर्ष्यति, देवदत्ताय असूयति ।

संक्रुध्यसि मृषा किं त्वं दिद्दक्षुं मां मृगेक्षणे ।
ईक्षितव्यं परस्त्रीभ्यः स्वधर्मो रक्षसामयम् ॥ ८-७६

हे सीते, माझ्यावर तूं कां रागावतेस? विविध प्रश्न विचारून परस्त्रियांचे दर्शन करणे हा आम्हा राक्षसांचा धर्म आहे.

या श्लोकांत 'क्रुधद्रुहोरूपसृष्टयोः कर्म' १-४-३८ आणि 'राधीक्ष्योर्यस्य विप्रश्नः' १-४-३९ या सूत्रांची निदर्शनें आलीं आहेत. काशिकेतील निदर्शनें अशी – देवदत्तमभि क्रुध्यति, देवदत्तमभिद्रुह्यति, देवदत्ताय ईक्षते । या श्लोकांचे मूळ रामायणांतील पुढील श्लोक आहे असे श्रीशेषराज शर्मा म्हणतात –

स्वधर्मो रक्षसां भीरु सर्वथैव न संशयः
गमनं वा परस्त्रीणां हरणं सम्प्रमथ्य वा ॥ (२०-५ वा. रा. सुंदरकांड)

श्रृण्वद्भ्यः प्रतिश्रृण्वन्तिमध्यमा भीरू नोत्तमाः ।
गृणद्भवयोऽनुगृणन्त्यन्ये कृताऽर्था नैव मद्विधाः ॥ ८-७७

अनुक्रमणिका

हे भीरु, मध्यम लोक कोणी उपदेश केला तर तो ऐकतात. उत्तम लोक ऐकत नाहीत. अकृतार्थ दुसरे कांही लोक जो दाता असेल त्याला भाषणांनी प्रोत्सहित करतात. परंतु माझ्यासारखे उत्तम लोक स्तुतीची अपेक्षा न करताच याचकांना देत असतात.

या श्लोकांत 'प्रत्याङ्भ्यां श्रुवःपूर्वस्य कर्ता' १-४-४० आणि 'अनुप्रतिगृणश्च' १-४-४१ या सूत्रांची निदर्शनें आलीं आहेत. काशिकेतील निदर्शनें अशीं –

देवदत्ताय गां प्रतिशृणोति, देवदत्ताय गाम् आशृणोति, होत्रे अनुगृणाति ।

इच्छ स्नेहेन दीव्यन्ती विषयान् भुवनेश्वरम् ।
संभोगाय परिक्रीतः कर्तास्मि तव नाऽप्रियम् । ८-७८

माला चन्दनादि विषयांचा उपयोग करीत तूं स्नेहाने माझा अंगीकार कर. विषयोपभोगाकरिता तुझ्याकडून स्वीकारल्या गेलेला मी तुझे कांही अप्रिय करणार नाही.

या श्लोकांत 'साधकतमं करणम्' १-४-४८, 'बिवःकर्मच १-४-४३' परिक्रयणे संप्रदानमन्यतरस्याम् १-४-४४ या सूत्रांची निदर्शनें आली आहेत. काशिकेतील निदर्शनें अशी –

दात्रेण लुनाती, परशुना छिनत्ति, अक्षैः अक्षान् वा दीव्यति, शतेन परिक्रीतोऽनुब्रूहि, शताय परिक्रीतोऽनुब्रूही, सहस्रेण परिक्रीतोऽनुब्रूहि, शताय परिक्रीतोऽनुब्रूहि ।

आस्स्व साकं मया सौधे माऽधिष्ठा निर्जनं वनम् ।
माऽधिवात्सीर्भुवं शय्यामधिशेष्व स्मरोत्सुका ॥ ८-७९

माझ्यासोबत राजसदनांत रहा. निर्जन वनांत राहू नकोस. जमिनीवर बसू नकोस कामार्थिनी होऊन माझी शय्यासोबत कर.

या श्लोकांत 'आधारोऽधिकरणम्' १-४-४५ 'अधिशीङ्स्थाससां कर्म' १-४-४६, 'उपान्वध्याङ्वनसः' १-४-४८ या सूत्रांची निदर्शने आली आहेत. काशिकेंतील निदर्शनें अशी –

कटे आस्ते, कटे शते, स्थाल्यां पचति, ग्राममधिशेते, ग्राममधितिष्ठति, पर्वत मध्यास्ते, ग्राममुपवसति ग्राममनुवसति, ग्राममधिवसति, ग्राममावसति ।

अभिन्यविक्षथास्त्वं मे यथैवाऽव्याहता मनः ।
तवाऽप्यध्यावसन्तं मां मा रौत्सीह् दयं तथा ॥ ८-८०

अनुक्रमणिका

ज्याप्रमाणे तूं माझ्या हृदयांत अनिवारित होऊन दडली आहेस त्याचप्रमाणे तुझ्या हृदयांत राहण्यांस मला अडवू नकोस.

या श्लोकांत 'अभिनिविशश्च' १-४-४७ या सूत्राचे निदर्शने आहे. काशिकेतील निदर्शन असें – ग्राममभिनिविशते ।

माऽवमंस्था नमस्यन्तमकार्यज्ञे जगत्पतिम् ।
संदृष्टे मयि काकुत्स्थमधन्यं कामयेत का ॥ ८-८१

हे कार्यज्ञानरहित सीते, तुला नमस्कार करणाऱ्या जगत्पति अशा माझा अपमान करू नकोस. मला पाहिल्यावर त्या अभागी रामाची कोणती स्त्री इच्छा करील ?

या श्लोकांत 'कर्तुरीप्सिततमं कर्म' १-४-४९ आणि 'तथायुक्तं चानीप्सितम्' १-४-५० ह्या सूत्रांची निदर्शने आली आहेत. काशिकेतील निदर्शने अशी – कटं करोति, ग्रामं गच्छति, ग्रामं गच्छन् वृक्षमूलान्युपसर्पति ।

यः पयो दोग्धि पाषाणं स रामाद् भूतिमाप्नुयात् ।
रावणं गमय प्रीतिं बोधयन्तं हिताऽहितम् ॥ ८-८२

जो दगडापासून दूध दोहील तो रामापासून ऐश्वर्य प्राप्त करील. (अर्थात हे शक्य नाही) हिताहित समजणाऱ्या रावणाची प्रीति संपादन कर.

या श्लोकांत 'अकथितं च' १-४-५१ 'गतिबुद्धि' १-४-५२ ह्या सूत्रांची निदर्शनें आली आहेत. काशिकेतील निदर्शनें अशीं – गांदोग्धि पयः पौरवं गां याचते, गामवरुणद्धि मेजव्र, माणवकं पन्थानं पृच्छति, पौरवं गां भिक्षते, वृक्षमवचिनोति फलानि, माणवकं धर्म ब्रूते, माणवकं धर्मम् अनुशास्ति, । गच्छति माणवको ग्रामम्- गमयति माणवकं ग्रामम्, याति माणवको ग्रामम् – यापयति माणवकं ग्रामम् ।

प्रीतोऽहं भोजयिष्यामि भवतीं भुवनत्रयम् ।
किं विलापयसेऽत्यर्थ पार्श्वे शायय रावणम् ॥ ८-८३

मा संतुष्ट होऊन त्रिभुवनांतील भोग्य पदार्थ तुला आणून देईन कशाला ज्यास्त बोलायला लावतेस? रावणाला तूं आपल्या जवळ झोपव.

या श्लोकांत 'गतिबुद्धि ... ' १-४-५२ या सूत्राची निदर्शन आली आहेत. काशिकेतील निदर्शनें वरीलपप्रमाणेच.

आज्ञां कारय रक्षोभिर्मां प्रियाण्युपहारय ।

कः शक्रेण कृतं नेच्छेदधिमूर्धानमञ्जलिम् ॥ ८-८४

तूं राक्षसांना आपली आज्ञा मानण्यासाठी प्रेरणा दे. अभीष्ट पदार्थ आणण्यासाठी मला प्रेरित कर. ज्याला बघून इंद्र हात जोडून नमस्कार करतो त्याची (रावणाची) इच्छा कोण करणार नाही ?

या श्लोकांत 'ह्रक्रोरन्यतरस्याम्' १-४-५६ आणि 'स्वतंत्रः कर्ता' १-४-५४ या सूत्रांची निदर्शनें आलीं आहेत. काशिकेतील निदर्शनें अशीं –

हरति भारं माणवकः – हारयतिभारं माणवकं माणवकेन वा, करोति कटं देवदत्तः- कारयति कटं देवदत्तं देवदत्तेन वा, देवदत्तः पचति, स्थाली पचति,

याठिकाणी भट्टिकाव्याचा व काशिकावृत्तीचाहि कारकाधिकार संपतो. आतापर्यंत भट्टिकाव्य आणि काशिकावृत्ति या दोहोंमधील निदर्शनांचा आपण तुलनात्मक विचार केला त्यावरून असें निदर्शनांस येते कीं, भट्टिकाव्यांतील निदर्शनें ही अधिक सरस आहेत. यादृष्टीनें पाणिनीय व्याकरणाच्या अध्ययनासाठी भट्टिकाव्याचा चांगल्या तऱ्हेने उपयोग होऊ शकतो.

## भट्टिकाव्यांतील कांही वैशिष्ट्यपूर्ण रूपें व दोष

यानंतर भट्टिकाव्यांत आलेल्या कांही वैशिष्ट्य दाखविणाऱ्या रूपांचा परामर्श घेण्याचे योजिले आहे. कित्येक रूपांच्या बाबतील वैयाकरणांच्या स्पष्टीकरणांची मौज वाटते. तर कित्येक रूपांच्या बाबतीत टीकाकारांची भिन्न-भिन्न मतें बघण्यासारखी आहेत. आपण प्रकीर्ण कांडापासून प्रारंभ करू या –

अभून्नृपो विबुधसखः परन्तपः श्रुत्वान्वितो दशरथ इत्युदाहृतः ।
गुणैर्वरं भुवनहितच्छलेन यं सनातनः पितरमुपागमत् स्वयम् ॥ १-१ (भ. का.)

देवतांचा मित्र, शत्रूंना पीडित करणारा, वेदादि शास्त्रांचे अध्ययन केलेला असा दशरथ नांवाचा प्रसिद्ध राजा होऊन गेला. भगवान् विष्णु लोकोपकाराच्या मिषाने गुणश्रेष्ठ अशा या राजाच्या पोटी पुत्ररूपाने अवतीर्ण झाले.

श्रुत्वान्वितः श्रुतैः अन्वितः हा समास कसा सोडवावा आणि तो कोणता मानावा याविषयी मतभेद आहेत. कैय्यट म्हणतो – 'तृतीया तत्कृतार्थेन गुणवचनेन' २-१-३० या सूत्राचा योगविभाग करून 'तृतीया' असा समास सोडवावा. परंतु महाभाष्यकरांना या सूत्राचा योगविभाग मान्य नाही – म्हणून सुप्सुप् समास करावा लागतो असे श्रीशेषराज शर्मा शास्त्री म्हणतात.

कौसल्ययाऽसावि सुखेन रामः प्राक्केकयीतो भरतस्ततोऽभूत् ।
प्रासोष्ट शत्रुघ्नमुदारचेष्टमेका सुमित्रा सह लक्ष्मणेन ॥ १-१४

प्रथम कौसल्येने रामाला, कैकयीने भरताला आणि सुमित्रेने लक्ष्मण आणि शत्रुघ्नाला जन्म दिला.

लक्ष्मणेन सह – येथे लक्ष्मणेन ही तृतीया 'सह' च्या साहचर्याने "सहयुक्तेऽप्रधाने" २-३-१९ या सूत्राप्रमाणे झाली आहे. मल्लिनाथाचे म्हणणें असें कीं, 'अत्र लक्ष्मणस्य क्रियापदेन सह सम्बन्धाभावादप्रधानत्वात् शत्रुघ्नापेक्षया न कनीयस्त्वं शङ्कअयम् । पित्रा सहागतः पुत्रः इत्यत्रेव शब्दक्रमानुरोधेन पुत्रापेक्षया पितुरिव लक्ष्मणस्यापि शत्रुघ्नापेक्षया ज्यायस्त्वमेव वेद्यम् ।' याठिकाणी लक्ष्मण या पदाचा क्रियापदाशी संबंध नसल्याने तें पद अप्रधान आहे. म्हणून त्याची तृतीया झाली. परंतु अप्रधान म्हणून शत्रुघ्नापेक्षा त्याला लहान समजू नये. पित्रा सहागतः पुत्रः येथे पित्रा या पदाप्रमाणे शब्दक्रमाच्या अनुरोधाने लक्ष्मणाला शुत्रुघ्नापेक्षा मोठेच समजावे.

> निशातुषारैर्नयनाऽम्बुकल्पैः पत्रान्तपर्यागलदच्छबिन्दुः ।
> उपारुरोदेव नदत्पतंगः कुमुद्वतीं तीरतरुर्दिनादो ॥ २-४

प्रातःकाळीं अश्रूंप्रमाणे असलेले दवबिंदू ज्याच्या पानांच्या अग्रभागांतून गळत आहेत व ज्याच्यावर बसून पक्षी कूजन करीत आहेत असा तटावरील वृक्ष जणूं कुमुदिनीला विचारतो कीं, पतीच्या वियोगाने तूं अशी शोभाहीन झालीस, आणि असें बोलून तो जणूं रडत आहे.

**कुमुद्वतीम् उमारुरोद** – येथे रुदिर अश्रुविमोचने हा अकर्मक धातु असतांना कुमुद्वतीम् असें कर्म त्याला कसें मिळाले? म्हणजे रुद् धातु सकर्मक कसा झाला ?

"अत्र रुदिर् विमोचने" इति धातोरकर्मकत्वेऽपि कुमुद्वतीं पदस्य 'गम्यमानोद्दश- क्रियाऽपेक्षया कर्मत्वम् । गम्यमानक्रियाऽपेक्षया कारकोत्पत्तेरिष्टत्वात्' इति मल्लिनाथः । शेदनक्रियया आक्रन्दनविशिष्ट्या कुमुद्वत्या 'ईप्सिततमत्वात् रुदिः सकर्मकः' । इति जयमंगलः । उपसर्गयोगात् रुदिः सकर्मक इति त्वन्ये । मल्लिनाथ म्हणतो कीं, गम्यमान क्रियेच्या अपेक्षेने कारकाची उत्पत्ति होऊ शकते. त्या गम्यमानक्रियेच्या अपेक्षेने येथे कर्मत्वाची प्राप्ती होते. जयमंगल म्हणतों कीं, आक्रन्दनविशिष्ट अशा रुदनक्रियेने कुमुद्वती हे पद ईप्सिततम असल्याने रुदिर् धातु सकर्मक होतो. इतर टिकाकारांचे म्हणणे असे कीं, उपसर्गाशी योग आल्याने रुदिर् धातु सकर्मक झाला आहे.

> ततो नदीष्णान्पथिकान्गिरिज्ञानाह्ववायकान्भूमिपतेरयोध्याम् ।
> दित्सुः सुतां योधहरैस्तुरंगै र्व्यसर्जयन्मैथिलमर्त्यमुख्यः ॥ २-४३

तेंव्हा महाराज जनकाने रामचंद्राला कन्यादान करण्याच्या इच्छेने दशरथाला बोलविण्यासाठी नदी तरून जाण्यामध्ये कुशल, अनेक मार्गामध्ये निपुण, पर्वतमार्गावरून जाणारे व बोलण्यात चतुर अशा घोडेस्वारांना अयोध्येत पाठविले. येथे पथिकान् हे पद कसे सोडवावे याविषयी मतभिन्नता आहे.

**पथिकान्** – पथिषु कुशलाः पथिकास्तान्, 'तत्र कुशलः पथः' इति ठक्प्रत्यय इति जयमंगलमल्लिनाथौ तन्न, तत्र सूत्रे, गोषदादिभ्यो वुन् इत्यतो वुनोऽनुवृत्ते, वुनि सति तु पथक इति स्यात् अतः पन्थानं गच्छितीति विग्रहे

'पथःष्कन्' इतिष्कन्, पान्थः पथिक इत्यपि इत्यमरः । जयमंगल व मल्लिनाथ म्हणतात की पथिषु कुशलाः या अर्थात 'तत्र कुशलः पथः' ५-२-६३ या सूत्राने ठक् प्रत्यय होतो. हे बरोबर नाही कारण या सूत्रांत त्याच्या पूर्वीच्या 'गोषदादिभ्यो वुन्' ५-२-६२ सूत्रांतून वुन् ची अनुवृत्ति येते आणि वुन् प्रत्यय झाला तर पथकः असें रूप होईल. म्हणून पन्थानं गच्छति असा विग्रह 'करून पथःष्कन् ५-२-७५ या सूत्राने ष्कन् प्रत्यय करून रूप साधावे.'

उभाम्प्रचक्रुर्नगरस्य मार्गान्ध्वजान्बबन्धुर्मुमुचुः खधूपान ।
दिशश्च पुष्पैश्चकरुर्विचित्रैरर्थेषु राज्ञा निपुणा नियुक्ताः ॥

कार्यामध्ये निपुण राजा दशरथाने नियुक्त केलेल्या पुरुषांनी शहरांतील रस्ते शिंपडले. ध्वज फडकविले. आकाशव्यापी धूप पसरविला आणि दिशा रंगीबेरंगी फुलांनी सजविल्या.

**उक्षाम्प्रचक्रुः** – उक्ष सेचने इति धातोर्लिट् । 'इजादेश्च गुरुमतोऽनृच्छः' इत्याम्प्रमप्रयोगे कृञोऽनुप्रयोगः कृञ्चानुप्रयुज्यते लिटिइत्यत्र पदान्तरानुप्रयोग निषेधेऽपि ते प्राग्धातोः इत्यनेन गत्युपसर्गसंज्ञकांना धात्वर्थकत्वादिना धात्वक्षरप्रायत्वाच्च अत्र धातोः प्रागेव प्रयोगनियमात् तेषां प्रोपसर्गस्य न व्यवधायकत्वमतो नाऽसाधुत्वम् । तं पातय प्रथममास प्रभ्रंशयां यो नहुषं चकार इत्यादिस्थले तु उपसर्गेतरस्य व्यवधानात् असाधुत्वमेव । जयमंगलाकारेण तु व्यवधानभयात् 'उक्षान् प्रचक्रु' इति पाठः कल्पितः व्याख्यातंच उक्षणमुक्षा गुरुश्च हल" इत्यप्रत्ययः, सा विद्यते येषां ते उक्षास्तान् (सेकवन्त) "अशं आदिभ्योऽच्" इत्यच् प्रत्ययः इति । तन्मल्लिनाथमते प्रसिद्धपाठ – त्यागादप्रसिद्धां पाठकल्पनाच्च साह्यसमेवत्युपेक्ष्यम् ।

उक्षाम्प्रचक्रुः येथे 'उक्ष सेचने' या धातुहून लिट्लरकार झाला आहे. इजादेश्च ... या सूत्राने (आम् प्रत्यय करावयाचा असतांना) कृञ् चा अनुप्रयोग झाला आहे जयमंगलाने उक्षान् प्रचक्रुः असा पाठ दिला आहे. त्याचे म्हणणे असें की, 'कुञ्चानुप्रयुज्यते लिटि' ३-१-४० या सूत्राने अन्य पदाच्या व्यवधानाचा निषेध केला आहे उक्षाम्प्रचक्रुः याठिकाणी उक्षाम् + चक्रुः यांच्या मध्ये प्र या उपसर्गाचे व्यवधान आहे म्हणून उक्षान् असा पाठ घेऊन त्याने वर दिल्याप्रमाणे समाधान केले आहे. मल्लिनाथाचे या विषयी म्हणणे असे की, प्रसिद्ध पाठाचा त्याग व अप्रसिद्ध पाठाचे ग्रहण करण्याची काही गरज नाही कारण पदान्तराचा (अन्य पदाचा) निषेध केला असला तरी 'ते प्राग्धातोः' १-४-८० या सूत्राने उपसर्ग व गति संज्ञकांचा प्रयोग धातूच्या पूर्वीच होतो व ते धातूचाच भाग बनतात. म्हणून प्र उपसर्गाचे व्यवधान मानण्याचे कारण नाही. म्हणूनच उक्षाम्प्रचक्रुः हाच पाठ बरोबर आहे तं पातयां प्रथममास, प्रभ्रंशयां या प्रयोगांमध्ये उपसर्गाहून भिन्न पदांचे व्यवधान असल्याने ते असाधु आहेत.

'सर्वत्र प्रैषातिसर्गप्राप्तकालेषु कृत्याश्च' इत्यातिसर्गेलोट् अतिसर्गः कामाचारानुज्ञा । प्रभ्रंशयांयो महुषं चकार

वस्त्रान्नपानं शयनं च नाना कृत्वाऽवकाशे रुचिरं प्रक्लृप्तम् ।
तान्प्रीतिमानाह मुनिस्ततः स्म निवद्ध्वमाद्ध्वंप पिबतात्त शेध्वम् ३-४४

तेव्हा भरद्वाज ऋषींनी वस्त्र, अन्न, पेय आणि शय्या अनेक ठिकाणी चांगल्या प्रकारे सुसज्जित करून अतिथींना म्हटले – वस्त्र घाला, बसा, प्या, खा आणि आरामात झोपा. निवद्ध्व म्, आद्ध्व , पिबत, आत्त, शेध्वम्, सर्वत्र विधौ लोडिति व्याख्यातृणां जयमंगलादीनां मतमसत्, रागत एव प्राप्तेः ज्योतिष्टोमादिवदपूर्वविधेयाऽभावः । नाऽप्यत्र ऋतौ जायामुपेयात् 'इतिवन्नियम्यते' तदनिच्छतामकरणे प्रत्ययाऽभावात् । नाऽपि स्थानान्तर विहारपरिसङ्ख्या परत्वमिति वाच्यं पञ्चेतरपञ्चनखभक्षणवत् स्थानान्तरविहारे दोषाभावात् । दोषत्रयदुष्टत्वादस्मदुक्तमेव युक्तमिति महामहोपाध्यायो मल्लिनाथः ।

या श्लोकात 'प्रैषातिसर्गप्राप्तकालेषु कृत्याश्च' ३-३-१६३ या सूत्राने अतिसर्ग या अर्थात लोट् लकार झाला आहे. अतिसर्ग म्हणजे मनाला येईल तसे वागण्याची अनुज्ञा. जयमंगलाने सर्वत्र विधी या अर्थात लोट् लकार सांगितला आहे. हे बराबर नाही. कारण निवदध्वम्, आदध्वम् पिबत, आत्त, शैध्वम् येथे काहीहि अपूर्व विधेय नाही. उदा. ज्याला पुत्राची इच्छा असेल त्याने ज्योतिष्टोम करावा. असे येथे नाही किंवा 'ऋतौ जायामुपेयात्' या वाक्यात सांगितल्याप्रमाणे काही नियमनहि नाही किंवा स्थानान्तर विहारादि देखील नाहीत. म्हणून विधि या अर्थात लोट् लकार मानता येत नाही. तर अतिसर्ग याच अर्थात लोट् लकार मानावा लागतो.

व्रातीनव्यालदीप्राऽस्त्रः सुत्वनः परिपूजयन् ।
पर्षद्वलान्महाब्रह्मैराट नैकटिकाश्रमान् ॥ ४-१२

आपले शरीर कष्टवून जीवन जगणाऱ्या लोकांना ठार करणाऱ्यांवर अस्त्रप्रयोग करणारे राम सोमयाग करणाऱ्यांचा सत्कार करून उत्तम ब्राह्मणांच्या वेदज्ञ ब्राह्मणांच्या सभेने युक्त निकटवर्ती आश्रमात गेले.

**पर्षद्वलान्** – पर्षत् अस्ति येषां ते पर्षद्वलास्तान् 'रजः कृष्यासुतिपरिषदो' वलच् इत्यत्र परिषत्पदेन तदर्थबोधकस्य पर्षत्पदस्याऽपि ग्रहणात् वलच्प्रत्ययः । परिषद्वलान् इति मल्लिनाथसंमतः पाठंस्तत्र परितः सीदन्ति यस्यां सा परिषत्, संपदादित्वात् क्विप् अन्यत् पूर्ववत् ।

पर्षद्वलान् – 'रजः कृप्यासुतिपरिषदो वलच्' ५-८-११८ या सूत्रातील परिषद् पदाने षर्षत्पदांचेहि ग्रहण होते म्हणून येथे वलच् प्रत्यय झाला आहे. मल्लिनाथ परिषद्वलान् असा पाठ देतो. तो परितः सीदन्ति यस्यां सा परिषत्असा अर्थ देऊन क्विप् प्रत्यय सांगतो इकारपरिहारेण पर्षदित्युच्यते असे तो स्पष्टीकरण देतो.

परिषद् शब्द घेतला तर वृत्ताची हानी होते व पर्षद् असा पाठ घेतला तर पाणिनीचे नियम बाजूला पडतात. तरीहि तो पर्षद् असा प्रयोग करतो. म्हणजे तो भट्टीचा अधिकार होता काय ?

तौ खड्गशमुसलप्रासचक्रबाणगदाकरौ ।
अकार्ष्टामायुधच्छाय रजः सन्तमसे रणे ॥ ५-२

खड्ग, मुसल, भाला, चक्रबाण आणि गदा, धारण करणाऱ्या खरदूषणांनी धुळीने अंधकार पूर्ण युद्धांमध्ये शस्त्रांचे आच्छादन केले.

**खड्गमुसलप्रासचक्रबाणगदाकरौ** – खड्गश्च मुसलश्च प्रासश्च चक्रं च बाणश्च गदा च खड्गमुसलप्रासचक्रबाणगदाः, व्यक्तिप्राधान्यात् जाति जातिरप्राणिनाम्" इत्येकवद्भागवाऽभावः। जयमंगलस्तु खड्गादीनां बाणान्तानां पदानां द्वन्द्वैकवद्भावं कृत्वा पश्चात्तेन सहिता गदेति शाकपार्थिवादित्वात्समासः। अन्यथा पूर्वसूत्रंविहितेन एकवद्भावेन् बाणगदम्" इति नपुंसकलिंगता स्यात् इत्यब्रतीत्।

खड्ग... येथे जयमंगल असे म्हणतों की, खड्गन इत्यादोंचा बाण या पदापर्यंत एकवद्भाव करून 'तेन सहिता गदा' असा शाकपार्थिवादि समास करावा. अन्यथा 'जातिरप्राणिनाम्' २-४-६ या सूत्राने नपुंसकलिंग होऊन बाणगदम् असें रूप होईल. परंतु असें मानण्याचे कारण नाही. खड्गा येथे ते धारण करणारी व्यक्ति प्रधान असल्याने जाति.... यासूत्राने होणाऱ्या एकवद्भावाचा अभाव झाला म्हणजे एकवद्भाव झाला नाही.

युवजानिर्धनुष्पाणिर्भूमिष्ठः खविचारिणः।
रामो यज्ञद्रुहो हन्ति कालकल्पैः शिलीमुखैः॥ ५-१३

तरुण पत्नीसह असलेला धनुर्धारी राम पृथ्वीवरून आकाशांत फिरणाऱ्या राक्षसांना कालसदृश बाणांनी मारतो.

**खविचारिण** :- खे विचरन्तीति, तुच्छीलाः खविचारिण, तान् 'सुप्यजातौ णिनिस्ताच्छील्ये' इति णिनिः। महामहोपाध्यायमल्लिनाथास्तु खे विचारः खविचारः (स. त.) सोऽस्ति एषां ते खविचारिणस्तान् (इनिप्रत्यय) असे प्रतिपादन करून पुढे तो म्हणतो की, पुनः सुब्ग्रहणेन उपसृष्टात् तन्निषेधादेतादृशस्थले न णिनिप्रत्ययः इति यत् कथयन्ति, तदयुक्तं भाष्यविरोधात्।

खविचारिण : - खे विचरन्तीति तच्छीला येथे 'सुप्यजातौ णिनिस्ताच्छाल्ये' ३-२-७८ या सूत्राने णिनि प्रत्यय होतो मल्लिनाथ विग्रह असा करतो- खे विचारः खविचारः, सोऽस्ति एषां ते खविचारिणस्तान् (इनिप्रत्ययः) असें प्रतिपादन करून पलीकडे तो स्पष्ट करतो कीं, पुनः सुब्ग्रहणेन उपसृष्टात् तन्निषेधादेतादृशस्थले न णिनिप्रत्यय। मल्लिनाथांचे हें मत बरोबर नाही कारण भाष्याशी त्याचा विरोध येतो. तो कसा? 'सुप्यजातौ णिनिस्ताच्छील्ये' या सूत्रांत 'सुपि स्थः' १-२-४ या सूत्रांतून या पदाची अनुवृत्ति येते. असें असतांना प्रस्तुत सूत्रांत सुपि या पदाचे ग्रहण कशाकरिता? याविषयी महाभाष्यकार म्हणतात – सूपीति वर्तमाने पुनः सुब्ग्रहणं किमर्थम्? अनुपसर्गे इत्येवं तदभूत्। इदं सुब्मात्रे यथा स्यात्। उदासारिण्यः प्रत्यासारिण्यः (व्या. म. भा. ३-२-७८) महाभाष्यकारांचा अभिप्राय याठिकाणी असा कीं, सुपि या पदाचे पुनःग्रहण केल्याने सुबन्त उपपद पाहिजे मग ते सुबन्त उपपद उपपद उपसर्ग असो किंवा इतर कोणतेहि सुबन्त असो. म्हणून खविचारिणः याठिकाणी "वि" हे उपपद असतांना णिनि झाला आहे. मल्लिनाथाचा अभिप्राय असा कीं "सुपि" या पदाचे पुनः ग्रहण केल्याने उपसर्गउपपदाचा निषेध होतो म्हणजे उपसर्गउपपद असेर तर णिनि प्रत्यय होणार नाही. खविचारिण याठिकाणी "वि" हा उपसर्ग आहे म्हणून अशा ठिकाणी णिनि प्रत्यय होणार नाही तर इनि प्रत्यय होईल. हे मत महाभाष्यकारांच्या मताशी विसंगत आहे.

अनुक्रमणिका

दुसरें असें की, तद्धितवृत्तीपेक्षा कृदवृत्ती अधिक बलवती असते. येथे णिनि हा कृत् प्रत्यय असून इनि हा तद्धित प्रत्यय आहे. म्हणून णिनि प्रत्यय लावून रूप साधने अधिक योग्य आहे.

आहोपुरुषिकां पश्य मम यद्रत्नकान्तिभिः ।
ध्वस्ताऽन्धकारेऽपि पुरे पुर्णेन्दोः सन्निधिःसदा ॥ ५-२७

माझा पुरुषार्थ बघ, रत्नांच्या कांतीने अंधकाराचा नाश होत असतांनाहि माझ्या शहरांत (आवश्यकता नसतांनाहि) पूर्णचन्द्र नेहमी राहतो.

**'आहोपुरुषिकाम्'** - अहोपुरुष इति यस्यां क्रियायां सा आहोपुरुषकाइति काशिका । मत्वर्थीयष्ठञ्प्रत्ययः मयूरव्यंसकादश्च' इत्यस्य आकृतिगणत्वात्समासः । केंचित्तु अहोपुरुषस्य भाव आहोपुरुषिका = आश्चर्यपुरुषत्वम् मनोज्ञादित्वाद्वुयञिति व्याचक्षते, किन्तु मनोज्ञादिषु मृग्यमेतदिति मल्लिनाथः ईदृशोदाहण दारबीजं तु मनोज्ञादिगणे आहोपुरुषशब्दाऽनुपलब्धिरेवेति बोध्यम् । अहोपुरुषिका दर्पाद्या स्यात्सम्भावनात्मनि इव्यमरः । आहोपुरुषिकाम् – अहोपुरुषइति यस्यां सा

आहोपुरुषिका असें काशिकाकार म्हणतात. तेव्हा मत्वर्थीय ठञ् प्रत्यय होतो कारण मयूरव्यंसकादिगण हा आकृतिगण आहे. नंतर समास होतो. काही अहो –पुरुषस्वभावः अहोपुरषिका म्हणजे आश्चर्यकारक पौरुष असा अर्थ करतात व मनोज्ञादिंमुळे वृञ् प्रत्यय होतो. असें स्पष्टीकरण करतात. परंतु मनोज्ञादिंमध्ये अहोपुरुष शब्द शोधायला पाहिजे असें मल्लिनाथ म्हणतो. अशा प्रकारच्या विवेचनाचे मूळ असें आहे कीं, मनोज्ञादि गणामध्ये अहोपुरुष हा शब्द उपलब्ध नाही.

अन्तर्धत्स्व रघुव्याघ्रात्तस्मात्त्वं राक्षसेश्वर ।
यो रणे दुरुपस्थानो हस्तरोधं दधद्धनु ॥ ५-३२

हे राक्षसराज, तूं त्या रामचन्द्रापासून गुप्त रहा. (त्यांच्यासमोर जाऊ नकोस) आपल्या दृढ मुष्टीने धनुष्य धारण करून राम जेव्हां संग्रामांत उभा ठाकतो तेंव्हा त्याच्याजवळ कोणी जाऊ शकत नाही.

**हस्तरोधम्** – हस्तेन रोधः (पीडनम्) यस्य तत् हस्तरोधं, तत् (व्य बहु) । हस्तेन रूद्ध्वा इति हस्तरोधं, 'सप्तम्यां चोपपीडरुधकर्षः' इति णमुल् इति जयमंगलादयस्तत्र 'उपोपसर्गव्यभिचारश्चिन्त्यः, व्याकरणान्तरे' वा द्रष्टव्य इति महोपाध्यायी मल्लिनाथः

हस्तरोधम् – हस्तेन रुद्ध्वा असा विग्रह करून सप्तम्यां चोपपीडरुधकर्षः ३-४-४९ या सूत्राने णमुल् प्रत्यय होतो असें येथे जयमंगलदीनीं सांगितले आहे. परंतु प्रस्तुत सूत्राने सांगितलेला उप उपसर्ग हस्तरोधम् येथे नाही किंवा दुसरे एखादे व्याकरण बघावे असें येथे मल्लिनाथ सुचवितो.

रामोऽवोचद्धनूमन्तमावामभ्रंलिहं गिरिम् ।

ऐव विद्वन् पितुः कामात्पान्तावल्पम्पचान्मुनीम् ॥ ६-९७

राम हनूमानाला म्हणाले, हे विद्वन्, आम्ही दोघेहि पित्याच्या इच्छेला अनुसरून अल्पसंतुष्ट अशा ऋषींचे रक्षण करीत या अत्यंत उंच पर्वतावर येऊन पोचलों.

**हनूमन्तम्** :- निन्दितौ (भग्नत्वादितिभावः) हनू स्तः यस्य सः हनूमान्, त निन्दाऽर्थे मतुप् । शरादीनां च इति संज्ञायां दीर्घत्वम्, यद्येवं तर्हि हनूमान् हनुमानपि इति विश्वकोशस्य प्रायेण ह्रस्वव्यवहारिणो लोकस्याऽपि का गतिरिति चेत्? तर्हि योगार्थाऽनुसरणेनाऽ संज्ञायां विशेषणरूपेणैव तन्निर्वाह, इति अदृष्टचरः साधीयान् पन्थाः । एवं च 'अन्येषाभापि दृश्यते' इति सूत्रेण दीर्घ इति वदन्तौ जयमंगलमल्लिनाथावुपेक्षणीयौ तत्प्रयुक्तदीर्घस्य उभयत्र (संज्ञायामसंज्ञायां च) प्राप्तेर्नित्यत्वाच्च 'गण्डौ कपोलौ, तत्परो हनुः' इत्यमरः । जातमात्रस्य आदित्यरथं गृह्णंतो हनूमतो हनुद्वयं भग्नमिति प्रसिद्धम् ।

हनूमन्तम् – निन्दितौ हनू यस्य सः । येथे निन्दा या अर्थात मतुप प्रत्यय होऊन 'शरादीनां च' ६-३-१२० या सूत्राने दीर्घ झाला आहे. जर असें आहे तर विश्वकोषांतील व प्रायः लोकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या "हनुमान्" या ऱ्हस्व पाठाची संगति कशी लावायची ?

जयमंगल व मल्लिनाथ दोघेहि "अन्येषामपि दृश्यते" ६-३-१३७ या सूत्राने दीर्घ होतो असें म्हणतात. या सूत्राने संज्ञा असो किंवा नसो दीर्घरूप मिळते कारण ते नित्य आहे. परंतु हनुमान् या ऱ्हस्व पाठाची संगति लावण्यासाठी पंडित श्रीशेषराज शर्मा म्हणतात कीं, संज्ञा असेल तेंव्हा "शरादीनां च" या सूत्राने दीर्घ होईल. नसेल तेंव्हा ऱ्हस्व होईल.

तस्मिन्नन्तर्घणे पश्यन् प्रघाणे सौधसद्मनः ।
लौहोद्घमनघनस्कन्धा ललिताऽपघनां स्त्रियम् ॥ ७-६२

गुहेचें द्वार ओलांडून धवलगृहाच्या एकदेशांत लोखंडी उद्घनाप्रमाणे स्कंध असणाऱ्या त्या वानरांनी सुंदर अवयवांनी शोभणारी एक स्त्री पाहिली.

**अन्तघणे** – अन्तर्हन्यते क्रोडीभवत्यस्मिन्निति अन्तर्घणः व्दारमतिक्रम्य यः साऽवकाशप्रदेश सोऽन्तर्घण इत्युच्यते ।

'अन्तर्घनो देशे' :- इति अन्तः पूर्वाद्धन्तेरप् धनादेशश्च, अन्तर्घण इति पाठान्तरे घणादेशः अस्य वाहीकग्रामविशषसंज्ञाया प्रयोगो रूढिमाश्रित्य बोध्यः । अत्र तु यौगिकवृत्तिमाश्रित्य पदाऽर्थौ विवेचितः ।

अन्तर्घणे – दरवाजा ओलांडून आंत गेल्यानंतर मध्ये जो सावकाश प्रदेश असतो त्याला अन्तर्घण असे म्हणतात.

अनुक्रमणिका

"अन्तर्घनो देशे" ३-३-७८ या सूत्राने येथे अन्तपूर्वक हन् धातुहून अप् प्रत्यय व धनादेश होतो. "अन्तर्घण" असा पाठ असेल तर घणादेश होतो. संज्ञीभूतो वाहीकेषु देशविशेष उच्युते (काशिका) । अन्तर्घन नावाचा वाहीकांत एक देश आहे. असे काशिकाकार म्हणतात. तो शब्द रूढिप्रमाणे आहे, येथे मात्र तो सूत्रानुसारच झाला आहे.

बभूव याऽधिशैलेन्द्र मृदित्वेवेन्द्रगोचरम् ।
कुषित्वा जगतां सारं सैका शङ्केव कृता भुवि ॥

जी लंका सुमेरु पर्वतावर इन्द्रपुरी अमरावतीचा जणू तिरस्कार करीत आहे असे वाटते. ती जगातील सार (उत्कृष्ट) पदार्थांना निकृष्ट करून पृथ्वीवर अशी अद्वितीय बनविली आहे असे मला वाटते.

**बभूवः** :- "इन्धिभवतिभ्यांच" इति कित्त्वमिति जयमंगलः । वस्तुवस्तु सूत्रमिदं प्रत्याख्यातम् । "इन्धेश्छन्दोविषयत्वाद्भुवो बुको नित्यत्वात्ताभ्यां लिटः किद्वचनानर्थक्यम्" इति वार्तिकम् ।

बुक् नित्यत्वादेश गुणवृद्धी वाधिष्यते तस्मात्कृतमनेन सूत्रणेति तात्पर्यम् ।

परंतु एकाला योग्य क्रिया दुसरा कोणी करतो त्यावेळी कर्मव्यतिहार होतो. बभूव – याठिकाणी जयमंगलाकार म्हणतों कीं, "इन्धिभवतिभ्यां च" १-२-६ या सूत्राने कित्व झाले आहे. वास्तविक या सूत्राचे महाभाष्यकारांनी प्रत्याख्यान केले आहे. ते असें – इन्ध् हा धातु वेदांशी संबंधित आहे आणि भू धातूला वुगागम नित्य सांगितला आहे म्हणून लिटाला कित्त्व सांगणे व्यर्थ आहे. वुगागम नित्य असल्यानेच गुणवृद्धींचा निषेध होईल. म्हणून हे सूत्र पूरे ।

वियति व्यत्यतन्वातां मूर्ती हरिपयोनिधी ।
व्यत्यैतां चोत्तमं मार्गमर्केन्द्रेन्दुनिषेवितम् ॥ ८-३

हनुमान् आणि समुद्राने आकाशांत एकाने आपले शरीर पसरविण्याऐवजी दुसऱ्याने पसरविले आणि सूर्य, इंद्र आणि चंद्राने सेवित मार्गात एकाच्या ऐवजी दुसरा चालू लागला.

**व्यत्यैताम्** – व्यतिपूर्वादिण्धातोर्लङ् 'कर्तरि कर्मव्यतिहारे' इत्यात्मनेपदं प्राप्तम् । गत्यर्थत्वात् 'न गतिहिंसार्थेभ्यः' इति प्रतिषिद्धम् । तेन तसः तस्थस्थमिपां तांतंतामः' इति तामादेशः गच्छतो हरेः पुरतो यत्र वियत्प्रदेशे स्वमूर्तिविस्ताराऽवसरस्तत्र पयोनिधिरूर्मिभिः स्वमूर्ति वितस्तार, वेलां गच्छतः पयोनिधेयंत्र स्वमूर्तिविस्ताराऽवसरस्तत्र हरिः स्वमूर्ति विस्तारितवान् । एव च पयोनिधेर्यत्र मार्गे गमनावसरस्तत्र हरिरुत्पत्य गन्तुमैच्छत्, तथा हरेर्यत्र वर्त्मनि प्रयाणप्रसंगस्तत्र पयोनिधिरभ्रलिहैरूर्मिभिर्गन्तुमैच्छत् । यत्र यत्क्रियावसरे क्रिया करोति स तत्र तत्क्रियाकारीत्युपचर्यते । यथा देवदत्तसाध्यां क्रिया यज्ञदत्तः कुर्वन् तत्कारीत्युच्यते । ततश्च इतरेण इतरसम्बन्धिन्यां क्रियायाः करणात् अन्यतरसम्बन्धिन्याश्चेत्संभवति कर्मव्यतिहारः ।

व्यत्यैताम् – येथे वि + अति + इण् धातुहून लङ् लकार झाला आहे. येथे 'कर्तरि कर्मव्यतिहारे' १-३-१४ या सूत्राने प्राप्त झालेल्या आत्मनेपदाचा' 'न गतिहिंसार्थेभ्यः' १-३-१५ या सूत्राने निषेध केला आहे. येथे कर्मव्यतिहार कसा आहे हे बघू – जेथे ज्या ठिकाणी योग्य वेळी जो क्रिया करतो त्याच्या बाबतीत ती क्रिया करणारा असा उपचार होतो परंतु एकाला योग्य क्रिया दुसरा कोणी करतो त्यावेळी कर्मव्यतिहार होतो. उदा. शुद्रादिकांनी करावयाची लवणक्रिया ब्राह्मणानें करणे अशा प्रकारचा क्रियाविनिमय द्योतित करावयाचा असेल तर कर्तरि आत्मनेपद होते. याठिकाणी आकाशांतून जात असतांना हनुमंताने स्वतःचे शरीर विस्तारण्याचा अवसर होता. त्यावेळी गगनचुंबी लाटांनी आकाश व्यापले. ज्यावेळी लाटांनी आकाश व्यापायचे त्यावेळी हनुमंताने आकाश व्यापले. अशा प्रकारें येथे कर्मव्यतिहार आहे तो द्योतित करावयाचा असल्याने आत्मनेपदाची प्राप्ती होती परंतु इण् गतौ हा गत्यर्थक धातु असल्याने त्याचा निषेध झाला.

प्रायुङ्क्त राक्षसीर्भीमा मन्दिराय प्रतिव्रजन् ।
भयानि दत्त सीतायै सर्वा यूयं कृते मम ॥ ८-९६

मंदिरांत परत जाणाऱ्या रावणाने असे म्हटले तुम्ही सर्व माझ्याकरिता सीतेला भीती दाखवा. असे म्हणून त्याने भयानक राक्षसींची नियुक्ती केली.

**सीतायै** – कर्मणेत्यादिना सम्प्रदानत्वे 'चतुर्थी सम्प्रदाने' इति चतुर्थी । 'स्वत्वनिवृत्ति पूर्वकपरस्वत्वोत्पत्यनुकूलव्यापारो दानम्' इति वृतिकाराऽभिमतदानलक्षणेऽभ्युपगते तु नाऽत्र संप्रदानत्वं, नाऽपि चतुर्थी । खण्डिकोपाध्यायः । शिष्याय चपेटां ददातीत्यादिप्रयोगदर्शनात् लक्षणमिदमनुपपन्नम् ।

सीतायै – येथे 'कर्मणा ययभिप्रैति स सम्प्रदानम्' १-४-३२ या सूत्राने संप्रदान संज्ञा होऊन 'चतुर्थी संप्रदाने' २-३-१३ या सूत्राने चतुर्थी विभक्ति झाली आहे. वृत्तिकार दानाचा अर्थ असा करतात – आपली स्वतःची मालकी काढून इतरांची मालकी प्रस्थापित करण्याच्या व्यापाराला दान असें म्हणतात. वृत्तिकारांचे हे लक्षण स्वीकारले तर सीतायै येथे संप्रदान संज्ञा व चतुर्थी विभक्तीहि होणार नाही. परंतु हा अर्थ नसतांना देखील खण्डिकोपाध्यायः शिष्याय चपेटां ददाति इत्यादि ठिकाणी चतुर्थी झालेली दिसते. म्हणून वृत्तिकारांचे लक्षण उपपन्न ठरत नाही असे पंडित श्रीशेषराजशर्मा शास्त्री म्हणतात.

पुरुहूतद्विषो धूर्षु युक्तान् यानस्य वाजिनः ।
आयूंषि त्वक्षु निर्भिद्य प्राभञ्जनिरमोचयत् ॥ ९-६७

हनुमंताने इंद्रजिताच्या रथाचा भार वहन करणाऱ्या घोड्यांचे चामडे फाडून त्यांना मुक्त केले.

**पुरुहूतद्विष** :- पुरहूतं द्वेष्टीति पुरुहूतद्विट्, तस्य । 'सत्सूद्विषेत्यादिना क्विप् । 'पृतनाषाड्द्विष' इति पुस्तकान्तरपाठस्तत्र पृतनां सहते इति पृतनाषाट् तस्य । 'छन्दसि सह' इति ण्विः 'सहेः साडः सः' इति सहेः सस्य मूर्धन्यः । एतत् पदस्य वेदप्रयोज्यत्वेऽपि 'तुरासाहं पुरोधाये' त्याद्याभियुक्तकर्तृकप्रयोगमदर्शनात् लौकिकत्वमपीति केचित् ।

पुरूहूतद्विषः- पुरुहूतं द्वेष्टीति पुरुहूतद्विट्, तस्य ।

सत्सूद्विष... ३-२-६१ का सूत्राने येथे क्विप् प्रत्यय होतो. मल्लिनाथाने पृतनाषाड् (पुरुहूत) द्विषः असा पाठ घेतला आहे. पृतनां सहते इति पृतनाषाड् येथे 'छन्दसि सहः' ३-२-६३ या सूत्राने ण्वि प्रत्यय होतो. या पदाचा वेदांतच प्रयोग होत असल्याने लौकिकांत त्याचा प्रयोग होणे इष्ट नाही. तथापि पुरांसाहं पुरोधाय इ. प्रयोग लौकिकांत आढळतात. म्हणून वरील प्रयोग निर्बांध आहे, असें मल्लिनाथ पृतनाषाड् या पाठाविषयी स्पष्टीकरण देतो.

> प्रणिशाम्य दशग्रीव प्रणियातुमलं रुषम् ।
> प्रणिजानीहि हन्यन्ते दूता दोषे न सत्यपि ॥ ९-१००

हे रावणा, आपण शांत व्हा, क्रोध करू नका, अपराध झाल्यावर देखील दूताला मारीत नसतात, हे आपण जाणून घ्या.

**प्रणियातुम् अलम्** – प्रनिपूर्वकात् यातेस्तुमुन् अत्र अलंयोगे 'अलंखल्वोः प्रतिषेधयोः प्राचांक्त्वा' इति क्त्वा प्रत्ययविषये तुमुन्प्रयोगो देशविभाषाऽनुसारात्कृतः । कष्ट इति मल्लिनाथः ।

प्रणियातुम् अलम् – येथे प्र + नि + या धातुहून तुमुन् प्रत्यय झाला आहे. याठिकाणी 'अलंखल्वोः प्रतिषेधयोः प्राचां क्त्वां' ३-४-१८ या सूत्राने क्त्वा प्रत्यय व्हावयाला पाहिजे परंतु या प्रत्ययाचा विषय असतांनाहि तुमुन् प्रत्यय देशविशेषामुळे झाला आहे असे पंडित श्री शेषराजशर्मा शास्त्री म्हणतात. मल्लिनाथाला हे संमत नाही.

> प्राच्यमञ्जिहिषां चक्रे प्रहस्तो रावणाज्ञया ॥
> द्वारं ररंघतुर्याम्यं महापार्श्वमहोदरौ ॥ १४-१५

रावणाच्या आज्ञेने प्रहस्ताने पूर्वद्वारावर जाण्याची इच्छा केली. महापार्श्व व महोदर नांवाच्या राक्षसांनी दक्षिण द्वारावर गमन केले.

**याम्यम्** – यमो देवताऽस्येति विग्रहे 'यमाच्चेति वक्तव्यम् इति ण्यप्रत्यय इति काशिका । भाष्येऽदर्शनादेतत्प्रामाण्ये संदिहाना ज्ञानेन्द्रभिक्षुचरणास्तु – 'अण्णन्तात्स्वार्थिकेन ष्यञाप्रयोगः सूपपाद' इति प्रत्यपीपदन् ।

याम्यम् – यमो देवता अस्य याम्यम् येथे 'यमाच्चेति वक्त्व्यम्' या वार्तिकाने ण्यप्रत्यय होतो असे काशिका म्हणते. परंतु महाभाष्यांत हे वार्तिक आढळत नाही. ही गोष्ट लक्षांत घेऊन ज्ञानेन्द्रभिक्षू म्हणतात प्रथम अण् प्रत्ययांत रूप तयार करून घेऊन नंतर स्वार्थिक ष्यञ् प्रत्यय लावावा व याम्यम् रूप साधावे.

> तिरोबभूवे सूर्येण प्रापे च निशयास्पदम् ।

जग्रसे कालरात्रीव वानरान् राक्षसाश्च सा ॥ १४-४३

सूर्य अस्ताला गेला. रात्रीला आपले स्थान मिळाले. रात्रीने कालरात्री बनून वानर व राक्षसांना खाऊन टाकले.

**रात्री** – कालप्रयुक्ता रात्री. शाकपार्थिवादीनां सिद्धये उत्तरपदलोपस्योपसंख्यानम् इति मध्यमपदलोपी समासः ।

'कृदिकारदक्तिनः' इति ङीष् । इत्थमेव रात्रीपदसिद्धौ वैदिकप्रकरणस्थेन
'रात्रेश्चाजसौ' इति सूत्रेण ङीप् इति लिखञ्जयमंगलो नाऽदरणीयः ।

रात्री – कालप्रयुक्ता रात्री येथे 'शाकपार्थिवादीनाम् ...' या वार्तिकाने मध्यमपदलोपी समास झाला आहे, आणि 'कृदिकारादक्तिनः' या गणसूत्राने ङीप् प्रत्यय झाला.

जयमंगल हेंच 'रात्री' पद वैदिक प्रकरणांतील "रात्रेश्चाजसौ" या सूत्राने ङीप् प्रत्यय करून सिद्ध करतो. परंतु वैदिक प्रकणांतील हे सूत्र लौकिकांत लावू नये.

अविवेष्टन् नृपाऽऽदेशादारूक्षंश्चाऽऽशु राक्षसम् ।
तानधावीत् समारूढांस्तेऽप्यस्त्रंसिषताऽऽकुलाः १५-६१

**अविवेष्टत्** – वेष्ट वेष्टने इति ण्यन्ताद्वातोर्लुक् ।

पक्षान्तरे 'विभाषा वेष्टिचष्टयोः' = इति अभ्यासस्य अत्वेन 'अववेष्टत्' इति रूपम् । अत्र प्रयोजककर्तृत्वेन 'राम' इति पदस्य अध्याहारं कुर्वन्तोऽपि जयमंगलभरतमल्लिकादयो 'वानरा अविवेष्टन्' इति 'वानरान् वेष्टयामासु' इतिच कथं नाम समलिखन्निति नैव वेद्मि, वेष्टधातोः सकर्मकत्वात् प्रयोज्ये कर्तरि तृतीययैव विभक्त्या भाव्यमिति मामकीना मनीषा । मल्लिनाथस्तु 'वानरा' इति पदमध्याहृत्य वानरा नृपादेशात् आशु राक्षसम् अविवेष्टन्' इत्यन्वयप्रयोजनामकार्षीत्तत्र अविवेष्टन्त इत्यर्थः । एवं चाऽत्र णिजर्थस्याऽनन्वयादविवक्षेति द्रष्टव्यम्इत्यपि स एवाह ।

अविवेष्टत् – येथे वेष्ट वेष्टने या ण्यन्त धातुहून लुङ् लकार झाला आहे. 'विभाषा वेष्टिचेष्टयोः' ७-४-९६ या सूत्राने विकल्पाने अभ्यासाला अत्त्र झाल्यास अववेष्टत् असे रूप होते. जयमंगल व भरतमल्लिक हे प्रयोजक कर्ता म्हणून "राम" या पदाचा अध्याहार करतात आणि वानरा अविवेष्टन् वानरान् वेष्ट्यामासुः असे कसे लिहितात हे कळत नाही. वेष्ट धातु सकर्मक असल्याने प्रयोज्य कर्त्याची तृतीया विभक्तीच व्हावयाला पाहिजे असें श्रीशेषरामशर्मा म्हणतात. मल्लिनाथ वानरा हे पद अध्याहृत घेऊन वानरा नृपादेशात् आशु राक्षसम् अविवेष्टन् अवा अन्वय देतो. तेथे अविवेष्टन्त असा अर्थ आहे. याप्रमाणे येथे णिजर्थाचा अन्वय होत नसल्याने त्याची विवक्षा नाही असेहि तो म्हणतो.

तौ हनूमन्तमानेतुमोषधीं मृतजीविनीम् ।
सन्धानकरणीं चाऽन्यां विशल्यकरणीं तथा ॥ १५-१०५

जाम्बवान् व विभीषणांनी मृतजीविनी (मेलेल्या व्यक्तीला जीवंत करणारी,) सन्धानकरणी (क्षताला संधान करणारी) दुसरी विशल्यकरणी ( रुतलेल्या बाणाग्राला दूर करणारी) ह्या औषधी आणण्यासाठी पाठविले.

**ओषधीम्** – ओषधि शब्दात् "कृदिकारदक्तिन" इति ङीप् एतत्पदसिद्धौ 'ओषधेश्च विभक्तावप्रथमायाम्' इति दीर्घत्वमिति वदन् लोके छान्दसप्रक्रियामाश्रयन् जयमंगलाचार्य उपेक्ष्यः ।

ओषधिम् – येथे ओषधि शब्दाहून 'कृदिकारादक्तिनः' या गणसूत्राने ङिप् प्रत्यय झाला आहे. 'ओषधेश्च विभक्तावप्रथमायाम्' ६-३-१३२ या सूत्राने दीर्घ होतो, असे जयमंगल म्हणतो. परंतु छान्दस सूत्र लौकिकांत लावणे योग्य नाही.

आह्वा स्यते विशङ्को मां रोत्स्यमानः शतक्रतुः ।
प्रकल्प्स्यति च तस्यार्थो निकुम्भे दुर्हणे हते ॥ १६-११

इंद्र युद्ध करतांना निर्भय होऊन युद्धाकरिता मला (रावणाला) ललकारील दुःखाने मारल्या जाणाऱ्या निकुंभाला ठार केल्यानंतर इंद्राचे प्रयोजन देखील सिद्ध होईल.

**दुर्हणे** – दुःखेन हन्यते इति दुर्हणस्तस्मिन् 'ईषद्-दुःसुषु कृच्छ्राकृच्छार्थेषुखल्' इति खल्प्रत्ययः हन्ते'रितिणत्वमिति मल्लिनाथः । वस्तुतस्तु अत्रणत्वे कर्तव्ये दुरःषत्वणत्वयो रुपसर्गत्वप्रतिषेधो, वक्तव्य' इति वार्तिकेन दुर उपसर्गत्वप्रतिषेधात् हुह्णे इत्यत्र णत्वं प्रामादिकं प्रतीयते ।

दुर्हणे – दुःखेन हन्यते इति येथे 'ईषद्दुःण' ३-३-१२६ या सूत्राने खल् प्रत्यय होऊन "हन्तेरत्पूर्वस्य' ८-४-२२ य सूत्राने णत्व होते असे मल्लिनाथ म्हणतो. 'वस्तुतः दूरःषत्व....' या वार्तिकाने णत्व कर्तव्य असतांना दुर या उपसर्गाचे उपसर्गत्व बाधित होते. म्हणून येथील णत्व प्रामादिक वाटते.

इन्दोः सन्दिष्यते वह्निः समुच्छोक्ष्यति सागरः ।
जलं धक्ष्यति तिग्मांशोः स्यन्त्स्यन्ति तमसां चयाः । १६-१७

चंद्रापासून अग्नि प्रस्त्रवेल. समुद्र सुकेल. जलदाह करील सूर्यापासून अंधकार समूह निघेल.

**धक्ष्यति** – 'दह भस्मीकरण' इति धातोर्लृट्, यत्तु 'होढ' इति हस्य ढत्वमिति जयमंगलस्तन्न, 'दादेर्धातोर्घ' इति दत्वापवादस्य घत्वस्य विधानात् । तत 'एकाचो बशो भष् झषन्तस्य स्ध्वोः' इति भष्भावेन दकारस्य धकारे तस्य खरि चेति चर्त्वम् ।

अनुक्रमणिका

धक्ष्यति – येथे दह भस्मीकरणे या धातुहून लृट् लकार झाला आहे. जयमंगलाने ‘होढः’ ८-२-३१ या सूत्राने दत्व होते असे म्हटले ते वरोबर नाही कारण ‘दादेर्धातोर्घः ८-२-३२ (हें सूत्र वरील सूत्राचा अपवाद आहे) या सूत्राने घत्व, नंतर ‘एकाचो बशो भष्...’ ८-२-३७ या सूत्राने भष्भाव होऊन दकाराला धकार होतो. खरि च ८-४-५५ या सूत्राने चर्त्व होऊन धस्यति हें रूप तयार होते.

मन्तूयिष्यति यक्षेन्द्रो वल्गूयिष्यति नो यमः ।
ग्लास्यन्त्यपतिपुत्राश्च वने वानर योषितः ॥ १६-३१

**मन्तूयिष्यति** – कण्ड्वादीनां धातुत्वेन प्रातिपदिकत्वेन च द्वैविध्यात् ‘कण्ड्वादिभ्य यक्’ इति यगन्तान्मन्तुशब्दात् लृट् । मन्तु अपराधे रोष इत्येक इति’ कण्ड्वाकदिपाठे यद्यपि दौर्मनस्वरूपार्थस्य न प्राप्तिस्तथापि धातूसपर्गाणामनेकार्थत्वादयमर्थः प्रकरणानुरूपष्टी काकृत्सम्मतः चान्द्रे व्याकरणे ‘मन्तुञ् रोषणवैमनस्ययोरपराधे चे’ ति दर्शनाद्वयाकरणान्तरसम्मतश्चेति सर्व निरवद्यम् । मल्लिनाथमते तु कोपिष्यतीत्यर्थः ।

मन्तूयिष्यति – कण्ड्वापदि धातु आणि प्रातिपदिक असे दोन प्रकारचे असतात. येथे ‘कण्ड्वाषदिभ्यो यक्’ ३-१-२७ या सूत्राने यगन्त मन्तु शब्दाहून लुट् लकार झाला आहे. कण्ड्वा दि गणांत मन्तु अपराधे रोष इत्येके असा पाठ असल्याने मन्तूयिष्यति म्हणजे दुर्मना भविष्यति असा अर्थ जरी प्राप्त होत नाही तरी धातूसपर्गाणामनेकार्थता या नियमाने प्रकरणानुसार हा अर्थ होऊ शकतो असे टीकाकारांचे मत आहे. चान्द्र व्याकरणांत ‘मन्तूञ् रोषणवैमनस्ययोरपराधे च’ असा अर्थ दिला असल्याने हा अर्थ निष्पन्न होतो असे पंडित श्रीशेषराज शर्मा शास्त्री म्हणतात मल्लिनाथाच्या मताने कोपिष्यति असा अर्थ आहे.

आर्च्छन् वामं मृगाःकृष्णाः शस्त्राणां व्यस्मरन् भटाः ।
रक्तं न्यष्ठीवदक्लाम्यदखिद्यद्वाजिकुञ्जरम् ।१७-१०

युद्धासाठी अभियान करणाऱ्या इंद्रजिताच्या सैनिकांच्या डाव्या भागाकडून काळे मृग चालू लागले, योद्धे शस्त्र विसरू लागले, घोडे, हत्ति रक्त ओकूं लागले आणि परिकश्रम न करता क्लान्त व खिन्न होऊ लागले.

**न्यष्ठीवत्** – निपूर्वात् ‘ष्ठिवु निरसन’ इति भौवादिकाद्धातोर्लङ् । ‘धात्वादेःषःस’ इति प्राप्तस्य सत्वस्य ‘सुब्धातुष्ठिवुष्वष्कतीनां सत्वप्रतिषेधो वक्तव्यः’ इति प्रतिषेधः अत्र द्वितीयस्थकारष्ठकारो वेति वृत्तिः । आचार्येण शिष्येभ्यः उभयथा प्रतिपादनादुभयमपि प्रमाणमिति व्याख्यातार इति माधवाचार्याः ष्ठिवुक्लमुचमां शिति’ इति दीर्घः ।

न्यष्ठीवत् – येथे नि उपसर्गपूर्वक ‘ष्ठिवु निरसने’ या धातुहून लङ् लकार झाला आहे. ‘धात्वादेः षः सः’ ६-१-६४ या सूत्राने प्राप्त झालेल्या सकाराचा ‘सुब्धातु...’ या वार्तिकाने निषेध झाला आहे. या ठिकाणी ‘द्वितीयस्थकारष्ठकारो वा’ अशी वृत्ति आहे आचार्यांनी शिष्यांना दोनहि प्रकारचे प्रतिपादन केले असल्याने दोनहि पाठ प्रामाणिक समजावे असे माधवाचार्यांनी व्याख्यान केले आहे असे पंडित श्रीशेषराज शर्मा म्हणतात.

## भट्टिकाव्यांत आढळणारे कांही व्याकरणविषयक दोष

व्याकरणाची दृष्टि समोर ठेवून भट्टीने भट्टिकाव्याची रचना केली असली तरी त्यांत व्याकरणाविषयक कांही दोष दिसतात. वेगवेगळ्या टिकाकारांनी ते दोष म्हणजे दोष नाहीत असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि मुळांतील दोष त्यामुळे दूर होऊ शकले नाही. प्रस्तुत पुस्तकाच्या दृष्टीने त्यांचा विचार होणे आवश्यक आहे.

१ प्रत्यूचे राक्षसेन्द्रस्तामाश्वसिहि बिभेषि किम् । ५-२३

रावण शूर्पणखेला म्हणाला, हे राक्षसी आश्वस्त हो, घाबरतेस कशाला ?

**आश्वसिहि** – 'अपि माषं मषं कुर्याच्छन्दोभंगं न कारयेत्' इति शास्त्राद्ध्रस्वान्तपाठे दीर्घ इति केचित् । अमात्रावृत्तत्वादक्षरसङ्ख्यपयैवालं यथा – 'ऋग्यजुषमधीयायान्' इत्यादावित्यन्ये इति मल्लिनाथः । वस्तुतस्तु श्लोकाख्यं छन्द इदं 'श्लोके षष्ठं गुरुज्ञेयं सर्वत्र लघु पञ्चमम् । द्विचतुष्पादयोऽऽह्स्वं सप्तमं दीर्घमन्ययोः । इति लक्षणादतो अत्र न छन्दोभंगः अपि त्वत्र श्लथत्वश्रुतेः हतवृत्ताभिधानो दोष इति वयं ब्रुमः ।

आश्वसिहि – येथे वस्तुतः आश्वासिहि किंवा आश्वसीहि असा पाठ असावयाला पाहिजे. याविषयी मल्लिनाथ म्हणतो अपि माषं.... या लक्षणाप्रमाणे ऱ्हस्वाच्या ठिकाणी दीर्घ करावा परंतु छदोभंग करू नये. दुसरे मत असें की, हे मात्रावृत्त नाही. म्हणून अक्षरसंख्या बरोबर असली कीं आटोपले असे ऋग्यजुष.. येथे झाले आहे. वस्तुतः येथे अनुष्टुप् वृत्त असून त्याचे लक्षण असें –

श्लोके षष्ठं गुरु ज्ञेयं सर्वत्र लघु पंचमम् ।
द्विचतुष्पादयोर्ऱ्हस्वं सप्तमं दीर्घमन्ययोः ॥

म्हणून येथे छंदोभंग दोष नाही पण हतवृत्त नांवाचा दोष झाला आहे.

१. अन्तर्धत्स्व रघुव्याघ्रात्तस्मात्त्वं राक्षसेश्वर ।
यो रणे दुरुपस्थानो हस्तरोधं दधद्धनुः ॥ ५-३२

हे राक्षसराज, तूं युद्धनिपुण रामचंद्राच्या संमुख होऊ नकोस. संग्रामामध्ये आपल्या दृढ मुष्टीने धनुष्य धारण करून राम उभा राहतो तेंव्हा त्याच्याजवळ कोणी जाऊ शकत नाही.

**हस्तरोधम्** – हस्तेन रुद्ध्वा् इति हस्तरोधं, 'सप्तम्यां चोपपीडरुधकर्षः' इति णमुल् इति जयमंगलादयः तत्र उपोपसर्गव्यभिचारश्चिन्त्यः, व्याकरणान्तरे वा द्रष्टव्य इति महोपाध्यायो मल्लिनाथः ।

हस्तरोधम् – येथे हा प्रयोग सदोष आहे. हस्तरोधम् याठिकाणी 'सप्तम्यां चोपपीडरुधकर्षः' ३-४-४९ या सूत्राने णमुल् प्रत्यय होतो असे टीकाकारांनी सांगितले परंतु हे बरोबर नाही कारण सप्तम्यन्त किंवा तृतीयान्त उपपद असतांना उप उपसर्गपूर्वक पीड्, रूध् आणि कृष् या धातुहून णमुल् करावा असें सूत्र सांगते परंतु हस्तरोधम् येथे हस्तपूर्वक रुध् धातुहून णमुल् झाला व सूत्राप्रमाणे हे बरोबर नाही. मल्लिनाथ म्हणतो दुसऱ्या व्याकरणांचा संदर्भ घ्यावा. हें मतहि योग्य नाही कारण अन्य कोणत्या व्याकरणांत यासाठी संदर्भ मिळाला तरी भट्टिकाव्य हे पाणिनीच्या व्याकरणाशी संबंधित असल्याने त्याचा संदर्भ घेणेच योग्य आहे. यादृष्टीने हस्तरोधम् हा प्रयोग सदोषच.

२. आःकष्टं बत ही चित्रं हू मातर्देवतानि धिक् ।
हा पितः क्वासि हे सुभ्रु बह्वेवं विललाप सः ॥ ६-११

ओः कष्ट आहे, हाय खेद आहे. आश्चर्य आहे. मातांनो, तुम्ही लोक कोठे आहांत ! देवतांचा देखील धिक्कार, हा पिताजी । सीते तूं कोठे चालली गेलीस रामचंद्र याप्रमाणे खूप विलाप करू लागले.

**सुभ्रु** – शोभने भ्रुवौ यस्याः सा सुभ्रूस्तत्संबुध्दौ 'ऊकारादप्यूङ् वक्तव्यः' इत्यूङन्तत्वात् सुभ्रूशब्दस्य नदीत्वात् सम्बुध्दौ 'अम्बार्थनद्योर्ह्रस्वः' इति ऱ्हस्वत्वमिति मल्लिनाथः 'नेयङुवङ्स्थानावस्त्री' इति नदीसंज्ञानिषेधात्सम्बुद्धिऱ्हस्वोऽपि न, अतः प्रमाद एवाऽयमिति बहव इति भट्टोजिदीक्षिताः । वस्तुतस्तु रामस्य शोकविवशनसत्वात् बोधाऽभावेन च्युतसंस्कृत्यात्मको दोषोऽपि गुण एवेति सर्वं निरवद्यम् । केचित्तु 'हा पितः' इति पदद्वयस्यैकीकरणेन 'हापितः' इति विधाय 'त्याजित' इति तस्यार्थं कुर्वन्ति ।

सुभ्रु – शोभने भ्रुवौ यस्याः सा सुभ्रूः तत्संबुध्दौ सुभ्रू 'ऊकारान्तादप्यूङ् वक्तव्य' :-ऊकारान्तांहून देखील ऊङ् सांगावा या वार्तिकाने सुभ्रू या ऊङन्त शब्दाहून 'नेयङुवङ्स्थानावस्त्री १-४-४ या सूत्रांने नदी संज्ञेचा निषेध होतो. म्हणून 'अम्बार्थनद्योर्ह्रस्वः' ७-३-१०७ या सूत्राने संबोधनात ऱ्हस्व देखील होत नाही. याप्रमाणे हे सुभ्रूः असें संबोधनाचे एकवचन तयार होते. मग ऱ्हस्व अशा हे सुभ्रू या पाठाची संगति कशी लावायची ?

मल्लिनाथ म्हणतो 'अम्बार्थनद्योर्ह्रस्वः' या सूत्राने ऱ्हस्व होते परंतु नेयङुवङ्स्थानावस्त्री' या सूत्राने नदी संज्ञेचा निषेध झाल्यामुळे संबोधनांत ऱ्हस्व होणार नाही, म्हणून हा प्रामादिक आहे. असें पुष्कळ जण म्हणतात असें भट्टोजि दिक्षित सांगतात. वास्तविक रामचंद्र दुःखाने खिन्न झाला होता म्हणून त्याला कांही बोध होत नव्हता, असें म्हटल्याने सर्व ठीक होते. अशावेळी दोष देखील गुणच आहे. कांही अभ्यासक हापित्तः असा पाठ घेऊन त्याचा त्याजितः असा अर्थ करतात.

३ उद्यंस्यति हरिर्वज्र विचरिष्यति निर्भयः ।
भोक्ष्यते यज्ञयागांश्च शूरमानं च वक्ष्यति ॥ १६-५

इंद्र वज्र उचलील, निर्भय होऊन इकडे तिकडे संचार करील, यज्ञांतील आपला भाग खाईल व मी शूर आहे असें समजून अभिमान करील.

अनुक्रमणिका

उद्यंस्यतिः- उत्पूर्वकात् यम् उपरमे इति धातोर्लृट् ।
उद्यस्यति – हा दोषपूर्ण पाठ आहे.

उत् उपसर्गपूर्वक यम् धातुहून लृट् लकार झाला आहे. तो होत असतांना ‘समुदाङ्भ्यो यमोऽग्रन्थे’ १-३-७५ या सूत्राने सम्, उद्, आङ् पूर्वक यम् धातुहून आत्मनेपद सांगितले आहे ते येथे झाले नाही. म्हणून उद्यंस्यति हा पाठ सदोष आहे.

४. आह्वास्यते विशङ्को मां योत्स्यमानः शतक्रतुः ।
प्रकल्प्स्यति च तस्यार्थो निकुम्भे दुर्हणे हते ।१६-११

आता इंद्र युद्ध करीत निर्भय होऊन मला युद्धासाठी ललकारील. दुःखाने मारल्या जाणाऱ्या निकुंभाची हत्या झाल्यावर इंद्राचे प्रयोजन सफल होईल.

**दुर्हणे** – दुःखेन हन्यत इति दुर्हणस्तस्मिन्, ‘ईषद्दुःसुषु कृच्छाकृच्छार्थेषु खल्’ इति खल्प्रत्ययः ‘हन्ते’ रिति णत्वमिति मल्लिनाथः । वस्तुतस्तु अत्र णत्वे कर्तव्ये ‘दुरः षत्वणत्वयोरुपसर्गत्वप्रतिषेधो वक्तव्य’ इति वार्तिकेन दुर उपसर्गप्रतिषेधात् दुर्हण इत्यत्र णत्वं प्रामादिकं प्रतीयते ।

दुर्हणे – येथील णत्व प्रामादिक आहे. मल्लिनाथाने ‘हन्तेरत्पूर्वस्य’ ८-४-२२ या सूत्राने णत्व होते असें सांगितले आहे याचा अर्थ असा उपसर्गस्थ निमित्ताहून पलीकडील हन् धातूच्या नकाराला णत्व करावे. ‘दुर्हणे’ याठिकाणी दुर् उपसर्गपूर्वक हन् धातु आहे. परंतु – दुरः षत्वणत्व या वार्तिकाने दूर् या उपसर्गत्वाचा णत्व कर्तव्य असतांना प्रतिषेध होतो. आणि वरील सूत्राने तर उपसर्ग संज्ञा असतांनाच णत्वाचे विधान केले आहे. आता दुर् हा उपसर्गच नाही म्हणून येथे णत्व देखील होऊ शकत नाही. णत्व प्रामादिक आहे.

अनुक्रमणिका

# भट्टिकाव्यांतील वचनांचा इतर लेखकांनी केलेला उल्लेख

भट्टिकाव्यांतील वचनांचा अनेक लेखकांनी त्यांच्या ग्रंथांत उल्लेख केला आहे. या प्रकरणांत माधवीय धातुवृत्ति, सिद्धांत कौमुदी व तत्त्वबोधिनी या ग्रंथांतच आलेल्या वचनांचा विचार करावयाचा आहे.

## अ)माधवीय धातुवृत्ति

प्रथम माधवीय धातुवृत्ति ह्या सायनाचार्यानी लिहिलेल्या ग्रंथांत, भट्टिकाव्यांतील वचनांचा जो उपयोग करून घेतलेला आहे त्यांचा सविस्तरपणे विचार करू. तथा श्रीकराचार्यस्याप्यभिमतमुपादानर्थस्य द्विकर्मत्वम् –

१ अजिग्रहत्तं जनको धनुस्तद्येनार्दिद्द्वैयत्यपुरं पिनाकी ।
जिज्ञासमानो बसमस्य बाह्वोधर्हसन्नभाक्षङीद्रधुनन्दनस्तत् ॥ २-४२ भ.का.

इति भट्टिश्लोकं विवृण्वन्यदाह तद्धनुस्तं रामं जनकोऽजिग्रहत् बोधितवान् अनेन धनुषा त्रिपुरं दग्धमिति, ग्रहेश्च बृद्धयर्थत्वात् "गतिबुद्धि" इत्यादिना रामस्य कर्मसंज्ञा धनुषस्तु कर्तुरीप्सिततम्" इति ग्रहिद्धिकर्मकः/ (मा. धा. भवादिः नाधृ नाथृ धातुवरील विवेचन)

माधवीय धातुवृत्तीच्या भ्वादि गणामध्ये द्विकर्मक धातूंचा विचार करित असतांना वरील विवेचन आढळते. सायणाचार्य लिहितात की, उपादानार्थक धातु द्विकर्मक असतात. ही गोष्ट श्रीकराचार्यांना देखील मान्य आहे. श्रीकराचार्यांनी भट्टिकाव्यांतील वर दिलेला श्लोक स्पष्टीकरणासाठी घेऊन उपादानार्थक धातूचें द्विकर्मकत्व सिद्ध केले आहे तद्धनुः तं रामं जनकोऽजिग्रहत् बोधितवान् अनेन धनुषा त्रिपुरं दग्धम् इति (जयमंगला) जनकाने तें धनुष्य रामाला दिलें म्हणजे त्या धनुष्याचें ज्ञान करून दिले किंवा त्याविषयीची माहिती दिलीं कीं, रामा, याच धनुष्याने शंकराने त्रिपुरासुराला ठार केले होते. त्याचा ध्वस केला होता याठिकाणीं अजिग्रहत् या क्रियापदाचा अर्थ "ग्राह्यत्वेन अबोधयत्" (चंद्रकला विद्योतिनी) असा पंडित श्रीशषराजशर्मा शास्त्री यांनी दिला आहे. तर भरतमल्लिकाने- "धातूनामनेकार्थत्वात् ग्रहिरत्र ज्ञानार्थः इत्यन्ये" असें सांगून स्वतः "अजिग्रहत् ग्राह्यामास" असां अर्थ दिला आहे. तात्पर्य "ग्रहि" हा धातु येथे बुद्धयर्थक आहे म्हणून "गतिबुद्धि" १-४-५२ या सूत्राने "रामम्" येथे कर्मसंज्ञा झाली व धनुषः येथे 'कर्तुरीप्सित...' १-४-४९ या सूत्राने कर्मसंज्ञा झाली आहे व "कर्मणि द्वितीया" २-३-२ या सूत्राने द्वितीया विभक्ति झाली आहे. याप्रमाणे ग्रहि धातूचें द्विकर्मकत्व सिद्ध होते.

२. इषुमति रघुसिंहे दन्दशूकाञ्जिधांसौ धनुररिभिरसह्यं मुष्टिपींड दधाने ।
व्रजति पुरतरुण्यो बद्धचित्रांऽगुंलित्रे कथमति गुरुशेकान्या रुदन्माङ्गिलिक्यः ॥
१-२६ भ. का.

दन्तशूक इति केशवस्वामी दकारस्य स्थाने तकारमाह, तन्महन्तो न सहन्ते । यदाह दन्दशुको ब्रिलेशय इति, अत्र सुभूतिचन्द्राः दंशेर्यङन्तादूकप्रत्ययेऽल्लोपयलोपयोरिति । तथा इषुमति रधुसिंहे दन्दशूकानु

जिधांसाविति भट्टिश्लोकव्याख्याने दन्दशूकान् हिंस्रान् दंशंर्लृपसदेत्याद्युक्तं शंकरायार्येण । हिंस्रमात्रे प्रयुञ्जनो भट्टिकारो दन्दशूकशब्दस्य नैधण्टुकप्रसिद्धिं नाद्रियते । (माधा भुवादि :- खर्द दन्दशूके धातुवरील विवेचन).

दन्दशूकः या शब्दाची सिद्धी कशी करावी याविषयी खर्द दन्दशूके या धातूच्या विवेचनांत माधवीय धातुवृत्तीत वरील विवेचन आले आहे. केशवस्वामी नावाचे ग्रंथकार दकाराच्या ठिकाणीं तकार मानतात. म्हणजे दन्दशूकः असा शब्द न घेता दन्तशूक असा शब्द घेतात ते महान्तांना मान्य नाही. दन्दशूकः चे बिलेशयः म्हणजे उंदीर, सर्प, ससा, खवले मांजर (गीर्वाण लघुकोश) असे अर्थ आहेत. सुभूतिचन्द्र दन्दशूकः या शब्दाची व्युत्पत्ति अशी देतात – दंश् धातुहून यङ् प्रत्यय होतो नंतर उक प्रत्यय व अल्लोप व यल्लोप होऊन दन्दशूकः हा शब्द निष्पन्न होतो भट्टिकाव्यांतील वर दिलेल्या श्लोकांत "दन्दशूकान्" हा शब्द आला असून त्याचा अर्थ "हिंस्रान्" म्हणजे राक्षस असा आहे. शंकराचार्याने दंश् धातुहून "लुपसदचरजपजभदहृद"शगृभ्यो भावगर्हायाम् ३-१-२४ या सूत्राने यङ प्रत्येय होतो असें म्हटले आहे. केवळ "राक्षस" या अर्थाने वरील श्लोकामध्ये "दन्दशूक" शब्दाचा प्रयोग भट्टीने केला असून तो निघंटु मधील व्युत्पत्ति मानीत नाही.

"सत्पम्यां चोपपीडरुधकर्षः । अत्र णमुल्विधावुपसर्गग्रहण पीडेरेव विशेषणमिति भागवृत्तौ, भट्टिकारस्त्वतन्त्रं मन्यते । यदाह धनुररिभिरसह्यमुष्टिपीडं दधान इति ।

(मा. धा. भ्वादि कृष् – धातुवरील विवेचन)

'सप्तम्यां चोपपीडरुथकर्षः ३-४-४९ या सूत्राने णमृल् प्रत्ययाचें विधान केले आहे. सूत्रांत उपसर्गग्रहण पीङ या धातूचेच विशेषण आहे. असें भागवृत्तीने सांगितले आहे. भट्टिकाव्यांत तसे कांही आढळत नाही. भट्टीने –

"धनुररिभिसह्यं मुष्टिपीडं दधाने" या पंक्तीत पीड् चा स्वतन्त्र प्रयोग केलेला आहे.

याच श्लोकाच आणखी एकदा उल्लेख याप्रमाणे आला आहे व्रजे उपरोधं, व्रजेन उपरोधं, "सत्पम्यां चोपपीडरुधकर्ष" इति सत्पम्यन्ते तृतीयान्ते चोपपदे णमुल् । "तृतीया प्रभृतीनि" इति समासविकल्पः । केचिदुपशब्दस्य पीडयतिनैव सम्बन्धमाहुः । भट्टिकारस्य तूपोपसर्गग्रहणमतन्त्रमिति प्रागेवोक्तम् । (मा. धा रुधिर – धातुवरील विवेचन)

व्रजे किंवा व्रजेन असे सत्पम्यन्त किंवा तृतीयान्त उपपद असतांना "सत्पम्यां चोपपीडरुधकर्षः ३-४-४९ या सूत्राने णमुल् प्रत्यय होतो. 'तृतीया प्रभृतीनि अन्यतरस्याम्' २-२-२१ या सूत्राने विकल्पाने समास होतो. कांही उपशब्दांचा "पीडयति" शी संबंध आहे. असे म्हणतात. भट्टि मात्र उप या उपसर्गाचे ग्रहण स्वतंत्र आहे असे मानतो हे वरील विवेचनांत स्पष्ट केले आहे.

अनुक्रमणिका

१. या श्लोकाचा पुनः एकदा उल्लेख याप्रमाणे

"सत्पम्यां चोपपीड" इति सत्पमीतृतीयान्तयोर्णमुल् । तृतीया प्रभृतित्वात् समासविकल्पः । धनुररिभिरसह्यं मुष्टिपीडं दधान" इति वदन् भट्टिकार उपोपसर्गग्रहणमतन्त्रं मन्यते । (मां. धा. चुरादि-पीड-धातुवरील विवेचन)

या संबंधी विस्तृत स्पष्टीकरण वर दिलेले आहेच.

२. रोचमानः कृदृष्टिभ्यो रक्षोभ्यः प्रत्तवाञ् श्रियम् ।
श्लाघमानः परस्त्रीभ्यस्तत्राऽऽगाद्राक्षसाधिपः" ॥ ८-७३

इलाघृ कत्थने ॥ कत्थनं श्लाघनम् (देवदत्ताय श्लाघते ।) देवदत्तं स्तुर्वेस्तमेव बोधयितुमिच्छतीत्यर्थः । श्लाघह्नुरङ्स्थाशपां ज्ञीप्स्यमानः । श्लाघ्नादीनां प्रयोग ज्ञीप्स्यमानो ज्ञाययितुमिष्यमाणः संप्रदानमिति देवदत्ताच्चतुर्थी, केचिदाहुः । आत्मानं परं वा स्तुवन् तां स्तुतिं बोधयितुमिच्छतीत्यर्यः इति । तथा च भट्टिः श्लाघमानः परस्त्रीभ्यस्त त्रागाद्राक्षसेश्वर इति । (मा. धा. भ्वादिः श्लाघृ कत्थनेधातुवरील विवेचन )

"श्लाघृ कत्थने" या भ्वादि गणातील धातूचे "देवदत्ताय श्लाघते" या उदाहरणाचा अर्थ सांगत असतांना वरील विवेचन आले आहे धातूचा अर्थ कत्थनम् म्हणजे श्लाघनम् असा दिला आहे. देवदत्ताय श्लाघते याचा अर्थ देवत्ताची स्तुती करीत त्याला काहीतरी जाणवून देण्याची इच्छा करतो असा आहे. ह्या स्पष्टीकरणाला पाणिनींचे श्लाघह्नुतङ्थाशपा ज्ञीप्स्यमानः । १-४-३४ हे सूत्र प्रमाण म्हणुन दिले आहे. म्हणुन देवदत्त शब्दाला संप्रदान ही संज्ञा होऊन चतुर्थी विभक्ति – 'चतुर्थी संप्रदाने' २-३-१३ या सूत्राने झाली आहे. असे म्हणतात. वर दिलेल्या भट्टिकाव्यांतील श्लोकांत असाच अर्थ आहे. परस्त्रीभ्यः श्लाधमानः याचा 'कामुकतेने परस्त्रियांची स्तुती करणारा' असा अर्थ प्रतीत होतो, भरतमल्लिकाने मुग्धबोध टीकेंत याचा अर्थ अधिक स्पष्ट दिला आहे. तो म्हणतो "परस्त्रीभ्यः श्लाघमानः तासां श्लाघया तास्तोषयन् स्वकीयश्लाघां ताः ज्ञापयन् वा तास्वात्मश्लाघां कथयन् वा, यस्मै श्लाघार्थ इति सम्प्रदानत्वं, यस्मै श्लाघार्थ इति श्लाघार्थेन यो ज्ञीप्स्यमानस्तस्य सम्प्रदानत्वमित्यर्थः (८-७३ मुग्धबोधे)

३. स प्रोषिवानेत्य पुरं प्रवेक्ष्यन् शुश्राव घोषं न जनौधजन्यम् ।
आकर्णयास न वेदनादान् न चोपलेभे वणिजांऽपणाऽऽयान् । ३-२७

"गुपूधूप" इत्यायो व्यवहारार्थस्य नेत्युक्तान्युदाहरणानि तद्विषयाणि । तथा च वृत्तिः स्तुत्यर्थेन पनिना साहचर्यात्तदर्थः पणि प्रत्ययमुत्पादयतीति । एव न्यासपदमञ्जयांदिष्वपि । अत एव तरंगिण्यामपि – न चोपलेभे वणिजां पणायां इति प्रयुञ्जानो भट्टिर्भ्रान्त इत्युक्तम् (मा. धा. पण धातुवरील विवेचन)

'गुपूधूपविच्छिपणिपनिभ्यः आयः' ३-१-२८ सूत्रांतील आय व्यवहारर्थक नाही हें दाखविण्याकरिता वरील उदाहरणे दिली. काशिका वृत्तीमध्ये देखील ही गोष्ट मान्य केलेली आहे स्तुत्यर्थक पनि धातूच्या साहचर्याने पणि देखील त्याच अर्थाचा आहे. आणि तेव्हाच त्यावरून प्रत्यय होईल. न्यास व पदमंजरींत देखील असेच म्हटले

अनुक्रमणिका

आहे. म्हणूनच तरंगिणींत देखील असे म्हटले आहे कीं, 'न चोपलेभे वणिजां पणायान्' असा भट्टीने केलेला प्रयोग बरोबर नाही.

४. उक्षाम्प्रचक्रुर्नगरस्य मार्गान्ध्वजान्बबन्धुर्मुमुचुः खधूपान् ।
दिशश्च पुष्पैश्चकरुर्विचित्रैरथेंषु राजा निपुणा नियोक्ताः ३-५

उक्षां प्रचक्रूनंगरस्य मार्गा इति भट्टिप्रयोगमुपादाय सुधाकरदयः, उक्ष्यत इत्युक्षाः, कर्मणि धञ्, उक्षान् प्रचक्रुरिति पाठान्तरं चास्थन् । (मा. धा. उक्ष सेचने धातुवरील विवेचन).

उक्ष सेचने या धातूच्या विवेचनांत सायणाचार्य म्हणतात कीं, उक्षां प्रचक्रुर्नगरस्य मार्गाः ह्या भट्टिकाव्यांतील श्लोकावर सुधाकरकारांनी असे म्हटले आहे कीं, उक्ष्यते इति उक्षाः ह्या अर्थात कर्मणि धञ्प्रत्यय होतो. तसेच उक्षाम्प्रचक्रुः असाहि पाठभेद त्यांनी सांगितला आहे.

वर दिलेले इतरहि कांही टीकाकारांचे स्पष्टीकरण समजून घेण्याकरिता आपण "उक्षाम्प्रचक्रुः" ह्या पदाचा नीट परिचय करून घेऊ.

उक्षाम्प्रचक्रुः हा उक्ष सेचनें या धातूचा लिट् लकार आहे. 'इजादेश्च गुरुमतोऽनृच्छः' ३-१-३६ या सूत्राने "आम्" प्रत्यय व कृञ्चानुप्रयुज्यते लिटि । ३-१-४० या सूत्राने कृञ् धातूचा अनुप्रयोग झाला आहे.

उक्षाम्प्रचक्रुः या ठिकाणी आम् प्रत्यय व कञ्चा अनुप्रयोग यांत "प्र" या उपसर्गाचे जे व्यवधान आहे ते बरोबर नाही असे पाणिनीयांचे मत आहे 'कृञ् चानुप्रयुज्यते लिटि' इत्यत्र "अनु" शब्दस्य व्यवहितविपर्यस्तप्रयोगनिवृत्यर्थत्वात् यथाह वार्तिककारः, 'विपर्यासनिवृत्यर्थ व्यवहितनिवृत्यर्थ च इति' । याचा सरलार्थ असा आम् प्रत्ययाहून पलीकडे उपसर्ग इत्यादींचे व्यवधान नसलेले केवळ भू धातु अस् धातु व कृधातु यांचेच अनुप्रयोग होतात. उपसर्गासहित किंवा इतर शब्दांचे व्यवधान असलेल्या भू इत्यादींचा अनुप्रयोग होत नाही म्हणूनच आम् प्रत्यय व कृ धातु यांच्यामध्ये येथे प्र हा शब्द आला असल्याने "उक्षाम्प्रचक्रुः" हा पाठ चूक आहे असे म्हणतात.

हा दोष टाळण्यासाठी जयमंगलाने "उक्षान् प्रचक्रुः" असा दोन पदांनी युक्त पाठ घेतलेला आहे (३-५ जयमंगल, भ.का.) उक्षान् असा पाठ घेतल्यावर मार्गान्चे ते विशेषण होते. उक्षा उक्षणं म्हणजे सेकः उक्षा विद्यते येषां मार्गाणां ते उक्षाः जलसेकविशिष्टाः तान् असा अर्थ निष्पन्न होतो. उक्षा शब्दाहून "अर्श आदिभ्यो अच्" ५-२-१२७ सूत्राने अच् प्रत्यय होतो. असे येथे व्याख्यान केले आहे. असा प्रयोग चूक नाही असे मुग्धबोध टीकेचें टीकाकार रामानन्दाचार्य म्हणतात. शिवाय 'प्रभ्रंशयां यो नहुषं चकार ।' 'तां पातयां प्रथममास' रघुवंशांतील हे प्रगोगहि बरोबर आहेत असे त्यांचे मत आहे. परंतु "उक्षान् प्रचक्रुः" असा जयमंगलाने घेतलेल्या पाठाचा स्वीकार केल्यास प्रसिद्ध पाठाचा म्हणजे "उक्षाम्प्रचक्रुः" या पाठाचा त्याग व अप्रसिद्ध म्हणजे "उक्षान् प्रचक्रुः" पाठाची कल्पना करणे हे केवळ साहस आहे म्हणून त्याची उपेक्षा करावी (३-५ मल्लि भा. का.) असे मल्लिनाथांचे म्हणणे आहे.

क्रमदीश्वराने "सप्रादिकृभ्वस्तिभिश्च" असे सूत्र करून प्रस्तुत श्लोकाचा निर्देश केला आहे काहींनी "नगरस्य उक्षां सेकं प्रचक्रुः भग्नान् मार्गान् ध्वजांश्च बबन्धु." असे म्हटले असल्याचे भरतमल्लिकाने सांगितले आहे. (३-५ भ.का. अध्यापक श्रीमद्‌गुररुनाथविद्यानिधि – भट्टाचार्येण सम्पादितम् ।

"कृञ्चानुप्रयुज्यते लिटि" ३-१-४० या सूत्राप्रमाणे अन्य पदाचें यवधान चालत नाही तथापि 'ते प्राग्धातोः' १-४-८० या सूत्राप्रमाणे गति व उपसर्ग संज्ञकांचा –तो धातूंचा एक भाग ठरत असत्याने –धातूच्या अगोदर प्रयोग होतो. म्हणून "प्र" उपसर्गाचे व्यवधान चूक नाही 'परंतु तं प्रथममासं' । किंवा 'प्रभ्रंशयां यो नहुषं चकार' । इत्यादि प्रयोगांत उपसर्गाशिवाय अन्य शब्दांचे व्यवधान आहे म्हणून हे प्रयोग चूक आहेत असे (चन्द्रकला – विद्योतिनी - ३-५- भ.का.) पंडित श्रीशेषराज शर्मा यांचे मत आहे.

५. व्रातीनव्यालदीप्राऽस्त्र सुत्वनः परिपूजयन् ।
पर्षद्वलान्महाब्रह्मैराट नैकटिकाश्रमान् ॥ ४-१२

'रजःकृष्यासुतिपरिषदो वलच्" इति मत्वर्थे वलच् । परिषदं समवैति, तत्र साधुर्वा (परिषद्यः) [परिषदेचे लक्षण स्मृतिकार पुढीलप्रमाणे देतात.
एकविंशतिसंख्याकैर्मीमासान्यायपारगैः ।
वेद कुशलैश्चैव परिषत्वं प्रकल्पयेत् ।] परिषदो ण्यः इति योगाभ्यां समवैति तत्र साधुरिति विषये ण्यः एकदेश विकृतस्यानन्यत्वात् कृतेकारलोपस्याप्येते प्रत्यया भवन्ति । तथा च भाष्ये एवोडः इत्यत्र पार्षदकृतिरेषा तत्र भवतामिति, तथा सम्प्रति पर्षद्वलोक्तमिति भारते वलच् । भट्टिकाव्ये पर्षद्वल इति वलच् दृश्यते । (मा. धा. – षद्‌लृम धातुवरील विवेचन)

'रजःकृष्यासतिपरिषदो वलच्' ५-२-११२ या सूत्राने मत्वर्थे वलच् प्रत्यय होतो. परिषदं समवैति किंवा तत्र साधुः हे दोन अर्थ आहेत.

'परिषदो ण्यः' । ४-४-४४ या सूत्राचा योगाविभाग (एका सूत्राचें दोन भाग करणे) केला तर 'समवैति' व 'तत्र साधुः ' या विषयांत "ष्य" प्रत्यय होईल. एकदेश विकृत झाला तरी तो अन्य होत नाही. या न्यायाप्रमाणे परिषदमधील इकाराचा लोप झाला तरी हे प्रत्यय होतातच. भाष्यामध्ये एवोडः याठिकाणीं ही पार्षदकृति आहे असे म्हटलें आहे. भारतामध्ये सम्प्रति पर्षद्वलोक्तन् असा पाठ दिसतो भट्टिकाव्यांत देखील पर्षद्वलान्" याठिकाणी वलच् प्रत्यय झालेला दिसतो.

पार्षद्वलान् – पर्षत् अस्ति येषां ते पर्षद्वलास्तान् । परिषद् म्हणजे सभा परिषद शब्दाहून 'रजः कृष्य...' या सूत्राने वलच् प्रत्यय मतुप् या अर्थात होतो. सूत्रांत परिषद हा शब्द असला तरी "पर्षद्" शब्दाहूनहि वलच् प्रत्यय व्हावयाला हरकत नाही. कारण "छिन्नेऽपि लाङगुले श्वा श्वा एव" कुत्र्याचें शेपूट तुटलें तरी कुत्रा कुत्राच असतो. त्याचा एक भाग विकृत झाला म्हणून तो बदलून जात नाही. या नियमाने परिषद् शब्दांतील इकार पर्षद् शब्दांत दिसत नसला तरी वलच् प्रत्यय होण्यास प्रत्यवाय नाही. "परिषद्वलान्" असा मल्लिनाथाने पाठ घेतला आहे येथे परितःसीदन्ति यस्यांसा परिषत्, 'संपदादिभ्यः क्विप्' (वा २२३३) या वार्तिकाने क्विप् प्रत्यय होतो.

अनुक्रमणिका

६.	ततश्चित्रीयमाणोऽसौ हेमरत्नमयो मृगः।
	यथामुखीनः सीतायाः पुप्लुवे बहु लोभयन् ॥ ५-४८

X यथामुखसंमुखस्य दर्शने X इति षष्ठ्यन्तभ्यामाभ्यां दर्शन इत्यर्थे खः। अत एव सादृश्येऽपि निर्देशात् यथामुखमित्यव्ययीभावः । तथा समोन्त्यलोपश्च । अयं च लोपः प्रत्ययनियोगेन इति केवलो न प्रयोगार्ह इति व्याख्यातारः। यथामुखीना सीताया इति भट्टिप्रयोगाचिन्त्यः। (मा.धा. — खनु धातुवरील विवेचन)

"यथामुखसंमुखस्य दर्शने' ५-२-६ या सूत्राने सूत्रांतील षष्ठ्यन्त शब्दाहून "दर्शन" या अर्थात "ख" प्रत्यय होतो. सादृश्य असा निर्देश असल्याने यथामुखम्" येथे अव्ययीभाव समास होतो व सम् मधील अन्त्याचा लोप होऊन संमुखस्य दर्शनः संमुखीनः असा शब्द — '(माधवीय धातुवृत्तींत सायणाचार्यानी-) निष्पन्न होतो असें सांगितले आहे. सम् चा अन्त्यलोप जो सांगितला तो प्रत्ययाचा योग असतांनाचे होतो तो केवळ प्रयोगार्ह नाही, असें व्याख्याकारांचे मत आहे. म्हणून यथामुखीना सीतायाः हा भट्टीने केलेला प्रयोग चिन्त्य आहे.

सायणाचार्याचे वरील विवेचन समजून घेण्यासाठी आपण यथामुखीनः हा शब्द नीटपणे लक्षांत घेऊ. यथामुखीनः मुखम् अनतिक्रम्य तिष्ठति इति यथामुखीनः यथामुख शब्दाहून "यथामुखसंमुखस्य दर्शने" ५-२-६ या सूत्राने दर्शन या अर्थात "ख" प्रत्यय होऊन त्याला "आयनेयीनीयियः फढखछघां प्रत्ययादीनाम्" । ७-१-२ या सूत्राने ईनादेश झाला आहे. "यथामुखीन" चा अर्थ सीतायाः पुरतो वर्तमानः सन् असा आहे.

यथामुखम् हा मुखस्य सदृशम् या अर्थात म्हणजेच सादृश्य अर्थात अव्ययीभाव समास झाला आहे. दर्पणादिकांत दिसणाऱ्या प्रतिबिंबाला यथामुखम् म्हटले आहे. यथामुख दर्शनः मथामुखीनः प्रतिबिंबाच्या आश्रयाप्रमाणे किंवा दर्पणाप्रमाणे, मारीचाने हेमरत्नमय मृगाचें रूप घेतले होते. ते अगदी स्वच्छ होते. येथे "इव" शब्दाचा लोप होतो. "प्रतिबिंबग्राही दर्पण इव" असा अर्थ येथे निष्पन्न होतो. वास्तविक उपचाराने म्हणजे लक्षणेने "यथामुखीनः" या शब्दाचा अर्थ केवळ अभिमुख असा आहे. सीताभिमुखी भूत्वा इत्यर्थः असें भरतमल्लिकाने म्हटलें आहे. (५-४८ भ.का. भरत म.)

७.	तं रत्नदायं जितमृत्युलोका रात्रिंचराः कान्तिभृतोऽन्वसर्पन्।
	प्रमुक्तमुक्ताफलमम्बुवाहं संजात तृष्णा इव देवमुख्याः ॥ १२-११

तं रत्नदायं जितमृत्युलोका रात्रिंचरः कान्तिभृतोऽध्यतिष्ठत्। इति भट्टिप्रयोगोऽयं दय दाणित्यपि द्रष्टव्यः। यद्वा "शाद्व्यध" इत्याकारान्तलक्षणे णे दायशब्दं व्युत्पाद्य तेन रत्नस्य दायो रत्नदाय इति षष्ठीसमासे विधेयः। (म.धा. दाण्दाने — धातुवरील विवेचन)

माधवीय धातुवृत्तीतील दाण्दाने (यच्छति) ह्या धातुवरील विवेचनांत वरील श्लोक भट्टिकाव्यांतून घेतलेला आहे.

अनुक्रमणिका

रत्नदायम् या पदात दय – दाण् धातु आहे. किंवा "श्याद्व्यधास्रुसंस्व्रतीणवसाव-हृवृलिहश्लिषश्वसश्च" । ३-१-१४१ या सूत्राने आकारान्तलक्षण णः प्रत्यय करून "दाय" शब्द साधावा व "रत्नस्य दायः रत्नदायः असा षष्ठी समास करावा.

जयमंगल व श्रीशेषराज शर्मा यांनी रत्नं दास्यति इति रत्नदायम् "अण्कर्मणि च "३-३-१२ या सूत्राने भविष्यत् कालाच्या अर्थात अण् प्रत्यय करून हा शब्द साधला आहे. किंवा दय दानगत्योः या धातुपासून कर्माणे अण् करून रत्नं दयते ददातीति रत्नदायम् अशी हि व्युत्पत्ति सुचविली आहे. (भ. का. १२-११ – जयमंगला, चंद्रकला व विद्योतिन्त.)

८. वेदोन्ङ्गवांस्तैरखिलोऽध्यगायि शस्त्राण्युपायंसत जित्वराणि ।
ते भिन्नवृत्तीन्यपि मानसानि समं जनानां गुणिनो ध्यवास्तुः ॥ १-१६

x उपाद्यमः स्वकरणे x उपयच्छते कन्यां, परिणयतीत्यर्थः । तङ् : अत्र भाष्यम्, इह कस्मान्न भवति स्वं, शटकं तमुपयच्छति, अग्रं यदा स्वं करोति तदा भवितव्यमेव । अत्र वृत्तिकारशिवस्वामिभ्यामिदं भाष्योक्तमस्वस्य स्वत्वेन करणं प्रसिद्धिवशात् पाणिग्रहणविषय उपसहृतम् । कैयटे तु निष्पादनलक्षणोऽत्र करोत्यर्थो गृह्यते इति, सामान्येनापि वार्तिककारणे पाणिग्रहणविशिष्टं स्वकरणं शिवस्वामिजयादित्यावूचतुः । प्रसिद्धत्वापुपायंस्त नतीरित्यादिप्रयोगस्तु साधर्म्यात् । भाष्यकारस्तु स्वकरणमात्रे विशिष्टे स्थित इत्युक्तं, भट्टिकाव्ये च शास्त्राण्युपायंस्त जित्वरणीति सामान्येन प्रयुज्यते । (भा. धा. भ्वादिः- यम – धातुवरील विवेचन)

यम उपरमे या धातूच्या विवेचनांत वरील परिच्छद आढळतो त्याचा सरलार्थ असा आहे. उपयच्छते कन्याम् म्हणजे परिणयति – "उपाद्यमः स्वकरणे" १-३-५६ या सूत्राने "उपयच्छते" येथे आत्मनेपद झालें आहे. याठिकाणी महाभाष्यकार पतंजलींचे मत देतात. – स्वं शटकं तमुपयच्छति येथे आत्मनेपद कां झाले नाही? ते जेंव्हा स्वतःचे करतो तेव्हां होईलच येथे वृत्तिकार शिवस्वामीचें असें म्हणणे आहे कीं, भाष्यात "अस्वस्य म्हणजे स्वतःचे जे नाही ते स्वतः चे करून घेणे" याचेंच पर्यवसान "पाणिग्रहण" या अर्थात झाले आहे. कैयटाने निष्पादन या अर्थात "करोति" शब्द भाष्यकारांनी वापरला आहे असें म्हटले आहे. शिवस्वामी व जयादित्य यांनी देखील "पाणिग्रहण विशिष्ट स्वकरण सामान्य अर्थानेच वापरला आहे. उपायंस्त, नतीः इत्यादि प्रयोग साधर्म्याने वापरलेले आहेत. भाष्यकारांनी स्वकरणमात्र विशिष्ट असें म्हटले आहे. भट्टिकाव्यांत "उपायंस्त" चा प्रयोग सामान्य अर्थातच आहे.

"शस्त्राण्युपायंसत – राज्ञां शस्त्रेषु दाराभिमानात् तत्परिग्रहे उभयमव्यपदेशः । अतएव "उपाद्यामः स्वकरणे" त्यात्मनेपदम् । स्वीकरणं पाणिग्रहणम् इति काशिकायाम् (मल्लिनाथी १-१६) असे मल्लिनाथाने म्हटले आहे.

माधवीय धातुवृत्तीत उपायंस्त असा पाठ आहे तर भट्टिकाव्याच्या इतर प्रतींत उपायंसत असा पाठ आढळतो.

अनुक्रमणिका

९.	व्याप्तं गृहाशयेः क्रूरैः क्रव्यादिभः सनिशाचरैः।
तुङ्गश्रृङ्गतरुच्छन्नं मानुषाणामगोचरम् ॥ ६-९४

क्रव्यादशब्दस्तु कृन्तविकृत्तपक्कमांसशब्दे उपपदे आणि पृषोदरादित्वादुपपदस्य क्रव्यभाव इति वृत्यादौ, "व्याप्तं गृहाशयैःक्रूरैः क्रव्यादैः सनिशाचरैरित्यममांसभक्षे व्याघ्रादौ भट्टिप्रयोगः चिन्त्यः। (मा. धा. – अद भक्षणे धातुवरील विवेचन)

माधवीय धातुवत्तीत अदादि गणांतील अद भक्षणे धातूच्या विवेचनात प्रस्तुतची पंक्ती आली आहे. वृत्ति इत्यादि ग्रंथांत असे म्हटले आहे की, पक्कमांस शब्द उपपद असतांना अण् प्रत्यय होतो व पृषोदरादिंमुळे उपपदाला "क्रव्य" भाव होतो. म्हणून अममांसभक्षण करणाऱ्या व्याघ्र इत्यादींच्या बाबतीत भट्टीने क्रव्यादैः या शब्दाचा केलेला प्रयोग चिन्तनीय आहे.

क्रव्यादिभः – क्रव्यम् म्हणजे आममांसम् अदन्तीति क्रव्यादः तैः 'क्रव्ये च' ३-२-६९ या सूत्राने "अद भक्षणे" या धातूहून विट् प्रत्यय होतो.

भरतमाल्लिक म्हणतो - "स्वमते पक्कापक्कविशेषानुक्तौ न क्षतिः क्षतिरर्थानतिशयत्वात्" (भ.का ६-९४, भरतमल्लिक)

१०.	एवंच आहध्वं मा रघूत्तममिति भट्टिप्रयोगोऽषि चिन्त्यः (मा.धा. इदादिः हन् धातुवरील विवेचन)

भट्टिकाव्याच्या जयमंगला टीका, चन्द्रकला विदोतिनी, टीका, मल्लिनाथी टीका, इत्यादि प्रती आम्ही पाहिल्या परंतु प्रयोग त्यांत आढळत नाही.

११.	विशङ्क्टो वर्क्षासे बाणपाणिः सम्पन्नतालद्वयसः पुरस्तात्।
भीष्मौ धनुष्मानुपजान्वरत्निरैति स्म रामः पथि जामदग्न्यः ॥ २-५०

एवं च ऐतिस्म रामं पथि जामदग्त्य' इति भट्टीप्रयोगवद् "न पुनरेति गतं चतुरं वय" इत्यत्राप्यैतीति वृद्धिरेव पठनीया। (मा. धा. इण् गतौ धातुवरील विवेचन)

"इण् गतौ" या धातूच्या विवरणांत वरील भट्टिकाव्याचा श्लोक दिसतो उपैति येथे "एत्येधत्यूठ्सु" ६-१-८९ या सूत्राने वृद्धि झाली आहे. त्याप्रमाणे "ऐति" या प्रयोगांत ती झाली आहे हे ठीकच आहे तशीच "न पुनरेति" येथेहि तो व्हावयास पाहिजे परंतु वृद्धि केलेली नाही.

"लट् स्मे" ३-२-११८ ऐति स्म – आगतवान्. ऐति हें आङ्पूर्वक इण् गतौ धातूचें लट् ललाराचें रूप असून "एत्येधत्यूठ्सु"। या सूत्राने वृद्धि झाली आहे.

१२.	ददैर्दुःखस्य मादृग्भ्यो धायैरामोदमुत्तमम् ।
लिम्पैरिव तनार्वातैश्चेतयः स्याज्ज्वलो न कः ॥ ६-८०

"तदर्हम्" इति निर्देशात् क्वचित्कृद्योगे द्वितीया भवतीति "दायै रामोदमुत्तमस्" इति भट्टिप्रयोगं निर्वहन्ति । (मा. धा. हुदाञ् धातुवरील विवेचन)

"तदर्हम्" ।५-१-११७ या सूत्रांतील 'तत्' या पदाच्या निर्देशाने क्वचित् कृदन्ताचा योग असतांना द्वितीया होते असे 'आमोदं धायैः' या प्रयोगावरून सिद्ध होते.

"आमोदम्" ही द्वितीया विभक्ति झाली आहे. याविषयी मल्लिनाथ म्हणतो – "कर्तृकर्मणोः कृति । इत्यत्र शेषत्वविक्षायामेव षष्ठीविधानादिह तदविवक्षायामामोदमिति कर्मणि द्वितीया" (भ. का. ६-८० मल्लिनाथी) 'कर्तृकर्मणोः कृति' २-३-६५ या सूत्राने शेषत्वाने त्रिवक्षा असतांना ,षष्ठींचे विधान केले आहे. अर्थातच तशी विवक्षा नसतांना "आमोदम्" येथे कर्मणि द्वितीया विभक्ति झाली आहे. पंडित श्रीशेषराज शर्मांचे देखील असेच मत आहे. आमोदं – कर्तृकर्मणोः कृति इति षष्ठया अनित्यत्वाद् द्वितीया । (भ. का. ६-८० चन्द्रकला विद्योतिनी)

१४	अनेकशो निर्जितराजकस्त्वं पितृनताप्सीर्नृपरक्ततोयैः ।
संक्षिप्य संरम्भमसद्विपक्षं काऽऽस्थाऽर्भकेऽस्मिंस्तव राम रामे ॥ २-५२

सम्पृचादिसूत्रे वृत्तिकारेण "क्षिपिदिवादिस्तुदादिश्च गृह्यते" इत्युक्तत्वात् "द्वाविमावम्भासि क्षिप्य गले बध्वा महाशिलाम्" इति, "संक्षिप्य संरम्भमसद्विपक्षम्" इति भारते भट्टिकाव्ये च दर्शनात्, पारायणिकैः क्षिपेरिह पाठोऽयूक्त इति भूसूत्रे सुधाकरेण प्रतिपादितम् । कुतस्तौदादिकस्यापि समानाः । (मा. धा. दिवादिः क्षिप प्रेरणे धातुवरील विवेचन)

सम्पृच्.... इ. सूत्रांत क्षिप् धातु दिवादि, व तुदादिं घेतात असें वृत्तिकाराने म्हटलें आहे. द्वाविमावम्भसि क्षिप्य या भारतांमध्ये आलेल्या पंक्तीत क्षिप् धातु आहे. संक्षिप्य ... ह्या भट्टिकाव्यांतील श्लोकांत देखील क्षिप हा धातु दिवादि गणांतील आहे. "भू" या सूत्रावरील सुधाकर टीकेच्या टीकाकारांनी असे म्हटले आहे की, पारायणिकांनी येथे क्षिप् धातूचा पाठ अयोग्य मानला आहे.

संक्षिप्य क्षिप् प्रेरणे ह्या दिवादि गणांतील धातुहून लोट् लकार, सिप् प्रत्यय त्याला हि आदेश व "अतो हेः" ६-४-१०५ या सूत्राने त्याचा लोप झाला आहे. "संक्षिप्य" चा अर्थ संहर असा आहे.

१५.	ततो वावृत्यमानाऽसौ रामशालां न्यविक्षत ।
मामुपायस्त रामेति वदन्ती साऽऽदरं वचः ॥ ४-२८

अनुक्रमणिका

तप ऐश्वर्ये वा ॥ अयं धातुरैश्वर्ये वा तङ्श्य नो उत्पादयतीत्यर्थः अन्यथा न्याय्यविकरणः परस्मैपदी च, (तपति) इति । केचिदिह वाग्रहणं वक्ष्यमाणस्य वृतवरणे इत्यस्य आद्यांशम् इच्छन्ति वावृतु वरणे इति । तथा च भट्टिः ततो वावृत्यमाना सा रामशालां न्यविक्षत 'इति' (मा.धा. दिवादि तप ऐश्वर्ये धातुवरील विवेचन)

तप ऐश्वर्ये वा या धातूच्या विवेचनांत भट्टिकाव्यांतील वरील श्लोक आला आहे. हा धातु "ऐश्वर्य" या अर्थात विकल्पाने तङ् म्हणजे आत्मनेपदी व श्यन् म्हणजे दिवादि गणांचा अर्थ प्राप्त करतो. अन्यथा तो परस्मैपदी व न्याय्यविकरण आहे कांही जण असें म्हणतात कीं येथे "वा" पदाचे ग्रहण पुढे सांगण्यात येणाऱ्या "वावृतु वरणे" या धातूच्या आद्यांशाकरिता आहे आणि त्यासाठी प्रमाण म्हणून भट्टीचा ततो वावृत्यमाना सा रामशालां न्यविक्षत हा श्लोक दिला आहे.

वावृत्यमाना हें रूप – वावृतु वरणे या दिवादि गणांतील "वर्तमानसामीप्ये वर्तमानवद्वा" ३-३-१३१ या सूत्राने कर्तरि लट् लकार होऊन शानच् प्रत्यय होऊन तयार झालें आहे.

१६. राधवस्याऽमुसः कान्तामासैरुक्तो न चाऽर्पिपः
मा नाऽनुभूः स्वकान् दोषान् मा मुहो मा रुषोऽधुना ॥ १५-१६

मुस खण्डने । (मुस्यति) इत्यादिना । दन्त्यान्त- इति सर्वे । आत्रेयस्तु कातन्त्रे मूर्धन्यान्तोयम् । तथाच "राघवस्यामुषः कान्तम्" इति भट्टिकाव्ये प्रयोगश्चेति पाठान्तरमप्याह । (मा.धा. दिवादिः मुस खण्डने – धातुवरील विवेचन)

मुस खण्डने हा दन्त्य म्हणजे सकारान्त धातु आहे असे सर्वांचे मत आहे. कातन्त्र व्याकरणांत आत्रेयाने हाच मूर्धन्य म्हणजे ष कारान्त आहे असे म्हटले आहे. भट्टिकाव्यात देखील "राक्षवस्यामुषः कान्तम्" असा प्रयोग पाठभेद म्हणून आढळतो.

अमुसः हे रूप "मुस खण्डने" या धातूचें लङ लकाराचें असून "पुषादि द्युताद्य्लृदितः परस्मैपदेषु" । -३-१-५५ या सूत्राने अङः झाला आहे.

पंडित श्रीशेषराज शर्मा म्हणतात – "आत्रेयस्तु" कातन्त्रे मूर्धन्यान्तोऽयम् । तथा च "राघवस्याऽमुष कान्ताम्" इति भट्टिकाव्ये प्रयोगश्चेति पाठान्तरमप्याह (भ.का. १५-१६ चन्द्रकला विद्योतिनी)

जयमंगलाने "राघवस्याऽमुषः कान्ताम्" (१५-१५ भ. का. जयमंगला टीका) असा षत्वयुक्तच पाठ घेतला आहे.

१७. (१) रावणाय नमस्कुर्याः स्यात्सीते स्वस्ति ते ध्रुवम् ।
अन्यथा प्रातराशाय कुर्याम त्वामलं वयम् ॥ ८-९८

(२) ईक्षांचक्रेऽथ सौमित्रिमनुजज्ञे बलानि च ।

नमश्चकार देवेभ्यः पर्णतल्पं मुमोच च॥ १४-१८

अत्र नमः शब्दः पठ्यते स यदा गतिसंज्ञकस्तदोपसर्गवद्वृ-त्या कृञ प्रणामवचनत्वं द्योतयतीति प्रणामापेक्षया कर्मणि देवादौ "नमः स्वस्ति" इत्येतद् बाधित्वा "उपपद विभक्तेः कारकविभक्तिर्बलीयसी" इति नमस्यति देवानितिवत् नमस्करीति देवानिति द्वितीयेव भवति । अगतित्वे तु करोतिक्रियाकर्मभावापन्नं विशेष्यभूतं प्रणाममाचष्ट इति देवादावकर्मणि "नमः स्वस्ति" इति चतुर्थी । तथा च भट्टिः "नमश्चकार देवेभ्यो, 'रावणाय नमस्कुर्या' इति स्वयंभुवे नमस्कृत्येत्यत्र तु नमसो गतित्वे कुञो विशेषकत्वात्प्रात्पां कारकविभक्तिं द्वितीयां "क्रियार्थोपपदस्य" इति चतुर्थी बाधते, तदत्रायमर्थोवाच्यः, स्वयंभुवं प्रीणयितुं प्रणम्येति । (मा.धा तनादयः डुकृञ् करणे धातुवरील विवेचन)

नमः हा शब्द ज्यावेळेस गति संज्ञक होतो त्यावेळेस "नमस्करोति देवान्" येथे देव या शब्दाला "नमस्वस्ति" । या २-३-१६ सूत्राने जरी तो कर्म संज्ञा धारण करीत असला तरी "उपपदविभक्तीपेक्षा कारकविभक्ति बलवती असते. या परिभाषेने चतुर्थी न होता द्वितीयाच होते." "नमस्यति देवान्" येथे ज्याप्रमाणे कारकविभक्तीच होते त्याप्रमाणे गति संज्ञा नसेल तेंव्हा देव या शब्दाला अकर्मणि "नमः स्वस्ति" या सूत्राने चतुर्थी विभक्तीच होईल. यासाठी भट्टीचे वचन देतात, 'नमश्चकार देवेभ्यः' येथे देवेभ्यः ही "नमश्चकार" या शब्दाच्या योगाने झालेली उपपद विभक्ति आहे तसेच "रावणाय" ही देखील "नमस्कुर्याः" या पदाच्या योगाने झालेली उपपद विभक्ति आहे. "स्वयंभुवे नमस्कृत्य" या प्रयोगात, नमस् ला गतिसंज्ञा होऊन कृत्रमुळे विशेषत्वाने प्राप्त झालेल्या कारकविभक्तीचा – (द्वितीयेचा) बाध "क्रियार्थोपपस्य" २-३-१४ या चतुर्थीने होतो. याठिकाणी "स्वयंभवं प्रीणयितुंम् प्रणम्य" "शंकराला प्रसन्न करण्यासाठी नमस्कार करून" असा वाच्यार्थ आहे.

पंडित श्रीशेषराज शर्मा लिहितात – नमश्चकार देवेभ्यः "नमः इति पदेन योगे" नमः स्वस्तिस्वाहास्वधालंवषड्योगाच्चे" ति चतुर्थी । यद्यपि "नमश्चकारे" ति क्रियापदेन साक्षाद्योगे "उपपदविभक्तेः कारकविभक्तिर्बलीयसी" ति परिभाषया द्वितीयाविभक्तेरेच प्राप्तिस्तथाप्यत्र नमः शब्दस्य वाचकत्वेन कृत्रोऽन्वयाच्चतुर्थ्यपि युक्ता । (१४ । १८ भ. का. चन्द्रकला विद्योतिनी)

१८. सहायवन्त उद्युक्ता बहवो निपुणाश्च याम् ।
श्रियमाशासते, लोलां तां हस्तेकृत्य मा श्वसीः । ५ । १६

उपयमनं दारकमिति वृत्तौ, अन्ये तु स्वीकरणमात्रमिच्छन्ति । हस्तेकृत्य महास्त्राणीति । आत्रेयस्तूपयमनन्नामपरित्यागलक्षणस्वीकरण, तथा च भट्टि; - हस्तेकृत्य त्वमाश्वासीः इति । (मा. धा. तनादय : डुकृञ् करणे धातुवरील विवेचन)

'नित्यं हस्ते पाणावुपयमनें । १ ।४ ।७७ या सूत्रांतील उपयमनम् शब्दाच्याअर्थाविषयीच्या चर्चेत भट्टीचा वरील श्लोक घेतला आहे. वृत्तीमध्ये उपयमनम् म्हणजे स्वीकरणमे हा अर्थ स्वीकारतात. उदा. "हस्तेकृत्य महास्त्राणि" याचा अर्थ 'महास्त्रें स्वतःची करुन' असा आहे. आत्रेय म्हणतात – उमयमन म्हणजे परित्याग हे ज्याचें

लक्षण आहे असें स्वीकारणे. भट्टीला देखील हाच अर्थ अभिप्रेत आहे. उदा. 'हस्तेकृत्य माश्वसीः' लक्ष्मीला हस्तगत करून देखील ही माझ्या ताब्यांत आली असा विश्वास करूं नकोस.

१९. लक्ष्मणं सा वृषस्यन्ती महोक्षं गौरिवाऽगमत् ।
मन्मथाऽऽयुधसम्पातव्यथ्यमानमतिः पुनः ॥ ४-३०

(अश्वस्यति, वृषस्यति, क्षीरस्यति, लवणस्यति) "अश्वक्षीरवृषलवणानामात्मप्रीतौ क्यचि" इत्यसुगागमः । अत्रात्मप्रीतावित्यपनीय "अश्ववृषयोर्मैथुनेच्छायां" "क्षीरलवणयोऽलालसायाम्" इत्यर्थान्तरमुक्तं, तेनाद्ययोरुदाहरणयोरश्ववृषौ मैथुनायेच्छत इत्यर्थः अन्ये तु परित्यक्तप्रकृत्यर्थान्मैथुनेच्छैवार्थ इत्याहुः । तथाच भट्टि इति रामो वृषस्यन्तीमिति । निघण्टुश्च वृषस्यन्ती तु कामुकीति [मा. धा. नामधातवः]

अश्वस्यति, वृषस्यति, क्षीरस्यति, लवणस्यति याठिकाणी 'अश्वक्षीरवृक्षलवणानामात्मप्रीतौ क्यचिं' । ७-१-५१ या सूत्राने असुगागम होतो. येथे "आत्मप्रीतौ" हा अर्थ दूर सारून "अश्व आणि वृष यांची मैथुनेच्छा, क्षीर आणि लवण यांची लालसा हे दुसरे अर्थ सांगितले. म्हणून अगोदरच्या उदाहरणामध्ये अश्व व वृष मैथुनाकरिता इच्छा करतात हा अर्थ निष्पन्न होतो. इतरांचे म्हणणे असे की, बाकीचे अर्थ बाजूला टाकून मैथुनेच्छा हाच अर्थ योग्य आहे. आपल्या या मताच्या पुष्टींकरीता भट्टीचे निदर्शन देतात कीं 'रामो वृषस्यन्तीम्'. निघण्टूने 'वृषस्यन्ती तु कामुकी' असें म्हटले आहे.

वृषस्यन्ती – आत्मनो वृषमिच्थतीति वृषस्यन्ती, या अर्थात येथे 'सुप आत्मनः क्यच्' ३-१-८ या सूत्राने क्यच् नंतर लट् व शतृ प्रत्यय होऊन ङीप् झाला आहे. "अश्वक्षीर" । या सूत्रावरील "अश्ववृषयोर्मैथुनेच्छायां" या वार्तिकाने असुगागम झाला आहे.

मल्लिनाथ म्हणतो – यथा गौर्वृषस्यन्ती, मैथुनेच्छावती महोक्षं महावृषभ् । वृषस्यन्तीत्युपमानविशेषणभेतत् । तेन वृषं लब्धुमिच्छन्तीति क्यच् । अश्वक्षीर । ७-१-५१ इत्यादिना असक् । तद्वयश्ववृषयोर्मैथुनेच्छायाम् इति । तद्ववागमत् (४-३० भ. का. मल्लिनाथी टीका)

## आ) सिद्धांत कौमुदी

आतापर्यंत आपण माधवीय धातुवृत्तींत भट्टीकाव्यांतील वचनांचा केलेला उल्लेख विस्तृतपणे पाहिला. यानंतर पाणिनीय अष्टाध्यायीवरील प्रकरणानुसार लिहिलेल्या सिद्धांत कौमुदी या भट्टोजी दिक्षितांच्या ग्रंथात भट्टिकाव्यांतील जीं वचने आहेत त्यांचा विचार करावयाचा आहे.

१. आः कष्टं बत ही चित्रं हूं मातर्दैवतानि धिक् ।
हा पितः क्वाऽसि हे सुभ्रु बह्वेतवं विललाप सः ॥ ६ । ११

भ्रूः श्रीवत् । हे सुभ्रूः । कथं तर्हि 'हापितः क्वासि हे सुभ्रू" इति भट्टिः । (सि. कौ. सू ३०६) प्रमाद एवायमिति बहवः ।

अजन्त स्त्रीलिंग प्रकरणांत स्त्रीलिंगी ऊदन्त शब्दांची प्रक्रिया देत असतांना भट्टोजींनी भट्टीच्या वरील श्लोकाचा निर्देश केलेला आहे.

'भ्रूः' हा एक ऊद्रन्त शब्द आहे तो श्रीः शब्दाप्रमाणे चालवावा असे सांगितले आहे.

हे सुभ्रू :- सु शोभना भ्रू यस्याः सा सुभ्रूः । हा शब्द स्त्रीप्रत्ययान्त नसल्याने "गोस्त्रियोरुपसर्जनस्य" १-२-४८ या सूत्राप्रमाणे ऱ्हस्व झाला नाही. 'नेयङुवङःस्थानावस्त्री' १-४-४ या सूत्राने भ्रू शब्द व तदन्त शब्द यांना नदी संज्ञा होत नाही. नदी संज्ञेचा निषेध केलेला असल्याने "अम्बार्थनद्योर्ह्रस्वः" ७-३-१०७ या सूत्राने नदीकार्य म्हणजे ऱ्हस्वाचे कार्य होत नाहीं. या अभिप्रायाने हे सुभ्रूः असे संबोधनाचे एकवचन तयार होते.

असें जर आहे तर भट्टीने – वर दिलेल्या प्रयोगांत "सुभ्रु" हा शब्द कसा वापरला? सुभ्रू शब्दांत नदी संज्ञेचे कार्य होणार नाही तर "सुभ्रू" शब्दाची संगति कशी लावावयाची?

नदी संज्ञा झाली नसतांना देखील "अम्बार्थनद्योऱ्हस्वः सूत्राचे ऱ्हस्व करणे हा प्रमाद आहे. असे पुष्कळ अभ्यासकांचे मत आहे.

बालमनोरमाकार म्हणतात – कतिपये सामान्ये नपुंसकत्वमाश्रित्य कथंचित् समादधुः । (सि. कौ. ची प्रस्तुत पंक्तीवरील बालमनोरमा)

"ऊकारादप्यूङः वक्तव्यः" इति ऊङःन्तत्वात् सुभ्रुशब्दस्य नदीत्वात् सम्बुद्धौ नदीऱ्हस्वः । असे मल्लिनाथाचें म्हणणे आहे. (६-११ भ. का. मल्लिनाथी) ऊकारान्त शब्दाहूनहि ऊङ होतो. या वचनाने

"सुभ्रु" हा ऊङन्त झाला म्हणून नदीसंज्ञक होऊन संबोधनांत ऱ्हस्वाचें कार्य होते.

जयमंगलाचें मत असें – 'भ्रू शब्दात्' अप्राणिजाते :- इत्यादिनोङः उवर्णान्तमात्रस्य विधानाब्दहुव्रीहिः । उपसर्जनत्वं च । पुनः स्त्रियामूङः । "अन्तादिवच्च" ६-१-८५ इति पूर्व प्रत्यन्तवत्वात् प्रतिपादिकत्वम् अतः सम्बुद्धौ – ऱ्हस्वत्वम् (६-११ भ. का. जयमंगला)

श्रीशेषराज शर्मा लिहितात – वस्तुतस्तु रामस्य शोकविवशमानसत्वात् बोधाऽऽ भावेन च्युतसंस्कृत्यात्मको दोषोऽपि गुण एवेति सर्वं निरवद्यम् । (६ । ११ भ. का. चन्द्रकला विद्योतिनी) वस्तुतः सीतेचें अपहरण झाल्याने राम दुःखित झाला होता. त्यामुळे त्याच्याकडून कोठलाहि दोष होणे स्वाभाविक आहे. परंतु अशा परिस्थितींत दोष देखील गुणासारखाच ठरतो. असे मानण्याने सर्व व्यवस्थित जुळते.

२.	हविर्जक्षिति निःशंको मखेषु मधवानसौ ।
प्रवाति स्वेच्छया वायुरुद्‌गोच्छति च भास्कर । १८-१९

"हविजक्षिति निः शको मखेषु मधवानसौ" इति भट्टिः (सि. कौ. सू ३६१)

मघवत् या शब्दाचें मधवान् हे रूप सिद्ध करीत असतांना सिद्धांत कौमुदीत वरील पंक्ति आढळते. मधवान् हे दीर्घकार्य शिष्टसंमत आहे हे सांगण्यासाठी भट्टोजींनी भट्टीचें "हविर्जक्षिति .... "हे वचन घेतलेले आहे.

मधवान् = महयते (पूज्यते) इति, "मह पूजायाम्" या धातुहून "श्वन्नुक्षम् (३१५७) या औणादिक सूत्राने मघवन् असें निपातन होंते. "मधवा बहुलम्" ६-४-१२८ या सूत्राने विकल्पाने "तृ" असा अन्तादेश होतो. नंतर "उगिदचा सर्वनामस्थानेऽधातोः" ७-१-७० या सूत्राने नुमागम होतो. संयोगान्त लोप असिद्ध असल्याने नकार लोप होत नाही.

३.	यद्यहं नाथ नाऽऽयास्यं विनासा हतबान्धवा ।
नाऽज्ञास्यस्त्वमिदं सर्व प्रमाद्यंश्चारदुर्बलः ५-८

"वेग्रो वक्तव्यः (वा. ३३६५) । विगता नासिका यस्य विग्रः । "ख्यश्च" (वा ३३६६) विख्यः । कथं तर्हि विनसा हतबान्धवा इति भट्टिः । विगतया नासिकयोपलक्षिता इति व्याख्येयमिति । (सि. कौ. सू. ८५९) हे स्पष्ट होत नाही.

"उपसर्गादनोत्परः" ८-४-२८ या सूत्राच्या सिद्धांत कौमुदींत वर दिलेलें विवेचन आहे. विग्र :- विगता नासिका यस्य स :- येथे वेग्रो वक्तव्य : हें वार्तिक सांगितले आहे. वि शब्दाहून पलीकडे आलेल्या नासिका शब्दाला ग्र आदेश होतो तर मग – विगता नासिका यस्य असा विग्रह केला असतांना टाप् प्रत्यय होऊन विनसा – हा भट्टीने केलेला प्रयोग जुळत नाही. कारण हा ग्रादेश नसादेशाचा अपवाद आहे. यावर भट्टोजी समाधान करतात कीं, विगता नासिका विनासिका असा प्रादि समास करावा. आता हा बहुव्रीहि समास नसल्याने "पद्द,न-" ६-१-६३ या सूत्राने नसादेश होऊन विनसा असे तृतीयान्त रूप तयार होईल. उपलक्षितेति अध्याहार्यम् असें बालमनोरमाकार म्हणतात.

मल्लिनाथ म्हणतो – विनसा हतबान्धवा – विगता नासा नासिका यस्याः सा विनसेति नासान्तो बहुव्रीहिः । घोणा नासा च नासिका" इत्यमरः नासिकान्तत्वे "उपसर्गाच्च" इति नसादेशं बाधित्वा "वेग्रो वक्तव्यः" इति ग्रोदेशे विग्रेति स्यादिति । (५-८ भ. का. मल्लिनाथी)

जयमंगल- विनासा हतबान्धवा – विगता नासा यस्याः । नासैव नासिकेति 'केऽणः' ७-४-१३ इति ऱ्हस्वत्वे रूपं, तस्या नसादेशस्य विधीयमानत्वादत्र संभव एव नास्ति (५-८ भ. का. जयमंगल)

अनुक्रमणिका

भट्टोजी दीक्षित व मल्लिनाथ "विनसा" असा पाठ घेतात तर जयमंगल, श्रीशेषराज शर्मा विनासा असा पाठ घेतात.

४. सूतोऽपि गंगासलिलैः पवित्वा सहाऽश्वमात्मानमनल्पमन्युः ।
सतीतयो राघवयोरधीयन् श्वसन्कदुष्णं पुरमाविवेश ॥ ३- १८

"इण्वदिक इति वक्तव्यम्" (वा. १५७७) अधियन्ति । अध्यगात् । केचिन्तु आर्धधातुकाधिकारोक्तस्यैवातिदेशमाहुः । तन्मते यण्न । तथा व भट्टि :- ससीतयो राघवयोरधीयन् इति । (सि. कौ. सू २४६२)

"घुमास्थागापाजहातिसां हलि ६-४-६६ या सूत्राच्या सिद्धांत कौमुदींत वर दिलेली चर्चा आढळते.

(वा.) इक् धातूला इण् धातूची कार्ये होतात. उदा. अधियन्ति – तेथे 'इणो यण्' ६-४-८१ या सूत्राने यण् होतो. तसेच "अध्यगात्" येथे "इणो गा लुङिः" याने गा आदेश होतो. कांहींच्या मते ज्या अर्थी हे वार्तिक आर्धधातुके या अधिकारांत असलेल्या 'इणो गा लुङिः २-४-४५ या सूत्रावर पठित आहे त्याअर्थी "इणो यण्' ६-४-८१ हे सूत्र त्या अधिकारांत नसल्यानें त्याचा अतिदेश इक्ल प्रवृत्त होत नाही म्हणून यण् होत नाही. भट्टीनेहि यण् रहित प्रयोग केला आहे. उदा. "ससीतयो राघवयोरधीयन्" । त्यांच्या मतें यण् न होता इयङः होऊन "अधीयन्ति" असें रूप होते. "राघवयोः अधीयन्" याचा अर्थ "राघवौ स्मरन्" असा होतो.

५ कथं तर्हि "आहध्वं मा रघूत्तमम्" इति भट्टिः । प्रमाद एवायमिति भागवृत्तिः । प्राप्येत्यध्याहारो वा । ल्यब्लोपे पञ्चमीति तु ल्यबन्तं विनैव तदर्थावगतिर्यत्र तद्विषयम् । भेत्तुमित्यादितुमुन्नन्ताध्याहारो वास्तु । (सि कौ. सु. २६९५)

भट्टिकाव्याच्या आम्हाला उपलब्ध झालेल्या प्रतींत वरील प्रयोग आढळत नाही.

६. क्रुध्यन्कुलं धक्ष्यति विप्रवन्हिर्यास्यन्सुतस्तप्स्यति मां समन्युम् ।
इत्यं नृपः पूर्वमवालुलोचे ततोऽनुजज्ञे गमनं सुतस्य ॥ १-२३

"अनुपसर्गाज्ज्ञः" १-३-७६ गां जानीते । अनुपसर्गात् किम् । स्वर्ग लोकं न प्रजानाति कथं तर्हि भट्टीः 'इत्थं नृपः पूर्वमवालुलोचे ततोऽनुजतज्ञे गमनं सुतस्य' इति । कर्मणि लिट् । नृपेणेति विपरिणामः (सि कौ. सू. २७४३)

सिद्धांत कौमुदीच्या आत्मनेपद प्रकरणांत प्रस्तुत चर्चा आली आहे. 'अनुपसर्गाज्ज्ञः' । हे सूत्र असे सांगते कीं, उपसर्गरहित ज्ञा धातुहून आत्मनेपद होते. उदा. गांजानीते / अनुपसर्गात् असें का म्हटलें? स्वर्ग लोकं न प्रजानाति या प्रयोगांत प्र उपसर्गपूर्वक ज्ञा धातु असल्याने आत्मनेपद झाले नाही तर परस्मैपद झाले आहे. असें असतांना भट्टीच्या उपर्युक्त प्रयोगांत अनुउपसर्गपूर्वी असून ज्ञा धातुहून अनुजज्ञे असें आत्मनेपद कसें झालें? भट्टोजी समाधान करतात – कर्मणि लिट् लकार येथे मानावा म्हणजे 'भावकर्मणोः' १-३-१३ या सूत्राने आत्मनेपद

होईल व सुतस्य गमनमनुज्ञातम् असा अर्थ होईल तर मग नृपः या प्रथमान्त पदाचा अन्वय कसा लागेल? अवालुलोचे याठिकाणी अन्वित झालेलें नृपः हे प्रथनान्तपद तृतीयान्त होईल.

भट्टोजींचे हे मत इतर अभ्यासकांनी उचलून धरलेलें दिसते. जयमंगल म्हणतो – अनृजज्ञे – अनुज्ञातं नृपेणेति विभक्तिविपरिणामेन तेनेति योज्यम् । कर्मणि लिट् १६०४ ज्ञा अवबोधने इति परस्मैपदित्वात् । नचानुपूर्वादस्मादात्मनेपदं विहितम् । (१-१२ भ. का. जयमंगला)

मल्लिनाथाने – अनुमेने असा पाठ घेतलेला दिसतो. "मन्यतेः कर्तरि लिट् । कौमुद्यान्तु ततोऽनुजज्ञ इति पाठमनुसृत्य "अनुपसर्गाज्ज्ञ" इति शास्त्रप्रातिकूल्यमुद्भाकव्य नृप इत्यत्र नृपेणैति विपरिणामं कृत्वा दोषपरिहारः कृतः । तदा अनुजज्ञे अनुज्ञातम् । कर्मणि जानातेरूपम् प्रथान्तम्, । गमननिति प्रथनान्तम्, । (१-२३ भ. का. मल्लि.)

श्री. शेषराज शर्मा म्हणतात – "अनुपूर्वात्" ज्ञा विबोधने इति धातोः कर्मणि लिट्, कर्तृवाच्ये अनुपसर्गाज्ज्ञः" इत्यनेन आत्मनेपदस्य अप्राप्तेः / (१-२३ भ. का. चन्द्रकला – विद्योतिनी)

७. तेन सङ्ग" तमार्येण रामाऽजर्यं कुरु द्रुतम् ।
लङ्कां प्राप्य ततः पापं दशग्रीवं हनिष्यसि ॥ ६-५४

तेन सङ्गतमार्येण रामाजर्य कुरु द्रुतम् इति भट्टिः । (सि. कौ. सू. २८५३)

सिद्धांत कौमुदीतील कृदन्त प्रकरणांत भट्टीचे वर दिलेलें वचन आढळते. 'अजर्य सङ्गा तम्' ३-१-१०५ या सूत्राचा अर्थ असा नञ्पर्वक जृ धातुहून कर्तरि यत् प्रत्यय होऊन "अजर्यम्" असे रूप निपातनाने सिद्ध होते. मात्र ते संगतम् (मैत्री) याचे विशेषण असावे. न. जीर्यति इति अजर्यम् (जीर्ण न होणारी, कायम टिकणारी) हे रामा, त्या आर्याशी तूं लवकरच जीर्ण न होणारी मैत्री कर. हा भट्टिकाव्यांतील केलेला प्रयोग यथार्थ आहे.

मल्लिनाथ म्हणतो – अजरिता कम्बलः इति वृतौ उदाहरणप्रत्युदाहरणयोर्विशेषणविशेष्यभावावगमात् अजर्य संगतमिति तथैव प्रत्युक्तम् । कालिदासेन तु पर्यायत्वदृष्ट्या मृगैरजयर्य जरसोपदिष्टम्" इति वैकल्पेन प्रत्युक्तम् । अथवा तत्रापि संगतमिति शेष इत्यास्तां तावत् । (भ. का. ६-५४, मल्लिनाथी) श्रीशेषराज शर्मा देखील याच मताला उचलून धरतात. (भ. का. ६-५४, चन्द्रकलाविद्योतिनी) काशिकावृत्तीमध्ये अजरिता कम्बलः असें प्रत्युदाहरण दिले आहे. तेथे उदाहरण – प्रत्युदाहरणांमध्ये विशेषणविशेष्यभावाचें ज्ञान होत असल्याने अजर्यं सङ्गशतम् असेंच सांगितले. कालिदासाने अजर्य संगतम् हे पर्याय मानून "मृगैरजर्य" जरसोपदिष्टम्" हा विकल्पाने प्रयोग केला आहे किंवा तेथेहि संगतम् असें सोडावें.

"अजर्य नोऽस्तु संगतम्" असा अमर कोष आहे.

अनुक्रमणिका

### इ) तत्त्वबोधिनी

सिद्धांत कौमुदींत आलेल्या भट्टीकाव्यांतील वचनांचा विचार केल्यानंतर तत्त्वबोधिनी या सिद्धांत कौमुदीच्या टीकेंत भट्टी काव्यांतील जी वचनें आली आहेत. त्याकडे वळूं. तत्त्वबोधिनी ज्ञानेन्द्र सरस्वती यांचा ग्रंथ असून ज्ञानेन्द्र सरस्वतींनी भट्टीच्या अनेक वचनांचा उल्लेख केलेला आहे. ती सविस्तर येथे बघावयाची आहेत.

१. हविर्जक्षिति निःशको मखेषु मघवानसौ ।
प्रवाति स्वेच्छया वायुरुद्गोच्छति च भास्करः । १८-१९

यत्त्वाहुः । मतुप्पक्षेऽपि छान्दसत्वान्न दीर्घ इत्येव भाष्याशय इति तन्न । मतुबन्तस्य छान्दसत्वे मानाभावात् । उदाहृतभट्टिप्रयोगविरोधाच्चेति दिक् ।

(तत्त्व बो. सू. ३६१)

"मघवान्" हा शब्द सिद्ध करीत असतांना दीर्घकार्याविषयी सिद्धांत कौमुदींत एक पंक्ति आली आहे त्यावरील तत्त्वबोधिनीत वरील विवेचन आलें आहे.

प्रकाशकारांचे असें म्हणणे आहे कीं, मतुप् पक्षांत देखील छान्दसत्वामुळें उपधादीर्घ होत नाहीं असाच भाष्यकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. पण हे त्यांचे म्हणणे बरोबर नाही कारण मतुप् प्रत्ययान्त मघवत् शब्द वैदिक आहे. म्हणजे मघ शब्दाहून वेदांतच मतुप् प्रत्यय होतो व भाषेंत तो प्रत्यय होत नाही. असें मानण्यास कांही प्रमाण नाहीं. तसें मानल्यास भट्टिकाव्यांतील वरील प्रयोगाचे कौमुदींत जे उदाहरण दिलें आहे. त्याच्याशी विरोध येतो. कारण वरील प्रयोगांत मद्यवान् हा प्रयोग प्रकाशकारांच्या म्हणण्याविरुद्ध ठरतो. म्हणून त्यांचे म्हणणें बरोबर मानता येत नाही असें दीक्षित म्हणतात.

२. राक्षसान्बटुयज्ञेषु पिण्डीशूरारिएस्तवान् ।
यद्यसौ कूपमाण्डूकि तवैतावति कः स्मयः ॥ ५-८

कौरव्यसाहचर्यान्माण्डूकशब्दोऽप्यपत्यप्रत्ययान्त एवेह गृहयते न तु "तस्येदम्" इत्यणन्तस्तेन "यद्यसौ कूपमाण्डूकि तव" इति भट्टिप्रयोगः सिद्धः । तत्र हि मण्डूकस्येयं भार्या इति विवक्षया तस्येदम्" इत्यण् । (तत्त्व. बो. सू. ४७७)

कौरव्यमाण्डूकाभ्यां च ४-१-१९ या सूत्रांत कौरव्य हा अपत्यप्रत्ययान्त शब्द आहे. येथे अपत्य या अर्थात यञ् प्रत्यय झाला आहे. या कौरव्य शब्दाच्या साहचर्याने माण्डूक शब्द देखील अपत्य प्रत्ययान्त म्हणजे अण् प्रत्ययान्त घ्यावा लागतो. वर दिलेल्या सूत्रांत अशा अपत्यार्थांत झालेल्या अण् प्रत्ययान्त शब्दाहून ष्फ प्रत्यय करावयाला सांगितला आहे त्यामुळे मण्डूकस्य अपत्यं स्त्री या अर्थात माण्डूकायनी असें रूप सिद्ध होईल. भट्टीच्या वरील प्रयोगांत हा प्रत्यय विवक्षित नाही. "तस्येदम्" ४-३-१२० या सूत्राने देखील अण् प्रत्यय सांगितला आहे. परंतु तो 'तस्य इदम्' या अर्थात सांगितला आहे हा अण् प्रत्यय भट्टीच्या प्रयोगात विवक्षित आहे म्हणून कूपमाण्डूकि

हा प्रयोग जुळतो त्या प्रयोगांत मण्डूकस्य भार्या या अर्थात 'तम्येदम्' सूत्राने अण् प्रत्यय होऊन माण्डूकी व संबांधनाचे एकवचन माण्डूकि असे रूप सिद्ध होते.

३. कौसल्याऽसावि सुखेन रामः प्राक्केकयीतो भरतस्ततोऽभूत् ।
प्रासोष्ट शत्रुन्घमुदारचेष्टमेका सुमित्रा सह लक्ष्मणेन ॥ १-१४

योगः संबन्ध स चेह दम्पतिभाव एवेति नाग्रहः, किंतु जन्यजनकभावोऽपि गृह्यते, । संकोचे मानाभावात् । तेन कौसल्ययाऽसावि सुखेन रामः प्राक्केकयीतो भरतस्ततोऽभूत् । इति भट्टिप्रयोगः संगच्छते । केकयस्य दुहिता केकयी । "जनपदशब्दात्क्षत्रियादञ्" इत्यपत्यप्रत्यये तु कैकयीति स्यात् ।(तत्त्व बो. सू ५०४)

"पुंयोगादाख्यायाम् । ४-१-४८ या सूत्रांतील योग शब्दाचा अर्थ संबंध असा आहे. तो संबंध दम्पतिभाव म्हणजे पतिपत्नींचाच असावा असा आग्रह नाही तर जन्यजनक संबंध देखील चालतो. कारण तो दंतपिरूपच मानावा याला प्रमाण नाही. सामान्य सबंध मान्य केला तरच प्रस्तुतचा भट्टीचा प्रयोग योग्य ठरतो. येथे केकयस्य दुहिता केकयी असा जन्यजनक संबंध विवक्षित आहे. 'जनपदशब्दात् क्षत्रियादञ्' ४-१-१६८ या सूत्राने जर अपत्य प्रत्यय केला तर कैकयी असें रूप तयार होईल.

४ अजिग्रह –त्तं जनको धनुस्तद्येनार्दिदद्दैरत्यपुरं पिनाकी ।
जिज्ञासमानो बलमस्य बाहोर्हसन्नभाङक्षीद्रघुनन्दस्तत् ॥ २-४२

यदपि "श्रुग्रहदृशाम्" इति कर्मत्वमुक्तम् तत्र दृषिग्रहणं प्रामाणिकमेव । श्रुणोतेस्तु शब्दकर्मकत्वात्सिद्धम् । ग्राहेर्द्विकर्मत्वं यद्यपि "अजिग्रहत्तं जनको धनुस्तत् इति भट्टिप्रयोगस्य, अयाचितारं न हि देवदेवमद्रि : सुतां ग्राहयितुं शशाक इति कालिदासप्रयोगस्य चानुगुणम् । तथापि बहूनामसंमतमेव । अत एव तं धनुरजिग्रहद्बोधिवान् सुतां ग्राहयितुमुद्वाह्यत्वेन बोधयितुम् इत्येवमुक्तप्रयोगे समर्थयांचक्रिरे । (तत्त्व बों सू. ५४०)

"श्रुग्रहदृशाम्" याठिकाणी जरी या धातूंना कर्मत्व सांगितले असले तरी दृश् धातूंचे ग्रहण प्रमाणाला धरून आहे. "श्रु" धातूंचे कर्मत्व "गतिबुद्धिप्रत्यवसानार्थशब्दकर्माकर्मकाणामणिकर्ता स णौ' १-३-५२ या सूत्रांतील शब्दकर्मकत्वामुळे सिद्ध होते. तथापि इतर अभ्यासकांना ते मान्य नाही म्हणूनच तं धनुः अजिग्रहत् म्हणजेच बोधितवान् – आपल्या मुलीचा विवाह करण्याच्या दृष्टीने विवाह व्हावा या दृष्टीने त्या धनुष्याचें ज्ञान करून दिले असे भट्टीच्या वरील प्रयोगांचे समर्थन केले आहे.

याविषयी इतर कांही टिकाकारांची मतें पुढील प्रमाणे आहेत. मुग्धबोधकारांच्या मतें – "णिजन्तस्य ग्रहधातोः प्रयोज्यकर्तुः कर्मसंज्ञाविधानात् "तम्" इति कर्मत्वम् । पाणिनिना तु यद्यपि णिजन्तस्य ग्रहेः कर्मसंज्ञाविधानं न कृतम् तथापि प्रयोगदर्शनात् तत् अनुसन्धेयम् यथा रघुवंशे १५ सर्गे "भरतः गन्धर्वान् आतोद्यं ग्राहयामास" ।

णिजन्त ग्रह् धातूच्या प्रयोज्य कर्त्याला कर्मसंज्ञा होते असे विधान केल्याने तम् येथे कर्मसंज्ञा झाली आहे. पाणिनींनी जरी णिजन्त ग्रह् धातूला कर्मसंज्ञा सांगितली नसली तरी तसे प्रयोग दिसत असल्याने कर्म संज्ञा मानावयाला हकत नाही. कालिदासनेहि असा प्रयोग केलेला आहे.

“अत्र ग्रहित्यज्योर्ण्यन्तयोर्द्विकर्मकत्वम् अनुसन्धेयम्” इति मल्लिनाथः । मल्लिनाथाने देखील ग्रह व त्यज् धातूंना द्विकर्मकत्व होते असे म्हटले आहे.

पाणिनिव्याकरणे णिजन्तस्य ज्ञानार्थधातोः प्रयोज्यकर्तुः कर्मसंज्ञाविधानात् “अजिग्रहत्” = बोधितवान् इति णिजन्तस्य ग्रहेः ज्ञानार्थत्वम् केचित् आहूः

पाणिनि – व्याकरणामध्ये णिजन्त अशा ज्ञानार्थक धातूच्या प्रयोज्य कर्त्याला कर्मसंज्ञा होते असे विधान केल्याने अजिग्रहत् म्हणजे बोधितवान् हा णिजन्त ग्रह् धातु ज्ञानार्थ असल्याने कर्मसंज्ञा होते. (त्याच्या प्रयोज्यकर्त्याला) असेहि कांही म्हणतात.

५. इत्यंप्रवादं युधि सम्प्रहारं प्रचक्रतू रामनिशाविहारौ ।
तृणाय मत्वा रघुनन्दनोऽथ बाणेन रक्षः प्रधनान्निरास्थत् ॥ २-३६

श्यन्नपि दैवादिकधातूपलक्षणमात्रं, न तु स्वयं विवक्षितः । तेन तृणाय मत्वा रघुनन्दनोऽपि बाणेन रक्षः प्रधनान्निसास्थत् इति भट्टिप्रयोगः संगच्छते । (तत्त्व बो. सू ५८४)

“मन्यकर्मण्यनादरे विभाषाऽप्राणिषु” २-३-१७ या सूत्रावरील सिद्धांत कौमुदींत आलेल्या ‘श्यना निर्देशात्’ या पंक्तीवरील विवेचनांत तत्त्वबोधिनींत उपर्युक्त श्लोक आला आहे.

प्रस्तुतच्या पंक्तीत जो श्यन् आला तो दिवादि धातूचें उपलक्षण आहे. तेथे श्यन् मधील यकार दिसलाच पाहिजे असे नाही. त्यामुळे ‘तृणाय मत्वा रघुनन्दनोऽपि’.... हा भट्टीचा प्रयोग सुसंगत ठरतो. मत्वा येथे मन् धातूचें पूर्वकालवाचकांचे रूप असून यकार दिसत नाही. येथे “तृणाय मत्वा” याचा अर्थ “तृणं मत्वा” असा आहे. येथे मत्वा हा दिवादि गणांतील धातु आहे व तृणम् हे त्या धातूचें कर्म आहे. त्या कर्माची चतुर्थी झाली आहे. ‘मन्यकर्मण्यनादरे विभाषाऽप्राणिषु’ । या सूत्राने तृणाय मत्वा चा अर्थ ‘अनादृत्य’ अनादर करून असा आहे.

६. सोऽध्यैष्ट वेदास्त्रिदशानयष्ट पितृनताप्सीत्समममंस्त बन्धून् ।
व्यजेष्ट षड्वर्गमरंस्त नीतौ समूलघातं न्यवधीदरींश्च ॥ १-२

“तृपिश्च सकर्मको-प्सस्ति । पितृनताप्सीत्सममंस्त बन्धून्” इति भट्टिप्रयोगात् । तेनास्मात् कर्मणि क्तः नास्तीति न शंकनीयम् (तत्त्व बो. सू. ७०५)

अनुक्रमणिका

'पूरणगुणसुहितार्थसदव्ययतव्यसमानाधिकरणेन' । २-२-११ या सूत्रावरील तत्त्वबोधिनींत वर दिलेला भट्टीचा श्लोक आला आहे. "तृपि" हा धातु सकर्मक देखील आहे असे पितृन् या भट्टीच्या प्रयोगावरून सिद्ध होते. म्हणून तृपि धातुहून कर्माणि क्त होत नाही अशी शंका घेऊ नयें.

पितृनतार्प्सीत् – या प्रयोगांत पितृन् हे आतार्प्सीत् चे कर्म आहे. अर्थातच तृप् प्रीणने हा धातु सकर्मक आहे.

७. मोदिष्ये कस्य सौरव्येऽहं को मे मोदिष्यते सुखे ।
आदेयाः किंकृते भोगाः कुम्भकर्ण त्वया विना ॥ १६-२४

तथा च भट्टिः प्रायुंक्त - यत्कृतेऽरीन्निगृह्णीमः । आदेयाः किंकृते भोगाः कुम्भकर्ण त्वया विना" इति ८-९-११ (तत्त्व. बो. सू. ७०५)

"पुरणगुणसुहितार्थसदव्ययतव्यसमानाधिकरणेन" । २-२-११ या सूत्रांतील "अव्यया" संबंधी विंचार करीत असतांना भट्टोजी दीक्षितांनी असे सांगितले कीं, पूर्वोत्तरसाहचर्यात् कृदव्ययमेव गृह्यते । तेन तदुपरि इत्यादि सिद्धम् । प्रस्तुतच्या सूत्रांतील सत् आणि तव्य ह्या पूर्वोत्तर पदांच्या साहचर्याने अव्यय म्हणजे कृद् अव्ययच होय. त्यामुळे 'तदुपरि' इ. सिद्ध होतात. भट्टीने देखील किंकृते चा प्रयोग केला आहे. किंकृते हे अव्यय आहे. त्याचा अर्थ "कस्य कृते" असा असून त्याच्याशी कोणाचाहि समास झाला नाही. श्रीशेषराज शर्मा म्हणतात – किंकृते – कृते इति निमित्ताऽर्थकमव्ययम् । कस्य कृते ।" (भ.का. १६-२४ चन्द्रकला – विद्योतिनो)

८. रणपण्डितोऽग्न्यविबुधाऽरि पुरे कलहं साममहितः कृतवान् ।
ज्वलदग्नि रावणगृहं च बलात् कलहंसराममहितः कृतवान् ॥ १०-२

अन्ये तु कारकषठ्या एव समासनिषेधोऽयम्, शेषषष्ठ्याः तु समासः स्यादेवेत्याहुः । एतेन 'कलहं स राममहितः कृतवान' इति भट्टिप्रयोगो व्याख्यातः । राममहितः सः कलहं कृतवानित्यन्वयः । (तत्त्व. बो. सू. ७०६)

'क्तेन च पूजायाम्' २-२-१२ या पाणिनींच्या सूत्रावरील 'रामपूजित इत्यादौ तु भूते क्तान्तेन सह तृतीयासमासः (प्रस्तुत सूत्रावरील सि. कौ.') भट्टोजी दीक्षितांच्या पंक्तीवर विवेचन करतांना तत्वबोधिनीने वरील उल्लेख केलेला आहे. रामपूजितः इत्यादि सामासिक पदांमध्ये "भूत" अर्थात क्तान्ताशी तृतीयासमास होतो. याविषयी आणखी कांही मतांतरे तत्त्वबोधिनीने दिली. त्यातीलच "अऩ्ये तु ..." हे एक आहे. तत्त्वबोधिनी म्हणते कीं, कलहं स राममहितः कृतवान् हा भट्टीचा प्रयोग म्हणूनच जुळतो. राममहितः सः कलहं कृतवान् असा अन्वय करावा. येथे राममहितः हा समास, मह पूजायाम् धातूच्या महितः या क्तान्ताशी भूते अर्थात रामेण महित :- असा झाला आहे.

९. ददैर्दुः खस्य मादृग्भ्यो धायैरामोदमुत्तमम् ।
लिम्पैरिव तनोवातैश्चेतयः स्याज्ज्वलो न कः ॥ ६-८०

"तदर्हम्" इति निर्देशात् 'कर्तृकर्मणोः कृति' इत्येतदनित्यम् तथा च 'धायैरामोदमुत्तमम्' इति भट्टिप्रयोगः संगच्छते इतिः (तत्त्व बो सू. ६२३)

'तदर्हम्' । ६-१-११७ या सूत्रांतील निर्देशावरून 'कर्तुकर्मणोः कृति' । २-३-६५ या सूत्राने सांगितलेली कर्तरि व कर्मणि षष्ठी अनित्य आहे असे सिद्ध होते. ही गोष्ट स्पष्ट करण्यासाठी "धायैरामोदमुत्तमम्" हा भट्टीचा प्रयोग दिला आहे. 'धार्येः' येथे "श्याद्वय्धा" ३-१-१४१ या सूत्राने ण प्रत्यय झाला आहे. आता हे कृदन्त तयार झाले. त्यायोगें "आमोदम्" या कर्माची षष्ठी विभक्ति व्हावयाला पाहिजे होती पण ती झाली नाही तर कर्मणि द्वितीया विभक्ती झाली आहे. यावरून कर्तृकर्मणोः' ... ।' या सूत्राने विहित केलेली द्वितीया विभक्ति अनित्य आहे. असे एकमत 'कर्तृकर्मणोः कृति' या सूत्रावरील तत्त्वबोधिनीत दिले आहे.

या श्लोकाचा आणखी एक उल्लेख मिळतो. तो असा, - तदर्हम् । अर्हतीत्यर्ह पचाद्यच् । यद्यपी कृद्योगे कर्मणि षठया भवितव्यम् । तथापि अत्र सौत्रो विभक्तिव्यत्यय इत्येके । "कर्मृकर्मणो :- इति षठया अनित्यत्वे ज्ञापकमिदम् । तेन च धयैरामोदमु – तमम् – इति भट्टिप्रयोगः संगच्छत इति तु कारकेषु अवोचाम । (तत्त्व. बो. सू. १७८०)

'तदर्हम्' । ५-१-११७ या सूत्रावर विवेचन करीत असतांना वरील भट्टीचा श्लोक आला आहे. कृदंत्ताशी योग असतांना जरी कर्माची षष्ठी होणे योग्य आहे तथापि हा जो विभक्तींत बदल पडलेला आहे तो सौत्र आहे असें कांही जण म्हणतात. "कर्तृकर्मणोः कृति" या सूत्राने सांगितलेली षष्ठी अनित्य आहे यासाठी हें ज्ञापक आहे. त्यामुळे "धयैरामोदमुत्तमम्" हा भट्टिकाव्यांतील प्रयोग सुसंगत ठरतो याविषयी अधिक विवेचन वर केले आहेच.

१०. सर्वस्य मुखस्य दर्शनः संमुखीन :- "संमुखस्य" इति नोक्तम् । प्रत्ययसंनियोगेनैव समशब्दस्यान्त्यलोपनिपातनात् । संशब्दस्तु समशब्दार्थे न दृश्यते "समुंखो भव" इत्यत्र "अभिमुखः" इत्यर्थप्रतीतेः । तत्र च खप्रत्यस्याजनिष्यमाणत्वात् । कथं तर्हिसंयुगे संमुखीनं तमुद्गभदं प्रहसेत कः" इति भट्टिः । अभिमुखावस्थानात्सामर्थ्यात् भविष्यतीति हरहत्तः (तत्त्व. बो. सू. १८०७)

भट्टिकाव्याच्या आम्हाला उपलब्ध झालेल्या प्रतीत वरील प्रयोग आढळत नाही.

१२. व्रातीनव्यालदीप्राऽस्त्रः सुत्वनः परिपूजयन् ।
पर्षद्वलान्महाब्रह्मैराट नैकटिकाश्रमान् ॥ ४-१२

तथा च भाष्यं "पार्षदकृतिरेषा तत्रभवतां" , 'सर्ववेदपार्षद' हीदं शास्त्रम् इति च । भट्टिस्त्वाह "पर्षद्वलान् महाब्रह्मैराट नैकटिकाश्रमान्" इति "पर्षदेषा दशावरा" इति मनुः (तत्त्व बो. स. १९१९)

"रजः कृष्यासुतिपरिषदो वलच्" । ५-२-११२ या सूत्रावरील सिद्धान्तकौमुदींत भट्टोजी दीक्षित म्हणतात की, "पर्षदिति पाठान्तरम्" सूत्रांत ... परिषद् असा शब्द पाणिनि घालतात. परंतु "पर्षद् असा देखील पाठभेद दिसतो. "पर्षद्" हा शब्द ज्यांत वापरलेला आहे असें कांही प्रयोग तत्त्वबोधिनीकार देतात. "सर्ववेदपार्षद हीदं

शास्त्रम्" 'पार्षदकृतिरेषा तत्रभवताम्' महाभाष्यकारांच्या वरील प्रयोगांत पार्षद शब्द आला आहे. तसेच भट्टीच्या वर दिलेल्या श्लोकांत 'पर्षद्' शब्द दिसतो. मनूने देखील 'पर्षदेषा दशावरा' या प्रयोगांत "पर्षद्" शब्दाचा उपयोग केला आहे.

या "पर्षद्" शब्दाविषयी सविस्तर विवरण याच प्रकरणांत माधवीय धातुवृत्तीतील भट्टीच्या वचनांचा उल्लेख यांत परिच्छेद क्रमांक ६ मध्ये केले आहे.

१३. कुम्भकर्णस्ततोऽगर्जीभ्द्रटांश्चाऽन्यान्यवीवृतत् ।
उपायंस्त महाऽस्त्राणि निरगाच्च द्रुतं पुरः ॥ १५-२१

स्वकरणशब्देन भार्यास्वीकारो गृह्यते इति वृत्तिकृत् । भट्टिस्तु स्वीकारमात्रेऽपि प्रायुंक्त "उपायंस्त महास्त्राणि इति (तत्त्व. बो. सू. २७२९)

"उपाद्यमः स्वकरणे" । १-३-५६ या सूत्रांतील "स्वकरण" शब्दाचा अर्थ सांगत असतांना भट्टीचा वर दिलेला श्लोक आला आहे. वृत्तिकारांचे असे मत आहे कीं, स्वकरण म्हणजे केवळ भार्येचा स्वीकार. भट्टीने स्वकरण म्हणजे स्वीकार — मग तो केवळ भार्येचाच असावा असा आग्रह नाही — असा अर्थ कल्पून 'उपायंस्त महास्त्राणि' मोठमोठ्या अस्त्रांचा स्वीकार केला. असा प्रयोग केला आहे. श्रीशेषराज शर्मा म्हणतात — "अत्र स्वकरणमौपचारिकम्" (१५-२१ भ. का चन्द्रकला विद्योतिनी टीका) जयमंगलाचे देखील तसेंच म्हणणें आहे. 'महास्त्राणि उपायंस्त स्वीकृतवान् । औपचारिकमत्र स्वीकरण तेन तङ्' । (१५-२१ भ. का. जयमंगला)

१४. ऋष्यमूकेऽ नवद्योऽस्ति पण्यभ्रातृवधः कपि ।
सुग्रीवो नाम वर्योऽसौ भवता चारुविक्रमः ॥ ६-५१

इह सूत्रेऽवद्यादीनि निर्विभक्तिकानि पृथक्पदानि तत्र वर्याशब्दष्टाबन्तोऽनुक्रियते । न त्वयं द्वन्द्वेन जसन्तेन निर्देशः । तेन वर्येति स्त्रियामेव निपात्यते । अस्त्रियांतु वृङ : "ऋहलोर्ण्यत्" । वार्या ऋत्विजः । ऋत्विजामपि यज्ञमात्रे वरणीयत्वादनिरोधोऽस्ति स्त्रीत्वं तु नास्तीति ण्यदेव भवति । एतच्च वृत्तिकारमतम् । न चात्र "एतिस्तु-" इति क्यप्शङ्क्यः । तत्र वृञ एव ग्रहणं न तु वृङ इति सिद्धान्तात् । भट्टिस्तु द्वन्द्वाज्ञसा निर्देश इति मत्वा पुल्लिङ्गेऽपि यर्त प्रायुंङ्क्त "सुग्रीवो मम वर्योऽसौ" इति (तत्त्व. बो. सू २८४९)

"अवद्यपण्यवर्या गहर्यपणितव्यानिरोधेषु" । ३-१-१०१ या सूत्रावरील तत्त्वबोधिनींत भट्टीच्या वरील श्लोकाचा उल्लेख केलेला आहे.

प्रस्तुत सूत्रांत अवद्य इ. पदांचा विभक्तीरहित उल्लेख केलेला आहे. "वर्या" हा टाप् प्रत्ययान्त शब्द आहे. हा द्वन्द्व समास असून जस् प्रत्ययान्त निर्देश आहे असे म्हणूं नये त्यामुळे वर्या हा शब्द स्त्रीलिंगीच निपातीत होतो. स्त्रीलिंगी नसतांना वृङः धातुहून "ऋहलोर्ण्यत्" या सूत्राने ण्यत् प्रत्यय होतो. उदा. वार्याः ऋत्विज येथे ण्यत् प्रत्यय झाला आहे. ऋत्विजांमध्ये देखील "वरणीय" ह्या अर्थात अनिरोध = अप्रतिबन्ध आहे. स्त्रीत्व नाही. म्हणून

ण्यत् प्रत्ययच होतो. हें वृत्तिकारांचे मत आहे. याठिकाणी “एतिस्तुशास्वृदृजुषः क्यप्” सूत्राने क्यप् होईल अशी शंका घेऊ नये. कारण प्रस्तुत सूत्रांतील “वृ” म्हणजे वृङः धातु नसून वृज धातूचा निर्देश आहे. भट्टीने प्रस्तुत सूत्रांत द्वन्द्व समास व जस् प्रत्ययान्त निर्देश आहे असे मानून पुल्लिंगात देखील यत् चा प्रयोग केलेला आहे. “सुग्रीवो मम वर्योऽसौ” या प्रयोगांतील “वर्यः” हा पुलिंगी निर्देश आहे.

श्री शेषराज शर्मा लिहितात – “वृङः संभक्तौ” इति धातो :- पूर्वसूत्रेणैव (“अवद्यपण्य-” ) अनिरोधेऽर्थे ण्यदपवादी यत्प्रत्ययाऽन्तो निपातः (६-५१ भ. का. चंद्रकला- विद्योतिनी) मल्लिनाथ म्हणतो – किन्तु स्त्रियामस्य निपातनात् पुंसि प्रयोगः कवेः स्वातन्त्रात् (६-५१ भ. का. मल्लिनाथी)

१५. तेन सङ्गसतमार्येण रामाऽजर्यं कुरु द्रुतम् ।
लङ्कां प्राप्य ततः पापं दशग्रीवं हनिष्यसि ॥ ६-५४

इहाजर्यमिति समुदायस्य संगतं वाच्यमित्यर्थौ न ग्राह्यः पर्यायाणां युगपत्प्रयोगासंभवेनाजर्य सतां संगतमिति प्रयोगानापत्तेः । तेन संगतमिति भट्टिप्रयोगानुपपत्तेश्च । (तत्त्व. बो. सू. २८५३)

“अजर्यं संगतम् ।” ३-१-१०५ या सूत्रावरील सिद्धांत कौमुदींत भट्टीचा वर दिलेला श्लोक घेतलेला आहे. तत्त्वबोधिनीकार म्हणतात याठिकाणी “अजर्यम्” हें पद “समुदायाशी मैत्री” अशा अर्थाचे वाचक आहे, असें म्हणूं नये. कारण “अजर्य नोऽस्तु सङ्गतम्” असा अमरकोश आहे. त्यानुसार अजर्यम् व संगतम् हे पर्यायशब्द आहेत.

त्यांचा एकदम प्रयोग होणे संभवत नाही. अजर्यं सतां संगतम् हया प्रयोगाची अनापत्ति येईल. तसेच ‘तेन संगतम्’ या भट्टीच्या प्रयोगाची उपपत्ति लागणार नाही.

१६. राघवस्य ततः कार्यं कारुर्वानरपुङ्गवः ।
सर्ववानरसेनानामाश्वागमनमादिशत् ॥ ७-२८

आद्ये योगरुढिर्द्वितीये तु योगमात्रमिति विवेकः । अत एव द्वितीये धात्वर्थं प्रति कारकान्वयो भवत्येव । तथा च भट्टि :- राघवस्य ततः कार्यं कारुर्वानरपुङ्गावः । सर्ववानरसेनानामश्वागमनमादिशत् – इति । (तत्त्व. बो. उणादि सू. १)

“कृवापाजिमिस्वदिसाध्यशूभ्य उण्” । १ या उणादि सूत्राने ‘करोति इति’ या अर्थात “कृ” धातुहून उण् प्रत्यय होऊन कारु हा शब्द तयार होतो. त्याचा अर्थ शिल्पी व कारक असा आहे. तत्त्वबोधिनीकार म्हणतात कारु म्हणजे शिल्पी हा अर्थ योगरूढीने निष्पन्न होतो तर कारु म्हणजे कारक : हा अर्थ केवळ योगाने म्हणजे सूत्राने निष्पन्न होतो. भट्टीच्या श्लोकांतील कारु शब्द योगाने म्हणजे कृ धातुहून उण् प्रत्यय लागून तयार झाला आहे. धात्वर्थाशी कारकाचा अन्वय होतो.

१७. माऽऽवधिष्ठा जटायुं मां सीतां रामाऽहमैक्षिषि ।
उपास्थितैवमुक्ते तं सुखायं राघवः पितुः । ६-४२

तथा च "आयुजीवितकालो ना" इत्यत्रायुः शब्दः सकारान्तः इत्येव व्याख्यायतां किमुकारान्ताभ्युपगमेनेति चेत् । आत्राहुः सकारान्त आयुः शब्दो नपुंसक इति तस्य पुलिंङगता नेत्याशयेन तथोक्तमिति । अन्ये तु छन्दसीणः इति सूत्रस्य भाषायां प्रवृत्यभावे माऽऽवधीष्ठा जटायुं माम् "इति भट्टिप्रयोगः । "तटीं विन्ध्यस्तत्राद्रेरभजत् जटायोः प्रथमजः इति विन्ध्यवर्णने अभिनन्दोक्तप्रयोगश्च न संगच्छतेत्याहः । वस्तुतस्तु जटां याति प्राप्नोतीति जटायुः । मृगय्वादित्वात्कु आयातीत्यात्युः (तत्त्व बो. उ.सू. २)

उणादि प्रकरणांतील "छन्दसीणः" । २ या सूत्रावरील तत्त्वबोधिनींत वरील चर्चा आली आहे. आयुः शब्द ज्याठिकाणी आलेला आहे असें वेगवेगळे प्रयोग येथे विवेचनासाठी घेतले आहेत. 'आयुजीवितकालो ना' या प्रयोगांत आयु शब्द आहे. तो आयुस् असा सकारान्त आहे असेच व्याख्यान करा. आयु असा उकारान्त मानण्याचे कारणच काय? यावर उत्तर देतात सकारान्त आयुस् हा शब्द नपुसकलिंगी आहे. म्हणून तो पुंलिंगी ठरूं शकत नाही. या अभिप्रायाने सांगितले आहे. कांही जण असें म्हणतात कीं, "छन्दसीण:" हे सूत्र लौकिक भाषेत प्रवृत्त होत नसल्याने भट्टीच्या प्रयोगांतील "जटायुम्" हें पद किंवा अभिनन्दाचा "जटायोः" हा प्रयोग जुळत नाही. वस्तुतः जटां याति प्राप्नोति इति जटायुः "मृगय्वादयश्च" । ३९ या सूत्राने येथे "कु" होतो. आयाति इति आयुः अशी युत्पति आहे. म्हणून 'जटायुषा जटायुं च विद्यादायुः तथायुषा' हा द्विरुप कोष "वायुना जगदायुना" हा वर्णविवेक बरोबर आहे.

१८. ततश्चित्रीयमाणोऽसौ हेमरत्नमयो मृगः ।
यथामुखीनः सीतायाः पुप्लुवे बहु लोभयन् ॥ ५-४८

"असादृश्ये" इति प्रतिषेघात् सादृश्ये यथाशब्दस्य कथं समासस्तत्राह निपातनादिति । एतश्च वृत्तिग्रन्थमनुसृत्य उक्तम् । भट्टिकाव्ये तु पदार्थानतिवृत्तौ यथाशब्दः आश्रितः । तथा च मायामृगं प्रक्रम्योक्तम् – "यथामुखीनः सीतायाः पुप्लुवे बहु लोभयन्" इति । (तत्त्व बो. सू. १८०७)

"यथामुखसंमुस्य दर्शनः खः" । ५-२-६ या पाणिनींच्या सूत्रांत मुखस्य सदृशं यथामुखम् हा यथा शब्दाशी सादृश्यार्थात झालेला समास आहे. तत्त्वबोधिनीकारांनी अशी शंका उपस्थित केली आहेत कीं, 'यथाऽसादृश्ये' । २-१-७ या सूत्राने यथा शब्दाचा सादृश्य हा अर्थ नसतांना म्हणजे असादृश्य या अर्थात असलेल्या यथा चा समास होतो. असें असतांना यथामुखम् या समासाची संगति कशी लावायची? निपातनाने हा समास होतों असें उत्तर येथे दिले आहे. वृत्तिग्रन्थाला अनुसरून येथे असें उत्तर दिले आहे. भट्टिकाव्यांत मात्र पदार्थानतिवृत्ति या अर्थात असलेल्या यथा शब्दाशी समास झाला आहे. उदा. मायामृगाला अनसरून यथामुखीनः – यथामुखं दर्शनः असा प्रयोग केला आहे. पदार्थानतिवृत्ति म्हणजे पदार्थाचा अतिक्रम न करणे.

अनुक्रमणिका

# अधिकार कांड

अनुक्रमणिका

# अधिकार कांड
## कथानक व रचनापद्धती

**कथानक**

जटायू सीतेला सोडवायला मध्ये येताच रावणाने त्याचे पंख कापून टाकले आणि तो लंकेला निघून गेला.

त्याने अनेक राक्षसींच्या पहाऱ्यांत सीतेला ठेवले. इकडे राम पर्णकुटीत परतल्यावर सीता नाही असें पाहून अत्यंत दुःखी झाला. सीतेला शोधित तो सर्वत्र भटकू लागला. असें असले तरी त्याने स्वतःची नित्यकर्मे सोडली नाही. रामाने एका पर्वताजवळ सांडलेले रक्त, अश्वासहित तुटलेला रथ व पंख छाटलेल्या गृध्राला पाहिले. "हाच सीतेला मारणारा असावा" असें समजून राम त्याला मारायला देखील धावला. परंतु त्याला जटायूने (गृध्राने) सर्व वृत्तांत सांगितला. पलीकडे रामाने कबंध राक्षसाचा वध केला. त्याला मुक्त केल्यावर तो रामाला म्हणाला, "रामा, रावणाने सीतेला लंकेत नेले आहे. ऋष्यमूक पर्वतावर आपल्या वाली नांवाच्या भावाकडून त्रस्त झालेला सुग्रीव नावांचा वानरराज राहतो. त्याच्याशी तुम्ही मैत्री करा. त्याच्या मदतीने तुमचे ईप्सित साध्य होईल. (सीतेचा शोध करता येईल). एवढे बोलून तो स्वर्गाला निघून गेला. त्यानंतर रामलक्ष्मण शबरीच्या आश्रमांत गेले. 'सुग्रीव तुमच्याशी मैत्री करील व तुम्हाला लवकरच सीता दिसेल, "असे सांगून ती देखील अंतर्हित झाली. नंतर ते दोघेहि पम्पा सरोवरावर गेले व तेथून ऋष्यमूक पर्वतावर पोचले. त्यांना पाहून हे वालीचे गुप्तचर असावे अशी शंका येऊन सुग्रीव सपरिजन मलय पर्वतावर निघून गेला. नंतर सुग्रीवाने हनुमंताला रामाकडे पाठविले. हनुमंताने रामाचा परिचय करून घेऊन त्यांना मलय पर्वतावर घेऊन गेला. अग्नीच्या साक्षीने राम व सुग्रीव यांनी परस्पर मैत्री जोडली. पलीकडे सुग्रीव व वालीच्या युद्धांत रामाने अतुल पराक्रम गाजवला आणि सुग्रीवाला त्याची पत्नी आणि राज्य मिळवून दिले. नंतर सुग्रीव किष्किन्धेंत गेला.

त्यानंतर वर्षाऋतु सुरू झाला. वर्षाकाळाचे तें सौंदर्य बघून रामाला सीतेची तीव्रतेने आठवण झाली. एखाद्या अप्रगल्भ माणसाप्रमाणे रामाने अत्यंत विलाप केला. पावसाळा संपला तरी सीतेला शोधण्याकरिता सुग्रीव कांहीच प्रयत्न करीत नाही असे पाहून रामाने सुग्रीवाची निंदा केली. त्याने लक्ष्मणाला सुग्रीवाकडे पाठविले. या अवधींत हनूमान लक्ष्मणाला किष्किन्धेंत घेऊन गेला. नंतर सुग्रीवाने सीतेचा शोध घेण्याकरिता सर्व दिशांना वानरांना पाठविले व एक महिन्याचा अवधि त्यांना दिला. अंगद, जांबवान् व नील या वानरांसह हनुमंताला दक्षिण दिशेला पाठविण्याचे ठरले. त्यावेळी रामाने चिन्ह म्हणून आपली अंगठी त्याला दिली. अनेक देशांत भ्रमण करीत असतांना त्या वानरांनी एका पर्वतावर एका सुंदर स्त्रीला पाहिले. स्वतः दानवाची स्वयंप्रभा नामक मुलगी असून त्याला विष्णूने मारले व त्याचीच ती नगरी असल्याचे तिने सांगितले. तिच्या मदतीने सर्व वानर पाताळांतून वर आले. सीतेच्या संशोधनाकरिता सुग्रीवाने दिलेला एक महिन्याचा अवधि संपल्याने ते मरण्याच्या तयारित होते परंतु त्यांची गृध्रराज संपातीची भेट झाली. त्रिकुट पर्वतावरील लंका नावाच्या रावणीपुरीत सीता आहे. अशी त्याच्याकडून माहिती कळल्याने ते सर्व मोठे आनंदित झाले. हनुमान लंकेकडे जावयाला निघाला.

अत्यंत वेगाने हनुमानाने आकाशांत उड्डाण केले. मार्गामध्ये आलेल्या एका राक्षसीच्या मुखांत त्याने प्रवेश करून तिचे पोट फाडून तिला यमसदनी पाठविले. वाटेत लागलेल्या मैनाक पर्वताने त्याच्या आदरातिथ्याची

इच्छा दाखविली. त्याला नम्रपणे नकार देऊन तो पुढे निघाला. नंतर देवतांनी प्रेरणा दिलेली सुरसा नामक नागमाता हनुमंताची परीक्षा घेण्यासाठी आली. तेंव्हा सूक्ष्मरूपाने तिच्या मुखांत प्रवेश करून तो बाहेर आला. नंतर राक्षस, ब्रह्मराक्षस व पिशाचांनी युक्त असलेल्या रावणपुरी लंकेत त्याने प्रवेश केला. त्यावेळी पूर्वदिशेला चंद्राचा उदय होत होता. सीतेचे कुशल जाणून घेण्याकरिता स्क्ष्मरूपाने तो राक्षसगृहांमध्ये संचार करीत होता. एकांतात असलेल्या रावणाला देखील त्याने पाहिले परंतु सीता तेथे नसल्याचे बघून तो चिंतातूर झाला. अशोक वनिकेला त्याने दुरूनच पाहिले. अत्यंत सुंदर अशा त्या उद्यानांत तो हळूहळू शिरला व चोहोकडे फिरू लागला. त्यावेळी रावण सीतेचा अनुनय करण्याकरिता तेथे आला. सीतेने त्याची निर्भर्त्सना केली. तेंव्हा तिला भयभीत करण्याकरिता राक्षसींना सांगून रावण तेथून निघून गेला. त्या राक्षसीणी झोपायला गेल्यानंतर योग्य अवसर पाहून सीतेपुढे त्याने रामकथेचा प्रस्ताव केला. तो राक्षसरूपी वानर आहे असे समजून सीतेने अनेक शंका व्यक्त केल्या. त्यावेळी हनुमंताने आपला परिचय करून दिला. तो रामाचा सेवक आहे व रामचंद्र माल्यवान् नामक पर्वतावर आहे असें त्याने सांगितले. रामाचे चिन्ह म्हणून त्यांची अंगठी त्याने सीतेला दिली. रामाची विरहावस्था सांगितली व प्रतिसंदेश मागितला. तेंव्हा सीतेने प्रतिसंदेश म्हणून रामाला अत्यंत प्रिय असणारा तिचा चूडामणि हनुमंताजवळ दिला. रामाविषयी तिने अनेक प्रश्न विचारले. त्यांची उत्तरे देऊन हनुमंताने नंदनवनाप्रमाणे असणाऱ्या अशोकवनिकेचा विध्वंस केला.

राक्षसींनी भयभीत होऊन वानराचा हा पराक्रम रावणाकडे जाऊन सांगितला. ऐंशी हजार सशस्त्र सैनिक पाठवून रावणाने त्याचा बंदोबस्त करण्याचा आदेश दिला. नंतर मंत्र्यांना पाठविले. हनुमंताने त्यांचा नाश केला. अक्षकुमाराला ठार मारले व इंद्रजिताबरोबर त्याची लढाई सुरू झाली. नंतर राक्षसांनी हनुमानाला ब्रह्मपाशांनी बांधले व रावणापुढे आणले त्याने हनुमंताचा शिरच्छेद करण्याची आज्ञा दिली. तेंव्हा विभिषणाने "दूतहत्या अनुचित आहे" असे सांगितले. परंतु वानर विध्वंसक असल्याने त्याची हत्या करणे उचित असल्याचे रावण म्हणाला. तेंव्हा मारुति म्हणाला, माझ्यासारख्या दूताला तूं मारतोस व धर्मप्रवण रामचंद्राच्या पत्नीला चोरून आणतोस तिला मुक्त कर. स्वतःचे कल्याण व लोकांच्या समृद्धीसाठी राम व सुग्रीवाशी मैत्री जोड. सर्व वानर सैनिक तुझे अनुचर होतील. रामाचा पराक्रम तू जाणत नाहीस. त्याचे हे भाषण ऐकून रावणाला अत्यंत क्रोध आला व त्याने हनुमंताची शेपटी पेटविण्याची आज्ञा दिली.

या कथानकानंतर अधिकारकांडाच्या रचनापद्धतीकडे वळूं –

**रचना पद्धती**

भट्टिकाव्यांत वर्णन केलेला पुढील (९/७८-९४) भाग रामायणांत नाही. यांत भट्टीने असे वर्णन केलें आहे. इंद्रजित् व हनुमंताचे युद्ध सुरू असतांना इंद्रजिताने हनुमंताला ब्रह्मस्त्राने बांधले व त्याला रावणाकडे घेऊन जाण्याची आज्ञा दिली. त्यावेळी राक्षसांनी त्याला म्हटलें की, आम्ही तुला खाऊन टाकूं, ज्योतिष्टोमादि यज्ञांचें रक्षण करणाऱ्या अधर्म माणसाचा तू दूत आहेस. शूर्पणखा खरदूषण यांना ठार मारणाऱ्या तसेच युद्धांत राक्षसांशी लढत असतांना ज्याला कष्ट होत नाहीत अशा रामाचा तू दूत आहेस. चारकर्मात कुशल असलेल्या कपटचित्त ह्या बंदराने रावण बेसावध असतांना अशोकवनिकेंत घुसून तिचा नाश केला. हा कपिष्ठल ऋषींप्रमाणे पवित्र असलेल्या सीतेकडे रात्री अवेळी गेला. इ."

अशाप्रकारें मूळ रामायणकथेंत नसलेला नवीन भाग घालण्यांत भट्टीने काय साधले? असा विचार करीत असतांना असें वाटतें कीं, राम व सीता हे दोघे म्हणजे प्रस्तुत काव्याचे नायक- नायिका. त्यांच्या उत्तुंग चारित्र्याविषयी शत्रूच्या मुखांतून भट्टीने जणूं प्रमाणपत्र दिलें आहे. मारुतीला राक्षस जरी निंदास्पद बोलत होते तरी त्यांच्या भाषणांत राम व सीतेविषयी एकहि अपशब्द बाहेर पडत नाही. उलट रामाला राक्षसांचे भय वाटत नाही, खरदूषणादि राक्षसांना त्याने ठार केले, यासारख्या वाक्यांमधून रामचंद्राच्या शोर्यादि गुणांचे दर्शन होते सीतेविषयी त्यांचे बोलणे तर पातिव्रत्याचे शत्रूपक्षाने दिलेले प्रमाणपत्रच आहे. हनुमंताला मात्र त्यांनी धारेवर धरले आहे. त्याचे कारण हनुमंताने लंकेचा केलेला उच्छेद होय आणि राक्षसांनी तो प्रत्यक्ष पाहिलेला होता. अर्थातच राम किंवा सीतेविषयी जो भाव त्यांच्या अंतःकरणांत होता तो हनुमंताविषयी असणे शक्य नाही.

रचनापद्धतीचा विचार केल्यानंतर आता आपण अधिकारकांडातील अधिकरांकडे वळूं या –

## अधिकारवैविध्य

सर्व प्रथम ट प्रत्ययाचा अधिकार येतो तो असा –

वनेचराग्र्याणाम् ५-९७ – वने चरन्तीति वनेचर :- येथे चरेष्टः' ३-२-१६ या सूत्रानुसार "ट" प्रत्यय होऊन हे रूप बनते.

आदायचर : ५-९७ – येथे : "भिक्षासेनादायेषुच" ३-१२-१७ आदाय हे उपपद असतांना चर् धातुहून "ट" प्रत्यय झाला आहे.

अग्रेसर : ५-९७ – अग्रे सरतीति अग्रेसर : येथे "पुरोऽग्रतोऽग्रेषु" .... ३-२-१८ या सूत्राने "ट" प्रत्यय झाला आहे.

यशस्करसमाचारम् ५-९८- यशः करोतीति यशस्करः येथे "कृञोहेतुताच्छील्यानुलोम्येषु" ३-२-२० या सूत्राने हेत्वर्थात "ट" प्रत्यय झाला आहे.

दयाकरम् ५-९८ दयां करोतीति दयाकर : येथे ताच्छील्यार्थात "ट" प्रत्यय झाला आहे तर

वाक्यकरम् ५-९८ – वाक्यं करोतीति वाक्यकर : येथे आनुलोम्य म्हणजे आनुकूल्य या अर्थात "ट" प्रत्यय झाला आहे.

पूर्वसर : ५-९७ – पूर्व : सरतीति पूर्वसर : येथे "पूर्वे कर्तरि" ३-२-१९ या सूत्राने "ट" प्रत्यय झाला आहे.

दिवाकर :, अन्तकर : - ५-९९ येथे "दिवाविभानिशा..." ३-१२-२१ या सूत्राने "ट" प्रत्यय झाला. तसेच.

अरुष्करम् ५-१०० – अरुः करोतीति अरुष्करम् – येथे देखील "ट" प्रत्यय वरील सूत्राने झाला आहे.

कर्मकरोपमः ५-९९ – कर्म करोतीति कर्णकरः येथे "कर्मणि भृतो..." ३-२-२२ या सूत्राने भृत्यार्थाति "ट" प्रत्यय झाला आहे.

वैरकारम्, कलहकारः, शब्दकार :- ५-१०० येथे सर्वत्र "न शब्दश्लोककलहगाथावैर ..." २-२-२३ या सूत्राने "ट" प्रत्ययाचा निषेध झाला आहे.

येथून आम् प्रत्ययाचा अधिकार आहे. तो असा संत्रासयाञ्चकार, सन्त्याजयाञ्चकार ५-१०० येथे "कास्प्रत्ययादाममन्त्रे लिटि" ३-१३५ या सूत्राने "आम्" प्रत्यय झाला आहे.

ईहाञ्चक्राते ५-१०६ येथे 'इजादेच गुरुमतोऽनृच्छः' ३-१-३६ या सूत्राने आम् प्रत्यय झाला आहे.

पलायाञ्चक्रे, दयाञ्चक्रे ५-१०६- येथे "दयायासश्च" ३-१-३७ या सूत्राने आम् प्रत्यय झाला आहे.

ओषाञ्चकार विदाञ्चकार ६-१- येथे "उषविदजागृभ्योऽन्यतरस्याम्" ३-१-३८ या सूत्राने आम् प्रत्यय झाला आहे. तसेच प्रजापराञ्चकार ६-२ येथेहि तो झाला आहे.

बिभयाम्प्रचकार ६-२ येथे "भीह्रीभृहूवां श्लुवच्च" ३-१-३९ या सूत्राने आम् प्रत्यय झाला आहे. जिह्रयाञ्चकार ६-३ – येथेहि तो झाला आहे.

विदांकुर्वन्तु ६-४- येथे 'विदांकुर्वन्त्वित्यन्यतरस्याम्' ३-१-४१ या सूत्राप्रमाणे आम् प्रत्ययादींचे निपातन होते.

यानंतर दुहादि आले आहेत ते असे सूरान् लक्ष्मणं, रामम् ६-८ येथे अनुक्रमे याच् पृच्छ् आणि ब्रू यांच्या योगाने कर्मसंज्ञा झाली आहे. हे सर्व धातु दुहादि आहेत तसेच

वनम् आत्मानं, चित्तमा ६-९ येथेहि अनुक्रमे भिक्ष् (याच्) दुह् आणि रुध् यांच्या योगे कर्मसंज्ञा झाली आहे. हे देखील दुहादि आहेत.

आश्रमद्रुमान्, तापसान् ६-१०- येथे अनुक्रमे "चि" आणि शास् या धातूंच्या योगें कर्मसंज्ञा झाली आहे हे सुद्धा दुहादि आहेत.

नंतर सिच् प्रत्ययाचा अधिकार आहे तो असा –

न्यवधिषम् ६-१६- येथे "च्लेः सिस्" ३-१-४४ या सूत्राने च्लि ला सिच् झाला आहे.

मा घुक्षः ६-१६ येथे “शल इगुपधादनिटः क्सः” ३-१-४५ या सूत्राने च्लि ला क्स असा आदेश झाला आहे.

मा ना श्लिषः ६-१६ — येथे “श्लिष आलिंगने ३-१-४६ या सूत्राने आलिंगन या अर्थांत च्लि ला क्स आदेश झाला आहे.

मा स्म द्राक्षीं, ६-१७- येथे “न दृश्” ३-१-४७ या सूत्राने क्स आदेशाचा प्रतिषेध झाला आहे.

अशिश्रियत् अदुद्रुवत् ६-१७- येथे “णिश्रिद्रुस्रुभ्यः कर्तरि चङ्” ३-१-४८ या सूत्राने चङ् आदेश झाला आहे.

अदधः ६-१८- येथै “विभाषा धेद्श्त्योः” ३-१-४९ या सूत्राने चङ्,आदेश झाल्याने द्विर्वचन झाले आहे तर

मा न वोचः ६-१९ येथे “अस्यतिवक्तिरव्यातिभ्योऽङः ३-१-५२ या सूत्राने अङः आदेश झाला आहे तसेच

आख्यत् ६-२०- येथेहि “ख्या” धातुहून अङादेश झाला आहे.

व्यलिपत्, आहम्, अभ्यषिचत् ६-२१ येथे “लिपिसिचिह्वश्च” ३-१-५५ या सूत्राने च्लि ला चङः आदेश झाला आहे.

अलिपत. अलिप्त ६-२२ येथे “आत्मनेपदेष्वन्यतरस्याम्” ३-१-५४ या सूत्राने विकल्पाने एकदा अङः आदेश झाला तर एकदा तो झालेला नाही म्हणून प्रस्तुतची दोनहि रूपें प्राप्त होतात.

अमुचत् ६-२४ येथे “पुषादिद्युताद्य्लृदितः” ३-१-५५ या सूत्राने च्लि ला अङादेश झाला आहे. या सूत्राची बाकीची निदर्शनें अशी —

अपुषत् अद्युतत् ६-२६ येथे पहिले निदर्शन पुषादीचे तर दुसरे द्युतादीचे आहे.

अन्वसृपत्, अशिषत् ६-२७ येथे “सर्तिशास्त्यर्तिभ्यश्च” ३-१-५६ या सूत्राने च्लि ला अङादेश झाला आहे तर

आरताम् ६-२८ येथेहि अङ आदेश झालेला आहे.

अश्च्युतत् ६-२८ येथे “इरितो वा” ३-१-५७ या सूत्राने च्लि ला अङ आदेश झाला आहे तर

अच्योतीत ६-२९ येथे विकल्पामुळे झाला नाही. म्हणून अङभावाचें रूप आहे. अस्तम्भीत्, अजारीत ६-३० येथे 'जृस्तम्भुम्रुचुम्लुचुग्रुचुग्लुचुग्लुञ्चुश्विभ्यश्च' ३-१-५८ या सूत्राने विकल्पाने अङ झाला नाही म्हणून सिच् झाला आहे. तर अजरत्, अस्तभत् ६-३० येथे अङः आदेश झाला आहे.

आपादि ६-३१ येथे "चिण् ते पदः" ३-१-६० या सूत्राने च्लि ला चिण् आदेश झाला आहे.

अदीपि, अबोधि, आपूरि ६-३२ – येथे 'दीपजनबुधपूरितायिप्यायिभ्योऽन्यतरस्याम्' ३-१-६१ या सूत्राने च्लि ला चिणादेश झाला आहे.

अतायि, अप्यायि ६-३३ येथेहि वरील सूत्रानेच च्लि ला चिणादेश झाला आहे.

उपाचायिष्ट ६-३३ – येथे "अचः कर्मकर्तरि" ३-१-६२ या सूत्राने कर्मकर्तरी च्लि ला चिणादेश होत नाही तर सिच् होतो.

अदोहि ६-३४- येथे "दुह च" ३-१-६३ या सूत्राने च्लि ली विकल्पाने चिणादेश झाला आहे.

समरुद्ध ६-३४ –येथे "न रुधः" ३-१-६४ या सूत्राने चिणादेशाचा प्रतिषेध झाला आहे.

समतप्त ६-३४ –येथे "ततोऽनुताते च" ३-१-६५ या सूत्राने चिणादेशाचा निषेध झाला आहे.

न्यवासि ६-३४ –येथे "चिण् भावकर्मणोः" ३-१-६६ या सूत्राने चिणादेश झाला आहे तर

समभावि ६-३४ येथे भावे चिण् झाला आहे.

यानंतर श्रम् चा अधिकार आला आहे तो असा – भिनद्मि रुणध्मि ६-३५- येथे "रुधादिभ्पः श्रम्" ३-१-७८ या सूत्राने श्नम् झाला आहे. या सूत्राची आणखी निदर्शने अशी – रिणच्मि, विविनच्मि, क्षुणद्मि छिनद्मि ६-३६ तसेच युनज्मि, पिनष्मि ६-३७ तसेच तृणद्मि, हिनस्मि, तनच्मि ६-३८ तसेच तृणेह्मि, अपृणक् ६-३९

यानंतर कृत्य प्रत्ययांचा अधिकार आहे. तो असा – प्रष्टव्यम्, कथनीयम् ६-४७- येथे "तव्यत्तव्याऽनीयरः" ३-१-९६ या सूत्राने अनुक्रमें तव्यत् किंवा तव्य आणि अनीयर् प्रत्यय झाले आहेत.

जेयम् ६-४७ – येथे "अचो यत्" ४-१-९७ या सूत्राने यत् प्रत्यय झाला आहे.

लभ्या ६-४८ – येथे "पोरदुपधात्" ३-१-९८ या सूत्राने यत् प्रत्यय झाला आहे.

शक्यः, सहयः ६-४८ येथे "शकिसहोश्च" ३-१-९९ या सूत्राने यत् प्रत्यय झाला आहे.

अनुक्रमणिका

गद्यम् ६-४८ येथे "गदमदचरयमश्चाऽनुपसर्गे "३-१-१०० या सूत्राने यत् प्रत्यय झाला आहे. याच सूत्राची आणखी निदर्शने अशी —

पापचर्यः ६-४९ चरितुं योग्यं चर्यम् येथे चर् धातुहून तर यम्यत्वम् ६-५० येथे यन्तुं योग्यः यम्य :- येथे यम् धातुहून यत् प्रत्यय झाला आहे.

अनवद्यः, पण्यभ्रातृवधः, वर्यः ६-५१ — येथे 'अवद्यपण्यवर्या गहर्यपणितव्याऽनिरोधेषु' ३-१-१०१ या सूत्राने निपातनें झाली आहेत. अनवद्यः याचे गहर्य या अर्थात, पण्यः याचे पणितव्य या अर्थात आणि वर्यः याचें अनिरोध या अर्थात यत् प्रत्ययाचे निपातन झाले आहे.

वह्येन ६-५२ येथे वहन्ति अनेन इति वह्यम् असें "वह्यं करणम्" ३-१-१०२ या सूत्राने यत् प्रत्ययाचें निपातन झाले आले आहे.

अर्यम् ६-५२ येथे "अर्यः स्वामिवैश्ययोः" ३-१-१०३ या सूत्राने स्वामी या अर्थात अर्यः असें यत् प्रत्ययान्त निंपातन आहे.

उपसर्यायाः ६-५३ येथे "उपसर्या काल्या प्रजने" ३-१-१०४ या सूत्राने उपसर्या हे यत् प्रत्ययान्त निपातन झाले आहे.

अजर्यम् ६-५४ येथे न् जीर्यतीति अजर्यम् या अर्थात "अजर्य सङःगतम्" ३-१-१०५ या सूत्राने यत् प्रत्ययाचे निपातन झाले आहे.

अनृतोद्यम्, सत्यवद्यम् ६-५५ येथे "वदः सुपि क्यप्च" ३-१-१०६ या सूत्राने क्यप् प्रत्ययाचे निपातन झाले आहे. सूत्रांतील चकारामुळे सत्यवद्यम् येथील यत् सिद्ध होतो.

मित्रभूयम् ६-५५- येथे मित्रस्य भावः मित्रभूयम् भाव या अर्थात "भुवा भावे" ३-१-१०७ या सूत्राने क्यप् प्रत्यय झाला आहे.

रिपुहत्याम् ६-५५ येथे "हनस्त च" ३-१-१०८ या सूत्राने हन् धातुहून भावे अर्थामध्ये क्यप् प्रत्यय व तकार अंतादेश झाला आहे.

वृत्येन, जुष्येण, आदृत्यः, स्तुत्यः, शिष्येण, इत्यः ६-५६ येथे "एतिस्तुशास्वृदृजुषः क्यप्" ३-१-१०९ या सूत्राने क्यप् प्रत्यय झाला आहे. तो कित् असल्याने गुणाचा प्रतिषेध झालेला आहे.

गृध्यम् ६-५६ येथे "ऋदुपधाच्चाक्लृपिचृतेः" ३-१-११० या सूत्राने क्यप झाला आहे.

अनुक्रमणिका

अखेयः ६-५७ येथे खनितुं शक्यः या अर्थात" ई च खनः" ३-१-१११ या सूत्राने क्यप् प्रत्यय व ईकार अंतादेश झाला आहे.

मृज्यः ६-५७ येथे "मृजेर्विभाषा" ३-१-११३ या सूत्राने विकल्पाने क्यप् झाला आहे.

राजसूययाजी सूर्यसन्निभः, अमृषोद्यम्, रुच्यः ६-५८ येथे "राजसूयसूर्यमृषोद्यरुच्यकुप्यकृष्टपच्याऽव्यथाः" ३-१-११४ या सूत्राने क्यप् प्रत्यय होऊन दीर्घत्वाचे, उत्वाचे, नित्यत्वाचे तर कोठे कर्तरीचे निपातन झाले आहे. बाकीची निदर्शने अशी –

अकृष्टपच्याः, ६-५९ अनुक्रमे कर्मकर्तरिचे निपातन तर कुप्यम् येथे कुत्वाचे निपातन झाले आहे. अव्यथ्यौ ६-६० येथे क्यप् झाला आहे.

भिद्योद्धयसन्निभान् ६-६० येथे भिद्यः, उद्धयः "भिद्योद्धयौ नदे" ३-१-११५ या सूत्राने क्यप् झाला आहे. उज्झला घत्व होते.

सिद्धयताराम् ६-६० येथे "पुष्यसिद्धयौ नक्षत्रे" ३-१-११६ या सूत्राने अधिकरणांत निपातन झाल्याने क्यप् झाला आहे.

विपूयैः ६-६१ येथे विपूयविनीयजित्या मुञ्जकल्कहलिषु ३-१-११८ या मुंजार्थात कर्मणि क्यबन्ताचें निपातन झाले आहे.

प्रगृह्यपदवत्, अगृह्याम्, देवगृह्याम् ६-६२ येथे "पदाऽस्वैरिबाहयपक्ष्येषु च" ३-१-११९ या सूत्राने अनुक्रमे पद या अर्थात प्रगृहयम् असे, अस्वैरि या अर्थात अगृहयाम् असें तर पक्ष्यार्थात देवगृहयाम् असे क्यप् प्रत्ययाचे निपातन झाले आहे.

धर्मकृत्यरताम्, अवृष्यषलभोजनाम् ६-६३ येथे "विभाषा कृवृषोः" ३-१-१२० या सूत्राने कर्तु योग्यं कृत्यम् आणि न वृष्याणि अवृष्याणि ही क्यप् प्रत्ययाची निदर्शने आहेत.

युग्यायातः ६-६३ येथे "युग्यं च पत्रे" ३-१-१२१ या सूत्राने युज्यते अनेनति युग्यम् या अर्थामध्ये क्यप् प्रत्ययाचे निपातन झाले आहे.

अमावास्यसमन्वये ६-६४ येथे "अमावस्यदन्यतरस्याम्" ३-१-१२२ अमावास्या अमा (सह) वसतोऽस्यां चन्द्राकों या अर्थात वस् धातुहून अधिकरणे ण्यत् प्रत्यय झाला आहे.

कार्यम्, अपाक्यैः ६-६४- येथे "ऋहलोर्ण्यत्" ३-१-१२४ या सूत्राने येथे ण्यत् प्रत्यय झाला आहे.

अनुक्रमणिका

अवश्यपाव्यम् ६-६५ येथे “ओरावश्यके” ३-१-१२५ या सूत्राने ण्यत् झाला आहे.

आसाव्यम् ६-६५ येथे “आसुयुवपिरपित्रपिचमश्च” ३-१-१२६ या सूत्राने येथे ण्यत् प्रत्यय झाला आहे.

आचाम्यम् ६-६६ येथे वरील सूत्राने ण्यत् प्रत्यय झाला आहे.

आनाय्यः ६-६६- येथे “आनाय्योऽनित्ये” ३-१-१२७ या सूत्राप्रमाणे अनित्य या अर्थात आनाय्यः या रूपाचे निपातन झाले आहे. आनाय्यः म्हणजे दक्षिणाग्नि कारण तो गार्हपत्य (या नित्य) अग्नीपासून आणला जातो. सतत प्रज्वलित नसल्याने अनित्य असतो.

प्रणय्यः, ६-६७- येथे “प्रणाय्योऽसम्मतौ” ३-१-१२८ या सूत्राने असंमत या अर्थात प्रणाय्यः असे निपातन झाले आहे.

निकाय्यम् ६-६७- येथे “पाय्यसान्नाय्यनिकाय्य...” ३-१-१२९ या सूत्राने निवास्थान या अर्थात ण्यत्, इत्यादींचे निपातन होऊन रूप सिद्ध झाले आहे.

कुण्डपाय्यवताम् ६-६८- येथे “क्रतौ कुण्डपाय्यसञ्चाय्यौ” ३-१-१३० या सूत्राने कुण्डपाय्य असें यत् प्रत्ययाचे निपातन झाले आहे.

उपचाय्यवताम् ६-६८- येथे “अग्नौ परिचाय्योपचाय्य...” ३-१-१३२ या सूत्राने येथे ण्यत् प्रत्ययाचे निपातन झाले आहे. उपचाय्य म्हणजे चित्याग्नि होय.

अग्निचित्यावताम् ६-६८- येथे “चित्याऽग्निचित्ये च ३-१-१३२ या सूत्राने अग्निचित्या असे निपातन झाले आहे.

यानंतर कृत् प्रत्ययांचा अधिकार सुरु होतो. तो असा –

कारकः, द्रष्टा ६-७२- येथे ‘ण्वुल्तृचौ’ ३-१-१३३ या सूत्राने अनुक्रमें ण्वुल् व तृच् प्रत्यय झालेला आहे. ‘युवोरनाकौ’ ७-१-१ या सूत्राने वु ला अकादेश झाला आहे.

कपिनन्दनः ६-७२- येथे “नन्दिग्रहिपचादिभ्यो ल्युणिन्यचः” या सूत्राने नन्दनः येथे ल्यु प्रत्यय झाला आहे. आणखी निदर्शनें अशी –

नन्दनानि, रमणानि ६-७३ येथेहि ल्यु झालेला आहे तसेच

वाशनैः, रोचनैः, ६-७४ – येथेही ल्यु झाला आहे. तसेच

अनुक्रमणिका

परिभावीणि, मन्थीनि, उदासीनि, ६-७५ येथें सर्व धातु ग्रहयादि म्हणून णिनि प्रत्यय झाला आहे. तसेच

कद्वदम् ६-७६- येथे पचादि म्हणून अच् प्रत्यय झाला आहे.

अज्ञः, प्रियः, वितृदैः, कुसुमोत्किरैः ६-७७ येथे 'इगुपधज्ञाप्रीकिरः कः' ३-१-१३५ या सूत्राने अनुक्रमे क प्रत्यय झाला आहे.

प्रग्लः ६-७७- येथे मात्र 'आतश्चोपसर्गे' ३-१-१३६ या सूत्राने प उपसर्ग लागला असल्याने क प्रत्यय झाला आहे.

उद्धमैः, उद्धयैः, आजिघ्रैः ६-७८- येथे "प्राघ्राध्माधेट्दृशः शः" ३-१-१३७ या सूत्राने श प्रत्यय झाला आहे.

धारयैः, पारयैः, उदेजयैः ६-७९- येथे "अनुपसर्गाल्लिम्पविन्द..." ६-१-१३८ या सूत्राने श प्रत्यय झाला आहे. तसेच

ददैः, ६-८०- येथे "ददातिदधात्योर्विभाषा" ३-१-१३९ या सूत्राने विकल्पाने कर्तरी श प्रत्यय झाला आहे.

ज्वलः, ६-८०- येथे 'ज्वलितिकसन्तेभ्यो णः' ३-१-१४० या सूत्राप्रमाणे ण प्रत्यय विकल्पाने झाला नाही तर पचाद्यच् होऊन झप बनले आहे.

धायैः, ६-८०- येथे "शाद्व्यधास्रु..." ३-१-१४१ या सूत्राने ण प्रत्यय झाला आहे. तसेच

अवश्यायः, आस्रावाः, संस्रावः ६-८१- येथेहि ण प्रत्यय झाला आहे. तसेच

अवसायः, अवहारः, ६-८२- येथेहि ण झाला आहे.

लेहैः, ६-८३ – येथेहि ण प्रत्यय झाला आहे.

दावैः, नायः, ६-८३- येथे "दुन्योरनुपसर्गे" ३-१-८३ या सूत्राने ण प्रत्यय झाला आहे.

ग्राहेण, ग्रहेण ६-८४- येथे 'विभाषा ग्रहः' ३-१-१४३ हे सूत्र विभाषेन (विकल्पाने) प्रवृत्त होते, म्हणून व्यवस्थितविभाषेने ग्राहेण येथे प्रवृत्त होते. ग्रहेण येथे ते होत नाही.

गृहाम् ६-८४- येथे 'गेहे कः' ३-१-१४४ या सूत्राने क प्रत्यय झाला आहे.

नर्तकाः ६-८५- येथे 'शिल्पिनि ष्वुन्' ३-१-१४५ या सूत्राने ष्वुन् प्रत्यय झाला आहे.

अलिगाथकैः ६-८५- येथे गायन्तीति गाथकाः ‘गस्थकन्’ ३-१-१४६ या सूत्राने थकन् प्रत्यय झाला आहे.

हायनः ६-८६- येथे जहाति जिहीते वा भावान् इति हायनः या अर्थात ‘हश्च ब्रीहिकालयोः’ ३-१-१४७ या सूत्राने ण्युट् प्रत्यय झाला आहे.

लवको ६-८६- येथे ‘पृसुल्वः समभिहारे वुन्’ ३-१-१४९ या सूत्राने वुन् प्रत्यय झाला आहे.

जीवकः ६-८७- येथे ‘आशिषि च’ ३-१-१५० या सूत्राने आशीर्वादार्थात वुन् प्रत्यय झाला आहे. जीवकः या पदाचा अर्थ जीवतात् असा आहे.

शत्रुलावौ ६-८८- येथें शत्रु हे उपपद असतांना ‘कर्मण्यण्’ ३-२-१ या सूत्राने अण् प्रत्यय झाला आहे.

व्योममायम् ६-८८- येथे ‘ह्वासवामश्च’ ३-२-२ या सूत्राने कर्मणि अण् प्रत्यय झाला आहे.

शर्मदम् ६-८९- येथे ‘आतोऽनुपसर्गे कः’ ३-२-३ या सूत्राने आदन्त् दा धातुवरून क प्रत्यय झाला आहे.

विषमस्थः ६-८९- येथे मात्र ‘सुपि स्थः’ ३-२-४ या सूत्राने क प्रत्यय होतो. स्था धातु आदन्त असूनहि पूर्वीच्या सूत्राने क प्रत्यय होत नाही.

शोकापनुदम् ६-८९- येथे ‘तुन्दशोकयोः परिमृजापनुदोः’ ३-२-५ या सूत्राने क प्रत्यय ‘आलस्यसुखाहरणयोरिति वक्तव्यम्’ या वार्तिकानुसार – सुखाहरण या विशेष अर्थात झाला आहे.

विश्वासप्रदवेषः, पथिप्रज्ञः ६-९०- येथे ‘प्रे दाज्ञः’ ३-२-६ या सूत्राने क प्रत्यय झाला आहे.

चित्तसंख्य ६-९०- येथे ‘समि ख्यः’ ३-२-७ या सूत्राने क प्रत्यय झाला आहे.

सुरापैः, सामगैः ६-९१- येथे ‘गापोष्टक्’ ३-२-८ या सूत्राने अनुक्रमें पा आमि गा धातुहून टक् प्रत्यय झाला आहे.

मनोहरम् ६-९२- येथे ‘हरतेनुद्यमनेऽच्’ ३-२-९ या सूत्राने अच् प्रत्यय झाला आहे.

वर्महरौ ६-९२- येथे ‘वयसि च’ ३-२-१० या सूत्राने अच् प्रत्यय झाला आहे. वर्महरौ म्हणजे कवचधारणवयस्कौ म्हणजेच तरुण असा अर्थ आहे.

सुखाहरः ६-९२- येथे ‘आङि ताच्छीत्ये’ ३-२-११ या सूत्राने अच् प्रत्यय झाला आहे.

अनुक्रमणिका

स्तम्बेरमौ ६-९३- येथे 'स्तम्बकर्णयोः रमिजपोः' ३-२-१३ या सूत्राने अच् प्रत्यय झाला आहे.

शंकरेण ६-९३- येथे 'शमि धातोः संज्ञायाम्' ३-२-१४ या सूत्राने शंकर ही संज्ञा असल्याने शम् धातुहून अच् प्रत्यय झाला आहे.

गुहाशयैः ६-९४- येथे अधिकरणे शेतेः' ३-२-१५ या सूत्राने अच् प्रत्यय झाला आहे. यानंतर खश् वगैरे प्रत्ययांचा अधिकार आहे. तो असा-

सत्त्वमेजयाः ६-९५- येथे 'एजेः खश्' ३-२-२८ या सूत्राने णिजन्त एजि धातुहून खश् प्रत्यय झाला आहे.

स्तनन्धयः ६-९५- येथे 'नासिकास्तनयोर्ध्माधेटो' ३-२-२९ या सूत्राने धेट् धातुहून खश् प्रत्यय झाला आहे.

नाडिन्धमान् ६-९५- येथे 'नाडीमुष्टयोश्च' ३-२-३० या सूत्राने खश् प्रत्यय झाला आहे.

कूलमुद्रुजैः, कूलमुद्वहाः ६-९६- येथे 'उदि कूले रुजिवहो' ३-२-३१ या सूत्राने खश् प्रत्यय झाला आहे.

अभ्रंलिहम् ६-९७- येथे 'वहाभ्रे लिहः' ३-२-३२ या सूत्राने खश् प्रत्यय झाला आहे.

अल्पम्पचान् ६-९७- येथे 'मितनखे च' ३-२-३४ या सूत्राने खश् प्रत्यय झाला आहे. मितचा अर्थ अल्प असा असहे. तसेच

अमितम्पचम् ६-९८- येथेहि खश् प्रत्यय झाला आहे.

अरुन्तुदेन ६-९९- येथे 'विध्वरुषोस्तुदः' ३-२-३५ या सूत्राने खश् प्रत्यय झाला आहे.

असूर्यम्पश्यया ६-९९ "असूर्यललाटयोर्दृशितपोः" ३-२-३६ या सूत्राने खश् प्रत्यय झाला आहे. तसेच

ललाटन्तपम् ६-१००- येथे खश् प्रत्यय झाला आहे.

उग्रम्पश्येन ६-१०१- येथे 'उग्रम्पश्येरम्मदपाणिन्धमाश्च' ३-२-३७ या सूत्राने निपातन झाले आहे. म्हणून अण् प्रत्ययाचा बाध होऊन खश् प्रत्यय व पश्यादेश झाला आहे.

वशंवदः ६-१०१ येथे वश हे उपपद असतांना "प्रियवशे वदः खच्" ३-२-३८ या सूत्राने खच् प्रत्यय झाला आहे तर

प्रियंवद ६-१०२ प्रिय हे उपपद असतांना खच् प्रत्यय झाला आहे.

अनुक्रमणिका

परन्तप, द्विषन्तपः ६-१०२ येथे द्विषत् आणि पर ही उपपदे असतांना "द्विषत्पर योस्तापे" ३-२-३९ या सूत्राने खच् प्रत्यय झाला आहे.

वाचंयमः ६-१०३ येथे ("वाचंयमपुरन्दरौ च" या सूत्राने मुमागमाचे निपातन होते) "वाचि यमो व्रते" ३-२-४० या सूत्राने खच् प्रत्यय झाला आहे.

सर्वंसहम् ६-१०३ येथे "पूः सर्वयोर्दारिसहोः" ३-२-४१ या सूत्राने खच् प्रत्यय झाला आहे.

सर्वङःकषयशः शाखम् ६-१०४ "सर्वकूलाभ्रकरीषेषु कषः" ३-२-४२ या सूत्राने सर्व हे उपपद असून कष् धातुहून-खच् प्रत्यय झाला आहे.

भयङ्कारम्, मेघङःकरम् ६-१०५ येथे "मेघर्तिभयेषु कृञ" ३-२-४३ या सूत्राने खच् प्रत्यय झाला आहे.

क्षेमङःकराणि, प्रयङःकरौ ६-१०६ येथे 'क्षेमप्रियमद्रेऽण् च' ३-२-४४ या सूत्रातील चकारामुळे खच् प्रत्यय झाला आहे.

आशितम्भवम् ६-१०७ येथे "आशिते भुवः करणभावयो" : ३-२-४५ या सूत्राने खच् प्रत्यय झाला आहे आणि तो आशितस्य भवनम् आशितम्भवः अशा भाव या अर्थात झाला आहे.

विश्वम्भरा, बलिन्दमप्रख्यम् ६-१०८ येथे बर्लि दमयतीति बलिन्दमः ही संज्ञा आहे "संज्ञायां भृतृवृजिधारिसहितपिदम" :३-२-४६ या सूत्राने खच् प्रत्यय झाला आहे. बाकीची निदर्शने अशीं – विश्वं बिभर्तीति विश्वम्भरा तसेच

वसुन्धरायाम् ६-१०९ येथेहि वसूनि धारयतीति वसुन्धरा ही संज्ञा असल्याने खच् प्रत्यय झाला.

हदमङःगमम् ६-१०९ येथे "गमश्च" ३-२-४७ या सूत्राने खच् प्रत्यय झाला आहे. हद्ग ताची ही संज्ञा आहे असे म्हणतात.

यानंतर ड प्रत्ययाचा अधिकार सुरु होतो तो असा –

दूरगैः, अन्तगैः, अत्यन्तगः ६-११० येथे "अन्ताऽत्यन्ताऽध्वदूरपारसर्वानन्तेषु ड" : ३-२-४८ या सूत्राने गम् धातुहून ड प्रत्यय झाला आहे.

दस्यहुः ६-११२- येथे आशिष हनः" ३-२-४९ या सूत्राने दास्यून् वध्यात् इति दस्युहः अशा आशीर्वाद या अर्थात ड प्रत्यय झाला आहे.

तपोपहः ६-१११- येथे “अपे क्लेशतमसोः” : ३-२-५० या सूत्राने अपपूर्वक हन् धातुहून ड झाला आहे.

क्लेषाऽपहम् ६-११२- येथेहि पूर्ववत् ड प्रत्यय झाला आहे.

शीर्षघातिनम्, ६-११३- येथे “कुमारशीर्षयोणिनि” : ३-२-५१ या सूत्राने शीर्ष हे उपपद हन् धातुहून णिनि प्रत्यय झाला आहे.

पतिघ्नी ६-११३ – येथे लक्षणे “जायापत्योष्टक् ३-२-५२ या सूत्राने टक् झाला आहे. येथे पति हे उपपद आहे.

शत्रुघ्नान् ६-११४ येथे “अमनुष्यकर्तृके च” : ३-२-५३ यासूत्राने टक् प्रत्यय झाला आहे.

हस्तिघ्नः ६-११४ - येथे “शक्तौ हस्तिकपाटयो” : ३-२-५४ या सूत्राने हस्ति हे उपपद असतांना हन् धातुहून टक् प्रत्यय झाला आहे.

पाणिघेः ६-११४ येथे “पाणिघताडघौ शिल्पिनि” ३-२-५५ या सूत्राने हन् धातुहून टक् प्रत्यय निपातित झाला आहे.

आढ्यङःकरणम्, प्रियङःकरणम् ६-११५-येथे दोनहि ठिकाणी “आढयसुभगस्थूलपलितनग्नाऽन्धप्रियेषु च्व्यर्थेष्वच्वौ कृञः करणे ख्युन्” ३-२-५६ या सूत्राने करणे ख्युन् प्रत्यय झाला आहे.

प्रियम्भावुकताम्, प्रियम्भविष्णुः ६-११६ - येथे “कर्तरि भुवः खिष्णुच्खुकञौ” ३-२-५७ या सूत्राने अनुक्रमें खुकञ् व खिष्णुच् प्रत्यय झाले आहेत.

व्योमस्पृशः ६-११७ येथे “स्पृशोऽनुदके क्विन्” ३-२-५८ या सूत्राने क्विन् प्रत्यय झाला आहे.

रामर्त्विक्, दधृक् ६-११८ येथे “ऋत्विग्दधृक्स्रग्दिष्णिगञ्चजिकुञ्चां च” ३-२-५९ या सूत्राप्रमाणे क्विन् प्रत्ययाचे निपातन झाले आहे. तसेच

यूङः दिशः ६-११९ ही देखील निपातने झाली आहेत.

किष्किन्धाऽद्रिसदा ६-१२१ - येथे “सत्यूद्विष ...” : ३-२-६१ या सूत्राने क्विप् प्रत्यय झाला आहे. तसेच

वालिद्रह्, अङःगदस्वम् ६-१२२ – येथेहि क्विप् झाला आहे.

वानरसेनान्योः, तनुच्छिदम् ६-१२३ येथेहि क्विप् प्रत्यय झाला आहे.

अनुक्रमणिका

दूरभाक् ६-१२३ - येथे ‘भजो ण्विः’ : ३-२-६२ या सूत्राने ण्वि प्रत्यय झाला आहे.

प्राणदम् ६-१२३- येथे “अदोऽनन्ने” ३-२-६८ या सूत्राने विट् प्रत्यय झाला आहे.

क्रव्यात् ६-१२४, क्रव्यमदन्तीक्रक्रिव्यादः म्हणजे मांस भक्षण करणारे गृध्रश्रृगालादि येथे “क्रव्ये च” ३-२-६९ या सूत्राने विट् प्रत्यय झाला आहे.

कामदुघः ६-२४ येथे “दुहः कब्घश्च” : ३-२-७० या सूत्राने दुह् धातुहून कप् प्रत्यय व घकारअन्तादेश झाला आहे.

अग्रेगावा ६-१२४ - येथे “अन्येभ्योऽपि दृश्यन्ते” ३-२-७५ या सूत्राने वनिप् प्रत्यय झाला आहे.

अभिभूः ६-१२५ – येथे ‘क्विप् च’ ३-२-७६ या सूत्राने क्विप् प्रत्यय झाला आहे.

शंस्थरूपः ६-१२५ – येथे स्थः क च” ३-२-७७ या सूत्राने क प्रत्यय झाला आहे.

रिपुघातिनम् ६-१२६ येथे “सुप्यजांतौ णिनिस्ताच्छील्ये” ३-२-७८ या सूत्राने ताच्छील्ये णिनि प्रत्यय झाला आहे.

बान्धवक्रोशिनः ६-१२६ – येथे “कर्तर्युपमाने” ३-२-७९ या सूत्राने णिनि प्रत्यय झाला आहे.

वनवर्तिनः ६-१२७ येथे “व्रते” ३-२-८० या सूत्राने णिनि प्रत्यय झाला आहे.

मधुपायिन्य : ६-१२७ येथे “बहुलमाभीक्ष्ण्ये” ३-२-८१ या सूत्राने पिबन्तीति-निरंतर मधुपान करणाऱ्या असा अभीक्ष्ण्याचा अर्थ येथे आहे.

शूरमानी, साधुम्मन्यम् ६-१२८- येथे “आमत्माने खश्च” ३-२-८३ या सूत्राने चकाराचे ग्रहण केले असल्याने शूरमात्मानं मन्यते या अर्थात शूंरमानी येथे णिनि प्रत्यय झाला आहे. तर शूरम्मन्यः येथे खश् प्रत्यय झाला आहे.

हविर्याजी ६-१२९- येथे हविषा इष्टवान् अशा भूतार्थात “करणे यजः” ३-२-८५ या सूत्राने णिनि प्रत्यय झाला आहे.

अन्यव्यासक्तघाती ५-१२९ येथे “कर्मणि हनः” ३-२-८६ या सूत्राने भूते णिनि प्रत्यय झाला आहे.

अनुक्रमणिका

ब्रह्मघ्नाम् ६-१२९ - येथे "ब्रह्मभ्रूणवृत्रेषु क्विप्" ३-२-८७ या सूत्राने क्विप् प्रत्यय झाला आहे. ब्रह्मघ्नाम् येथील क्विप् प्रत्यय "क्विप् च" या सूत्राने सिद्ध होत असतांना प्रस्तुत सूत्र नियमार्थ आहे. तो नियम असा की, ब्रह्म, भ्रूण, वृत्र हींच उपपदें, हन् हाच धातु, क्विप् हाच प्रत्यय व भूते हाच अर्थ असेल तरच या सूत्राने क्विप् प्रत्यय होईल. "चतुर्विधोऽत्र नियमः" असे काशिकाकार म्हणतात तर ब्रह्मादि उपपदे व क्विप् प्रत्यय असा 'द्विविधो नियमः' असे महाभाष्यकार म्हणतात.

पुण्यकृतः, पापकृत्, सुकृताम् ६-१३०- येथे "सुकर्मपापमन्त्रपुण्येषु कृञः" ३-२-८९ या सूत्राने क्वप् झाला आहे.

सोमसुत् ६-१३१ – येथे 'सोमे सुञः' ३-२-९० या सूत्राने क्विप् प्रत्यय झाला आहे.

अग्निचित् ६-१३१- येथे "अग्नौ' चेः" ३-२-९१ या सूत्राने अग्न्यर्थमिष्टकाचयनं कृतवानित्यर्थः या अर्थात क्विप् प्रत्यय झाला आहे.

रथचक्रचित् ६-१३१- येथे रथचक्रकमिव चीयते या (रथचक्रदृशोऽग्न्यर्थ इष्टकाचय इत्यर्थो लक्षणयाऽग्निरपि) अर्थात, "कर्मण्यग्न्याख्यायाम् ३-२-९-२ या सूत्राने क्विप् प्रत्यय झाला आहे.

मांसविक्रयिणः ६-१३२- येथे "कर्मणीनि विक्रियः" ३-२-९३ या सूत्राने 'कुत्सितग्रहणं कर्तव्य्' । या वार्तिकाप्रमाणे "कुत्सा" या अर्थात इनि प्रत्यय झाला आहे.

पापदृश्वना ६-१३२- येथे "दृशेः क्विनिप्" ३-२-९४ या सूत्राने क्वनिप् प्रत्यय झाला आहे.

राजकृत्वा ६-१३३- येथे "राजनि युधि कृञः" ३-२-९५ या सूत्राने क्वनिप् झाला व तो पित् प्रत्यय असल्याने "ऱ्हस्वस्य पिति कृति तुक्" या सूत्राने तुगागम झाला आहे.

सहयुध्वानम् ६-१३३- येथे 'सहे च' ३-२-९६ या सूत्राने क्वनिप् प्रत्यय झाला आहे.

कृतजैः ६-१३४- येथे "सप्तम्यां जनेर्ड" ३-२-९७ या सूत्राने 'कृते जाताः' अर्थात (सप्तमीच्या) ड प्रत्यय झाला आहे.

हे कौशल्याज ६-१३४- येथे "पञ्चम्यामजातौ" ३-२-९८ या सूत्राने कौशल्याः जाताः या पंचमीच्या अर्थात ड प्रत्यय झाला आहे.

प्रजाः ६-१३५- येथे "उपसर्गे च संज्ञायाम्" ३-२-९९ या सूत्राने प्र उपसर्गपूर्वक जन् धातुहून ड प्रत्यय झाला आहे. प्रजा ही संज्ञा आहे.

आत्मानुजस्य ६-१३५- येथे "अनौ कर्मणि" ३-२-१०० या सूत्राने ड प्रत्यय झाला आहे.

अधिज, अनुजेन, अक्षत्रियजे किञ्जम् ६-१३६- येथे "अन्येष्वपि दृश्यते" ३-२-१०१ या सूत्राने ड प्रत्यय झाला आहे.

अकृतं, न कृतवान् ६-१३७- येथे "निष्ठा" ३-२-१०२ या सूत्राने अनुक्रमें क्त आणि क्तवतु हे प्रत्यय झाले आहे. या दोनहि प्रत्ययांना "क्तक्तवतू निष्ठा" सूत्राने निष्ठा संज्ञा होते.

यज्वभिः, सुत्वभिः ६-१३७- येथे "सुयजोङ्वनिप्" ३-२-१०३ या सूत्राने अनुक्रमे यज् आणि सु धातुहून ङ्वानिप् प्रत्यय झाला आहे.

जरद्भिः ६-१३७- येथे "जीर्यतेरतृन्" ३-२-१०४ या सूत्राने अतृन् प्रत्यय झाला आहे.

उपसेदुषाम्, ऊषुषाम् ६-१३८- येथे "भाषायां सदवसश्रुवः" ३-२-१०८ या सूत्राने क्वसु प्रत्यय झाला आहे.

उपेयिवान्, अनूचानैः ६-१३९- येथे "उपेयिदाननाश्वाऽननूचानश्च" ३-२-१०९ या सूत्राने क्वसु व कानच् प्रत्ययान्त ही निपातने आहेत.

आतापर्यंत, भूत अर्थातील कृदन्त सांगून सूत्रक्रमानें तिङन्ताची उदाहरणे सांगतात –

अन्वनैषीत् ६-१४०- येथे "लुङ्" ३-२-११० या सूत्राने अनु उपसर्गपूर्वक नी धातुहून भूते लुङ् झाला आहे.

न्यक्षिपत् ६-१४०- येथे "अनद्यतने लङः" ३-२-१११ या सूत्राने अनद्यतन भूतार्थात लङः लकार झाला आहे.

संभविष्यावः ६-१४१- येथे "अभिज्ञावचने लृट्" ३-२-११२ या सूत्राने अभिज्ञा म्हणजे स्मृति या अर्थात लृट् झाला आहे. अभिजानासि (आठवते ?) हे अभिज्ञावचन आहे.

अवसाव ६-१४२- येथे "न यदि" ३-२-११३ या सूत्राने लृट् चा निषेध झाल्याने लङः झाला आहे.

पास्यावः ६-१४२- येथे "विभाषा साकाङक्षे" ३-२-११४ या सूत्राने विकल्पाने भूते लृट् झाला आहे.

विदधे ६-१४३- येथे "परीक्षे लृट्" ३-२-११५ या सूत्राने अनद्यतन परीक्षार्थात लिट् लकार झाला आहे.

शश्वद बभूव ह् अकरोत् ६-१४३- येथे 'हशश्वतोर्लङः च' ३-२-११६ या सूत्राने अनुक्रमे शश्वत् आणि ह उपपद असताना लिट् लकार झाला आहे.

यानंतर ‘तच्छीलतद्धर्मतत्साधुकारी’ या अर्थात येणाऱ्या कृत् प्रत्ययाचा अधिकार येतो, तो असा-

पूरयितारः, कर्ता ७-१- येथे ‘तृन्’ ३-२-१३५ या सूत्राने साधु करोतीति कर्म या अर्थात तृन् प्रत्यय झाला आहे.

रोचिष्णवः, प्रजनिष्णूनाम् ७-२ - येथे ‘अलङःकृञ्निराकृञ’.... ३-२-१३६ या सूत्राने अनुक्रमें रुच् आणि प्रजन् धातुहून इष्णुच् प्रत्यय झाला आहे.

निराकरिष्णवः, वर्तिष्णवः, अलङःकरिष्णवः, चरिष्णवः ७-३- येथे देखील निराकृञ्, वृतु, अलंङःकृञ व चर् धातुहून इष्णुच् प्रत्यय झाला आहे.

जिष्णुः, ग्लास्नुः ७-४ - येथे ‘ग्लाजिस्थश्च ग्स्नुः’.... ३-२-१३९ या सूत्राने ग्स्नु प्रत्यय झाला आहे.

अधृष्णुवत् ७-४ - येथे ‘त्रसिगृधिकृषिक्षिपेः क्नु’.... ३-२-१४० या सूत्राने क्नु प्रत्यय झाला आहे.

भ्रमी ७-५ - येथे ‘शमित्यष्टाभ्यो घिनुण्’.... ३-२-१४१ या सूत्राने घिनुण् प्रत्यय झाला आहे.

संज्वारिणा, द्रोहि, खद्योतसम्पर्कि, आमोषि ७-६ - येथे ‘संपृचानुरुधाङःय....’.... ३-२-१४२ या सूत्राने ज्वर्, द्रुह्, सम्पुच्, मुष् या धातुहून घिनुण् प्रत्यय झाला आहे. तसेच

परिसारिण्यः, परिदेविनम्, अभ्याघातिभिः, परिराटिभिः ७-७ — येथे परिसृ, परिदेवि, अभ्याहन्, परिरट् या धातुहून घिनुण् प्रत्यय झाला आहे. तसेच

संसर्गी, परिदाही, आक्रीडिनः, परिवादिनः ७-८ — येथे संसृज्, परिदह्, आक्रीडः परिवद् या धातुहून घिनुण् प्रत्यय झाला आहे. तसेच

दैवानुरोधिन्यः, रागिणम् ७-९ — येथे अनुरुध, रज् धातुहून घिनुण् प्रत्यय झाला आहे. तसेच

परिक्षेपी, त्यागिनं, योगिनं, परिमोहिनम् ७-१० — येथे परिक्षिप्, त्यज्, युज् परिमुह्, या धातुहून घिनुण् प्रत्यय झाला आहे.

विकत्थी, अविस्रम्भी, ७-११ - येथे ‘वौ कषलसकत्थस्रम्भ’.... ३-२-१४३ या सूत्राने अनुक्रमें कत्थ, व स्रम्भ धातुहून घिनुण् प्रत्यय झाला आहे.

अपलाषिणः ७-१२ - येथे ‘अपे च लष’ ३-२-१४४ या सूत्राने लष् धातुहून घिनुण् प्रत्यय झाला आहे.

**अनुक्रमणिका**

प्रलापिनः, प्रमाथिनः ७-१२ - येथे 'प्रे लपसृद्रुमथवदवस' : ३-२-१४५ या सूत्राने प्र उपसर्गपूर्वक लप्, मथ् या धातुहून घिनुण् प्रत्यय झाला आहे.

हिंसकाः ७-१२- येथे 'निन्दहिंसक्लिश...' ३-२-१४६ या सूत्राने 'वृञ्' प्रत्यय होऊन 'वु' च्या ठिकाणी अकादेश होतो. तसेच

केशकः, निन्दकः, ७-१३ - येथे वुञ् प्रत्यय व अकादेश झाला आहे.

परिदेवकः ७-१३ - येथे 'देविक्रुशोश्चोपसर्गे' ३-२-१४७ या सूत्राने वुञ् झाला आहे.

चेष्टनैः, रवणैः ७-१४ - येथे 'चलनशब्दार्थादकर्मकाद्युच्' ३-२-१४८ या सूत्राने युच् प्रत्यय होऊन यु च्या स्थानी अनादेश झाला आहे.

उत्कण्ठावर्धनैः ७-१४ - येथे 'अनुदात्तेतश्च हलादेः' ३-२-१४९ या सूत्राने युच् झाला आहे. तसेच

द्योतनम् ७-१५ - येथेंहि युच् झाला आहे.

शोचनः, दन्द्रमणान् ७-१५ — येथे अनुक्रमें शुच् व द्रम् धातुहून युच् प्रत्यय झाला आहे. तसेच

गर्धनः, चङःक्रमणः ७-१६ - येथेहि युच् झाला आहे.

मण्डना, कोपनम् ७-१६ - येथे 'क्रुधमण्डार्थेभ्यश्च' ३-२-१५१ या सूत्राने मण्ड् व कुप् (हा क्रधार्थक आहे) धातुहून युच् प्रत्यय झाला आहे.

आप्यायितारम् ७-१७ - येथे 'न यः' ३-२-१५२ या सूत्राने युच् प्रत्ययाचा निषेध होतो म्हणून तृन् प्रत्यय झाला आहे. 'अनुदात्तेतश्च हलादेः' या सूत्राने युच् प्राप्त झाला होता.

दीपितारम् ७-१७ - येथे 'सूददीपदीक्षश्च' ३-२-१५३ या सूत्राने युच् चा निषेध झाला आहे.

वर्षुके, स्थायुकः, गामुकः ७-१८ - येथे 'लषपतपद..' ३-२-१५४ या सूत्राने अनुक्रमें वृष् स्था, गम् धातुहून उकञ् प्रत्यय झाला आहे.

जल्पाकीभिः ७-१९ - येथे 'जल्पभिक्षकुट्टलुण्टवृङः षाकन् ३-२-१५५ या सूत्राने जल्प् धातुहून षाकन् प्रत्यय झाला आहे.

अनुक्रमणिका

प्रजविना ७-१९ - येथे 'प्रजोरिनिः' ३-२-१५६ या सूत्राने प्र उपसर्गपूर्वक जु या सौत्र धातुहून इनि प्रत्यय झाला आहे.

जयिना ७-१९ - येथे 'जिदृक्षिविश्रीण्व' ३-२-१५७ या सूत्राने जि धातुहून इनि प्रत्यय झाला आहे. तसेच

विश्रयिणम्, अनादरिणम्, अभ्यमी, परिभवी, अव्यथिनम् ७-२० – येथे अनुक्रमे 'विश्री, इण्, अभि + अम्, परि + भू, अ + व्यथ् धातुहून इनि प्रत्यय झाला आहे.

स्पृहयालुं, निद्रालुं, अदयालुवत् ७-२१ येथे 'स्पृहिगृहिपति' ३-२-१५८ या सूत्राने अनुक्रमें स्पृह, निद्रा, दयि या धातुहून आलुच् प्रत्यय झाला आहे.

धारुं, सद्रु, द्रुतम् ७-२१ - येथे 'दाधेट्सिशदसदो रुः' ३-२-१५९ या सूत्राने अनुक्रमें धेट्, सद्, हा धातुहून रु प्रत्यय झाला आहे.

सृमरः, ७-२२ - येथे 'सृघस्यदः क्मरच्' २-३-१६० या सूत्राने सृ धातुहून क्मरच् प्रत्यय झाला आहे.

भङ्गुरप्रज्ञ, भासुरम् ७-२२ - येथे 'भञ्जभासमिदो घुरच्' ३-२-१६१ या सूत्राने अनुक्रमें भञ्ज् व भासू धातुहून घुरच् प्रत्यय झाला आहे.

विदुरः ७-२२ - येथे 'विदिभिदिच्छिदेः कुरच्' ३-२-१६२ या सूत्राने कुरच् प्रत्यय झाला आहे.

जित्वरः ७-२२ - येथे 'इण्नशजिसर्तिभ्यः क्वरप्' ३-२-१६३ या सूत्राने जि धातुहून क्वरप् प्रत्यय झाला आहे.

गत्वरान् ७-२२ - येथें 'गत्वरश्च' ३-२-१६४ या सूत्राने गम् धातुहून निपातनाने क्वरप् प्रत्यय झाला आहे.

जागरूकः ७-२३ - येथे 'जागरूकः' ३-२-१६५ या सूत्राने जागृ धातुहून ऊक प्रत्यय झाला आहे.

दन्दशूकः ७-२३ - येथे 'यजजपदशां यङः' ३-२-१६६ या सूत्राने गर्हितं दशतीति दन्दशूकः या अर्थात दंश् धातुहून ऊक प्रत्यय झाला आहे.

अकम्प्रं, दीप्रम् ७-२३ - येथे 'नमिकम्पि....' ३-२-१६७ या सूत्राने कम्पि, दीपी या धार्तुहून र् प्रत्यय झाला आहे. तसेच

कम्राभिः, ७-२४ - येथे कमु धातुहून र प्रत्यय झाला आहे.

आशंसुः ७-२४ - येथे 'सनाशंसभिक्ष उ' : ३-२-१६८ या सूत्राने आशंस् धातुहून उ प्रत्यय झाला आहे.

इच्छुः ७-२४ - येथे 'बिन्दुरिच्छुः' ३-२-१६९ या सूत्राने इच्छुः हे निपातन झाले आहे.

स्वप्नक् ७-२५ - येथे 'स्वपितृषोर्नजिङः' ३-२-१७२ या सूत्राने स्वप् धातुहून नजिङः प्रत्यय झाला आहे.

वन्दारुभिः ७-२५ - येथे 'शृवन्द्योरारुः' ३-२-१७३ या सूत्राने आरु प्रत्यय झाला आहे.

अभीरुः ७-२५ — येथे 'भियः क्रुक्लुकनौ' ३-२-१७४ या सूत्राने भी धातुहून क्रुक् प्रत्यय झाला आहे.

भासुराभिः, ईश्वरः ७-२५ - येथे 'स्थेशभासपिसकसो वरच्' ३-२-१७५ या सूत्राने भास्, व ईश् धातुहून वरच् प्रत्यय झाला आहे.

विद्युन्नाशम्, भासम्, विभ्राजम्, ७-२६ - येथे 'भ्राजभास....' ३-२-१७७ या सूत्राने अनुक्रमें द्युत्, भास्, भ्राज् या धातुहून क्विप् प्रत्यय झाला आहे.

यानंतर घञ् प्रत्यय येतो. असा —

काकुत्स्थपादपच्छायाम् ७-३२ - येथे 'पदरुज् ...' ३-३-१६९ येथे पद्यन्ते इति पादाः या अर्थात पद् धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

सारनिभम् ७-३३ - येथे 'सृ स्थिरे' ३-३-१७ या सूत्राने सृ धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

नंतर भावेऽकर्तरि च कारके असा अधिकार येतो.

शीतज्ञपर्शाम् ७-३२ - येथे 'अकर्तरि च कारके संज्ञायाम्' ३-३-१९ या सूत्राने स्पृश्यते इति स्पर्शः या अर्थात स्पृश् धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

एकनिश्चायम् ७-३४ - येथे 'परिमाणाख्यायां सर्वेभ्यः' ३-३-२० या सूत्राने घञ् प्रत्यय झाला आहे.

उपाध्यायः ७-३४ - येथे 'इङश्च' ३-३-२१ या सूत्राने उपाध्यायः या अर्थात घञ् प्रत्यय झाला आहे.

संरावम् ७-३५ - येथे 'उपसर्गे रुवः' ३-३-२२ या सूत्राने सम् + रु धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

चारुसन्द्रावम् ७-३५ - येथे "समि युद्रुदुवः" ३-३-२३ या सूत्राने सम् द्रु धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

अनुक्रमणिका

नायेन, यमश्रायम् ७-३६ - येथे 'श्रिणीभुवोऽनुपसर्गे' ३-३-२४ या सूत्राने णीञ् आणि श्रि धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

विश्रावैः, विश्राम् ७-३६ - येथे "वौक्षुश्रुवः" ३-३-२५ या सूत्राने क्षु व श्रु धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

उन्नायान् ७-३७ - येथे अवोदोर्नियः" ३-३-२६ या सूत्राने घञ् प्रत्यय झाला आहे.

प्रद्रावैः ७-३७ - येथे "प्रेद्रुस्तुस्रुवः" ३-३-२७ या सूत्राने घञ् प्रत्यय झाला आहे.

वनाभिलावन् ७-३७ - येथे "निरभ्योः पूल्वोः" ३-३-२९ या सूत्राने अभिलू या धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

उद्गार... ७-३८ - येथे "उन्योर्ग्रः" ३-३-२९ या सूत्राने उद्गृह धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

उत्कारेषु ७-६८ - येथे "कृ धान्ये" ३-३-३० या सूत्राने कृ धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

संस्तावम् ७-३९ - येथे "यज्ञे समि स्तुवः" ३-३-३१ या सूत्राने घञ् प्रत्यय झाला आहे.

पुष्पप्रस्तार... ७-३९ - येथे "प्रस्त्रोऽयज्ञे" ३-३-३२ या सूत्राने प्र + स्तृ या धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

विस्तारम् ७-४० - येथे "प्रथने वावशब्दे" ३-३-३३ या सूत्राने स्तृ धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

संग्राहः ७-४० - येथे "समि मुष्टौ" ३-३-३४ या सूत्राने सम्ग्रह् या धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

न्याय्यम् ७-४१ - येथे 'परिन्योर्नीणोद्यूताभ्रेषयोः' ३-३-३५ या सूत्राने नि + इ धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

पर्यायेण ७-४१ - येथे "परावनुपात्यय इणः" ३-३-३६ या सूत्राने परि + इ धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

निशोपशायः ७-४१ - येथे 'व्युपयोः शेतेः' ३-३-३७ या सूत्राने उप + शी धातुहून घञ्प्रत्यय झाला आहे.

फलोच्चायः ७-४१ - 'हस्तादाने चेरस्तेये' ३-३-४० या सूत्राने उत् + चि या धातुहून घञ् झाला आहे.

रक्षोनिकायेषु, स्तोककायैः ७-४२ - येथे 'निवासचिति...' ३-३-४१ या सूत्राने अनुक्रमें निवास आणि शरीर या अर्थांमध्यें घञ्प्रत्यय व क आदेश झाला आहे.

अनुक्रमणिका

शत्रुनिकायानाम् - ७-४२ - येथे ‘संघे चानौत्तराधर्ये’ ३-३-४२ या सूत्राने कर्मणि घञ् प्रत्यय व क आदेश झाला आहे.

व्यायहासीम् ७-४२ - येथे “कर्मव्यतिहारे णच् स्त्रियाम्” ३-३-४३ या सूत्राने स्त्रीलिंगी भावे णच् झाला आहे.

साराविणम् ७-४३ - येथे “अभिविधौ भावे इनुण्” ३-३-४४ या सूत्राने रु धातुहून इनुण् प्रत्यय झाला आहे.

निग्राहः ७-४३ - येथे ‘आक्रोशेऽन्योर्ग्रहः’ ३-३-४५ या सूत्राने नि + ग्रह् धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

प्रग्राहैः ७-४४ - येथे “प्रे लिप्सायाम्” ३-३-४६ या सूत्राने भावे या अर्थात घञ् प्रत्यय झाला आहे.

सपरिग्राहा ७-४५ - येथे “परो यज्ञे” ३-३-४७ या सूत्राने परि + ग्रह् धातुहून यज्ञ या अर्थात घञ् झाला आहे.

नीवार... ७-४६ - येथे “नौ वृ धान्ये” ३-३-४८ या सूत्राने नि + वृञ् या धातुहून घञ् प्रत्यय झाला आहे.

निरुद्द्रावाः ७-४६ - येथे “उदि श्रयति...” ३-३-४९ या सूत्राने घञ् प्रत्यय झाला आहे. तसेच

उच्छ्रायवान् ७-४७ - येथे उत् + श्रि या धातुहून घञ् झाला आहे.

आरावः दूराप्लावम् ७-४७ - येथें “विभाषा डि रुप्लवोः” ३-३-५० या सूत्राने अनुक्रमें आ + रु आणि आ + प्ल या धातुंहून घञ् प्रत्यय झाला आहे.

अवग्राहे ७-४८ - येथे “अवे ग्रहो वर्षप्रतिबन्धे” ३-३-५१ या सूत्राने वृष्टि प्रतिबंध या अर्थात घञ् झाला आहे. अवग्राह चा अर्थ वृष्टिप्रतिबंध असा आहे.

प्रग्राहवान् ७-४९ - येथे ‘प्रे वणिजाम्’ ३-३-५२ या सूत्राने घञ् प्रत्यय झाला आहे.

अप्रग्राहैः ७-५२ - येथे “रश्मौ च” ३-३-५३ या सूत्राने घञ् प्रत्यय झाला आहे.

प्रावारैः ७-५३ - येथे “वृणोतेराच्छादने ३-३-५४ या सूत्राने प्रा + वृञ् धातुहून आच्छादान अर्थात घञ् प्रत्यय झाला आहे.

परिभावम् ७-५४ - येथे “परौ भुवोऽवज्ञाने” ३-३-५५ या सूत्राने घञ् प्रत्यय झाला आहे परिभाव म्हणजे तिरस्कर.

**अनुक्रमणिका**

शिलोच्चयान् ७-५५ - येथें 'एरच्' ३-३-५६ या सूत्राने उत् + चि धातुहून अच् प्रत्यय झाला आहे.

लवम्, अतरान् ७-५५ - येथें "ऋदोरप्" ३-३-५७ या सूत्राने लूञ् व तु धातुहून अप् प्रत्यय झाला आहे.

विनिश्चयम् ७-५५ - येथे "ग्रहवृदृनिश्चिगमश्च" ३-३-५८ या सूत्राने अप् प्रत्यय झाला आहे.

असङ्घसाः ७-५६ - येथें "उपसर्गेऽदः" ३-३-५९ या सूत्राने सम् + अद् धातुहून अप् प्रत्यय झाला आहे.

अन्यादान ७-५६ - येथे "नौ ण च" ३-३-६० या सूत्राने नि + अद् धातुहून ण प्रत्यय झाला आहे.

सव्यधान् ७-५६ - येथे "व्यधजपोरनुसर्गे" ३-६-६१ या सूत्राने व्यध् धातुहून अप् प्रत्यय झाला आहे.

अस्वनाः, सहसाः ७-५७ - येथें स्वनहसोर्वा ३-३-६२ या सूत्राने अनुक्रमें स्वन्, हस् धातुहून अप् झाला आहे.

संयामवन्तः ७-५७ येथे 'यमः समुपनिविषु च" ३-३-६३ या सूत्राने अप् प्रत्यय झाला आहे.

निगदान् ७-५७ - येथे "नौ गदनदपठस्वनः" ३-३-६४ या सूत्राने नि + गद् धातुहून अप् प्रत्यय झाला आहे.

अनिक्वाणा ७-५८ - येंथे "क्वणो वीणायां च" ३-३-३५ या सूत्राने सांगितलेला अप् वैकल्पिक असल्याने "भावे" याने घञ् झाला आहे.

क्षीणपणाः ७-५८ – येथें - 'नित्यं पणः परिमाणे" ३-३-६६ या सूत्राने पण् धातुहून अप् प्रत्यय झाला आहे.

अमदाः ७-५८ - येथे "मदोऽनुपसर्गे" ३-३-६७ या सूत्राने अप् प्रत्यय झाला आहे.

ससम्मदाः ७-५९ - येथे "प्रमदसम्मदौ हर्षे ३-३-६८ या सूत्राने निपातन झाले आहे.

समजेन ७-५९ - येथे "समुदोरजः पशुषु" ३-३-६९ या सूत्राने अप् प्रत्यय झाला आहे.

उपसरम् ७-६० - येथे "प्रजने सर्ते" ३-३-७१ या सूत्राने उप + सृ धातुहून अप् प्रत्यय झाला आहे.

अन्योन्योपहवाः ७-६० - येथें 'ह्वः ष सम्प्रसारणं च ...' ३-३-७२ या सूत्राने उप +ह्वा धातुहून अप् प्रत्यय झाला आहे.

आहवप्रज्ञाः ७-६० - येथें "आङि युद्धे" ३-३-७३ या सूत्राने आहवः – येथे अप् प्रत्यय झाला आहे.

अनुक्रमणिका

आहावम् ७-६० - येथें निपानमाहावः ३-३-७४ या सूत्राने अप् प्रत्ययाचे निपातन झाले आहे.

हवम् ७-६१ - येथें "भावेऽनुपसर्गस्य ऽ" ३-३-७५या सूत्राने अप् प्रत्यय झाला आहे.

पिपासावधकाङ्क्षिणः ७-६१ - येथे 'हनश्च वधः' ३-३-७६ या सूत्राने वधादेश झाला आहे.

तमोघनप्रख्यम् ७-६१ - येथें "मूर्तौ घनः" ३-३-७७ या सूत्राने हन् धातुहून काढिण्य अर्थात अप् प्रत्यय व घन् प्रत्ययाचे निपातन झाले आहे.

अन्तर्घणे ७-६२ - येथे 'अन्तर्घणो देशे' ३-३-७८ या सूत्राने अन्तर पूर्वक हन् धातुहून अप् प्रत्यय व घनादेश झाला आहे. दार ओलांडल्यानंतर जो एक सावकाश भाग असतो त्याला अन्तर्घण म्हणतात.

प्रवाने ७-६२ - येथे "अगारैकदेशे प्रघणः प्रघानश्च ३-३-७९ या सूत्राने कर्मणि अप् प्रत्यय व वृद्धीचें निपातन झाले आहे. घराच्या प्रमुख दरवाजाच्या आंत व बाहेर दोन चौक असतात.त्यांना आलिन्द असेहि नांव आहे. त्यांतील बाह्य चौकाला प्रघण किंवा प्रघाण असें म्हणतात.

लौहोघन... ७-६२ - येथें "उघनोऽत्याधानम् ३-३-८० या सूत्राने आधिकरणार्थात अप् प्रत्ययाचे निपातन झाले आहे.

ललिताऽपघनाम् ७-६२ - येथे अपघनोऽङ्ग म्" ३-३-८१ या सूत्राने करणे अप् प्रत्ययाचे निपातन झाले आहे.

विघनेन्दु ७-६३ - येथें "करणेऽयोविद्रुषु" ३-३-८२ या सूत्राने विघनाः येथे करणे अप् व घनादेश झाला आहे.

स्तम्बघ्नपद... ७-६३ - येथे "स्तम्बे क च" ३-३-८३ या सूत्राने स्तम्बघनः येथे करणे क प्रत्यय झाला आहे.

परिघोरु - ७३-६३ — येथे परौ घः ३-३-८४ या सूत्राने करणे अप् व घनादेशाचे निपातन झाले आहे.

उपघ्नान् ७-६४ - येथे 'उपघ्न आश्रये' ३-३-८५ या सूत्राने अप् प्रत्यय व उपधेचा लोप निपातनामाने होतो.

सङ्घम् - उद्घान् ७-६४ - येथें 'सङ्घोद्धो गणप्रशंसयोः' ३-३-८६ या सूत्राने सङ्घः येथे + हन् धातुहून भावे अप् व टिलोपाचे निपातन तर उद्धाः येथे कर्मणि अप् प्रत्ययाचे निपातन होते.

**अनुक्रमणिका**

निघाऽनिघाः - ७-६५ - येथे ‘निघो निमितम्’ ३-३-८७ या सूत्राने निहन् धातुहून अप् प्रत्यय व टिलोपाचें निपातन झाले आहे.

लब्धिमैः - ७-६५ - येथे ‘ड्वितः क्त्रि’ ३-३-८८ या सूत्राने डुलभष् या डित् धातुहून क्त्रि प्रत्यय झाला आहे. पलीकडे त्याला मप् वगैरे होतात.

भ्राजथुमतीम् ७-६५ - येथे ‘द्विथोऽथृच्’ ३-३-८९ या सूत्राने अथुच् प्रत्यय झाला आहे.

रक्ष्णं, यत्नेन, ७-६६ - येथे ‘यजयाचयत’ -३-३-९० या सूत्राने रक्ष् या धातुहून नङः झाला आहे.
स्वप्ने ७-६६ - येथे “स्वपो नन्” -३-३-९१ या सूत्राने नन् प्रत्यय झाला आहे.

निधिवत् ७-६६ – येथे उघसर्गे घोः किः “३-३-९२ या सूत्राने धा धातुहून कि प्रत्यय झाला आहे.

जलधि… ७-६७ - येथे “कर्मण्यधिकरणे च” ३-३-९३ या सूत्राने जलं धीयतेऽस्मिन्निति जलधिः या अर्थात कि प्रत्यय झाला आहे.

सृष्टिः ७-६७ - येथे “स्त्रियां क्तिन्” ३-३-९४ या अर्थात कर्मणि क्तिन् प्रत्यय झाला आहे.

स्थितिम् ७-६८ – येथे हि क्तिन् झाला आहे.

यानंतर स्त्रीलिंगी स्थागापापचो भावे ३-३-९५ प्रत्यययाचा अधिकार येतो तो असा.

जूर्ति, कीर्ति, यूतीन्, ७-६९ - ‘ऊतियूतिजूति’ -३-३-९७ या सूत्राने क्तिन् प्रत्यय व दीर्घत्वाचे निपातन अनुक्रमें जु, कृत्, यु धातुंहून झाले आहे.

व्रज्यावती, ७-७० - येथे “व्रजयजोर्भावे क्यप्” -३-३-९८ या सूत्राने व्रज् धातुहून क्यप् प्रत्यय झाला आहे.

विद्या ७-७० - येथे ‘संज्ञायां समज…’ -३-३-९९ या सूत्राने विद् धातुहून क्यप् प्रत्यय झाला आहे.

… क्रियान् ७-७० - येथे ‘कृञः श च’ -३-३-१०० या सूत्राने श प्रत्यय, रिङादेश, व इयङः होतो.

इच्छातः ७-७० - येथे ‘इच्छा’ -३-३-१०१ या सूत्राने इष् धातुहून श प्रत्यय व छभावाचे निपातन झाले आहे.

चङःक्रमावतः ७-७० - येथे ‘अ प्रत्ययात्’ -३-३-१०२ या सूत्राने क्रम् धातुहून अ प्रत्यय झाला आहे.

अनुक्रमणिका

शिक्षया ७-७१ - येथे 'गुरोश्च हलः' -३-३-१०३ या सूत्राने शिक्ष् धातुहून अ प्रत्यय झाला आहे.

त्रपावन्त, व्यथाम् ७-७१ - येथे 'षिद्भिदादिभ्योऽङः' ३-३-१०४ या सूत्राने त्रपूष् षित् आणि व्यथ् भिदादी म्हणून अङः प्रत्यय झाला आहे.

चिन्तावन्तः, कथां, पूजाम् ७-७२ - येथे 'चिन्तिपूजि' -३-३-१०६ या सूत्राने चिन्ता, पूज्, कथ् धातुंहून अङः प्रत्यय झाला आहे.

उपधा ७-७२ - येथे 'आतश्चोपसर्गे' ३-३-१०६ या सूत्राने अङः झाला आहे.

प्रायोगापासनया ७-७३ - येथे 'ण्यासश्रन्थो युच्' ३-३-१०७ या सूत्राने आस् धातुहून युच् प्रत्यय झाला आहे.

प्रस्कन्दिकाम् ७-७४ - येथे 'रोगाख्यायां ण्वुल्बहुलम्' ३-३-१०८ या सूत्राने प्र + स्कन्द् धातुहून ण्वुल् प्रत्यय झाला आहे.

प्रस्कन्दिका = हगवण, ही रोगाची संज्ञा आहे.

शालभञ्जिका.... ७-७४ - येथे 'संज्ञायाम्' ३-३-१०९ या सूत्राने ण्वुल् प्रत्यय झाला आहे. ही एका विशिष्ट क्रीडेची संज्ञा आहे.

कारिम् ७-७५ - येथे 'विभाषाऽख्यान...' ३-३-११० या सूत्राने इञ् प्रत्यय झाला आहे. विभाषा असल्याने क्रियाम् येथे तो झाला नाही.

प्रायोपवेशिकाम् ७-७६ - येथे 'पर्यायार्ह...' -३-३-१११ या सूत्राने ण्वुच् प्रत्यय झाला आहे.

अजीवनिः ७-७७ - येथे 'आक्रोशे नञ्यनिः' -३-३-११२ या सूत्राने अनि प्रत्यय झाला आहे.

यानंतर स्त्रीलिंगी प्रत्यय सोडून इतर कृत् प्रत्ययांचा अधिकार येतो. तो असा –

अक्लेश्यम्, प्रपतनम् ७-७८ - येथे 'कृत्यल्युटो बहुलम्' -३-३-११३ या सूत्रांतील बहुलग्रहणामुळे भावसाधन प्रत्यय झाले आहेत.

मन्दगतः ७-७९ - येथे 'नपुंसके भावे क्तः' ३-३-११४ या सूत्राने भावे क्त प्रत्यय झाला आहे.

अशोभनः ७-७९ - येथे ‘ल्युट् च’ ३-३-११५ या सूत्राने ल्युट् प्रत्यय झाला आहे. पलीकडे त्याला अनादेश झाला.

देहव्रश्चनम् -७-८०... येथे ‘करणाधिकरणयोश्च’ ३-३-११७ या सूत्राने वृश्च्यते येनेति व्रश्चनम् अशा करण अर्थात ल्युट् झाला आहे.

आकरः ७-८० - येथे ‘पुंसि संज्ञायां घः प्रायेण’ ३-३-११८ या सूत्राने घ प्रत्यय झाला आहे.

गोचरः ७-८० - येथे ‘गोचरसंचर...’ -३-३-११९ या सूत्राने अधिकरणार्थात घ प्रत्ययाचे निपातन झाले आहे. तसेच

संचरः ७-८१ येथेहि घ प्रत्ययाचे निपातन झाले आहेत.

अवतारः ७-८२ - येथे ‘अवे तृस्त्रोर्घञ्’ -३-३-१२० या सूत्राने घञ् प्रत्यय झाला आहे.

अन्यायात् ७-८२ - येथे ‘अन्यायन्याय...’ -३-३-१२२ या सूत्राने नि + इ धातुहून घञ् झाला.

उदङकः... ७-८३ - येथे ‘उदङकोऽनुदके’ ३-३-१२३ या सूत्राने घञ् प्रत्ययाचे निपातन होते.

अनायः ७-८३ - येथे ‘जालमानाय’ -३-३-१२४ या सूत्राने करणार्थात घञ् प्रत्ययाचे निपातन होते.

आनाय चा अर्थ जाल असा आहे.

आखनम् ७-८३ - येथे ‘खनो घ च’ ३-३-१२५ या सूत्राने घ प्रत्यय झाला आहे.

दुर्लभम् ७-८३ - येथे ‘ईषद्...’ ३-३-१२६या सूत्राने खल् प्रत्यय झाला आहे. तयोरेव या सूत्राप्रमाणे तो खल् कर्मणि अर्थात झाला आहे.

ईषदाढयङकरः ७-८४ - येथें ‘कर्तृकर्मणोश्च’ ३-३-१२७ या सूत्राने च्व्यर्ते कर्मोपपदामुळे कृ धातुहून खल् प्रत्यय झाला आहे.

दुरुपस्थाने ७-८५ - येथे ‘आतो युच्’ ३-३-१२८ या सूत्राने खल् चा अपवाद युच् प्रत्यय झाला आहे. वरील सूत्रांतून ईषदादि अनुवृतीने येत असल्याने येथे दुर ह्या उपपदाची संगति लागते.

यानंतर विङत् अधिकार आला आहे.

अनुक्रमणिका

सङःकुटितुम्, अध्यगीढ्वषम् ६-९१ - येथे 'गाङः कुटादिभ्योऽञ्णिन्ङित्' १-२-१ या सूत्राने अनुक्रमे कुट्, इङः या धातुंहून झालेल्या प्रत्ययाला ङित् झाला आहे. ङित्वामुळे 'विङति च' या सूत्राप्रमाणे गुणवृद्धी होत नाही.

उद्विजितुम् ७-९२ - येथे 'विज इट्' १-२-२ या सूत्राने उद् + विज् धातुहून झालेल्या प्रत्ययाला ङित्व झाले आहे.

प्रोर्णुवित्रीम्, प्रोर्णवितुम्, ७-९३ - येथे 'विभाषोर्णोः' १-२-३ या सूत्राने ऊर्णुञ् धातुहून एकदा ङित्त्व झाले तर एकदा ते झाले नाही. म्हणुन दोन रूपें होतात.

कुरुत ७-९३ - येथे 'सार्वधातुकमपित्' १-२-४ या सूत्राने ङित्व होते म्हणून उ प्रत्ययाला गुण होत नाही.

ददृशुः ७-९४ - येथे 'असंयोगाल्लिट् कित्' १-२-५ या सूत्राने कित्त्व झाल्याने गुण झाला नाही.

बभूव ७-९५ - येथे 'इन्धिभवतिभ्यां च' १-२-६ या सूत्राने कित्त्व होते असें जयमंगल म्हणतात.

मृदित्वा, कृषित्वा ७-९५ - येथे 'न क्त्वा सेट्' या सूत्राप्रमाणे कित्वप्रतिषेध प्राप्त होतो. परंतु 'मृडमृदगुध...' १-२-७ या सूत्राने कित्त्व होते. तसेच

अमृडित्वा, क्लिशित्वा, उदित्वा ७-९६ – येथेहि कित्त्व होते.

मुषित्वा, गृहीत्वा, रुदित्वा ७-९७ - येथे 'रुदविदमुषग्रहि...' १-२-८ या सूत्राने कित्त्व झाले आहे. तसेच

पिपृच्छिषूणां विदित्वा ७-९८ – येथेहि कित्त्व झाले आहे. तसेच

अविविदिषुं, रुरुदिषुं, मुमुषिषुवत् ७-९९ येथेहि कित्त्च झाले आहे. सर्वत्र गुणाचा निषेध झाला आहे.

अपचिकीर्षया ७-९९ - येथे 'इको झल्' १-२-९ या सूत्राने कित् झाला आहे. म्हणून गुणाभाव झाला.

बुभुत्सवः, मा भुद्ध्वषम् - ७-१०० - येथे 'हलन्ताच्च' १-२-१० या सूत्राने कित्त्व झाले आहे.

भुत्सीध्वम् ७-१०० 'लिङः सिचावात्मनेपदेषु' १-२-११ या सूत्राने कित्त्व झाले आहे.

कृषीढ्वम् ७-१०० - येथे 'उश्च' १-२-१२ या सूत्राने कित्त्व झाले आहे.

समगध्वम् ७-१०१ - येथे 'वा गमः' १-२-१३ या सूत्राने विकल्पाने कित्त्व झाले आहे.

**अनुक्रमणिका**

उपायध्वम् ७-१०१ - येथे ‘यमो गन्धने’ १-२-१५ या सूत्राने सिच् ला कित्त्व झाले आहे.

उपायंस्त ७-१०१ - येथे ‘विभाषोपयमने’ १-२-१६ या सूत्राने विकल्पाने कित्त्व झाले नाही. म्हणून अनुनासिकाचा लोप झाला नाही.

प्रास्थिषत, आधिषत ७-१०२ - येथे ‘स्थाघ्वोरिच्च’ १-२-१७ या सूत्राने कित्त्व व इत्त्व झाले आहे.

वर्तित्वा ७-१०३ - येथे “न क्त्वा सेट्” १-२-१८ या सूत्राने कित्त्वाचा प्रतिषेध झाला आहे.

प्रक्ष्वेदिताः, अधिशयितम् ७-१०३ - येथे ‘निष्ठा शीङः’ १-२-१९ या सूत्राने कित्त्वाचा प्रतिषेध झाला आहे.

अमर्षितम् ७-१०४ - येथे ‘मृषस्तितिक्षायाम्’ १-२-२० या सूत्राने कित्त्वाचा प्रतिषेध झाला आहे.

द्युतितं, प्रलोठितम् ७-१०४ - येथे ‘उदुपधात्…’ १-२-२१ या सूत्राने कित्त्व झाले म्हणून द्युतितम् तर कित्त्व झाले नाही म्हणून प्रलोठिलम्. येथे कित्त्व झाले नाही म्हणून लधूपधगुण् झाला आहे. द्युतितम् हे भाव प्रलोठितम् हे आदिकर्मणीचें निदर्शन आहे.

ग्रन्थित्वा, गुम्फित्वा ७-१०५ - येथे ‘नोपधात्थफान्ताद्वा’ १-२-२३ या सूत्राने कित्त्वाचा निषेध झाला आहे. ग्रन्थित्वा हे उपधेचे तर गुम्फित्वा हे फकारान्ताचे निदर्शन आहे.

वञ्चित्वा, ७-१०६ - येथे ‘वञ्चिलुञ्च्यृतश्च १-२-८४ या सूत्राने कित्त्वाचा निषेध झाला म्हणून नलोप झाला नाही.

तृषित्वा -७-१०६ - येथे तृषिमृषि… १-२-२५ या सूत्राने कित्त्व झाले आहे.

द्युतित्वा, दिद्योतिषुम् ७-१०७ - येथे ‘रलो व्युपधात्…’ १-२-२६ या सूत्राने द्युतित्वा येथे कित्त्व झाले तर दिद्योतिषुम् येथे कित्त्व झाले नाही म्हणून गुण झाला आहे.

यानंतर आत्मनेपदाचा अधिकार येतो, तो असा –

अगाधत ८-१ - येथे ‘अनुदातङित आत्मनेपदम्’ १-३-१२ या सूत्राने गाधृ धातु अनुदातेत् असल्याने आत्मनेपद झाले आहे तर,

अत्यशेरत ८-१ – येथे शीङः धातु ङित् असल्याने आत्मनेपद झाले आहे.

अनुक्रमणिका

अभायत, गम्यमानम् ८-२ - येथे 'भावकर्मणोः' १-३-१३ या सूत्राने अनुक्रमें भावे व कर्मणि आत्मनेपद झाले आहे.

व्यत्यतन्वाताम् ८-३ - येथे 'कर्तरि कर्मव्यतिहारे' १-३-१४ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

व्यत्यैताम् ८-३ - येथे 'न गतिहिंसार्थेभ्यः' १-३-१५ या सूत्राने वरील सूत्राने प्राप्त झालेल्या आत्मनेपदाचा गत्यर्थत्वामुळे निषेध झाला आहे. तसेच व्यतिघ्नन्तीं, व्यतिघ्नन् ८-५- येथे हन् धातु हिंसार्थक असल्याने आत्मनेपदाचा निषेध झाला आहे.

व्यतियुतः ८-६ - येथे 'इतरेतराऽन्यो...' १-३-१६ या सूत्राने – कर्मव्यतिहारामुळे प्राप्त झालेल्या आत्मनेपदाचा निषेध केला आहे येथे अन्योन्यम् हे उपपद आहे.

न्यविक्षत ८-७ - येथे 'नेर्विशः' १-३-१७ या सूत्राने नि + विश् धातुहून आत्मनेपद झाले आहे.

परिक्रीणानम् ८-८ - येथे 'परिव्यवेभ्यः क्रियः' १-३-१८ या सूत्राने परि + क्री धातुहून आत्मनेपद झाले आहे, आणि ते अकर्त्रभिप्रायक्रियाफल असतांना झाले आहे.

अकर्त्रभिप्रायक्रियाफल = म्हणजे कर्त्याकडे क्रियेचे फल नसतांनाही आत्मनेपद व्हावे हे या सूत्राचे प्रयोजन आहे.

पराजयमानः विजेषीष्ठाः ८-९ - येथे 'विपराभ्यां जेः' १-३-१९ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

आदत्स्व ८-१० - येथे 'आङो दोऽनास्य... ' १-३-२० या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

परिक्रीडस्व, अनुक्रीडमानानि ८-१० - येथे 'क्रीडोऽनुसंपरिभ्यश्च' १-३-२१ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

अवतिष्ठस्व, प्रस्थास्यसे, संस्थास्यसे ८-११ - येथे 'समवप्रविभ्यः स्थः' १-३-२२ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

तिष्ठते, तिष्ठामहे ८-१२ - येथे 'प्रकाशनस्थेयाख्यायोश्च' १-३-२३ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे. प्रकाशन म्हणजे स्वाभिप्रायबोधनम् अर्थात स्वतःच्या हेतूचे आविष्करण, तर स्थेय म्हणजे विवादपदनिर्णेता अर्थात विवादांत निर्णय देणारा. या ठिकाणी मैनाक हनुमंताला म्हणतों की, तुझ्यावर आमची प्रीति आहे म्हणून संदेह उत्पन्न झाल्यास आम्हाला दुसऱ्या निर्णेत्याची आवश्यकता नाही. तिष्ठते येथे स्थेयाख्या तर तिष्ठामहे येथे प्रकाशनाख्या आहे.

उत्तिष्ठमानम् ८-१२ - येथे 'उदोऽनूर्ध्वकर्मणि' १-३-२४ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

उपतिष्ठन्ते ८-१३ - येथे 'उपान्मन्त्रकरणे' १-३-२५ या सूत्राने मन्त्रकरण या अर्थात आत्मनेपद झाले आहे.

उपतिष्ठस्व ८-१४ - येथे 'अकर्मकाच्च' १-३-२६ या सूत्राने उप + स्था अकर्मक धातुहून आत्मनेपद झाले आहे.

वितपते ८-१४ - येथे 'उद्विभ्यां तपः' १-३-२७ या सूत्राने वि + तप् धातुहून आत्मनेपद झाले आहे.

आध्नानः ८-१५ - येथे 'आङो यमहनः' १-३-२८ या सूत्राने आ + हन् धातुहून आत्मनेपद झाले आहे.

सङःगच्छस्व ८-१६ - येथे 'समो गम्यृच्छिभ्याम्' १-३-२९ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

संश्रृणुष्व, समारन्त ८-१६ - येथे 'अर्तिश्रुदृशि...' या वार्तिकाने आत्मनेपद झाले आहे.

उपाह्वणये, संह्व यस्व ८-१७ - येथे 'निसमुपविभ्यो ह्वः ' १-३-३० या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

संविद्रते ८-१७ - येथे 'विदिप्रच्छि...' या वार्तिकाने आत्मनेपद झाले आहे.

आह्वदयमानम् ८-१८ – येथे स्पर्धा अर्थ गम्यमान असतांना आत्मनेपद झाले आहे. येथे आकाश आणि मैनाक पर्वत यांच्यातील स्पर्धा गम्यमान आहे.

प्रकुर्वाणः ८-१८ - येथे 'गन्धनावक्षेपण...' १-३-३२ या सूत्राने सेवन या अर्थात आत्मनेपद झाले आहे. सेवकाप्रमाणे सेवा करीत असलेल्या मैनाकाला हनुमंताने पाहिले, असा सेवनार्थ येथे विवक्षित आहे. इतर अर्थाचीं निदर्शनें अशी –

प्रकुर्वाणम् ८-१९ – येथे साहसिक्य हा अर्थ आहे.

उपस्कृथाः ८-१९ - येथे प्रतियत्न हा अर्थ आहे.

उपचक्रे ८-२० – येथे गन्धन म्हणजे हिंसा, चुगली हा अर्थ आहे. सीतेला वनांतून पळवून नेले हा गंधनार्थ आहे.

अधिचक्रे ८-२० - येथे 'अधेः प्रहसने' १-३-३३ या सूत्राने- प्रहसन म्हणजे क्षमा करणे किंवा जिंकणे, इंद्र देखील ज्याला सहन करू शकला नाही असा अर्थ येथे विवक्षित आहे. म्हणून आत्मनेपद झाले आहे.

विकुर्वाणः ८-२० - येथे 'वेः शब्दकर्मणः' १-३-३४ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे. विविधान्स्वरान् कुर्वाणः असा विकुर्वाणः चा अर्थ आहे.

विकुर्वे ८-२१ - येथे 'अकर्मकाच्च' १-३-३५ या सूत्राने वि + कृ धातुहून तो अकर्मक असतांना आत्मनेपद झाले आहे.

विनेष्ये, उदानेष्ये ८-२१ - येथे 'संमाननोत्सञ्जन...' १-३-३६ या सूत्राने व्यय, व उत्सञ्जन या अर्थात आत्मनेपद झाले आहे.

विनेष्ये ८-२२ - येथे 'कर्तृस्थे चाशरीरे कर्मणि' १-३-३७ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे कारण क्रोधरूपी कर्म हे शरीरावयवभिन्न आहे.

क्रममाणः ८-२२ - येथे 'वृत्तिसर्गतायनेषु क्रमः' १-३-३८ या सूत्राने क्रम् धातुहून वृत्ति म्हणजे प्रतिबंध नसणे या अर्थात आत्मनेपद झाले आहे तर

उपाक्रंस्त ८-२३ - येथे सर्ग या अर्थात झाले आहे.

पराक्रंस्तः ८-२२ - येथे 'उपपराभ्याम्' १-३-३९ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

आक्रममाणा ८-२३ - येथे 'आङः उद्गामने' १-३-४० या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

विक्रममाणाया ८-२४ - येथे 'वेः पादविहरणे' १-३-४१ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

प्रक्रममाणः, उपाक्रंस्त ८-२५ — प्रोपाभ्यां समर्थाभ्याम्' १-३-४२ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

क्रममाणैः ८-२५ - येथे 'अनुपसर्गाद्वा' १-३-४३ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

अपजानानः ८-२६ - येथे 'अपह्नावे ज्ञः' १-३-४४ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

ज्ञास्ये ८-२६ - येथे 'अकर्मकाच्च' १-३-४५ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

प्रत्यज्ञास्त ८-२६ - येथे 'संप्रतिभ्यामनाध्याने' १-३-४६ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे. आध्यान म्हणजे उत्कंठापूर्वक स्मरण असा अर्थ आहे. हे प्रति + ज्ञा चे निदर्शन आहे.

संजानानान् ८-२७ —हे सम् + ज्ञा धातूचे निदर्शन आहे.

वदमानः ८-२७ - येथे 'भासनोपसंभाषाज्ञान'... १-३-४७ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे. हे ज्ञानाचे निदर्शन आहे. बाकी निर्दशने अशीं –

उपावदिष्ट ८-२८ - येथे उपसंभाषा (उपसान्त्वन) या अर्थात आत्मनेपद झाले आहे.

व्यवदिष्ट ८-२८ – येथे विमती या अर्थात झाले आहे. विमतीचा अर्थ मतभेद असा आहे.

संप्रवदमानात् ८-२८ - येथे 'व्यक्तवाचां समुच्चारणे' १-३-४८ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे. मनुष्यादिकांचे स्पष्ट उच्चारण, एकत्र (सामुदायिक रीतीने) होत असतांना असा अर्थ येथे आहे.

अन्ववदिष्ट ८-२९ - येथे 'अनोरकर्मकात्' १-३-४९ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

विप्रवदमानैः ८-३० - येथे 'विभाषा विप्रलापे' १-३-५० या सूत्राने आत्मनेपद झाले आहे. या ठिकाणी हनुमान परस्पर विरुद्ध (अर्थ) बोलणाऱ्या राक्षसांच्या लंकेंत पोचला असा अर्थ आहे.

अवगिरमाणैः ८-३० - येथे 'अवाद्ग्र ' १-३-५१ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

संगिरन्ते ८-३१ - येथे 'समः प्रतिज्ञाने' १-३-५२ या सूत्राने सम् + गृ या धातुहून प्रतिज्ञान (कबूल करणे) अर्थात आत्मनेपद झाले आहे.

उदचरन्त ८-३१ - येथे 'उदश्चरः सकर्मकात्' १-३-५३ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

समचरन्त ८-३२ - येथे 'समस्तृतीयायुक्तात्' १-३-५४ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे. येथे यानैः या तृतीयान्त पदाशी योग आहे.

संप्रायच्छन्त ८-३२ - येथे 'दाणश्च सा चेच्चतुर्थ्यर्थे' १-३-५५ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे. येथे बन्दीभिः या वस्तुतः तृतीया असलेल्या पदाचा हठहृतमहिलाभ्यः असा चतुर्थीचा अर्थ अभिप्रेत आहे. म्हणून सम् + दा धातुहून संप्रायच्छन्त असे आत्मनेपद झाले.

उपांयसत ८-३३ - येथे 'उपाद्यमः स्वकरणे' १-३-५६ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे. सूत्रांतील स्वकरण शब्दाचा स्वीकार असा अर्थ आहे. प्रियकरांनी दिलेल्या मदिरेचा, क्रोधामुळे संतप्त झालेल्या स्त्रियांनी स्वीकार केला नाही. असा येथे अर्थ आहे. म्हणून उप + यम् धातुहून आत्मनेपद झाले आहे.

जिज्ञासमानाभ्यः ८-३३ - येथे 'ज्ञाश्रुस्मृदृशां सनः' १-३-५७ या सूत्राने सन्नन्त ज्ञा धातुहून आत्मनेपद झाले आहे. तसेच

अनुक्रमणिका

सुस्मूर्षमाणः ८-३४ — येथेहि सन्नन्त धातुहून आत्मनेपद झाले आहे.

अशप्सत ८-३३ - येथे 'शप उपालम्भे' या वार्तिकाने आत्मनेपद झाले आहे.

अनुजिज्ञासता ८-३५ - येथे 'नानोर्ज्ञः' १-३-५८ या सूत्राने आत्मनेपदाचा निषेध झाला आहे. 'ज्ञाश्रुस्मृ...' सूत्राने ते प्राप्त झाले होते.

आशुश्रूषन् ८-३६ - येथे 'प्रत्याङ्भ्यां श्रुवः...' १-३-५९ या सूत्राने आत्मनेपदाचा निषेध झाला आहे. 'ज्ञाश्रुस्मृ' सुत्राने ते प्राप्त झाले होते.

शीयमाना ८-३६ - येथे 'शदे शितः' १-३-६० या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

म्रियेत ८-३७ - येथे 'म्रियतेर्लुङ्लिङोश्च' १-३-६१ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे. म्रियेत हा लिङः लकार आहे.

अध्यासिसिषमाणे ८-३८ - येथे 'पूर्ववत्सन' १-३-६२ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे. आस उपवेशने हा धातु अनुदात्तेत् म्हणून आत्मनेपदी आहे. त्याच्या सन्नन्नाहून देखील आत्मनेपद झाले आहे.

कासाञ्चक्रे ८-३८ - येथे 'आम्प्रत्ययवत्...' १-३-६३ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

उपायुङ्क्त, प्रयुञ्जानः ८-३९ - येथे 'प्रोपाभ्यां युजेः'.... १-३-६४ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे. यज्ञपात्र असा अर्थ नसतांना या सूत्राने आत्मनेपद होते.

संक्ष्णुवानः ८-४० - येथे 'समः क्ष्णुवः' १-३-६५ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

उपाभुङ्क्त ८-४० - येथे 'भुजोऽनवने' १-३-६६ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

अपाययत ८-४१ - येथे 'णैरणौ...' १-३-६७ या सूत्राने पा धातूच्या णिजन्ताहून आत्मनेपद झाले आहे.

अविस्मापयमानः, अभीषयन्त ८-४२ - येथे 'भीस्म्योर्हेतुभये' १-३-६८ या सूत्राने णिजन्त स्मि आणि भी धातुहून आत्मनेपद झाले आहे.

अगर्धयत, अवञ्चयत ८-४३ - येथे 'गृधिवञ्च्योः...' १-३-६९ या सूत्राने गृध् आणि वञ्च् यांच्या ण्यन्ताहून आत्मनेपद झाले आहे.

अनुक्रमणिका

अपलापयमानस्य ८-४४ - येथे 'लियः संमानन...' १-३-७० या सूत्राने शालीनीकरण या अर्थात आत्मनेपद झाले आहे.

मिथ्याकारयते ८-४४ - येथे 'मिथ्योपपदात्...' १-३-७१ या सूत्राने मिथ्या उपपदपूर्वक कृ धातूच्या ण्यन्ताहून आत्मनेपद झाले आहे. अभ्यास म्हणजे पुन पुनः करणे.

गूहमानः ८-४५ – येथे स्वरितञ्तिः...' १-३-७२ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

अपवदमानस्य ८-४५ - येथे 'अपाद्वदः' १-३-७३ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे.

द्योतयमानाभिः ८-४६ - येथे 'णिचश्च' १-३-७४ या सूत्राने णिजन्त द्युत् धातुहून आत्मनेपद झाले आहे.

आयच्छमानाभिः ८-४६ - येथे 'समुदाङःभ्यो...' १-३-७५ या सूत्राने आ + यम् धातुहून आत्मनेपद झाले आहे.

उद्यच्छमानाभिः ८-४७ – येथे उद् + यम् धातुहून आत्मनेपद झाले आहे.

जानानाभिः ८-४७ - येथे 'अनुपसर्गाज्ज्ञः' १-३-७६ या सूत्राने ज्ञा धातुहून आत्मनेपद झाले आहे.

वहमानाभिः ८-४९ - येथे 'विभाषोपपदेन प्रतीयमाने' १-३-७७ या सूत्राने आत्मनेपद झाले आहे. ही अप्राप्तविभाषा आहे. कारण 'स्वरितजित...' या सूत्राने त्या क्रियेचे फल कर्त्याकडे जात असेल तर आत्मनेपद सांगितले आहे. परंतु हे कार्य एखाद्या उपपदाने करून टाकले तर तेथे परस्मैपद होईल. म्हणजे परस्मैपद अप्राप्त होते. तें या सूत्राने प्राप्त करून दिले. म्हणून ही अप्राप्त विभाषा आहे.

पिबन्तीभिः ८-४९ - येथे 'शेषात्कर्तरि...' १-३-७८ या सूत्राने परस्मैपद झाले आहे.

पराकुर्वन् अनुकुर्वत् ८-५० - येथे 'अनुपराभ्यांकृञः' १-३-७९ या सूत्राने परस्मैपद झाले आहे.

अभिक्षिपन्तम् ८-५१ - येथे 'अभिप्रत्यतिभ्यः क्षिपः' १-३-८० या सूत्राने परस्मैपद झाले आहे.

प्रवहन्तम् ८-५२ - येथे 'प्राद्वहः' १-३-८१ या सूत्राने परस्मैपद झाले आहे.

परिमृष्यन्तम् ८-५२ - येथे 'परेमृषः' १-३-८२ या सूत्राने परस्मैपद झाले आहे.

आरमन्तम् ८-५२ - येथे 'व्याङःपरिभ्यो रमः' १-३-८३ या सूत्राने आ + रम् धातुहून आत्मनेपद झाले आहे. तसेच

व्यरमत्, पर्यरमत् ८-५२ – येथेंहि वि + रम्, परि + रम् या धातूंवरून परस्मैपद झाले आहे.

उपारंसीत् ८-५४ - 'उपाच्च' या अधिकारांत 'विभाषाऽकर्मकात्' १-३-५४ या सूत्राने परस्मैपद झाले आहे. विकल्पाने हे होत नाही. तेंव्हा उपारंस्त ८-५५ असे आत्मनेपद होते

अविबोधयन् ८-५६ - येथे 'बुधयुधजन...'१-३-८६ या सूत्राने परस्मैपद झाले आहे. तसेच

प्रावयन्तीम् ८-५९ – येथे प्रु धातुहून परस्मैस्पद झाले आहे.

अचलयन् ८-६० - येथे 'निगरणचलनाऽर्थेभ्यश्च' १-३-८७ या सूत्राने परस्मैपद झाले आहे.

अयोधयत् ८-५६ - येथे 'अणावकर्मकात्...' १-३-८८ या सूत्राने परस्मैपद झाले आहे. आणखी कांही निदर्शनें :-

नाशयेयम्, जनयेयम् ८-५७ - येथे परस्मैपद झाले आहे.

द्रावयिष्यामि, ८-५८ - येथे परस्मैपद झाले आहे.

अत्रासयन् ८-६० - येथे परस्मैपद झाले आहे.

आयासयन्त, नर्तयमानवत् ८-६१ - येथे 'न पादम्याङ्य...' १-३-८९ या सूत्राने परस्मैपदाचा निषेध केला आहे.

अपायतत ८-६२ – येथे वरील सूत्राने परस्मैपदाचा निषेध केला आहे आहे. तसेच

प्रादमयन्त, परिमोहयमाणाभिः ८-६३ - येथे परस्मैपदाचा निषेध केला आहे.

वासयते स्म, अरोचयत ८-६४ - येथेहि परस्मैपदाचा निषेध केला आहे.

शकशकायद्भिः, हरितायत्... ८-६५ - येथे 'वा क्यषः' १-३-९० या सूत्राने विकल्पाने परस्मैपद झाले आहे.

अस्यदन्, अलोठिषत ८-६६ - येथे 'घुद्भ्यो लुङि' १-३-९१ या सूत्राने अनुक्रमें परस्मैपद झाले तर अलोठिषत येथे ते विकल्पाने झाले नाही.

विवृत्सन्तं, वर्त्स्यत्सिद्धिम् ८-६७ - येथे 'वृद्भ्यःस्यसनो' १-३-९३ या सूत्राने परस्मैपद झाले आहे. एक सन्नन्ताचे तर दुसरे स्यचे निदर्शन आहे. तसेच

वर्तिष्यमाणम् ८-६८ - येथे विकल्पाने परस्मैपद झाले नाही.

निरवर्त्स्यत् ८-६९ – येथे विकल्पाने परस्मैपद झाले आहे.

अकल्प्स्यत् ८-६९ - येथे 'लृटि च क्लृपः' १-३-९३ या सूत्राने परस्मैपद झाले आहे. यानंतर कारकाधिकार येतो, तो असा –

वृक्षात् ८-८० - येथे ध्रुवमपायेऽपादानम् १-४-८४ या सूत्राने अपादान संज्ञा झाली आहे. 'अपादाने पंचमी' या सूत्राने त्या अपादान संज्ञकांची सर्वत्र पंचमी होते.

शत्रोः, रावणात, ८-७० - येथे 'भीत्रार्थानां भयहेतुः' १-४-२५ या सूत्राने अपादान संज्ञा झाली आहे. अनुक्रमें त्राणम् आणि बिभ्यतीम् यांचा येथे प्रयोग आहे. त्राणाचा व भयाचा हेतु शत्रोः व रावणात् ह्यांना अपादान संज्ञा झाली.

प्रीतेः ८-७१ - येथे 'पराजेरसोढ' १-४-२६ या सूत्राने पराजयमानाम् या पदाच्या योगाने अपादान संज्ञा झाली आहे. येथे प्रीति असोढ अर्थ आहे.

दशाननात् ८-७१ - येथे 'वारणार्थानामीप्सितः' १-४-२७ या सूत्राने अपादान संज्ञा झाली आहे.

रक्षोभ्यः ८-७१ - येथे 'अन्तर्धौ येन...' १-४-२८ या सूत्राने अन्तर्दधानाम् (राक्षसांनी मला पाहू नये) या पदाच्या योगाने अपादान संज्ञा झाली आहे.

रामात् ८-७२ - येथे 'आख्यातोपयोगे' १-४-२९ या सूत्राने अधीतसंदेशः या पदाच्या योगे अपादान संज्ञा झाली आहे. येथे राम आख्याता आहे हनुमान रामाचा संदेश अत्यंत सावधानपणाने भक्तिपूर्वक ऐकतो. तो नियमपूर्वक ग्रहण केल्याने विद्येप्रमाणे समजला आहे.

वायोः ८-७२ – येथे जनिकर्तुः प्रकृति १-४-३० या सूत्राने जातः या पदाच्या योगाने अपादान संज्ञा झाली आहे. हनुमानाच्या जन्माची प्रकृति म्हणजे कारण वायु आहे. त्याला अपादान संज्ञा झाली आहे.

आदित्यात् ८-७२ - येथे 'भुवः प्रभवः' १-४-३१ या सूत्राने प्रभवन्तीम् पदाच्या योगे अपादान संज्ञा झाली आहे. सीता अत्यंत तेजस्विनी असल्याने ती जणू सूर्यापासून उत्पन्न झाली कीं काय असें वर्णन केले आहे.

**अनुक्रमणिका**

रक्षोभ्यः ८-७३ - येथे 'कर्मणा यमभिप्रैति स संप्रदानम्' १-४-३२ या सूत्राने सम्प्रदान संज्ञा होते. संप्रदान संज्ञक पदाची चतुर्थी – 'चतुर्थी संप्रदाने' या सूत्राने होते.

कुदृष्टिभ्यः ८-७३ - येथे 'रुच्यर्थानां प्रीयमाणः' १-४-३३ या सूत्राने संप्रदान संज्ञा झाली आहे. रोचमानः हा प्रीयमाण अर्थ आहे.

परस्त्रीभ्यः ८-७३ - येथे 'श्लाघह्नुनङः' -१-४-३४ या सूत्राने संप्रदान संज्ञा झाली आहे. श्लाघमानः चा येथे प्रयोग असून तो ज्ञीप्स्यमान (जाणवून देण्यास योग्य) अर्थ आहे.

सीतायै ८-७४ - येथे 'श्लाघह्नुसङः...' -१-४-३४ या सूत्राने निह्नुवानः असा ह्नुतङः चा प्रयोग असल्याने संप्रदान संज्ञा झाली आहे.

एतस्यै ८-७४ - येथे धारेरुत्तमर्णः १-४-३५ या सूत्राने संप्रदान संज्ञा झाली आहे. धारयन् असा धृ धातूचा प्रयोग असल्याने उत्तमर्ण असलेल्या एतस्यै ह्या पदाला प्रस्तुत संज्ञा होते.

तस्यै ८-७५ - येथे 'स्पृहेरीप्सितः' १-४-३६ या सूत्राने संप्रदान संज्ञा झाली आहे. स्पृहमानः असा स्पृह, धातूचा प्रयोग असून तस्यै हा ईप्सितार्थ आहे.

सीतायै ८-७५ - येथे 'क्रुधद्रुहेर्ष्या...' १-४-३७ या सूत्राने संप्रदान संज्ञा झाली आहे. अक्रुध्यत्, असूयत यांचा येथे प्रयोग आहे.

माम् ८-७६ - येथे 'क्रुधद्रुहो...' १-४-३८ या सूत्राने कर्म संज्ञा झाली आहे. सम् + क्रुध असा सोपसर्ग क्रुध् धातूचा येथे प्रयोग आहे. म्हणून कर्म संज्ञा होऊन 'कर्मणि द्वितीया' या सूत्राने द्वितीया झाली आहे.

परस्त्रीभ्यः ८-७६ - येथे 'राधीक्ष्यो' १-४-३९ या सूत्राने संप्रदान संज्ञा झाली आहे. ईक्षितव्यम् असा ईक्ष् धातूचा प्रयोग असून 'परस्त्रीच्या संबंधात अनेक प्रश्न विचारून तिचे दर्शन करणे' हा अर्थ अभिप्रेत आहे.

श्रृण्वद्भ्यः ८-७७ - येथे 'प्रत्याङःभ्यां श्रुवः पूर्वस्य' १-४-४० या सूत्राने संप्रदान संज्ञा झाली आहे. प्रतिश्रृण्वन्ति असा प्रति + श्रृ चा येथे प्रयोग आहे.

गृणद्भ्यः ८-७७ - येथे 'अनुप्रतिगृणश्च' १-४-४१ या सूत्राने संप्रदान संज्ञा झाली आहे.

स्नेहेन ८-७८ - येथे 'साधकतमं करणम्' १-४-४२ या सूत्राने करण संज्ञा झाली आहे. करण संज्ञकाची 'कर्तृकरणयोस्तृतीयां' या सूत्राने सर्वत्र तृतीया विभक्ति होत असते.

अनुक्रमणिका

विषयान् ८-७८ - येथे ‘दिवः कर्म च’ १-४-४३ या सूत्राने विकल्पाने कर्मसंज्ञा झाली आहे. दीव्यन्ती या पदाच्या योगें करण संज्ञेची अपवाद असलेली ही कर्मसंज्ञा झाली आहे.

संभोगाय ८-७८ - येथे ‘परिक्रयणे संप्रदान...’ १-४-४४ या सूत्राने परिक्रीतः या पदाच्या योगें विकल्पाने संप्रदान संज्ञा झाली आहे.

सौधे ८-७९ - येथे ‘आधारोऽधिकरणम्’ १-४-४५ या सूत्राने अधिकरण संज्ञा झाली आहे. अधिकरण संज्ञकाची ‘सप्तम्यधिकरणे च’ या सूत्राने सर्वत्र सप्तमी विभक्ती होते.

वनम् ८-७९ - येथे ‘अधिशीङः...’ १-४-४६ या सूत्राने आधाराची कर्मसंज्ञा झाली आहे. येथे अधि + स्था धातूचा प्रयोग आहे तर

शय्याम् ८-७९ - येथे अधि + शीङः धातूचा प्रयोग आहे.

मनः ८-८० - येथे ‘अभिनिविशश्च’ १-४-४७ या सूत्राने आधाराची कर्मसंज्ञा झाली आहे. अभि + नि + विश् – अधिन्यविक्षथाः चा येथे प्रयोग आहे.

भुवम् ८-७९ - येथे ‘उपान्वध्याङःवसः’ १-४-४८ या सूत्राने आधारभूत भुवम् ला कर्मसंज्ञा झाली आहे.

अधिवात्सीः अधि + वस् चे निदर्शन आहे.

हृदयम् ८-८०- येथे अध्यावसन्तम् अधि + आ + वस् चे हे निदर्शन आहे.

जगत्पतिम् ८-८१ - येथे ‘कर्तुरीप्सित...’ १-४-४९ या सूत्राने कर्मसंज्ञा झाली आहे. कर्त्यासंबंधीची जी अवमान क्रिया, तिने जगत्पतीला मिळविणे इष्टतम आहे म्हणून जगत्पतिम् येथे कर्मसंज्ञा झाली आहे.

काकुत्स्थम् ८-८१ - येथे ‘तथायुक्तं ...’ १-४-५० या सूत्राने कर्मसंज्ञा झाली आहे.

पाषाणम् ८-८२ - येथे ‘अकथितं च’ १-४-५१ या सूत्राने अकथित कर्मसंज्ञा झाली आहे. अकथित कर्म म्हणजे गौण कर्म. दुह्, याच् इत्यादि सोळा धातूंना एक मुख्य व दुसरे गौण अशी दोन कर्मे असतात. त्याना द्विकर्मक धातु असे म्हणतात. त्यांतील गौण कर्माला ही अकथित संज्ञा होते. येथे दुह् धातूचे पयः हे मुख्य कर्म तर पाषाणम् हे गौण – अकथित कर्म आहे.

भवतीम् ८-८२ - येथे ‘गतिबुद्धि...’ १-४-५२ या सूत्राने बोधयन्तम् या बुद्धयर्थक पदामुळे अणिकर्त्याला (भवतीम् अशी) कर्मसंज्ञा झाली आहे.

अनुक्रमणिका

भवतीम् ८-८३ - येथे प्रत्यवसानार्थक भुज् धातूचा प्रयोग आहे म्हणून भवतीम् या आणि कर्त्याला कर्मसंज्ञा झाली आहे.

आत्मानम् ८-८३ - येथे शब्दकर्मक लप् धातूचा प्रयोग आहे. म्हणून कर्मसंज्ञा झाली आहे.

रावणम् ८-८३ — शीङः या अकर्मक धातूचा प्रयोग असल्याने कर्मसंज्ञा झाली आहे.

रक्षोभिः माम् ८-८४ - येथे 'ह्रक्रोरन्यतरस्याम्' १-४-५३ या सूत्राने आणि कर्त्याला कर्मसंज्ञा विकल्पाने सांगितली असल्याने रक्षोभिः येथे ती झाली नाही म्हणून तृतीया झाली तर माम् येथे कर्मसंज्ञा झाली म्हणून द्वितीया झाली आहे.

शक्रेण ८-८४ - येथे 'स्वतन्त्रः कर्ता' १-४-५४ या सूत्राने कर्तृसंज्ञा होऊन कर्तरि तृतीया झाली आहे.

सीता ८-८४ - येथे 'तत्प्रयोजको हेतुश्च' १-४-५५ या सूत्राने प्रयोजक कर्ता झाला आहे.

यानंतर कर्मप्रवचनीयाचा अधिकार सांगितला आहे. तो असा-

अनु ८-८५ - येथे 'अनुर्लक्षणे' १-४-८४ या सूत्राने कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. ते येथे हेतुभूत विवक्षित आहे. कर्मप्रवचनीय संज्ञकाचा ज्याच्याशी संबंध येतो त्याची सर्वत्र द्वितीया 'कर्मप्रवचनीययुक्ते द्वितीया' या सूत्राने होते. याप्रमाणे वचनम् येथे द्वितीया झाली आहे.

पापानु ८-८५ - येथे 'तृतीयार्थे' १-४-८५ या सूत्राने कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. तद्योगे पापम् येथे द्वितीया होते.

अनु ८-८६ - येथे 'हीने' १-४-८६ या सूत्राने कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. तद्योगे रामम् येथे द्वितीया होते.

उप ८-८६ - येथे 'उपोऽधिके च' १-४-८७ या सूत्राने कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. तद्योगे शूरेषू येथे 'यस्मादधिकं... सप्तमी' या सूत्राने सप्तमी होते. तर

उप ८-८७ — येथे सूत्रांतील चकारामुळे हीन या अर्थात कर्मप्रवचनीय संज्ञा होऊन शूरम् येथे द्वितीया होते.

अप ८-८७ - येथे 'अपपरी वर्जने' १-४-८८ या सूत्राने कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. तद्योगे 'पञ्चम्यपाङः परिभिः' या सूत्राने लोकेभ्यः येथे पंचमी झाली आहे.

आ ८-८८ - येथे ‘आङः मर्यादावचने’ १-४-८९ या सूत्राने कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. तद्योगे रामदर्शनात् येथे पंचमी झाली आहे.

अनु ८-८८ - येथे ‘लक्षणेत्थंभूत…’ १-४-९० या सूत्राने इत्थंभूताख्यानांत कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. तद्योगे सदवृत्तान् येथे द्वितीया झाली आहे. तसेच.

परि, प्रति ८-८८ – येथे अनुक्रमें वीप्सा, लक्षणे या अर्थात कर्मप्रवचनीय संज्ञा होऊन तद्योगे स्त्रीम् स्त्रियः येथे द्वितीया झाली आहे.

अभि ८-८९ - येथे ‘अभिरभागे’ १-४-९१ या सूत्राने लक्षणे कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. तद्योगे भवन्तम् येथे द्वितीया होते.

प्रति ८-८९ - येथे ‘प्रतिः प्रतिनिधि…’ १-४-९२ या सूत्राने कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. येथे प्रतिनिधी हा अर्थ आहे. तद्योगें ‘प्रतिनिधिप्रतिदाने च यस्मात्’ य सूत्राने नारायणतः येथे पंचमी विभक्ति होते.

अधि ८-९० - येथे ‘अधिपरी अवर्थकौ’ १-४-९३ या सूत्राने (अधि) – इतर कुठल्याहि अर्थाचा वाचक नसतांना – अनर्थक असतांना कर्मप्रवचनीय संज्ञा होते. तद्योगें कोठेहि द्वितीया होत नाही परंतु गत्युपसर्गसंज्ञेचा बाध होतो व त्यामुळे ‘गतिर्गतौ’ या सूत्राप्रमाणे अनुदात्त होत नाही. हे कर्मप्रवचनीय संज्ञेचे फल आहे.

सूक्तम् ८-९० - येथे ‘सुः पूजायाम्’ १-४-९४ या सूत्राने –पूजा म्हणजे प्रशंसनीय असा अर्थ आहे- कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. त्यांचे फल म्हणज ‘गतिरनन्तरः’ सूत्राने स्वराभाव होतो.

अति ८-९० - येथे ‘अतिरतिक्रमणे च’ १-४-९५ या सूत्राने कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. तद्योगें रामम् येथे द्वितीया होते.

अपि ८-९१ - येथे ‘अपिः पदार्थसंभावना…’ १-४-९६ या सूत्राने पदार्थ द्योतकता असल्याने कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. स्थापयि… येथे षत्व झाले नाही.

अपि ८-९१ – येथे संभावना अर्थात कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. स्थाणुम् येथे षत्व झाले नाही.

अपि ८-९२ - येथे अन्ववसर्ग या अर्थात कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. स्तुहि यथे षत्व झाले नाही.

अपि ८-९२ - येथेहि अन्ववसर्ग म्हणजे कामाचारानुज्ञा या अर्थात कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. त्यामुळे संघ येथे षत्व झाले नाही.

अपि ८-९२ - येथे गर्हा या अर्थात कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. त्यामुळे सिञ्च येथे षत्व झाले नाही.

अनुक्रमणिका

उपसर्गात् – या सूत्राने सर्वत्र षत्व झाले नाही.

अधि ८-९३ - येथे अधिरीश्वरे १-४-९७ या सूत्राने कर्मप्रवचनीय संज्ञा झाली आहे. तद्योगे रामे येथे यस्मादधिकं... सप्तमी या सूत्राने सप्तमी होते.

अपि ८-९३ - येथे 'विभाषा कृञि' १-४-९८ या सूत्राने कर्मप्रवचनीय संज्ञा विकल्पाने झाली आहे.

यानंतर विभक्त्यधिकार येतो, तो असा –

खड्गम् ८-९४ - येथे 'कर्मणि द्वितीया' २-३-२ या सूत्राने द्वितीया विभक्ति झाली आहे.

वैदेहीम् ८-९४ - येथे 'अन्तरान्तरेण युक्ते' २-३-४ या सूत्राप्रमाणे अन्तरा शब्दाच्या योगाने द्वितीया झाली.

चिरेण ८-९५ - येथे 'अपवर्गे तृतीया' २-३-६ या सूत्राने तृतीया होते. तृतीया अर्थात हे अव्यय आहे. अपवर्ग म्हणजे फलप्राप्ती हा अर्थ येथे द्योतित होतो.

मासे -८-९५ – येथे सप्तमीपञ्चम्यौ कारकमध्ये २-३-७ या सूत्राने – त्वम् आणि माम् या कर्ता व कर्म कारकांच्या मध्ये सप्तमी झाली आहे.

सूक्तम् ८-९० - येथे 'कर्मवप्रचनीययुक्ते द्वितीया' २-३-८ या सूत्राने द्वितीया झाली आहे. उक्तम् हे कर्मप्रवचनीय संज्ञक पद आहे.

रामे ८-९३ - येथे 'यस्मादधिकं...' २-३-९ या सूत्राने सप्तमी झाली आहे.

रामदर्शनात् ८-८८ - येथे 'पञ्चम्यपाङःपरिभिः' २-३-१० या सूत्राने आङः पदाच्या योगाने पंचमी झाली आहे.

नारायणतः प्रति ८-८९ - येथे प्रतिनिधि... २-३-११ या सूत्राने पंचमी विभक्ति झाली आहे.

मन्दिराय ८-९० - येथे 'गत्यर्थकर्मणि...' २-३-१२ या सूत्राने 'प्रतिव्रजन्' योगाने चतुर्थी झाली आहे.

सीतायै ८-९६ - येथे 'चतुर्थी सम्प्रदाने' २-३-१३ या सूत्राने चतुर्थी झाली आहे.

भयाय ८-९७ - येथे 'क्रियार्थोपपदस्य...' २-३-१४ या सूत्राने चतुर्थी झाली आहे. भयाय म्हणजे भयम् उत्पादयितुम् असा अर्थ विवक्षित आहे. उत्पादयितुम् या तुमुन्नन्ताचा प्रयोग केलेला नाही. त्याचे भयम् हे कर्म आहे. सूत्राप्रमाणे त्याची चतुर्थी झाली आहे.

रावणप्रीत्यै ८-९७ - येथे ‘तुमर्थाच्च...’ २-३-१५ या सूत्राने चतुर्थी झाली आहे.

ते, प्रातराशाय ८-९८ - येथे ‘नमः स्वस्तिस्वाहा...’ २-३-१६ या सूत्राने अनुक्रमें स्वस्ति, अलम् या पदांच्या योगें चतुर्थी झाली आहे.

तृणाय ८-९९ - येथे ‘मन्यकर्म...’ २-३-१७ या सूत्राने चतुर्थी झाली आहे. मत्वाचा अर्थ तृणमिव संगणय्य असा आहे. हे कर्म असून त्याचा अर्थ तिरस्कार असा आहे.

स्वमांसैः ८-९९ - येथे ‘कर्तृकरणयोस्तृतीया’ २-३-१८ या सूत्राने करणे तृतीया झाली आहे. तर..

मया ८-१०० — येथे कर्तरी तृतीया झाली आहे.

चन्द्रमसा ८-१०० - येथे ‘सहयुक्तेऽप्रधाने’ २-३-१९ या सूत्राने ‘सह’ पदाच्या योगाने तृतीया झाली आहे.

मुखैः ८-१०१ - येथे ‘येनाङ्गविकार’ २-३-२० या सूत्राने तृतीया झाली आहे.

भीमैर्वचनकर्मभिः ८-१०१ - येथे ‘इत्थंभूतलक्षणे’ २-३-२१ या सूत्राने तृतीया झाली आहे.

मैथिल्या ८-१०२ - येथे ‘संज्ञोऽन्यतरस्यां...’ २-३-२२ या सूत्राने संजानानः या पदाच्या योगाने विकल्पाने कर्माची तृतीया झाली आहे.

आयातेन ८-१०२ - येथे ‘हैतौ’ २-३-२३ या सूत्राने हेत्वर्थे तृतीया झाली आहे.

ऋणात् ८-१०३ - येथे ‘अकर्तर्यृणे पञ्चमी’ २-३-२४ या सूत्राने पंचमी झाली आहे.

वियोगेन ८-१०३ - येथे ‘विभाषाऽगुणे स्त्रियाम्’ २-३-२५ हे सूत्र वैकल्पिक असल्याने तृतीया झाली आहे.

बोधस्य हेतोः ८-१०३ - येथे ‘षष्ठी हेतुप्रयोगे’ २-३-२७ या सूत्राने षष्ठी झाली आहे.

रामात् ८-७२ - येथे ‘अपादाने पञ्चमी’ २-३-२८ या सूत्राने पंचमी झाली आहे.

पूर्वस्मात्, क्रौर्यात् ८-१०५ - येथे ‘अन्यारादितरर्ते...’ २-३-२९ या सूत्राने अनुक्रमें अन्यवत्, ऋते पदांच्या योगानें पंचमी झाली आहे. तसेच रावणात् प्रभावात् ८-१०६ — येथे अनुक्रमें इतर प्राक् शब्दांच्या योगाने पंचमी झाली. तसेच समुद्रात् ८-१०७ — येथे उत्तराहि शब्दामुळे पंचमी झाली. तसेच लवणतोयस्य ८-१०७ - येथे ‘षष्ठयतसर्थप्रत्ययेन’ २-३-३० या सूत्राने दक्षिणतः या अतसुच् प्रत्ययान्ताच्या योगे षष्ठी झाली आहे.

दण्डकान् ८-१०८ - येथे 'एनपा द्वितीया' २-३-३१ या सूत्राने दक्षिणेन या एनबन्ताच्या योगाने द्वितीया झाली आहे.

वैनतेयेन, नभस्वतः ८-१०९ - येथे 'पृथग्विना...' २-३-३२ या सूत्राने पंचमी झाली आहे.

स्तोकेन, कृच्छ्रात् ८-११०-येथे 'करणे च स्तोकाल्प....' २-३-३२ या सूत्राने स्तोकेन येथे तृतीया तर कृच्छ्रात् येथे पंचमी झाली आहे.

महेन्द्रस्य ८-१११ - येथे 'दुरान्तिकार्थे... षष्ठी' २-३-३४ या सूत्राने विप्रकृष्टम् पदाच्या योगाने षष्ठी झाली आहे. तसेच

विन्ध्यपर्वतात् ८-१११ – येथे पंचमी झाली आहे. तसेच

समुद्रस्य ८-१११ – येथे न अनभ्यासे या शब्दाच्या योगें वैकल्पिक षष्ठी झाली आहे.

विप्रकृष्टं, दूरम् ८-१११ - येथे 'दूरान्तिकार्थेभ्यो द्वितीया च' २-३-३५ या सूत्राने द्वितीया झाली आहे.

अनभ्यासे ८-१११ - येथे 'सप्तम्यधिकरणे च' २-३-३६ या सूत्राने सप्तमी विभक्ती होते.

असम्प्राप्ते दशग्रीवे, तस्मिन्प्रतिगते ८-११२ - येथे 'यस्य च भावेन भावलक्षणम्' २-३-३८ या सूत्राने भावलक्षण सप्तमी झाली आहे.

तास्मिन्, वदति ८-११३ - येथे 'षष्ठी चानादरे' २-३-३८ या सूत्राने अनादरे सप्तमी झाली आहे.

वानरेषु, नरेषु ८-११४ - येथे 'स्वामीश्वर...' २-३-३९ या सूत्राने अनुक्रमें स्वामी, अधिपति या शब्दांशी योग आल्याने सप्तमी झाली आहे. तसेच

निशाटानाम् ८-११५ - येथे ईश्वर शब्दाच्या योगें षष्ठी झाली आहे.

अन्वेषणस्य ८-११५ - येथे 'आयुक्तकुशलाभ्यां...' २-३-४० या सूत्राने विकल्पाने षष्ठी झाली आहे तर ..

दूतकर्मणि ८-११५ - येथे – विकल्पाने सप्तमी झाली.

स्त्रीषु ८-११६ - येथे 'यतश्च निर्धारणम्' २-३-४१ या सूत्राने दर्शनीयतमत्व या गुणवाचक पदाने पृथक्करण विवक्षित आहे म्हणून सप्तमी झाली.

अनुक्रमणिका

भुजङ्गेभ्यः ८-११६ - येथे 'पंचमी विभक्ते' २-३-४२ या सूत्राने पंचमी विभक्ति झाली आहे.

भवत्याम्, सङ्गमेन ८-११७-येथे 'प्रसितो....' २-३-४४ या सूत्राने अनुक्रमें उत्सुक, आणि प्रसित शब्दांच्या योगाने सप्तमी तृतीया झाली आहे.

मघासु ८-११७ - येथे 'नक्षत्रे चलुपि" २-३-४५ या सूत्राने सप्तमी झाली आहे.

अंगुलीयकः ८-११८ - येथे 'प्रातिपदिक ...' २-३-४६ या सूत्राने प्रातिपदिकार्थमात्रे प्रथमा झाली आहे.

हे मैथिलि ८-११८ - येथे 'सम्बोधने च' २-३-४७ या सूत्राने प्रथमा झाली आहे. व 'एकवचनं संबुद्धि' २-३-४९ या सूत्राने संबुद्धि झाली आहे.

काकुत्स्थस्य ८-११८ - येथे 'षष्ठी शेषे' २-३-५० या सूत्राने संबंधे षष्ठी झाली आहे.

रामस्य ८-११९ - येथे दय् धातूच्या प्रयोगामुळे षष्ठी झाली आहे तर

तव ८-११९ - येथे अध्येति पदाच्या योगाने षष्ठी झाली आहे.

आगमस्य ८-११९ - येथे "कृञः प्रतियत्ने" २-३-५३ या सूत्राने कर्मणि षष्ठी झाली आहे. प्रतियत्न म्हणजे गुणाधान रामाचे आगमन निश्चित असतांना देखील सुग्रीवाच्या सख्याने त्यांत निश्चितता आणली म्हणजे गुणाधान केले आहे.

रावणस्य ८-१२० - येथे 'रूजार्थानां भाव...' २-३-५४ या सूत्राने रोक्ष्यन्ति या पदाच्या योगाने कर्मणि षष्ठी झाली आहे.

धृत्याः ८-१२० - येथे 'आशिषि नाथः' २-३-५५ या सूत्राने नाथस्व या पदाच्या योगाने कर्मणि षष्ठी झाली आहे.

मन्योः ८-१२० - येथे "जासिनिप्रहण..." २-३-५६ या सूत्राने उज्ञासय पदाच्या योगाने कर्मणि षष्ठी झाली आहे. तसेच

राक्षसानाम् ८-१२१ - येथे प्रणिहनिष्यति या पदाच्या योगाने कर्मणि षष्ठी झाली आहे.

प्राणानाम् ८-१२१ - येथे 'व्यवहृपणयोः समर्थयोः' २-३-५७ या सूत्राने अपणिष्ट पदाच्या योगाने कर्मणि षष्ठी झाली आहे.

बन्धुभोगानाम् ८-१२२ - येथे 'दिवस्तदर्थस्य' २-३-५८ या सूत्राने कर्मणि षष्ठी झाली आहे.

आत्मसंपदम् ८-१२२ - येथे 'विभाषोपसर्गे' २-३-५९ या सूत्राने सोपसर्ग दिव् धातूचा प्रयोग आहे. म्हणून विकल्पाने द्वितीया झाली आहे.

अहः ८-१२२ - येथे 'कृत्वोर्थ...' २-३-६४ या सूत्राने अधिकरणे षष्ठी झाली आहे. शतकृत्वः हे कृत्वसुच् प्रत्ययान्त रूप आहे.

शाङ्‌र्गस्य ८-१२३ - येथे 'कर्तृकर्मणोः कृति' २-३-६५ या सूत्राने भर्तुः या कृदन्ताशी योग आल्याने शाङ्‌र्गस्य ही कर्मणि षष्ठी झाली आहे.

पुरः ८-१२४ - येथे 'उभयप्राप्तौ कर्मणि' २-३-६६ या सूत्राने कर्मणि षष्ठी झाली आहे. प्रवेश या कृदन्ताच्या योगाने कर्तरि षष्ठी आणि पुरः योगें कर्मणि षष्ठी प्राप्त झाली असतांना प्रस्तुत सूत्राने कर्मणि षष्ठी झाली आहे.

रामस्य ८-१२४ - येथे 'क्तस्य च वर्तमाने' २-३-६७ या सूत्राने षष्ठी झाली आहे. संमतम् 'मतिबुद्धि' या सूत्राने येथे वर्तमानार्थी क्त प्रत्यय झाला व याच्याशी रामस्य चा योग आल्याने षष्ठी झाली.

रामस्य ८-१२५ - येथे 'अधिकरणवाचिनश्च' २-३-६८ या सूत्राने शयितं, भुक्तं, स्थितं, प्रक्रान्तम् या अधिकरणार्थक क्तान्त पदांशी योग असल्याने षष्ठी झाली आहे.

अभिज्ञानं, कर्म, अन्तिकम् ८-१२६ - येथे 'न लोकाव्ययं' या सूत्राने षष्ठीचा निषेध झाला आहे. अनुक्रमें लादेश, उकार, उक यांच्या योगें षष्ठीची प्राप्ती होती.

कर्म, ८-१२७ - येथे अव्ययाच्या योगें षष्ठीची प्राप्ती होती.

वैदेहीम्, अन्यैः यशः ८-१२८ – येथे अनुक्रमें निष्ठा, खल्, तृन् यांच्या षष्ठीची प्राप्ती होती.

वार्ताम् ८-१२८ - येथे 'अकेनोः...' २-३-७० या सूत्राने आख्यायकः या भविष्यदर्थी अकन्त पदाने प्राप्त झालेल्या षष्ठीचा निषेध केला आहे.

राक्षसेन्द्रस्य ८-१२९ - येथे 'कृत्यानां कर्तरि वा' २-३-७१ या सूत्राने संरक्ष्यम् या कृत्य प्रत्ययान्ताशी योग आल्याने विकल्पाने कर्तरि षष्ठी झाली आहे.

मया ८-१२९ – तर येथे 'लब्धम्' या कृत्यप्रत्ययन्ताशी योग असल्याने विकल्पाने तृतीया झाली आहे.

नन्दनस्य ८-१२९ - येथे 'तुल्यार्थे' २-३-७२ या सूत्राने सदृश पदाच्या योगाने षष्ठी झाली आहे.

राघवाभ्याम् ८-१३० - येथे 'चतुर्थी चाशिष्य...' २-३-७३ या सूत्राने भद्रार्थक शिवम् या पदाच्या योगें विकल्पाने आशीर्वादार्थात चतुर्थी झाली आहे.

रामस्य ८-१३० - येथे 'हितः' पदाच्या योगाने षष्ठी झाली आहे.

यानंतर सिचिवृद्धि अधिकार येतो. तो असा :-

अक्षारिषुः अह्वालीत् ९-८ येथे 'अतो ल्रान्तस्य' ७-२-२ या सूत्राने क्षर् आणि हल् धातुहून – लुङः लकार होतो नंतर- सिचि वृद्धि होते.

अव्राजीत्, ९-८ - येथे 'वदव्रजहलन्तस्याचः' ७-२-३ या सूत्राने व्रज् धातुहून वृद्धि आली आहे तर.

अवादीत् ९-९ येथे वद् धातुहून वृद्धि झाली आहे.

प्रादेवीत् ९-९ - येथे 'नेटि' ७-२-४ या सूत्राने हलन्त लक्षणवृद्धीचा प्रतिषेध केला आहे.

अग्रहीत् ९-९ - येथे 'हन्यन्तक्षण...' ७-२-५ या सूत्राने वैकल्पिक वृद्धीचा निषेध केला आहे. तसेच

अवमिषुः ९-१० – यथेहि टुवम् धातुहून प्राप्त झालेल्या वृद्धीचा निषेध केला आहे.

प्रौर्णाविषुः ९-१०-येथे 'ऊर्णोतेर्विभाषा' ७-२-६ या सूत्राने विकल्पाने वृध्दि झाली आहे.

अरासिषुः अत्रासिषुः ९-११ - येथे 'अतो हलादेर्लघोः' ७-२-७ या सूत्राने वृद्धि झाली आहे. प्रथम याठिकाणी वदव्रज... या सूत्राने वृद्धि प्राप्त झाली असतांना तिचा 'नेटि' सूत्राने निषेध होतो. नंतर प्रस्तुत सूत्राने विकल्पाने वृद्धि होते.

यानंतर इदि्प्रतषेधाचा अधिकार येतो, तो असा-

ईश्वराः ९-१२ - येथे नेड्शि कृति ७-२-८ या सूत्राने इट् आगमनाचा निषेध झाला आहे. ईश् धातुहून 'स्थेश..' या सूत्राने वरच् होतो.

शस्त्रहस्ताः ९-१२ - येथे 'तितुत्र...' ७-२-९ या सूत्राने इट् चा निषेध झाला आहे. शस् धातुहून प्रथम येथे 'दाम्नी...' या सूत्राने ष्ट्रन होतो. तर

क्षितो ९-१३-येथे क्षि धातुहून क्तिच् होतो. इट् चा निषेध वरीलप्रमाणे.

चेतव्यान् ९-१३ - येथे ‘एकाच उपदेशे …’ ७-२-१० या सूत्राने इट् चा निषेध झाला आहे. येथे प्रथम् तव्य प्रत्यय होतो.

युतान् ९-१३ - येथे ‘श्रयुकः किति’ ७-२-११ या सूत्राने इट् चा निषेध झाला आहे. प्रथम् येथे कर्तरि क्त प्रत्यय होतो. तसेच

श्रित्वा ९-१३ - येथे ही इट् चा निषेध झाला आहे.

विजिगृक्षून् ९-१३ - येथे ‘सनि ग्रहगुहोश्च’ ७-२-१२ या सूत्राने ग्रह् या सन्नन्त धातुहून झालेल्या इडागमाचा निषेध झाला आहे. तसेच

संगुघुक्षवः ९-१४ – सम् + गुह्, धातुच्या सन्नन्ताहून झालेल्या इट् चा निषेध झाला आहे.तसेच

प्रतिरुरुक्षवः ९-१४ – येथे रु धातुहून झालेल्या इट् चा निषेध झाला आहे. सूत्रांतील चकाराने उगन्ताचा देखील समावेश होतो.

चकृम ९-१५ - येथें ‘कृसृभृवृ…’ ७-२-१३ या सूत्राने कृ धातुहून इट् चा निषेध झाला आहे.

उद्विग्नान् ९-१६ - येथे ‘श्वीदितो निष्ठायाम्’ ७-२-१४ या सूत्राने उद् + विज् धातुहून क्त प्रत्यय झाल्यानंतर इट् चा निषेध झाला आहे.

उद्वृत्तम ९-९६ - येथे ‘यस्य विभाषा’ ७-२-१५ या सूत्राने इट् चा निषेध झाला आहे.

भिन्नान् ९-१६ - येथे ‘आदितश्च’ ७-२-१६ या सूत्राने इट् चा निषेध झाला आहे.

प्रमेदिता : ९-१७ - येथे ‘विभाषा भावा…’ ७-२-१७ या सूत्राने प्र + मिद् – प्र आदिकर्म द्योतक असल्याने – विकल्पाने इट् आगम झाला आहे.

सुस्वान्ताः, बाढविक्रमाः अम्लिष्टनादाः फाण्ट… ९-१७ - येथे ‘क्षुब्धस्वान्त…’ ७-२-१७ या सूत्राने स्वन् स्वान्त, बाह् – बाढ, म्लेच्छ् – म्लिष्ट, फण् – फाष्ट असें निपातन झाले आहे.

धृष्टान् ९-१८ - येथे ‘धृषिशसी …’ ७-२-१९ या सूत्राने धृष् धातुहून इट् चा निषेध झाला आहे.

अतिदृढान् ९-१८ - येथे ‘दृढः स्थूलबलयोः’ ७-२-२० या सूत्राने दृह् धातुहून इट् च्या अभावाचे निपातन होते.

परिदृढादयः ९-१८ - येथे ‘प्रभौ परिवृढः’ ७-२-२१ या सूत्राने परि + वृह् धातुहून क्त प्रत्यय व इडागमाचे निपातन झाले आहे.

कष्टम् ९-१८ - येथे ‘कृच्छ्रगहनयोः कषः’ ७-२-२२ या सूत्राने कष् धातुहून इट् चा निषेध झाला आहे.

घृष्ट ९-१८ - येथे ‘घुषिर…’ ७-२-२६ या सूत्राने घुष् धातुहून विशब्दन = स्वाभिप्रायाविष्करण या अर्थात इट् चा प्रतिषेध झाला आहे.

अव्यर्णः ९-१९ - येथे ‘अर्देः सन्नि’ ७-२-८४ या सूत्राने इट् निषेध झाला आहे.

अभ्यर्णान् ९-१९ - येथे ‘अभेश्चा…’ ७-२-२५ या सूत्राने अभि + अर्द् धातुहून अविदूर अर्थात इट् चा निषेध झाला आहे.

वृत्तशस्त्रान् ९-१९ - येथे ‘णेरध्ययने…’ ७-२-२६ या सूत्राने इडभावाचे निपातन झाले आहे.

अदान्तान् ९-१९ - येथे ‘वादान्तशान्त…’ ७-२-२७ या सूत्राने दम् धातुहून इडभावाचे निपातन झाले आहे. तसेच

दमित, प्रशान्त,… पूरित.. ९-२० – येथेहि कोठे इट् चे तर कोठे इडभावाचें निपातन झाले आहे.

रुषितः, रुष्टान्, तूर्णम्, त्वरितः ९-२० - येथे ‘रुष्यमत्वर…’ ७-२-२८ या सूत्राने विकल्पाने प्रवृत्ति असल्याने कोठे इडागम झाला तर कोठे तो झाला नाही. तसेच

संघुष्टै, अभ्यमित्रः, आस्वान्ताः ९-२१ – येथेहि इडागमाचा विकल्प झाला आहे.

संहृष्टाः ९-२२ - येथे ‘हृषेर्लोमसु’ ७-२-२९ या सूत्राने इडभाव झाला आहे.

अपचितः ९-२३ - येथे ‘अपचितश्च’ ७-२-३० या सूत्राने इडभावाचे निपातन झाले आहे.

यानंतर इडधिकार येतो तो असा –

लवितुम् ९-२३ - येथे ‘आर्धधातुकस्येड्वलादेः’ ७-२-३५ या सूत्राने इट् आगम झाला आहे. त्यापूर्वी तुमुन् होऊन त्याला ‘आर्धधातुकं शेषः’ या सूत्राने आर्धधातुक संज्ञा होते.

अक्रमीत् ९-२३ - येथे ‘स्नुक्रमो’ ७-२-३६ या सूत्राने क्रम धातुहून इडागम झाला आहे.

निगृहितम्... ९-२३ - येथे 'ग्रहोऽलिटि दीर्घः' ७-२-३७ या सूत्राने इडागम झाला आहे.

आवरीतुं, वरितुम् ९-२४ - येथे 'वृतो वा' ७-२-३८ या सूत्राने वृ धातुहून इडागम झाला आहे.

वरिषीष्ट ९-२५ - येथे 'न लिङि' ७-२-३९ या सूत्राने (- वृञ् धातुहून इट् विकल्पाने झाला आहे) दीर्घाचा प्रतिषेध केला आहे.

प्रावारिषुः ९-२५ - येथे 'सिचि वृद्धि...' ७-२-४० या सूत्राने इट् ला दीर्घत्व-प्रतिषेध केला आहे.

विवरिषुः ९-२६ - येथे 'इट् सनि वा' ७-२-४१ या सूत्राने विकल्पाने इडागम झाला आहे.

अवरिष्ट ९-२६ - येथे 'लिङः सिचो...' ७-२-४२ या सूत्राने इडागम झाला आहे. हे सिच् चे निदर्शन आहे.

वरिषीष्ट ९-२५ - येथेहि विकल्पाने इडागम झाला आहे. हे लिङः चे निदर्शन आहे. नसेच ...

संवरिषीष्ठाः ९-२७ - येथे विकल्पाने इडागम झाला आहे हेही लिङः चे निदर्शन आहे.

ध्वृषीष्ठाः ९-२७ - येथे 'ऋतश्च संयोगादेः' ७-२-४३ या सूत्राने इडागम विकल्पाने झाला नाही.

स्वरिता ९-२७ - येथे 'स्वरतिसूति...' ७-२-४४ या सूत्राने स्वृ धातुहून विकल्पाने वलादि इट् झाला आहे. तसेच

संस्वरिषीष्ठाः सोता, विधवितुम् ९-२८ - येथे विकल्पाने इडागम झाला व झाला नाही अशी ही निदर्शने आहेत. तसेच

गाहिता, विगाढा ९-२९ — येथेहि इडागम झाला व झाला नाही. रधितुं, रद्धा ९-२९ - येथे 'रधादिभ्यश्च' ७-२-४५ या सूत्राने रध् धातुहून इडागम विकल्पाने झाला आहे.

निष्कोषितव्यान्, निष्कोष्टुम् ९-३० - येथे 'निरः कुषः' ७-२-४६ या सूत्राने विकल्पाने इड् झाला व झाला नाही. अशी ही दोन रूपे आहेत.

निष्कुषिता... ९-३० - येथे 'इण् निष्ठायाम्' ७-२-४७ या सूत्राने इडागम झाला आहे.

एषिता, एष्टारम्, सहिता सोढारम्, रेषितुं, रेष्टारम्, रोष्टा ९-३१ - येथे 'तीषसह...' ७-२-४८ या सूत्राने इट् आगम विकल्पाने झाला व झाला नाही.

दिदेविषुं, दुद्यूषुः, अर्दिधिषुः, ईर्त्सुम्, ९-३२ - येथे 'सनीवन्त' ७-२-४९ या सूत्राने इड् विकल्पाने झाला व झाला नाही. अशी ही निदर्शने आहेत तसेच

धिप्सुं, दिदम्भिषुः, संशिश्रीषुः ९-३३ - येथेहि इडागम विकल्पाने झाला, झाला नाही. तसेच

बिभ्रक्षुः बिभ्रज्ञिषुः ९-३४ - येथेहि इडागम झाला, झाला नाही. तसेच

संयुयूषु, यियविषु ९-३५ - येथे इडागम झाला व झाला नाही. तसेच

प्रोर्णुनविषुः प्रोर्णुनुषुः ९-३६ - येथे इडागम झाला व झाला नाही. तसेच

जिज्ञापयिषू, बुभूर्षू ९-३७ - येथे इडागम झाला व झाला नाही.

क्लिष्ट्वा, अक्लिशिता ९-३८ - येथे 'क्लिशः क्त्वानिष्ठयोः' ७-२-५० या सूत्राने विकल्पाने इडागम झाला व झाला नाही.

पवितः, पूत्वा ९-३९ - येथे 'पूङश्च' ७-२-५१ या सूत्राने पू धातुहून इडागम झाला व झाला नाही.

अध्युषितं, क्षुधित्वा ९-३९ - येथे 'वसतिक्षुधोरिट्' ७-२-५२ या सूत्राने वस् व क्षुध् धातुहून इडागम झाला आहे.

अञ्चित... ९-४० - येथे 'अञ्चेः पूजायाम्' ७-२-५३ या सूत्राने अञ्च् धातुहून पूजा या अर्थात इडागम झाला आहे.

विलुभितम् ९-४० - येथे 'लुभो विमोहने' ७-२-५४ या सूत्राने लुभ् धातुहून विमोहन = व्याकुलीकरण या अर्थात इडागम झाला आहे.

जरित्वा, व्रश्चित्वा ९-४१ - येथे 'चृव्रश्च्योः क्त्वि' -७-२-५५ या सूत्राने जृष् आणि व्रश्च् या धातुहून क्त्वा प्रत्यय होऊन इडागम झाला आहे.

दमित्वा, अश्रान्त्वा ९-४२ - येथे 'येथे उदितो वा' ७-२-५६ या सूत्राने – दमु, श्रमु हे दोनही धातु उदित आहेत- म्हणून एकदा इट् झाला तर एकदा तो विकल्पाने झाला नाही.

कर्तिष्यन् नर्त्स्यन् ९-४२ - येथे 'सेऽसिचि...' ७-२-५७ या सूत्राने कृत् धातुहून विकल्पाने इडागम झाला तर नृत् धातुहून तो झाला नाही.

जिगमिषन् ९-४३ - येथे ‘गमेरिट् परस्मैपदेषु’ - ७-२-५८ या सूत्राने इडागम झाला आहे.

आवत्स्र्यताम् ९-४३ - येथे ‘न वृद्भ्यश्चतुर्भ्यः’ ७-२-५९ या सूत्राने इडाभाव झाला आहे.

अकल्प्स्यत् ९-४४ - येथे ‘तासि च क्लृपः’ ७-२-६० या सूत्राने इडागमाचा निषेध झाला आहे. तसेच कल्प्ता, कल्प्स्यति ९-४५ – येथे इट् चा निषेध झाला आहे.

ययाथ ९-४७ - येथे ‘अचस्तास्’ -७-२-६१ या सूत्राने इट्चा निषेध झाला आहे. या हा धातु तासि नित्य अनिट् आहे. परंतु कॄयादि नियमाने प्राप्त झालेला इट्चा२ निषेध झाला आहे.

शशक्थः ९-४७ - येथे ‘उपदेशेऽत्वतः’ ७-२-६२ या सूत्राने नित्य इट्चा निषेध झाला आहे.

सस्मर्थ ९-४७ - येथे ‘ऋतो भारद्वाजस्य’ ७-२-६३ या सूत्राने स्मृ धातुहून भारद्वाज नियमाने इट्चा निषेध झाला आहे.

दद्रष्ठ, ससर्जिथ ९-४८ - येथे ‘विभाषा सृजिदृशोः’ ७-२-६५ या सूत्राने इट्चा विकल्प झाला आहे. एकदा झाला नाही तर एकदा तो झाला.

आदिथ ९-४८ - येथे ‘इडत्यर्ति…’ ७-२-६६ या सूत्राने नित्य इट् झाला आहे.

हनिष्यन् ९-४९ - येथे ‘ऋद्धनोः स्ये’ ७-२-७० या सूत्राने इट् झाला आहे.

मा न अञ्जीः ९-४९ - येथे ‘अञ्जः सिचि’ ७-२-७१ या सूत्राने नित्य इट् झाला आहे.

मा न प्रस्तावीः ९-४९ - येथे ‘स्तुसु…’ ७-२-७२ या सूत्राने सिच् ला इट् झाला आहे. तसेच

मा न सावीः ९-५० - येथे सु धातुहून इट् झाला आहे. असेच

मा न धावी ९-५० - येथे धू धातुहून इट् झाला आहे.

मा न संयंसीः ९-५० - येथे ‘यमरम…’ ७-२-७३ या सूत्राने यम् धातुहून इट् आगम झाला आहे.

अनंसीत् ९-५१ - येथे नम् धातुहून इट् झाला आहे.

अयासीत् ९-५१ - येथे या धातुहून इट् झाला आहे.

अनुक्रमणिका

उपारंसीत् ९-५२ - येथे रम् धातुहून इट् झाला आहे.

संसिस्मयिषमाणः ९-५३ - येथे 'स्मिपूङःरञ्ञवशां सनि' ७-२-७४ या सूत्राने, सम् + स्मिङः धातुच्या सन्नन्ताहून इट् झाला आहे. तसेच

व्यञ्जिजिषुः पिपविषुः ९-५३ – येथे वि + अञ्ज् + सन् आणि पू + सन् या धातुंहून इट् झाला आहे. तसेच

आशिशिषोः ९-५४ - येथे अश् धातुहून इट् झाला आहे.

चिकरिशोः जिगरिषुः ९-५४ - येथे 'किरश्च पञ्चभ्यः' ७-२-७५ या सूत्राने अनुक्रमें कृ, गृ, या धातुंहून इट् झाला आहे.

रोदिति ९-५५ - येथे 'रुदादिभ्यः सार्वधातुके' ७-२-७६ या सूत्राने इट् झाला आहे. तसेच

आश्वसीत् ९-५६ – येथे आ + श्वस् धातुहून इट् झाला आहे. तसेच

प्राणिषि ९-५७ - येथे अन् धातुहून इट् झाला आहे.

ईशिषे ९-५७ - येथे 'ईशः से' ७-२-७७ या सूत्राने ईश् धातुहून इट् झाला आहे.

ईडिषे ९-५७ - येथे 'ईडजनोर्ध्वे च' ७-२-७८ या सूत्राने ईड् धातुहून इडागम झाला आहे.

यानंतर (विसर्गाला सकार होणे) सत्वाधिकार येतो. तो असा –

ससैन्यश्छादयन् ९-५८-येथे 'विसर्जनीयस्य सः' ८-३-३४ या सूत्राने ससैन्यः + छादयन् येथील विसर्गाचा सकार झाला आहे.

शरैः क्षुरप्रैः ९-५८ - येथे 'शर्परे विसर्जनीयः' ८-३-३५ या सूत्राने शरैः क्षुरप्रैः येथील विसर्गाचा विसर्ग झाला आहे.

मायाभिः + शतशः + सर्वतः ९-५८ - येथे 'वा शरि' ८-३-३६ या सूत्राने विकल्पाने विसर्गाचा विसर्ग झाला आहे.

वानरः ≍ कुलशैलाभ ≍ प्रसह्य ९-५९ - येथे 'कुप्वोः कपौच' ८-३-३७ या सूत्राने क वर्गातील वर्ण (कुल) पलीकडे असतांना विसर्गाचा जिह्वानमूलीय तर प वर्गातील वर्ण (प्रसह्य) पलीकडे असतांना उपध्मानीय झाला आहे.

अनुक्रमणिका

यशस्काम्यन् ९-५९ - येथे ‘सोऽपदादौ’ ८-३-३७ या सूत्राने यशस् येथील सकाराचा विसर्ग झाला आहे.

तमस्कल्पान्, रक्षस्पाशान् ९-५९ – येथे वरील सुत्रावरील ‘पाशकल्पककाम्येष्विति वाच्यम्’ या वार्तिकाने विसर्गाचा सकार झाला आहे.

ज्योतिष्कल्पः धनुष्पाशम् ९-६० - येथे ‘इणः शः’ ८-३-३९ या सूत्राने इण्हून पलिकडे आलेल्या विसर्गाचा षकार झाला आहे.

निर्नमस्कारान् ९-६० - येथे ‘नमस्पुरसोर्गत्योः’ ८-३-४० या सूत्राने नमस् च्या विसर्गाला सकार झाला आहे. तसेच...

पुरस्कृतान् ९-६० – येथेहि पुरस् च्या विसर्गाचा सकार झाला आहे.

निष्क्रयम्, आविष्कृतं, दुष्कृतबहिष्कृतः ९-६१ - येथे ‘इदुदुपधस्य चाऽप्रत्ययस्य’ ८-३-४१ या सूत्राने प्रत्यय भिन्न विसर्गाचा षकार झाला आहे. तसेच

चतुष्काष्ठम् ९-६२ – येथेहि षत्व झाले आहे.

तिरस्कुर्वन्, तिरस्कृता .. ९-६२ - येथे ‘तिरसोऽन्यतरस्याम्’ ८-३-४२ या सूत्राने विकल्पाने सकार झाला आहे.

द्विष्कुर्वतां, चतुष्कुर्वन् ९-६३ - येथे ‘द्विस्त्रिश्चतुरिति कृत्वोऽर्थे’ ८-३-४३ या सूत्राने विसर्गाचा विकल्पाने षकार झाला आहे.

बहिष्करिष्यन् ९-६४ - येथे ‘इसुसोः सामर्थ्ये’ ८-३-४४ या सूत्राने विकल्पाने षकार झाला आहे. तसेच

ज्योतिष्कुर्वन् ९-६४ - येथेहि षकार झाला आहे.

अनायुष्करम्, धनुष्करः ९-६४ - येथे ‘कृञो हेतु’ ८-३-४५ या सूत्राने विसर्गाचा षकार झाला आहे. तसेच

अरूष्करान्, ज्योतिष्करः ९-६५ - येथेहि षकार झाला आहे.

यशस्करः, यशस्कामम् ९-६५ - येथे ‘अतः कृकमि-’ ८-३-४६ या सूत्राने विसर्गाला सकार झाला आहे.

अधस्पदम् ९-६६ - येथे ‘अधः शिरसी पदे’ ८-३-४७ या सूत्राने विसर्गाचा सकार झाला आहे.

अनुक्रमणिका

तमस्काण्डैः ९-६६ - येथे ‘कस्कादिषु च’ ८-३-४८ या सूत्राने विसर्गाचा सकार झाला आहे.

यानंतर षत्वाचा अधिकार आहे. तो असा...

पृतनाषाड्द्विषः ९-६७ - येथे ‘सहेः साङ सः’ ८-३-५६ या सूत्राने षकार झाला आहे.

आयूंषि ९-६८ - येथे ‘नुम्विसर्जनीय...’ ८-३-५८ या सूत्राने षकार झाला आहे.

धूर्षु, त्वक्षु ९-६७ - येथे ‘आदेशप्रत्यययोः’ ८-३-५९ या सूत्राने सु प्रत्ययाच्या सकाराला षकार झाला आहे. तसेच

सुषुपुः ९-६८ - येथे आदेशाच्या सकाराला षकार झाला आहे.

प्रोषितः आशिषत ९-६८ - येथे ‘शासिवसि...’ ८-३-६० या सूत्राने सकाराला षत्व झाले आहे.

प्रतुष्टूवः, आसिषञ्जयिषुः ९-६९ - येथे ‘स्तौतिण्यो...’ ८-३-६१ या सूत्राने धातूच्या सकाराला षकार झाला आहे.

उत्सिसाहयिषन् ९-६९ - येथे ‘सः स्विदि...’ ८-३-६२ या सूत्राने धातूच्या सकाराचा सकारच राहतो.

अभ्यषिञ्चन् ९-७१-येथे ‘प्राक्सितात्...’ ८-३-६३ या सूत्राने षत्व झाले आहे.

अभिषिषिक्षन्तम् ९-७० - येथे ‘स्थादिष्व...’ ८-३-६४ या सूत्राने धातु आणि अभ्यास यांच्या सकाराला षत्व झाले आहे.

अभिष्यन्तः ९-७१ - येथे ‘उपसर्गात्..’ ८-३-६५ या सूत्राने सकाराला षत्व होते.

अविषीदन् ९-७२ - येथे ‘सदिरप्रतेः’ ८-३-६६ या सूत्राने षत्व झाले आहे.

व्यष्टभ्नात् ९-७२ - येथे ‘स्तन्भेः’ ८-३-६७ या सूत्राने उपसर्गाहून पलीकडे आलेल्या धातूच्या सकाराचा षकार झाला आहे.

अवष्टब्धान् ९-७२ - येथे ‘अवाच्चालम्बना..’ ८-३-६८ या सूत्राने अव + स्तन्भ् या सौत्र धातुहून आविदूर्य अर्थात षत्व झाले आहे.

नरविष्णवान् ९-७२ - येथे 'वेश्च स्वनो भोजने' ८-३-६९ या सूत्राने वि + स्वन् या धातुहून षकार झाला आहे.

विषहय ९-७३ - येथे 'परिनिविभ्यः...' ८-३-७० या सूत्राने सहमधील सकाराला षत्व झाले आहे.

व्यषहत, पर्यषहिष्ट ९-७३ - येथे 'सिवादीनां वाड्..' ८-३-७१ या सूत्राने विकल्पाने षत्व झाले आहे.

विष्यन्दमान... ९-७४ - येथे 'अनुविपर्य...' ८-३-७२ या सूत्राने स्यन्द् धातूच्या सकाराला विकल्पाने षत्व झाले आहे.

विष्कन्तृन्, अविस्कन्ता ९-७४ - येथे 'वेः स्कन्देः...' ८-३-७३ या सूत्राने षत्व झाले तर एकदा विकल्पाने ते झाले नाही.

परिस्कन्दन् ९-७५ - येथे 'परेश्च' ८-३-७४ या सूत्राने षत्व झाले नाही तर विकल्प असल्याने परिष्कन्दन्तम् ९-७५ येथे ते षत्व झाले आहे.

अपरिस्कन्दम् ९-७५ - येथे 'परिस्कन्दः प्राच्यभरतेषु' ८-३-७५ या सूत्राने षत्वाभावाचे निपातन होते.

विस्फुरन् ९-७५ - येथे 'स्फुरतिस्फुलत्यो..' ८-३-७६ या सूत्राने षत्वाभाव झाला आहे. तर

विस्फुलद्भिः, निष्फुलः ९-७६ - येथे एकदा षत्वाभाव तर एकदा षत्व झाले आहे.

विष्कम्भितुम् ९-७६ - येथे 'वेः स्कभ्नातेः...' ८-३-७७ या सूत्राने नित्य षकार होतो.

कृषीढ्वं, प्रोढ्वेम् ९-७७ - येथे 'इणः षीध्वं..' ८-३-७८ या सूत्राने मूर्धन्य ढकार झाला आहे.

अङ्गुलिषङ्गम् ९-७८ - येथे 'समासेऽ...' ८-३-८० या सूत्राने सकाराला षकार झाला आहे.

भीरूष्ठानात् ९-७८ - येथे 'भीरोः स्थानम्' ८-३-८१ या सूत्राने सकाराला षकार झाला आहे.

अग्निष्टोम... ९-७९ - येथे 'अग्नेः स्तुत्' ८-३-८२ या सूत्राने सकाराला षकार झाला आहे.

ज्योतिष्टोमः ९-७९ - येथे 'ज्योतिरायुषः...' ८-३-८३ या सूत्राने सकाराला षकार झाला आहे.

मातृष्वसेय्याः ९-८० - येथे 'मातृपितृभ्यां स्वसा' ८-३-८४ या सूत्राने षकार झाला आहे.

**अनुक्रमणिका**

मातुः स्वसुः ९-८० - येथे 'मातुः पितुर्...' ८-३-८५ या सूत्राने विकल्पाने षकार झाला नाही.

प्रादुःषन्ति ९-८१ - येथे 'उपसर्ग...' ८-३-८७ या सूत्राने प्रादुः शब्दाहून पलीकडे आलेल्या अस् धातूच्या सकाराला षत्व झाले आहे.

दुःषूते ९-८१ - येथे 'सुविनिर्...' ८-३-८८ या सूत्राने धातुच्या सकाराला षकार झाला आहे. तसेच

विषमाऽशयः सुषुप्तम् ९-८२- येथेहि षकार झाला आहे.

निष्णातः ९-८२ - येथे 'निनदीभ्यां स्नातेः कौशले' ८-३-८९ या सूत्राने षत्व झाले आहे.

प्रतिष्णातम् ९-८३ - येथे 'सूत्रं प्रतिष्णातम्' ८-३-९० या सूत्राने प्रति + स्ना षकार झाला आहे.

कपिष्ठल... ९-८३ - येथे 'कपिष्ठलो गोत्रे' ८-३-९१ या सूत्राने षत्वाचे निपातन झाले आहे.

प्रष्ठाम् ९-८४ - येथे 'प्रष्ठोऽग्रगामिनि' ८-३-९२ या सूत्राने अग्रगामी या अर्थात षत्वनिपातन झाले आहे.

विष्टरस्थाम् ९-८४ - येथे 'वृक्षासनयोर्विष्टरः' ८-३-९३ या सूत्राने षत्वाचे निपातन झाले आहे.

गविष्ठिराम् ९-८४ - येथे 'गवियुधिभ्यां स्थिरः' ८-३-९५ या सूत्राने गवि + स्थिर येथे षत्व झाले आहे.

कुष्ठले ९-८४ - येथे 'विकुशमि...' ८-३-९६ या सूत्राने षकार झाला आहे.

दिविष्ठाम् ९-८४ - येथे 'अम्बाम्बगगोभूमि...' ८-३-९७ या सूत्राने षत्व झाले आहे. सूत्रांतच दिवि असा शब्द उच्चारल्याने सप्तमीचा अलुक् झाला आहे.

सुषाम्नीम् ९-८५ - येथे 'सुषामादिषु च' ८-३-९८ या सूत्राने षत्व झाले आहे.

ज्योतिष्टमाम् ९-८५ - येथे 'ह्रस्वातादौ तद्धिते' ८-३-१०१ या सूत्राने षत्व झाले आहे.

निष्टपन्तीम् ९-८५ - येथे 'निसस्तपतावनासेवने' ८-३-१०२ या सूत्राने षत्व झाले आहे.

ज्योतिःसात्कुर्वतीम् ९-८५ - येथे 'सात्पदाद्योः' ८-३-१११ या सूत्राने षत्वाचा निषेध केला आहे. 'नुम्विस...' या सूत्राने प्राप्ति होती.

**अनुक्रमणिका**

परिसेसिचाम् ९-८७ - येथे ‘सिचो यङि’ ८-३-११२ या सूत्राने षत्वाचा निषेध झाला आहे. ‘उपसर्गात्’ याने प्राप्ती होती.

परिसेवतः ९-८८ - येथे ‘सेधतेर्गतौ’ ८-३-११३ या सूत्राने षत्वाचा निषेध झाला आहे. ‘उपसर्गात्...’ या सूत्राने प्राप्ति होती.

अप्रतिस्तब्धम्, अनिस्तब्धः ९-८९ - येथे ‘प्रतिस्तब्धनिस्तब्धो च’ ८-३-११४ या सूत्राप्रमाणे षत्वाचा प्रतिषेध झाला आहे. ‘स्तन्भेः’ सूत्राने प्राप्ति होती.

विसोढवन्तम् ९-८९ - येथे ‘सोढः’ ८-३-११५ या सूत्राने षत्वाचा निषेध झाला आहे. ‘परिनिवि...’ या सूत्राने प्राप्ति होती.

व्यतस्तम्भत् ९-८९ - येथे ‘स्तम्भुसिवु...’ ८-३-११६ या सूत्राने षत्वाचा निषेध झाला आहे.

अभिसोष्यन्तम् ९-९० - येथे ‘सुनोतेः स्यसनोः’ ८-३-११७ या सूत्राने षत्वाचा निषेध झाला आहे. ‘उपसर्गात्...’ या सूत्राने प्राप्ति होती.

विषसाद ९-९१ - येथे ‘सदेः परस्य लिटि’ ८-३-११८ या सूत्राने षत्वाचा निषेध झाला आहे.

यानंतर णत्वाचा अधिकार येतो. तो असा :-

मुष्णन्तम्, विस्तीर्णम् ९-९२ - ये ‘रषाभ्यां नो णः समानपदे’ ८-४-१ या सूत्राने नकाराला णत्व झाले आहे.

भिन्नमर्माणः ९-९३ - येथे ‘अट्कुप्वाङ...’ ८-४-२ या सूत्राने अट् व पर्गाचे व्यवधान असतांनाहि णत्व झाले आहे.

खरणसादयः ९-९३ - येथे ‘पूर्वपदात्...’ ८-४-३ या सूत्राने णत्व झाले आहे.

अग्रेवणम् ९-९३ - येथे ‘वनं पुरगामिश्र...’ ८-४-४ या सूत्राने णत्व झाले आहे.

आम्रवणं, निर्वणम् ९-९४ - येथे ‘प्रनिरन्तः’ ८-४-५ या सूत्राने वन मधील नकाराला णत्व झाले आहे.

आम्रवणं, निर्वणम् ९-९४ - येथे ‘प्रनिरन्तः’ ८-४-५ या सूत्राने वन मधील नकाराला णत्व झाले आहे.

देवदारुवनामिश्रैः ९-९४ - येथे ‘विभाषा...’ ८-४-६ या सूत्राने णत्वाचा विकल्प होतो. परंतु ‘द्वयच्त्र्यज्भ्यामेव’ या वार्तिकाने नियमन केल्याप्रमाणे वन मध्ये चार स्वर असल्याने णत्व झाले नाही.

पूर्वाह्णे ९-९५ - येथे ‘अह्नोमऽदन्तात्’ ८-४-७ या सूत्राने णत्व झाले आहे.

शेषवाहणम् ९-९५ - येथे ‘वाहनमाहितात्’ ८-४-८ या सूत्राने णत्व झाले आहे.

सुरापाणम्… ९-९६ - येथे ‘वा भावकरणयोः’ ८-४-१० या सूत्राने णत्व झाले आहे. येथे भावे अर्थात प्रथम ल्युट् होतो.

रुधिरपायिणाम् ९-९५ - येथे ‘प्रातिपदिकान्त’ ८-४-११ या सूत्राने णत्व झाले आहे. हे सूत्र वैकल्पिक आहे. म्हणून

परस्त्रीवाहिनम् ९-९६ - येथे णत्व झाले नाही.

सुरापिणः ९-९६ - येथे ‘एकाजुत्तरपदे णः’ ८-४-१२ या सूत्राने णत्व झाले आहे.

संघर्षयोगिणः ९-९७ - येथे ‘कुमति च’ ८-४-१३ या सूत्राने णत्व झाले आहे.

प्रणेमुः ९-९७ - येथे ‘उपसर्गाद्…’ ८-४-१४ या सूत्राने णत्व झाले आहे.

प्रणीमन्तम् ९-९७ - येथे ‘हिनुमीना’ ८-४-१५ या सूत्राने णत्व झाले आहे. प्र + मी चे हे निदर्शन आहे तर

प्रहिण्वन्तः ९-९७ - येथे हे प्र + हि चे निदर्शन आहे. येथे णत्व झाले आहे.

प्रवपाणि ९-९८ - येथे ‘आनि लोट्’ ८-४-१६ या सूत्राने णत्व झाले आहे. वप् धातूचा लोट् लकार आहे.

प्रणिघ्नन्तं, प्रणिहितः, प्रणिनदन्, प्रण्यगादीत् ९-९९ - येथे ‘नेर्गदनदपतपदधु…’ ८-४-१७ या सूत्राने णत्व झाले आहे. तसेच या सूत्राने

प्रणिशाम्य, प्रणियातुम् ९-१०० - येथेहि णत्व झाले आहे.

प्रणिजानीहि ९-१०१ - येथे ‘शेषे विभाषा’ ८-४-१८ या सूत्राने णत्व विकल्पाने झाले आहे.

प्राणयन्तम् ९-१०१ - येथे ‘अनितेः’ ८-४-१९ या सूत्राने णत्व झाले आहे.

प्राणिणिषुः ९-१०१ - येथे ‘उभौ साभ्यासस्य’ ८-४-२१ या सूत्राने दोनहि नकारांना णत्व झाले आहे.

अद्यानिषत ९-०२ - येथे ‘हन्तेरत्पूर्वस्य’ ८-४-२२ या सूत्राचे प्रत्युदाहरण आहे.

अनुक्रमणिका

प्रह्ण्मः ९-१०२ - येथे 'वमोर्वा' ८-४-२३ या सूत्राने णत्व विकल्पाने झाले आहे.

अन्तर्हणनम् ९-१०३ - येथे 'अन्तरदेशे' ८-४-२४ या सूत्राने नकाराला णत्व झाले आहे.

अन्तरयणम् ९-१०३ - येथे 'अयनं च' ८-४-२५ या सूत्राने णत्व झाले आहे.

प्रयाणम् ९-१०३ - येथे 'कृत्यच' ८-४-२९ या सूत्राने णत्व झाले आहे. तसेच या सूत्राने

प्रहीणजीवितम् ९-१०४ - येथेहि णत्व झाले आहे.

प्रहापणम् ९-१०४ - येथे 'णेर्विभाषा' ८-४-३० या सूत्राने णत्व झाले आहे.

प्रकोपणं, प्रगोपणम् ९-१०५ - येथे 'हलश्चेजुपधात्' ८-४-३१ या सूत्राने कुपं, गुप्, हे धातु इजुपध असल्याने णत्व झाले नाही.

प्रेङःखणः ९-१०६ - येथे 'इजादेः सनुमः' ८-४-३२ या सूत्राने णत्व झाले आहे.

परिणिंसकः, प्रणिन्द्य, प्रणिक्षिष्यति ९-१०६ - येथे 'वा निंसनिक्ष..' ८-४-३३ या सूत्राने निस्, निन्द्, निक्ष् च्या धातुरूपांना विकल्पाने णत्व झाले आहे.

प्रगमनं, प्रभानम्, अतिप्रवेपनम्, ९-१०७ - येथे 'न भाभूपूकमि...' ८-४-३४ या सूत्राने णत्वाचा प्रतिषेध झाले आहे.

दुष्पानः ९-१०८ - येथे 'षात्पदान्तात्' ८-४-३५ या सूत्राने णत्वाचा प्रतिषेध झाला आहे.

प्रनष्टः ९-१०८ - येथे 'नशेः षान्तस्य' ८-४-३६ या सूत्राने णत्वाचा प्रतिषेध झाला आहे.

सेषभीममुखेन ९-१०९ - येथे 'पदव्यवायेऽपि' ८-४-३८ या सूत्राने विभक्तीच्या नकाराच्या णत्वाचा प्रतिषेध झाला आहे. येथे निमित्तनिमित्तिन् यांच्यामध्ये भीम पदाचें व्यवधान आल्याने णत्व झाले नाही.

क्षुभ्नता ९-१०९ - येथे 'क्षुभ्नादिषु च' ८-४-३९ या सूत्राने णत्वाचा निषेध झाला आहे.

# प्रसन्न कांड

अनुक्रमणिका

# प्रसन्न कांड

## कथानक व रचनापद्धति

### कथानक

राक्षसांनी शेपटीला आग लावल्यानंतर हनुमंताने आकाशांत उड्डान केले, लंकेतील अनेक घरांना आग लावली. नंतर सीतेची भेट घेऊन रामाकडे जाण्याची आज्ञा मागण्यास तो अशोकवनिकेंत गेला. तेथून त्याने आकाशाकडें उडी मारली. महेन्द्र पर्वतावर सर्व वानर तेथे येणाऱ्या हनुमंताच्या लोकोत्तर वेगाचा अनुभव घेत होते व म्हणत होते कीं, हा उपद्रव कोठून होत आहे? त्या वेगाने हनुमंताने वायु, सूर्य व गरुडाला देखील पराजित केले. महेन्द्र पर्वतावरील वानर समूहांत तो येऊन पोचला. नंतर सर्व वानर मधुवन नामक सुग्रीवाच्या उपवनांत आले व हनुमान् रामाला भेटायला गेला. त्याने रामाला सीतेचा चुडामणि देऊन वंदन केले. सीतादर्शन व लंकाध्वंसनाचा संपूर्ण वृत्तांत त्याने रामाला निवेदन केला. नंतर सर्व वानर समुद्राजवळ असलेल्या महेन्द्र पर्वतावर पोहचले आणि तेथून समुद्रावर आले. सभोवताल पहारा करण्याची आज्ञा देऊन रामाने तेथे झोप घेतली.

इकडे लंकेमध्ये प्रातःकाळी सूर्याने जगाचा उद्धार केला. (सूर्य उदयाला आला) तरुणी राजमंदिरांत गायला लागल्या. लंकावासी लोक रावण झोपून उठण्याच्या वेळी. अनुकूल पोषाख वगैरे करून राजभवनांत जाण्याची तयारी करू लागले. अनेक प्रकारच्या वाहनांतून राक्षसवीर रावणाच्या सेवेसाठी चालू लागले. जणू जनसमूहाने मार्गरूपी नद्यांना भरून राजाच्या अंगणरूपी समुद्राला परिपूर्ण करून टाकले. नंतर गुणांची कदर न करणाऱ्या व श्रेष्ठ ब्राह्मणांचे प्रत्याख्यान करणाऱ्या रावणाने अभ्युदयासाठी म्हणून पापिष्ठ अशा ब्रह्मराक्षसांची अगोदर पूजा केली. सर्व नित्यकृत्य केल्यानंतर रावणाने, लोकांना त्रस्त करणाऱ्या, सज्जनांचा बाधक आणि मायावी राक्षसांबरोबर सभामंडपांत प्रवेश केला. व तेथे रत्नांच्या समूहांनी जडवलेल्या सुवर्णमय सिंहासनावर तो आरूढ झाला.

प्रातःकाळानंतर देवाची पूजा केलेल्या विभीषणाला त्याची माता कैकसी म्हणाली कीं, तूं देवतांना आनंदित करीत रावणाने केलेल्या दुर्नीतीचा प्रतिकार कर. घनघोर संग्रामांत रामाकडून रावणाची हत्या होण्यापूर्वी अशा दुर्व्यवहाराचा परिहार करण्यासाठी तूं प्रयत्न कर. जनस्थानांतील सर्वच्या सर्व राक्षस मारले गेले, लंकापुरींतील योद्धे जिंकले गेले, तेथील वृक्ष उपटले गेले. सभाभवनही पेटविले गेले. अशा संकटाच्या वेळी रावणाचे रक्षण करण्याकरिता प्रयत्न कर. याप्रमाणे स्वतःला अभीष्ट असें आईचे भाषण ऐकूण विभीषण रावणाच्या भवनांत गेला. मोठ्या सन्मानाने राक्षसराज रावणाजवळ त्याला द्वारपालांनी पोचविले आणि बसावयाला आसन दिले. नंतर लंकाधिपति रावणाने सभासद राक्षसांची आरंभी प्रशंसा केली. व म्हणाला, हे राक्षसांनो खर दुषणादि वीर मारले गेले, लंका जाळली. भृत्यांसह अक्षकुमार मारला गेला. शत्रूंची सेना समुद्रतरणाची इच्छा करीत आहे. अशा परिस्थितींत काय करावे? सांगा? नंतर गर्विष्ठ असें प्रहस्तादि राक्षस आपापली शस्त्रे परजून म्हणाले, महाराज, इन्द्राच्या अभिमानाचे खंडन करण्यांत कुशल असणाऱ्या आपण, तुमचे भक्ष्य असणाऱ्या यःकश्चित् मानवाच्या चढाईला गौरवास्पद कां करीत आहात? आपल्या आज्ञेने आम्ही चन्द्रसूर्याला देखील दंड देऊ. आमच्या सकाळच्या न्याहरी करिता देखील पुरणार नाही अशा ह्या राघवाच्या बंदराला का घाबरता? त्यावेळी

विभीषणाने आपल्या भाषणाला आरंभ केला. हे प्रहस्तादि राक्षसांनो, तुम्ही आपल्या योग्यते प्रमाणेच बोलला. परंतु कर्तव्याच्या बाबतीत बुद्धीचा अधिकार असतो, शौर्याचा नाही, याप्रमाणे विभीषणाने शत्रुभूत रामाचा उत्कर्ष व रावणाचा अपकर्ष युक्ति-प्रयुक्तींनी, अनेकवार प्रतिपादन केला. वालीला ठार करणारा व सुग्रीवाचा मित्र झालेल्या रामचंद्राशी संधि केल्याने संपूर्ण राक्षसकुळाचे संरक्षण व मित्राच्या उपार्जनाने आपल्या बलाची वृद्धि होईल असें तो पुष्कळदा बोलला. विभीषणाच्या या संभाषणाला परम बुद्धिमान माल्यवानाने देखील संमति दर्शविली. त्याने रामाचा असाधारण महिमा गायला. कुंभकर्णाने देखील याच नितिमार्गाचे प्रदर्शन केले व तो झोपी गेला. यानंतर पुन्हा विभीषणाने अनेक उत्पातांचे कथन केले व रावणाला भव्य कर्तव्याचा उपदेश केला. परंतु हे सर्व असह्य होऊन रावणाने स्वतःच्या पराक्रमाची प्रशंसा केली आणि निर्भर्त्सना करून विभीषणावर (पार्ष्णीने = पावलाच्या मागच्या भागाने) लाथ हाणली. विभीषण मूलतः सहनशील असल्याने क्रोधाला आवरून चार मंत्र्यासह तो आसनावरून उठला. दोन चार वाक्य बोलला व रामचंद्रांना वंदन करण्याच्या बुद्धीने त्याने सभाभवन सोडले. 'विभीषण सच्चरित्र आहे' असे हनुमंताच्या बोलण्यावरून रामाने त्याला लंकेचे आधिपत्य कबूल करून संतुष्ट केले.

नंतर मंद मंद वायूनीं मनाला हरण करणाऱ्या लहरीमध्ये चंद्रकिरण मिश्रित रात्री कामोद्दीपक असल्याने रामचंद्राला मूर्छित अवस्थेत घालवाव्या लागल्या. समुद्राला वाट देण्याबद्दल प्रार्थना करूनहि जेंव्हा तो ऐकत नाही असे रामाने पाहिले तेंव्हा त्यांना अत्यंत क्रोध आला. त्यांनी धनुष्य धारण करताच संपूर्ण पृथ्वी कंपायमान झाली, समुद्राचे पाणी सुकून गेले. तेंव्हा समुद्र शरण येऊन म्हणाला, रामा, प्रलयकालीन अग्नीप्रमाणे भयंकर असलेले आपले बाण आवरा, तुमच्या आज्ञेने वानरांनी माझ्यावर पुल बांधावा व समुद्र पार करावा. तेंव्हा रामचंद्राचा अभिप्राय जाणून वानरांच्या सेना सेतुनिर्मितीसाठी पर्वत उपटून आणण्यासाठी तत्पर झाल्या. याप्रकारे पर्वताचे समूह उपटून ते महासागरांत टाकून नील इ. वानरांनी सेतु निर्माण केला. समुद्रतरणाचे ते साधन बघून सर्वांना फार आनंद झाला. रामाच्या प्रबळ सेनेने अत्यंत हर्षित होऊन सुवेल नामक पर्वतावर आरोहण केले. रावणाच्या सेनांशी लढायला ती उत्सुक झाली. तिकडे रावणाची सेना देखील लढायला तयार झाली.

**रचनापद्धती**

रामायणांत जांबवानाने हनुमंतला लंकायात्रेचे वर्णन विचारले व त्याने ते सांगितले, सीतेची दुरवस्था वर्णन करून लंकेवर आक्रमण करण्याकरिता हनुमानाने इतर वानरांना उत्तेजन दिले. मधुवनांतील फळे इत्यादींचा वानरांनी उपभोग घेतला. वनरक्षकाला पृथ्वीवर खेचले. इत्यादि सर्व विस्ताराने (सर्ग ५८-५९) सांगितले आहे. भट्टीने केवळ (सर्ग १० / २१-३१ भ. का.) ह्या अकरा श्लोकांत वर्णन केले आहे. परंतु सीतेचा शोध लागल्यानंतर ती बातमी रामाला जाऊन सांगण्याचा उल्लेख मात्र भट्टि करतो. (सर्ग १०/३२ भ. का.) यावरून दूत बनून गेलेल्या हनुमंताला ती आनंदाची बातमी रामाला जाऊन सांगण्याची स्वाभाविक घाई दिसून येते.

भट्टिकाव्यांत (१० / ४४-५० भ.का.) वर्णन केलेले रामलक्ष्मण व वानरांचे महेंद्र-पर्वतारोहण रामायणांत नाही. तसेच आजुबाजूला रक्षक ठेऊन रामाने शयन केल्याचा भट्टिकाव्यांतील (१० / ७५ भ. का.) निर्देशहि रामायणांत नाही. भट्टिकाव्याचा याठिकाणी दहावा सर्ग पूर्ण होऊन पुढे अकरावा सर्ग सुरू होणार आहे. त्या सर्गातील घटना सलगपणे दाखविण्यासाठी भट्टीने कदाचित् हा उल्लेख केला असेल.

भट्टिकाव्यांतील (११ / १-३७ भ. का.) प्रभातवर्णन मूळ रामायणांत आढळत नाही. रावण सभेमध्यें जातो. तेंव्हाचेही भट्टिकाव्यांतील (११ / ७५ भ. का. ) वर्णन रामायणांत नाही. पुढे बाराव्या सर्गापासून भट्टि युद्धाचे वर्णन करणार आहे,ते वाचण्यासाठी वाचकांची भूमिका तयार व्हावी म्हणून कदाचित् भट्टीने हे प्रभातवर्णन केले असावे.

भट्टिकाव्यांत (१२ / १-५ भ.का.) भट्टीने एक प्रसंग असा घालतो की, रावणाची आई विभीषणाला असें सांगते कीं, तू रावणाकडे जाऊन त्याची समजूत काढ. रामाची पत्नी सीता त्याला देऊन टाक आणि सर्व प्रकारें पुढे घडून येणारा विनाश टाळ. हे असें वर्णन रामायणांत नाही. इतर कोण्याही वडीलधाऱ्या मंडळीपेक्षा रावण आईचे म्हणणे कदाचित् मान्य करील. असे समजून भट्टीने विभीषणाकडून रावणाची अशी समजूत काढायला सांगितले असावे. राक्षसांचा संहार व लंकेची झालेली हानी बघून कोणीहि हळहळला असता, तसेच भट्टीकाव्यांत मातामह माल्यवान बोलल्याचा (१२ / ५५-६० भ. का.) किंवा कुम्भकर्ण बोलल्याचा (१२/ ६१-६८ भ. का.) उल्लेख येतो. रामायणांत असा उल्लेख नाही. विभीषण माल्यवान् किंवा कुंभकर्ण हे सर्वजण रावणाला युद्धापासून परावृत्त करण्याच्या प्रयत्नांत असलेले दाखविले आहे

## अ] अलंकारशास्त्राचें निदर्शन यादृष्टीने भट्टिकाव्य

भट्टिकाव्य हा जसा व्याकरणाचा लक्षणग्रंथ आहे तसाच तो अलंकारांचा देखील लक्षणग्रंथ आहे. आता या मुद्याचा विस्तृतपणें विचार करावयाचा आहे.

वैचित्र्य किंवा चमत्कृति हा अलंकारांचा धर्म होय. वैचित्र्य म्हणजे चटकदारपणा. रसाला अनुकूल होईल अशा प्रकारें जेंव्हा शब्दनिष्ठ वैचित्र्य दिसून येते तेंव्हा शब्दालंकार होतो. शब्दालंकार हा शब्दनिष्ठ असतो. म्हणजे तो अलंकार विशिष्ट शब्दरचनेवर अवलंबून असतो. भट्टिकाव्याचा दहावा सर्ग अलंकारांचे निदर्शन आहे. भट्टीने शब्दालंकारापैकी अनुप्रास व यमक यांचीच निदर्शने दिलीं आहेत. ती अशीं - प्रथम आपण भट्टीने दिलेल्या अनुप्रास या अलंकाराचा विचार करूं –

### शब्दालंकार

### अनुप्रासवत् अलंकार

अनुप्रास ज्यांत आहे त्याला अनुप्रासवत् अलंकार म्हणतात. अनुप्रासांत एका किंवा अनेक वर्णांचीहि आवृत्ति होऊ शकते. म्हणून रसाला पोषक अशी चमत्कृति निर्माण करणारी व्यंजनांची जेथे आवृत्ति होते तेथे अनुप्रास अलंकार होतो त्यांचे लक्षण असें "सरूपवर्णविन्यासमनुप्रासं प्रचक्षते" । हा सरूप वर्णांचा विन्यास वेगवेगळ्या पद्धतीने होऊ शकतो. या वर्णांच्या आवृत्तीवरून अनुप्रासाचे प्रकार पडतात. छेकानुप्रास, वृत्त्यनुप्रास, श्रुत्यनुप्रास, अन्त्यानुप्रास, लाटानुप्रास. यापैकी भट्टीने वृत्त्यनुप्रासाचे निदर्शन दिले आहे –

अथ स वल्कदुकूलकुथादिभिः
परिणतो जलदुद्धतवालाधः ।

अनुक्रमणिका

उदपतद् दिवमाकुललोचनै –
नृरिपुभिः स भयैरभिवीक्षितः ॥ १०-१

येथे प्रथम चरणांत लकारांची, दुसऱ्या चरणांत तकार व धकारांची तिसऱ्या चरणांत लकारांची व चवथ्या चरणांत रेफ आणि भकारांची आवृत्ति झाली आहे. म्हणून येथे वृत्त्यनुप्रास अलंकार आहे.

**यमक अलंकार**

यमकामध्ये त्याच वर्णाची पुनः आवृत्ति होते व क्रमहि तोच असतो, मात्र प्रत्येकवेळी अर्थ भिन्न असतो जेंव्हा एखाद्या पद्यांत दोन किंवा अधिक वर्ण ज्या क्रमाने आले असतील त्याच क्रमाने त्यांची मागील स्वरासहित पुनरावृत्ति होते. त्या आवृत्त झालेल्या वर्णसमूहास अर्थ असेल आणि प्रत्येक वेळी तो अर्थ भिन्न असेल तेंव्हा यमक हा अलंकार होतो –

तुल्यश्रुतीनां भिन्नानामभिधेयैः परस्परम् ।
वर्णानां यः पुनर्वादो यमकं तन्निरुप्यते ॥

**१. युक्पाद यमक**

यमक अलंकाराचेहि अनेक प्रकार आहेत. त्यापैकी भट्टि युक्पाद यमकाचे निदर्शन असें देतो –

रणपण्डितोऽग्र्यविबुधाऽरिपुरे
कलहं स राममहितः कृतवान् ।
ज्वलदग्नि रावणगृहं च बलात्
कलहंसराममहितः कृतवान् ॥ १०-२

येथे द्वितीय चरणाचें चतुर्थ चरणाशी यमक साधलें आहे. म्हणून येथे युक्पाद यमक नांवाचा अलंकार आहे. यालाच मराठींत युग्मक म्हणतात.

**२. पादान्त यमक**

दोन चरणांच्या अंती त्याच क्रमाने अक्षरांची पुनरावृत्ति झाली असता अंत्ययमक होते. अर्थातच आवृत झालेलीं अक्षरें भिन्न अर्थाने यावी लागतात. भट्टीचें निदर्शन असे –

निखिलाऽभवन् न स-हसा सहसा
ज्वलनेन पूः प्रभवता भवता ॥
वनिताजनेन वियता वियता

अनुक्रमणिका

त्रिपुराऽऽपदं नगमिता गमिता ॥ १०-३

### ३. पादादि यमक

जेंव्हा चरणांच्या प्रारंभी यमक असते तेंव्हा त्यास आदियमक म्हणतात. भट्टीचें निदर्शन न असें :-

सरसां स- रसां परिमुच्य तनुं
पततां पततां कुकुभो बहुशः ।
स — कलैः सकलैः परितः करुणै —
रुदितै रुदितैरिव खं निचितम् ॥ १०-४

येथे प्रत्येक चरणाच्या आरंभी यमक साधले आहे.

### ४. पादमध्य यमक

जेंव्हा चरणांच्या मध्ये तींच अक्षरे त्याच क्रमाने येतात तेंव्हा मध्य यमक होते.

न च कांचन काञ्चनसद्मतचिति.
न कपिः शिखिना शिखिना समयौत् ।
न च न द्रवता द्रवता परितो
हिमहानकृता न कृता क्व च न ॥ १०-५

येथे प्रत्येक चरणाच्या मध्ये यमक साधले आहे.

### ५. चक्रवाल यमक

या यमकाचें लक्षण असें —

पदानामवसाने तु वाक्ये स्यात्तुल्यवर्णता ।
प्रतिपादं भवेद्यत्र चक्रवालं तदुच्यते ॥

चक्रवाल यमकांत मंडलाकाराने यमक साधलें असते. भट्टिकाव्यांतील चक्रवाल यमकाचें निदर्शन असें आहे —

अवसितं हसितं प्रसितं मुदा
विलसितं — हसितं स्मरभासितम् ।

अनुक्रमणिका

न स — मदाः प्रमदा हत — संप्रदा
पुरहितं विहितं न समीहितम् ॥ १०-६

**६. समुद्गयमकम्**

चरणाच्या प्रथमार्धाची आवृत्ति द्वितीयार्धात झाली असल्यास समुद्गकयमक होतें.

समिद्धशरणा दीप्ता देहे लंका मतेश्वरा ।
समिद्धशरणादीप्ता देहेऽलंकामतेश्वरा ॥ १०-७

येथे समुद्गी आकाराने यमक साधलें आहे.

**७. काञ्ची यमक**

एका चरणाचा अन्त व दुसऱ्या चरणाचा आरंभ जेथें सारखा असतो तेथे काञ्ची यमक होते. भट्टीने या अलंकाराचें निदर्शन असे दिलें आहे.

पिशिताशिनामनुदिशं स्फुटतां
स्फुटतां जगाम परिविह्वलता ।
ह्विलता जनेन बहुधा चरितं
चरितं महत्त्वरहितं महता ॥ १०-८

येथे रसना (काञ्ची) आकाराने यमक साधले आहे.

**८. यमकावली**

यमकांची मालाची माला जेथे दिसते तेथे यमकावली अलंकार होतो. भट्टीने दिलेले निदर्शने असें —

न गजा नगजा दयिता दयिता विगतं विगतं ललितं ललितम् ।
प्रमदा प्रमदाऽऽमहता महतामरणं मरणं समयात् समयात् ॥ १०-९

येथे मालाकाराने यमक साधलें आहे.

**९. अयुक्पाद यमक**

जेथे प्रथम चरणाचें तृतीय चरणाशी यमक साधलें असते तेथे अयुक्पाद यमक हा यमकालंकाराचा भेद होतो. भट्टीने दिलेलें निदर्शन असें आहे –

न वानरैः पराक्रान्तां महद्भिर्भीमविक्रमैः ।
न वा नरैः पराक्रान्तां ददाह नगरीं कपिः ॥ १०-१०

येथे प्रथम आणि तृतीय चरणांतील अक्षरें सारखी असून क्रम सारखा परंतु अर्थ भिन्न आहे.

**१०. पादाद्यन्तयमक**

जेथे चरणाचा आदि व अंत यमकाने होतो तेथे पादाद्यन्तयमक होते. भट्टि याप्रमाणे निदर्शन देतो –

द्रुतं द्रुतं वाहिनसमागतं गतं
महीमहीनद्युतिरोचितं चितम् ।
समं समन्तादपगोपुरं पुरं
परैः परैरप्यनिराकृतं कृतम् ॥ १०-११

येथे चरणाच्या आदि द्रुतम्, द्रुतम् असा किंवा समम्, समम् असा यमक असून अंती चितम्, चितम् असा किंवा कृतम्, कृतम् असा यमक साधलेला आहे. म्हणून पादाद्यन्तयमक झाला आहे.

**११. मिथुन यमक**

प्रथम चरणाचें द्वितीय चरणाशी आणि तृतीय चरणाचें चतुर्थ चरणाशी यमक साधलेले असल्यास तेथे मिथुन यमक होते. भट्टीने दिलेलें निदर्शन असें –

नश्यन्ति ददर्श वृन्दानि कपीन्द्रः ।
हारीण्यबलानां हारीण्यबलानाम् ॥ १०-१२

येथे तृतीयाचे चतुर्थ चरणाशी चक्रवाक मिथुनाप्रमाणे यमक साधलें आहे.

**१२. वृन्तयमक**

या प्रकाराचें भट्टीनें दिलेलें निदर्शन असें –

अनुक्रमणिका

नारीणामपनुनुदुर्न देहरोदान्
नाऽऽरीणाऽमलसलिता हिण्यवाप्यः ।
नाऽऽरिणामनलपरीतपत्रपुष्पान्
नाऽरीणामभवदुपेत्य शर्म वृक्षान् ॥ १०-१३

प्रत्येक पुष्प ज्याप्रमाणे त्याच्या वृन्तावर (देठावर) अवस्थित असते तसे येथे प्रत्येक पद मुळावर अवस्थित आहे म्हणून वृन्तयमक हा प्रकार साधला आहे.

### १३. पुष्पयमक

वृत्ताच्या चरणांत यतीवर म्हणजे विरामस्थानी यमक असल्यास त्याला पुष्पयमक असें म्हणतात. भट्टीने दिलेलें निदर्शन असें —

अथ लुलितपत्तत्रिमालं
रुग्णासनबाणकेशरतमालम् ।
स वनं विविक्तमालं
सीतां द्रष्टुं जगामाऽलम् ॥ १०-१४

येथे विरामस्थानी यमक साधल्याने पुष्पयमक नांवाचा यमकाचा प्रकार आहे.

### १४. पादादिमध्ययमक

जेंव्हा चरणाच्या आदि व मध्ये तीच अक्षरे त्याच क्रमाने पुन्हा येतात तेंव्हा आदिमध्ययमक होते. भट्टीचें निदर्शन असें —

घनगिरीन्द्रविलङःघनशालिना
वनगता वनजद्युतिलोचना ।
जनमता ददृशे जनकात्मजा
तरुमृगेण तरुस्थलशायिनी ॥ १०-१५

येथे पादाच्या आदि मध्ये घन, वन, जन, तरु यांची यमके साधलीं आहेत. म्हणून पादादिमध्य यमक हा प्रकार आहे.

### १५. विपथ यमक

कान्ता सहमाना दुःख च्युतभूषा ।

रामस्य वियक्ता कान्ता सहमाना ॥ १०-१६

येथे कान्ता सहमाना या पदांचा दुसऱ्या चरणांत क्रम बदलला आहे.

**१६. मध्यान्तयमक**

मितमवददुदारं तां हनूमान् मुदाऽरं
रघुवृषभसकाशं यामि देवि प्रकाशम् ।
तव विदितविषादो दृष्टकृत्स्नामिषादः ।
श्रियमनिशमवन्तं पर्वतं माल्यवन्तम् ॥ १०-१७

येथे चरणाच्या मध्ये व अन्ती यमक साधले आहे.

**१७. गर्भयमक**

उदपतद्वियदप्रगमः परै-
रुचितमुन्नतिमत्पृथुसत्त्ववत् ।
रुचितमुन्नतिमत्पृथुसत्त्ववत्
प्रतिविधाय वपुर्भयदं द्विषाम् ॥ १०-१८

येथे दोन चरणांच्या मध्ये दोन चरणांचे यमक साधले आहे. ते दोन चरणांच्या मध्ये आहे असे म्हणून गर्भयमक म्हणतात.

**१८. सर्वयमक**

श्लोकांतील चारहि चरण एकरूप असल्यास सर्वयमक होते. भट्टीचें निदर्शन असें आहे —

बभौ मरुत्वान् वि-कृतः स-मुद्रो ।
बभौ मरुत्वान् विकृतः स-मुद्रः ।
बभौ मरुत्वान् विकृतः समुद्रो
बभौ मरुत्वान् विकृतः समुद्रः ॥ १०-१९

येथे चारहि चरण सारखे आहेत.

**१९. महायमक**

पहिला श्लोक व दुसरा श्लोक एकरूप असून अर्थदृष्ट्या भिन्न असतो तेंव्हा महायमक होते. भट्टीनें दिलेलें निदर्शन असें आहे —

अभियाता वरं तुङःगं भू — भृतं रुचिरं पुरः ।
कर्कशं प्रथितं धाम स — सत्त्वं पुष्करेक्षणम् ॥ १०-२०
अभियाऽताऽऽवरं तुङ्गंभू — भृतं रुचिरं पुरः ।
कर्कशं प्रस्थितं धाम स — सत्त्वं पुष्करे क्षणम् ॥ १०-२१

येथे एका श्लाकांचे दुसऱ्या श्लोकाशी यमक साधलें आहे.

**२०. आद्यन्त यमक**

जेथे श्लोकाच्या आदी व अंती यमक असते तेथे आद्यन्तयमक होते.

चित्रं चित्रमिवाऽऽयातो विचित्रं तस्य भू — भृतम् ।
हरयो वेगमासाद्य संत्रस्तो मुमुहुर्मुहुः ॥ १०-२२

येथे श्लोकाच्या आदी व अंती यमक आहे.

याप्रमाणे भट्टीकाव्यांतील शब्दालंकाराचें विवेचन केल्यानंतर आपण अर्थालंकारांचा विचार करू.

## अर्थालंकार

नाट्याचार्य भरताने अलंकारांचा क्रम दीपक, रूपक, उपमा असा दिला आहे. भामह किंवा दंडि यांचा क्रम उपमा, रूपक, दीपक असा आहे. आपण भट्टिकाव्याचा दहावा सर्ग वाचायला लागलो तर आपल्याला असें दिसतें की, त्याने प्रारंभी जीं अलंकारांची निदर्शने दिलीं आहेत ती भरताच्या क्रमाने म्हणजे प्रथम दीपक नंतर रूपक अशी आहेत. त्यानंतर जीं निदर्शने आहेत त्यांतील क्रम आणि भामहाचा क्रम सारखा आहे. यावरून असा तर्क करायला हरकत नाही कीं, भरत व भामह या दोघांच्या मधल्या काळांत जो कोणी प्रसिद्ध आलंकारिक झाला असेल त्याच्या क्रमाप्रमाणे भट्टीने आपल्या काव्यांत निदर्शनें दिलीं असतील. तो विशिष्ट ग्रंथ आज उपलब्ध नाही म्हणून प्रस्तुत प्रकरणांतील विवेचन भामहाला अनुसरून केले आहे. भामहाचें विवेचन जेथे मिळत नाही तेथे दंडीच्या विवेचनाचा आधार घेतला आहे.

### १. दीपक अलंकार

सर्वात अगोदर भट्टीनें दीपक अलंकार घेतला आहे. आपणहि दीपकापासूनच आरंभ करूं या. सुरवातीला दीपक अलंकाराचे सामान्य स्वरूप लक्षांत घेऊ. हा अलंकार देहली दीपकन्यायावर बसविला आहे. उंबरठ्यावर ठेवलेला दिवा घरालाहि प्रकाशित करतो आणि रस्त्यालाहि प्रकाशित करतो पण दिवा ठेवणाऱ्याचा मुख्य हेतु घर प्रकाशित करण्याचा असतो, रस्ता केवळ अनुषंगाने प्रकाशित होतो. तसेच येथे आहे. दंडि 'काव्यादर्शात' दीपकाचे लक्षण पुढीलप्रमाणे देतो –

जातिक्रियागुणद्रव्यवाचिनैकत्रवर्तिना ।
सर्ववाक्यो प्रकारश्चेत् तमाहुर्दीपकं यथा ॥ २-९७

भट्टीने दिलेले दीपक अलंकाराचें निदर्शन असें –

गच्छन् स वारीण्यकीरत् पयोधेः
कूलस्थितांस्तानि तरूनधुन्वन् ।
पुष्पस्तरांस्तेऽङःगसुखानतन्वन्
तान् किन्नरा मन्मथिनोऽध्यतिष्ठन् ॥ १०-२३

भामहाने दीपक अलंकाराचें लक्षण दिलें नाही परंतु आदि, मध्य व अंत असें त्याचे तीन प्रकार होतात असें सांगितले आहे. त्यापैकी हे आदि दीपकाचें निदर्शन आहे असें जयमंगल व शेषराज शर्मा शास्त्री म्हणतात. कारण येथे 'गच्छन्' हे क्रियापद आरंभी आलें आहे.

उत्तरकालीन आलंकारिकांच्या दृष्टीने हे मालादीपकाचे निदर्शन होईल कारण 'पूर्वी पूर्वी येणारी प्रत्येक गोष्ट पुढील पुढील प्रत्येक गोष्टीचा उत्कर्ष करणारी असते. अशी त्याची व्याख्या आहे. येथेहि असेत दिसते. हनुमानाने त्याच्या वेगाने समुद्राचें पाणी उसळविलें, त्या उसळण्याने तटावरचीं झाडें कंपित झालीं, झाडें कंपित झाल्याने फुलें गळून पडलीं आणि फुलें गळल्याने त्या फुलांवर किन्नर जाऊन बसलें. येथे पूर्वी पूर्वीची गोष्ट पुढील पुढील गोष्टीला गुणावह ठरली आहे. म्हणून मालादीपक अलंकार झाला आहे.

भट्टि अन्त्यदीपकाचें निदर्शन पुढीप्रमाणे देतो –

स गिरिं तरुखण्डमण्डितं
समवाप्य त्वरया लतामृगः ।
स्मितदर्शितकार्यनिश्चयः
कपिसैन्यैर्मुदितैरमण्डयत् ॥ १०-२४

अनुक्रमणिका

येथे 'अमण्ड्यत्' हे क्रियापद श्लाकाच्या शेवटी आल्याने हें अन्त्यदीपकाचें निदर्शन आहे असें जयमंगल म्हणतो. मल्लिनाथ पदार्थहेतुक काव्यलिंग मानतो.

भट्टि मध्यदीपकाचें निदर्शन असें देतो –
गरुडानिलतिग्मरश्मयः
पततां यद्यपि संमता जवे ।
अचिरेण कृतार्थमागतं
तममन्यन्त तथाप्यतीव ते ॥ १०-२५

येथे 'अमन्यन्त' या क्रियापदाचा मध्ये निर्देश आल्याने हें मध्यदीपकाचें निदर्शन आहे. मल्लिनाथ याठिकाणीं पदार्थहेतुक काव्यलिंग अलंकार मानतो.

**२. रूपक अलंकार**

भट्टीने दीपकानंतर रूपक अलंकाराचें निदर्शन दिले आहे. रूपकाचें सर्वसामान्य स्वरूप असें आहे. – सादृश्यावर आधारलेल्या अभेदप्रधान अलंकारांत रूपक हा प्रमुख अलंकार आहे. रूपक अलंकारांत लक्षणेचा खेळ आहे. गौणी सारोपा लक्षणा म्हणून जी सांगितली ती रूपकाचा आश्रय आहे. परंतु गौणी लक्षणेतील प्रत्येकच आरोप रूपकाचा विषय होत नाही. त्या आरोपांतून सौंदर्य प्रतीत झालें पाहिजे म्हणजेच तो आरोप वैचित्र्यपूर्ण हवा. भामह रूपकाचें लक्षण असें देतो –

उपमानेन यत्तत्त्वमुपमेयस्य रूप्यते ।
गुणानां समतां दृष्ट्वाय रूपकं नाम तद्विदुः ॥ २-२१

भट्टीचे रूपक अलंकाराचें निदर्शन असें –

व्रणकन्दरलीनशस्त्रसर्पः
पृथुवक्षः स्थलकर्कशोरुभित्तिः ।
च्युतशोणितबद्धधातुरागः
शुशुभे वानरभूधरस्तदासौ ॥ १०-२६

येथे उपमानभूत असलेल्या भूधराशी उपमेयभूत असलेल्या कपीचें तादात्म्य निरूपण केलें आहे. म्हणून रूपक अलंकार झाला आहे. रूपकाच्या अनेक प्रकारांपैकी हे समस्त वस्तुविषय रूपकाचें निदर्शन आहे. कारण येथील आरोप शाब्द आहे. मल्लिनाथ येथे सावयव रूपक मानतो.

**उपमा रूपक**

चलपिङ्गकेशरहिरण्यलताः स्फुटनेत्रपङ्क्तिमणिसंहतयः।
कलधौतसानव इवाऽथ गिरेः कपयो बभूः पवनजागमने ॥ १०-२७

येथे कलधौतसानव इव येथे उपमा वापरल्याने उपमायुक्त रूपक अलंकार झाला आहे. मल्लिनाथ या ठिकाणीं उत्प्रेक्षा अलंकार सांगतो.

**खण्डरूपक**

कपितोनिधीन् प्लवङ्गमेन्दुर्मदयित्वा मधुरेण दर्शनेन।
वचनाऽमृतदीधितीर्वितन्वन्नकृताऽऽनन्दपरीतनेत्रवारीन् ॥ १०-२८

'आनन्दपरीतनेत्रवारीन्' हा रूपित अर्थाहून अन्य अर्थ सांगितला आहे. म्हणून हे खण्डरूपकाचें निदर्शन आहे. मल्लिनाथ अतिशयोक्ति व रूपकाचा संकर मानतो

**अर्धरूपक**

परिखेदितविन्ध्यवीरूधः परिपीताऽमलनिर्झराऽम्भसः।
दुधुवुर्मधुकाननं ततः कपिनागा मुदिताङ्गदाऽऽज्ञया ॥ १०-२९

येथे कपिनागा हे अर्धरूपक आहे. कपयः एक नागाः हा रूपक समास आहे. मल्लिनाथ उपमा हा अलंकार मानतो .

**ललाम रूपक**

विटपिमृगविषादध्वान्तनुद्वानराऽर्कः
प्रियवचनमयूरवैर्बोधिताऽर्थारविन्दः।
उदयगिरिमिवाऽद्रिं संप्रमुच्यऽभ्यगात् खं
नृपहृदयगुहास्थं घ्नन् प्रमोहाऽन्धकारम् ॥ १०-३०

हे रूपक अन्वर्थ उपमेने युक्त आहे. म्हणून याला ललामरूपक असें म्हणतात. उदेति अस्मात् इति उदयः स चासौ गिरिश्चेति हा येथे अन्वर्थ आहे. असें जयमंगल म्हणतो.

अनुक्रमणिका

**३. उपमा अलंकार**

रूपकानंतर भट्टीने उपमा अलंकाराचें निदर्शन दिलें आहे. प्रथम आपण उपमेचे सामान्य स्वरूप बघू –

उपमा हा अलंकार आपल्या नित्याच्या परिचयाचा आहे.

आपणांस ठाऊक असलेल्या एखाद्या वस्तूंतील गुणधर्माच्या सारखेपणावरून दुसऱ्या वस्तूंतील आपणांस ठाऊक नसलेल्या गुणधर्माचा परिचय करून देण्याचें कार्य उपमा करतें.

उपमा म्हणजे दोन वस्तूंची एखाद्या समान गुणधर्माच्या बाबतीत केलेली तुलना होय. मात्र जेथे जेथे अशी तुलना आढळते तेथे तेथे सर्वच ठिकाणी उपमा होत नाही. तुलनेबरोबरच उपमेला दुसरी एक गोष्ट आवश्यक आहे ती म्हणजे चमत्कृति ही होय. चमत्कृति म्हणजे चटकदारपणा. या चमत्कृतीलाच वैचित्र्य, हृद्यता, विच्छित्ति वगैरे नांवे आहेत. उपमेतील तुलना ही चटकदार असली पाहिजे. वाचकाच्या मनाला एकदम खेचून घेईल असें वैचित्र्यपूर्ण साम्य उपमेंत आढळले पाहिजे. म्हणूनच उपमेची व्याख्या अशी – दोन भिन्न पदार्थांतील रमणीय साधर्म्य किंवा सादृश्य ज्या वाक्यांतून प्रतीत होते तेथे उपमा अलंकार होतो किंवा उपमान व उपमेय यांच्यातील रमणीय साधर्म्य म्हणजे उपमा. भामह उपमेचें लक्षण असें देतो –

विरुद्धेनोपमानेन देशकालक्रियादिभिः।
उपमेयस्य यत्साम्यं गुणलेशेन सोपमा ॥

दोन वस्तूंमधील साम्याला उपमा म्हणतात परंतु दोन वस्तूंमध्यें सर्वात्मना साम्य सर्वथा असंभव आहे. दोन वस्तु सर्वदृष्टीनें सारख्या असणे अकल्पनीय आहे. अशा अवस्थेंत उपमा संभवनीयच होणार नाही. ह्यासाठीच भामहाने व्याख्येमध्ये 'गुणलेशेन' पद घातलें आहे. मुख आणि चन्द्र परस्परांहून भिन्न आहेत केवळ आल्हादकता या आधारावर त्यांत उपमा साधली जाते. उपमेचें अनेक प्रकार आहेत. इवोपमेचें भट्टि पुढीलप्रमाणे निदर्शन देतो.

रघुतनयमगात् तपोवनस्थं विधृतजटाऽजिनवल्कलं हनूमान्।
परमिव पुरुषं नरेणयुक्तं समशमवेशसमाधिनाऽनुजेन ॥ १०-३१

या श्लोकांत 'इव' शब्द आल्याने ही इवोपमा आहे. येथे उपमार्थ 'इव' शब्दाने कळतो.

**यथोपमा**

करपुटनिहितं दधत् स रत्नं
परिविरलाऽङ्गुलिनिर्गताल्पदीप्ति।
तनुकपिलघनस्थितं यथेन्दुं
नृपमनमत् परिभुग्नजानुमूर्धा ॥ १०-३२

या श्लोकांत उपमार्थ ‘यथा’ शब्दाने कळतो म्हणून ही यथोपमा आहे.

**सहोपमा**

रुचिरोन्नतरत्नगौरवः परिपूर्णोऽमृतरश्मिमण्डलः ।
समदृश्यत जीविताशया सह रामेण वधूशिरोमणिः ॥ १०-३३

यांत सह शब्दाने उपमार्थ द्योतित झाला आहे म्हणून ही सहोपमा आहे. मल्लिनाथ येथ सहोक्ति अलंकार मानतो.

**तद्धितोपमा**

अवसन्नरुचिं वनागतं तमनामृष्टरजोविधूसरम् ।
समपश्यदपेतमैथिलिं दधतं गौरवमात्रमात्मवत् ॥ १०-३४

आत्मवत् येथे आत्मना तुल्यम् - ‘तेन तुल्यं क्रिया चेद्वतिः’ । या सूत्राने वति प्रत्यय झाला. तो तद्धित प्रत्यय म्हणून ही तद्धितोपमा झाली आहे.

**लुप्तोपमा**

सामर्थ्यसंपादितवाञ्छितार्थश्चिन्तामणिः स्यान्न कथं हनूमान् ।
सलक्ष्मणो भूमिपतिस्तदानीं शाखामृगानीकपतिश्च मेने ॥ १०-३५

चिन्तामणिः येथे ‘इव’ शब्दाचा लोप झाल्याने ही लुप्तोपमा झाली आहे. मल्लिनाथ उत्प्रेक्षा अलंकार मानतो.

**समोपमा**

युष्मानचेतन क्षयवायुकल्पान् सीतास्फुलिङगं परिगुह्य जाल्मः ।
लङःकावनं सिंहसमोऽधिशेते मर्तु द्विषन्नित्यवदद्धनूमान् ॥ १०-३६

येथे ‘सम’ या शब्दाने उपमेचें अभिधान झालें आहे म्हणून ही समोपमा झाली आहे.

अनुक्रमणिका

**४. अर्थान्तरन्यास अलंकार**

पुष्कळदा बोलतांना आपण असें करतो. एखादी विशेष गोष्ट सांगत असतां आपण सामान्य नियमाने तिचे समर्थन करतो किंवा एखाद्या सामान्य नियमाचें समर्थन विशेष गोष्टीने करतो. काव्यामध्ये जेंव्हा असा प्रकार दिसतो तेव्हा तेथे अर्थान्तरन्यास अलंकार होतो. अर्थान्तर = दुसरा अर्थ (अर्थात् येथे सामान्य – विशेषांपैकी अर्थ अपेक्षित आहे)

न्यास = ठेवणे जेथे सामान्य विशेषांपैकी एकाचें समर्थन करण्यास दुसरा अर्थ सांगितला असतो तेथे अर्थान्तरन्यास होतो. अर्थान्तरन्यासांतील दोन अर्थांपैकी एक सामान्य व दुसरा विशेष अर्थ असतो. तसेच त्यापैकी एक प्रकृत आणि दुसरा अप्रकृत असतो आणि समर्थनहि साधर्म्याने किंवा वैधर्म्याने होऊ शकते. भामह अर्थान्तरन्यासाचें लक्षण असे देतो –

उपन्यसनमन्यस्य यदर्थस्योदितादृते ।
ज्ञेयः सोऽर्थान्तरन्यासः पूर्वार्थानुगतो तथा ॥ २-७१

एक गोष्ट सांगून त्याच्या समर्थनाकरिता जेंव्हा दुसरी गोष्ट सांगितली जाते तेंव्हा अर्थान्तरन्यास अलंकार होतो. भामहाने अर्थान्तरन्यासांत सामान्य विशेषभावाचा निर्देश केला नाही. परंतु नंतरच्या आलंकारिकांनी स्पष्टपणे असें म्हटलेले आहे कीं, सामान्याचें विशेषाने व विशेषाचे सामान्याने समर्थन असेल तर तो अर्थान्तरन्यास अलंकार होईल. अर्थान्तरन्यासाचें भट्टीने दिलेले निदर्शन असें –

अहृत धनेश्वरस्य युधि यः समेतमायो धनं
तमहमितो विलोक्य विबुधैः कृतोत्तमायोधनम् ।
विभवमदेन निह्नुःतन्हियाऽतिमात्रसंपन्नकं
व्यथयति सत्यथादधिगताऽथवेह संपन्नकम् ॥ १०-३७

येथे कुबेराचें पुष्पक विमान हरण करणाऱ्या देवतांशी संग्राम करणाऱ्या, संपत्तीने मदोन्मत अशा रावणाला मी पाहून आलो या विशेष अर्थाचे संपत्ति कोणत्या पुरुषाला सन्मार्गापासून विचलित करीत नाही, या सामान्य अर्थाने समर्थन केले आहे. म्हणून येथे अर्थान्तरन्यास अलंकार झाला आहे. मल्लिनाथ याठिकाणी अर्थान्तरन्यास आणि यमक यांची संसृष्टि सांगतो.

**५. आक्षेप-अलंकार**

आक्षेप म्हणजे निषेधाचा आभास किंवा गर्भित निषेध. अर्थात् येथे दोन प्रकारचा निषेध अभिप्रेत आहे. आपण जे अगोदर सांगितले आहे त्याचाच निषेध करणें किंवा जे आपण सांगणार आहोंत त्याचा निषेध करणे. हे करीत असतांना जी गोष्ट आपण सांगितली किंवा सांगणार आहोंत ती गोष्ट ऐकणाऱ्याच्या मनावर आपण अधिक

अनुक्रमणिका

परिणामकारकतेने बिंबवीत असतो. अर्थात् यांतहि व्यंजनेचा खेळ असतोच. सांगितलेल्या गोष्टीचा किंवा सांगावयाच्या गोष्टीचा आपण निषेध केला म्हणजे आपल्या मनांत काय आहे हे आपण सुचवितो.

आक्षेप :-अलंकाराचें लक्षण भामहाने असे दिले आहे.

प्रतिषेध इवेष्टस्य यो विशेषाभिधित्सया ।
आक्षेप इति तं सन्तः शंसन्ति द्विविधं यथा ॥ २-६८
वक्ष्यमाणोक्तविषयस्तत्राक्षेपो द्विधा मतः । २-६७

उक्तविषय :-आक्षेपाचें निदर्शन भट्टि पुढीलप्रमाणे देतो –

ऋद्धिमान् राक्षसो मूढश्चित्रं नाऽसौ युदुद्धतः ।
को वा हेतुरनार्याणां धर्म्ये वर्त्मनि वर्तितुम् ॥ १०-३८

समृद्ध व मूढ असा हा राक्षस दुर्वर्तनी नसता तरच आश्चर्य होते. ह्या पूर्वार्धात सांगितलेल्या इष्ट अर्थाचा "को वा" इत्यादि पदाने, कांही विशेष सांगण्याच्या हेतूने प्रतिषेध केला आहे. दुर्जनांना धर्म्य मार्गाचे अनुसरण करण्याचें कांही कारण नाही हाच तो अर्थ होय. हा उक्तविषय – आक्षेप होय. मल्लिनाथ येथे अर्थान्तरन्यास व काव्यलिंग यांचा संकर मानतो. वक्ष्यमाण विषय आक्षेपाचें निदर्शन पुढीलप्रमाणे आहे

तस्याऽधिवासे तनुरुत्सुकाऽसौ दृष्टा मया रामपतिः प्रमन्युः ।
कार्यस्य सारोऽमुदीरितो वः प्रोक्तेन शेषेण किमुद्धतेन ॥ १०-३९

रावणाच्या नगरींत राहणाऱ्या सीतेला मी पाहिले. मी केलेल्या कार्याचे साररूपाने आपणास निवेदन केले आहे. या पूर्वार्धात सांगितलेल्या इष्टार्थाचा प्रतिषेध 'अशोक वनिकेचा भंग इ. सांगण्याचें काही प्रयोजन नाही' असे म्हणून केला आहे. येथे जे पलीकडे सांगवयाचे त्याचाच निषेध केला आहे. म्हणून हा वक्ष्यमाण विषय आक्षेप आहे.

**६. व्यतिरेक – अलंकार**

व्यतिरेक म्हणजे आधिक्य अर्थात् या अलंकारात उपमेयाचें उपमानाहून आधिक्य अपेक्षित आहे. एखाद्या धर्माच्या बाबतीत उपमेयाचें आधिक्य दाखविणे ही व्यतिरेकाची मध्यवर्ती कल्पना आहे. येथे कवि उपमेयाचा सरसपणा स्पष्टपणे आपल्यापुढे मांडतो. उपमेयाचा हा सरसपणा कवि दोन प्रकारें दाखवितो. एकतर उपमेयाचा उत्कर्ष दाखवून किंवा उपमानाचा अपकर्ष दाखवून. व्यतिरेकाची भामहाने केलेली व्याख्या अशी –

उपमानवतोऽर्थस्य यद्विशेषनिदर्शनम् ।
व्यतिरेकं तमिच्छन्ति विशेषापादनाद्यथा ॥ २-७५

भट्टि व्यतिरेकाचें निदर्शन असे देतो –

समतां शशिलेखयोपयायादवदाता प्रतनुः क्षयेण सीता।
यदि नाम कलङःक इन्दुलेखामतिवृत्तो लधयेन्न चाऽपि भावी ॥ १०-४०

येथे उपमेयभूत सीतागत सौंदर्याचे आधिक्य उपमानभूत चन्द्राचा अपकर्ष करून दाखविलें आहे.

**७. विभावना – अलंकार**

कारणाशिवाय कार्य दिसणे अशा प्रकारचें जेथे वचन असते तेथे विभावना अलंकार होतो. "अपीतमत्ताः शिखिनः" – मद्यपानाशिवायच मोर उन्मत्त दिसूं लागलें. येथे विभावना आहे. एखाद्या मनुष्य मत्त किंवा झिंगल्यासारखा दिसतो तेव्हा त्याने मद्य घेतले असावे असा आपण अंदाज करतो. सारांश मद्य हे कारण आणि मत्तता हे कार्य हा संबंध आपल्या मनांत ठरून गेलेला असतो. पण जेव्हा आपण मयूराला मद्याशिवायच मत्त झालेले पाहतो तेव्हा आपल्या मनांत कारणांशिवायच कार्य झाल्याचा विरोध उभा राहतो. अर्थात् विरोधाचा इतर प्रकारांप्रमाणेच येथेहि परिहार होऊ शकतो. मद्य हे मत्ततेचें प्रसिद्ध कारण आहे. ते येथे दिसत नाही. पण येथे दुसरेच कारण आहे ते म्हणजे वर्षाॠतुचा समय, अर्थातच हा प्रसिद्ध हेत नाही. सारांश कारणाशिवाय कार्य दिसणे हे विभावनेचे स्वरूप असलें तरी तिचें कार्य लोकप्रसिद्ध कारणाहून वेगळे असे स्वाभाविक किंवा कविकल्पित कारण सुचविणे हे आहे व विभावना शब्दातहि हाच अर्थ गर्भित आहे. (विभाव्यते कारणान्तरम् अस्याम्) कवि हे कसें साधूं शकतो? मद्यामुळे येणारी मत्तता व वर्षाकाळामुळे येणारी मत्तता यांना कवि एक समजतो व या मानीव एकतेवर विभावनेचा खेळ करतो. अर्थात येथेहि वस्तुतः दोन कार्याच्या ठिकाणी कवि आहार्य अभेद मानतो. ही आहार्य अभेदबुद्धि विभावनेंत असते. भामह विभावनेचें लक्षण याप्रमाणे देतो. –

क्रियायाः प्रतिषेधे या तत्फलस्य विभावना।
ज्ञेया विभावनैवासौ समाधौ सुलभे सति ॥ २-७७

विभावनेचे निदर्शन भट्टि असे देतो –

अपरीक्षितकारिणा गृहीतां त्वमनासेवितवृद्धपण्डितेन।
अविरोधितनिष्ठुरेण साध्वीं दयितां त्रातुमलं घटस्व राजन् ॥ १०-४१

येथे परीक्षा, सेवा विरोध ह्या तीन क्रियांचा प्रतिषेध केला असतांना देखील. फलाची अभिव्यक्ति झाल्याचें वर्णन असल्याने विभावना अलंकार झाला आहे. मल्लिनाथ काव्यलिंग सांगतो.

अनुक्रमणिका

**८. समासोक्ति-अलंकार**

समासोक्ति हा शब्दगत सादृश्यावर आधारलेला अलंकार आहे. या अलंकारांत कवि विशिष्ट शब्दयोजनेच्या द्वारे प्रकृत आणि अप्रकृत या दोघांच्या व्यवहाराचें एकदमच वर्णन करतो. (समासोक्तिः=समासेन, संक्षेपेण उक्तिः) समासोक्तीमध्ये अप्रकृत व्यवहाराचा प्रकृतावर एकप्रकारें आरोप असतो. हे सर्व करीत असतांना कवीला दोन गोष्टी सांभाळाव्या लागतात, शब्दाचें लिंग आणि वाक्यांतील विशेषणें, क्रियापदें वगैरे निश्चित प्रकारची वापरावी लागतात ती अशा प्रकारचीं कीं त्या घटनेचंत त्या शब्दानी केलेले वर्णन वाचीत असतां अप्रकृताचा व्यवहार सरळ सूचित व्हावा. म्हणून समासोक्तींत गम्य औपम्य असते. भामह समासोक्तीची व्याख्या अशी करतो –

यत्रोक्ते गम्यतेऽन्योऽर्थस्तत्समानविशेषणः ।
सा समासोक्तिरुद्दिष्टा संक्षिप्तार्थतया यथा ॥ २-७९

भट्टीने समासोक्तीचें निदर्शन असे दिले आहे.

स च विह्वनलसत्त्वसंकुलः परिशुष्यन्नभवन्महाह्रदः ।
परितः परितापमूर्छितः पतितं चाऽम्बु निरभ्रमीप्सितम् ॥ १०-४२

येथे विह्वपलसत्त्वसंकुलः, परितापमूर्छितः, निरभ्रम् यांचा रामाकडे अर्थ लागतोच शिवाय ह्रदपक्षीहि आणखी एक अर्थ संक्षेपाने निघतो म्हणून येथे समासोक्ति अलंकार झाला आहे. मल्लिनाथ याठिकाणीं अतिशयोक्ति व रूपकांचा संकर सांगतो.

**९ अतिशयोक्ति अलंकार**

अतिशयः उत्कर्षः उपमेयस्य इत्यर्थः, तसेय उक्तिः अतिशयोक्तिः । भामहाने अतिशयोक्तीचें लक्षण असें दिले आहे-

निमित्ततो वचो यत्तु लोकातिक्रान्तगोचरम् ।
मन्यन्तेऽतिशयोक्तिं तामलङःकारतया यथा ॥ २-८१

दंडीने दिलेले या अलंकाराचें लक्षण असे –

विवक्षा या विशेषस्य लोकसीमातिवर्तिनी ।
असावतिशयोक्तिः स्यादलंकारोत्तमा यथा ॥ २-२१४

तात्पर्य लोकमर्यादेचे उल्लंघन करून प्रस्तुत वस्तूचा उत्कर्ष वर्णन करण्याची इच्छा, ही या अलंकाराची कल्पना आहे. अग्निपुराणांत देखील असेच लक्षण दिलेले आढळतें.

लोकसीमातिवृत्तस्य वस्तुधर्मस्य कीर्तनम् ।
भवेदतिशयो नाम सम्भवो सम्भोद्विधा इति ॥

अतिशयोक्तीचें भट्टीचे निदर्शन असें —

अथ लक्ष्मणतुल्यरूपवेशं गमकादेशविनिर्गताऽग्रहस्तम् ।
कपयोऽनुययुः समेत्य रामं नतसुग्रीवगृहीतसादराज्ञम् ॥ १०-१४३

मल्लिनाथ येथे स्वभावोक्ति अलंकार मानतो.

**१० यथासंख्य अलंकार**

यथासंख्य म्हणजे संख्येला अनुसरून असणे. पद्यांत कांही वस्तु एका क्रमाने येतात व त्यांशी संबंधित असलेल्या तितक्याच गोष्टी त्याच विशिष्ट क्रमाने येतात. यांची रचना अशी असते. एका जातीच्या वस्तूंची पंक्ति असतें दुसरी, तिसरी तशीच एकाएका जातीची पंक्ति असते. त्या प्रत्येक पंक्तितील एक एक शब्द एका विशिष्ट क्रमाने घेऊन अन्वय करावयाचा असतो. म्हणून ते शब्द त्या पंक्तीतीलएक एक शब्द एका विशिष्ट क्रमाने घेऊन अन्वय करावयाचा असतो. म्हणून ते शब्द त्या पंक्तीतील क्रमिक होत. म्हणून यथासंख्य म्हणजे क्रमिकांचा समन्वय होय. यांतील सौंदर्य अर्थामध्ये नसून शब्दांच्या विशिष्ट मांडणीत आहे. भामहाने यथासंख्याचें केलेले लक्षण असें —

भूयसामुपदिष्टानामर्थानामसधर्मणाम् ।
क्रमशो योऽनुनिर्देशो यथासंख्य तदुच्यते ॥ २-८९

भट्टी यथासंख्येचे निदर्शन असे देतो —

कपिपृष्ठगतौ ततो नरेन्द्रौ कपयश्च ज्वलिताऽग्निपिङगलाक्षा ।
मुमुचुः प्रयमुर्द्रुतं समीयुर्वसुधां व्योम महीधरं महेन्द्रम् ॥ १२-४४

येथे मुमुचुः इत्यादि क्रियांचा वसुधाम् इत्यादि कर्माशी अनुक्रमें अन्वय आहे. म्हणून यथासंख्य अलंकार झाला आहे.

**११ उत्प्रेक्षा अलंकार**

उत्प्रेक्षेचें भामहाने लक्षण दिले आहे. ते असें —

अविवक्षितसामान्या किञ्चिच्चोपमया सह ।
अतद्‌गुषणक्रियायोगादुत्प्रेक्षातिशयान्विता ॥ २-९१

भट्टि उत्प्रेक्षेचें निदर्शन असे देतो —

स्थितमिव परिरक्षितृं समन्तादुदधिजलौघपरिप्लवाद् धरित्रीम् ।
गगनतलवसुन्धराऽन्तकाले जलनिधिवेगसहं प्रसार्य देहम् ॥ १०-४५

या श्लोकांत परिरक्षितुम् इव याठिकाणी उत्प्रेक्षा अलंकार झाला आहे.

**१२ वार्ता —अलंकार**

भामह वार्ता शब्दाचा प्रयोग चमत्कारहीन उक्ति करिता करतो. काव्यत्वाकरिता वक्रोक्तीची अनिवार्यपणे आवश्यकता असते. परंतु वार्ता अलंकारांत तिचाच अभाव असतो. म्हणून तो म्हणतो —

गतोऽस्तमर्को भातीन्दुर्यान्ति वासाय पक्षिणः ।
इत्येवामादि किं काव्यं वार्तामेनां प्रचक्षते ॥ २-८६

सूर्यास्त झाला. चन्द्र चमकत आहे, पक्षी घरट्यांत जात आहेत अशा उक्तींना काय काव्य म्हणावयाचे? याला वार्ता म्हणतात. परंतु दण्डीने मात्र याला अलंकारता प्रदान केली आहे. तो म्हणतो —

गतोऽस्तमर्को भातीन्दुर्यान्ति वासाय पक्षिणः ।
इतीदमपि साध्वेव कालावस्थानिवेदने ॥ २-२४४

'सूर्य अस्ताला गेला' इ. वाक्यें देखील विशिष्ट कालाच्या अवस्थेचा बोध करून देत असल्याने सुंदर मानावी लागतात.

भट्टीने वार्ता अलंकाराचे निदर्शन पुढीलप्रमाणे दिलें आहे.

विषधरनिलये निविष्टपूलं शिखरशतैः परिमृष्टदेवलोकम् ।
घनविपुलनितम्बपुरिताशं फलकुसुमाचित वृक्षरम्यकुञ्जम् ॥ १०-४६

अनुक्रमणिका

या श्लोकांत महेन्द्र पर्वताचें जसेचें तसें वर्णन केले असल्याने वार्ता अलंकार झाला आहे. मल्लिनाथ याठिकाणी अतिशयोक्ती अलंकार मानतो.

**१३ प्रेय अलंकार**

प्रेयस् म्हणजे रसिकांना अत्यंत प्रिय असलेले. जेंव्हा एखादा भाव दुसऱ्या वस्तूंच्या अंगत्वाने दिसून येतो तेंव्हा प्रेयस् अलंकार होतो. म्हणून भामह प्रेयस् अलंकाराचे उदाहरण असें देतो —

प्रेयो गृहागतं कृष्णमवादीद्विदुरो यथा ।
अद्य या मम गोविन्द जाता त्वयि गृहागते ।
कालेनैषा भवेत्प्रीतिस्तवैवागमनात्पुनः ॥ ३-५

घरी आलेल्या कृष्णाला विदुर म्हणतो, 'हे गोविन्द, आज तू घरी आल्याने मला जसा आनंद झाला तसा पुनः तुझ्या आगमनानेच होईल. हा प्रेयस् अलंकार आहे. भामहाने अनेक अलंकारांचे लक्षण दिलें नाही त्यापैकी हा एक होय. दंडीने दिलेले प्रस्तुत अलंकारांचे लक्षण असें —

प्रेयः प्रियतराख्यानम् ..... ॥ २-२७५

आपल्याला अत्यन्त प्रिय असलेल्याचें आख्यान म्हणजे भावव्यंजक निरूपण करणे म्हणजे प्रेय अलंकार होय. भट्टीने दिलेले प्रेय अलंकाराचे निदर्शन असें —

मधुकरविरुतैः प्रियाध्वनीनां, सरसिरुहैर्दयिताऽस्यहास्यलक्ष्म्याः ।
स्फुटमनुहरमाणमादधानं पुरुषपतेः सहसा परं प्रमोदम् ॥ १०-४७

या श्लोकांत वास्तविक महेन्द्र पर्वताचे वर्णन केले आहे. परंतु ते ज्या पद्धतीने केले आहे त्यामुळे कथेचा नायक जो राम त्याला प्रियतर असणाऱ्या व्यक्तीचें म्हणजे सीतेचें वर्णन येऊन गेले आहे म्हणून येथे प्रेय अलंकार झाला आहे. मल्लिनाथ हा प्रतीपाचा दुसरा भेद असल्याने सांगतो.

**१४ रसवत् —अलंकार**

रसवत्चा अर्थ आहे रसयुक्त. भामहाने रसाची गणना अलंकारांत केली आहे. अलंकारवाद्यांच्या मते काव्याला शोभा आणणारी जेवढीं तत्त्वे आहेत ते सर्व अलंकार आहेत. अलंकार शब्दाचा हा प्रयोग व्यापक अर्थात केला आहे व तो सौंदर्याचा पर्याय होय. जसे वामनाने म्हटलें आहे. सौंदर्यमलंकारः । का. सू. १-२-२ भामह रसवत् अलंकाराचें लक्षण असे देतो —

अनुक्रमणिका

रसवद्दर्शितस्पष्टश्रृंगारादिरसं यथा । ३ -६. ज्यांत श्रृंगारादि रस स्पष्टपणे दिसतात तेथे रसवत् अलंकार होतो. दण्डि म्हणतो 'रसवत् रसपेशलम्' २ -२७५ रसाने रमणीय कथनाला रसवत् अलंकार म्हणतात. भट्टीचें रसवद् अलंकाराचे निदर्शन असें –

ग्रहमणिरसनं दिवो नितम्बं विपुलमनुत्तमलब्धकान्तियोगम् ।
च्युतघनवसनं मनोऽभिरामं शिखरकरैर्मदनादिव स्पृशन्तम् ॥ १०-४८

या श्लोकांत आकाश व पर्वताचे स्त्री पुरुषाप्रमाणे शृंगार वर्णन केल्याने रसवद् अलंकार झाला आहे. मल्लिनाथ उत्प्रेक्षा व रूपक यांचा संकर मानतो.

**१५ ऊर्जस्वी अलंकार**

दंडीने "ऊर्जस्वि रुढाहङःकारम्" – २-२७५ गर्व व्यक्त करणारी उक्ति. म्हणजे ऊर्जस्वी अलंकार असें लक्षण दिले आहे. भामहाने याचे लक्षण दिले नाही. परंतु उदाहरण दिले आहे ते असे –

ऊर्जस्वि कर्णेन यथा 'पार्थाय पुनरागतः ।
द्विःसन्दधाति किं कर्णः श्लये' त्यहिरपाकृतः ॥ ३-७

प्रसंग आहे महाभारतातला – एके वेळी अर्जुनाला मारण्याकरिता कर्णाने बाण सोडला. त्या बाणांत एक असा साप घुसला कीं ज्याची माता खांडव वनांत अर्जुनाकडून मारल्या गेली होती. म्हणून त्याचा बदला घेण्याची तो वाट पाहत होता. कृष्णाने अर्जुनाला खाली वाकायला सांगितले व बाण वरचेवर निघून गेला. अर्जुनाचें संरक्षण झाले. म्हणून तो बाण अर्जुनाचे कांहीच अहित करू शकला नाही. सांप देखील हताश झाला व येऊन कर्णाला म्हणाला कीं, तूं पूनश्च माझी योजना करशील तर मी अर्जुनाला ठार करील. यावर दिलेले कर्णाचें हे अहंकार युक्त भाषण आहे कीं, कर्ण दोनदा बाण मारत नाही.

भट्टि ऊर्जस्वी अलंकाराचें निदर्शन असे देतो –

प्रचपलमगुरुं भराऽसहिष्णुं जनसमानमनूर्जित विवर्ज्य ।
कृतवसतिमिवाऽर्णवोपकण्ठे स्थिरमतुलोन्नतिमूढतुङःगमेधम् ॥ १०-४९

येथे महेन्द्र पर्वताचे वर्णन आहे म्हणून ऊर्जस्वी अलंकार झाला आहे. मल्लिनाथ उत्प्रेक्षा व काव्यलिंग यांचा संकर मानतो.

**१६ पर्यायोक्त अलंकार**

पर्यायोक्त म्हणजे पर्यायाने किंवा वेगळ्या प्रकाराने तीच गोष्ट सांगणे. जी गोष्ट आपणांस सांगावयाची असते ती वाच्य होय. ती ज्या शब्दांनी सांगावयाची त्या शब्दांना आपण वाचक म्हणतो. आपल्या बोलण्यांत नेहमी वाच्य वाचक संबंध असतो. अशा वाच्यवाचक संबंधाचा उपयोग न करता कवि जेंव्हा वेगळ्या प्रकारें तीच गोष्ट सांगतो तेंव्हा पर्यायोक्त अलंकार होतो. म्हणून पर्यायोक्ताचें भामह असें लक्षण देतो –

पर्यायोक्तं यदन्येन प्रकारेणाभिधीयते । ३-८

भट्टीचें निदर्शन असे –

स्फटिकमणिगृहैः सरत्नदीपैः प्रतरुणकिन्नरगीतनिस्वनैश्च ।
अमरपुरमतिं सुराङ्गनानां दधतमदुःखमनल्पकल्पवृक्षम् ॥ १०-५०

येथे "अमरपुरमर्ति दधतम्" या वाक्याने महेन्द्र पर्वतच अमरपूर असल्याचें प्रतिपादन केले आहे.

**१७ समाहित अलंकार**

दंडि समाहिताचें लक्षण असें देतो –

किञ्चिदारभमाणस्य कार्यं दैववशात् पुनः ।
तत्साधनसमापत्तिर्या तदाहुः समाहितम् ॥ २-२९८

एका कार्यास आरंभ करणाऱ्या मनुष्याचें सुदैवाने अन्य कारणांनी ते घडून येते असे वर्णन असेल तेथे समाहित अलंकार होतो. भट्टि निदर्शन देतो –

अथ ददृशुरुदीर्णधूमधूम्रां दिशमुदधिव्यवधिं समेतसीताम् ।
सहरघुतनयाः प्लवङ्गसेनाः पवनसुताङ्गुलिदर्शितामुदक्षाः ॥ १०-५१

येथे धुकं पसरल्याने दक्षिण दिशा जी दिसत नव्हती ती मारुतीने बोटाने दाखविली असे वर्णन असल्याने समाहित अलंकार झाला. यालाच पलीकडे समाधीअलंकार म्हणायला लागले. मल्लिनाथ येथे स्वभावोक्ति अलंकार सांगतो.

**१८ उदार अलंकार**

दण्डि काव्यादर्शात उदात्त किंवा उदाराचें लक्षण असें देतो –

आशयस्य विभूतेर्वा यन्महत्त्वमनुत्तमम् ।
उदात्तं नाम तं प्राहुरलङ्का रं मनीषिणः ॥ २-३००

आशय अथवा वैभवाचें अनृपम महत्त्व वर्णन करणे हे उदात्ताचें लक्षण आहे. आशयांत चरित्राची उदात्त व वैभवांत विभूति संपत्तीची प्रचुरता असते. पहिल्या प्रकाराचें भट्टि असें निदर्शन देतो —

जलनिधिमगमन्महेन्द्रकुञ्जात्प्रचयतिरोहिततिग्मरश्मिभासः ।
सलिलसमुदयैर्महातरङ्गैर्भुवनभरक्षममप्यभिन्नवेलम् ॥ १-५२

भामह द्वितीय उदाराचें लक्षण याप्रमाणे देतो —

एतदेवापरेऽन्येन व्याख्यानेनान्यथा विदुः ।
नानारत्नादियुक्तं यत्तत्किलोदात्तमुच्यते ॥ ३-१२

भट्टीचे निदर्शन असे :-

पृथुगुरुमणिशुक्तिगर्भभासा ग्लपितरसातलसंभृताऽन्धकारम् ।
उपहतरविरश्मिवृत्तिमुच्चैः प्रलघुपरिलवमानवज्त्रजालैः ॥ १०-५३

रत्न इ. चा योग असल्याने पुढील श्लोकांतहि उदारच आहे,

समुपचितजलं विवर्धमानैरमलसरित्सलिलैर्विभावरीषु ।
स्फुटमवगमयन्तमूढवारीन् शशधररत्नमयान्महेन्द्रसानून् ॥ १०-५४

**१९ श्लिष्ट —अलंकार**

उपमानेन यत्तत्त्वमुपमेयस्य साध्यते ।
गुणक्रियाभ्यां नाम्ना च श्लिष्टं तदभिधीयते ॥ ३-१४

जर गुण, क्रिया आणि नाम (संज्ञा) यांच्या द्वारा उपमानाबरोबर उपमेयाचें तादात्म्य (अभेद) वर्णन केले असेल तर तेथे श्लिष्ट अलंकार होईल. असे भामहाने श्लिष्ट अलंकाराचें लक्षण दिले आहे. परंतु उपमेय — उपमानांतील अभेद-प्रतिपादन रूपकांत देखील असते. मग या दोन अलंकारांत भेद कोणता ?

“अत्र तु इष्टः प्रयोगो युगपदुपमानोपमेययोः ॥ ” ३-१५ येथे “उपमान व उपमेयांचा एकावेळेस प्रयोग असणे” ही गोष्ट अभिप्रेत आहे. उपमान उपमेयांतील धर्म रूपकांत भिन्न शब्दांत सांगितला जातो तर श्लिष्टांत तो

अनुक्रमणिका

एका शब्दांत सांगितल्या जातो. अर्थात रूपकांत शब्दांची अनेकार्थता विवक्षित नाही पण श्लिष्टांत ती अनिवार्य आहे.

भट्टि सहोवित श्लिष्टाचें निदर्शन असे देतो –

भुवनभरसहानलङःघय्धाम्नः परुरुचिरत्नभृतो गुरूरुदेहान् ।
श्रमविधुरविलीनकूर्मनक्रान् दधतमुदूढभुवो गिरीनहींश्च ॥ १०-५५

येथे "गिरीनहींश्च" यांचा सहोक्तीने निर्देश असल्याने हे सहोक्तिश्लिष्ट अलंकाराचें निदर्शन झाले आहे. मल्लिनाथ तुल्ययोगिता मानतो.

**उपमाश्लिष्ट**

प्रददृशुरुरुमुक्तशीकरौधान् विमलमणिद्युतिसंभृतेन्द्रचापान् ।
जलमुच इव धीरमन्द्रघोषान् क्षितिपरितापहृतो महातनरङःगान् ॥ १०-५६

“जलमुच इव” ही उपमा या श्लोकांत वापरली असल्याने हे उपमायुक्त श्लिष्टाचें निदर्शन झाले आहे.

**हेतुश्लिष्ट**

विद्रुममणिकृतभूषा मुक्ताफलनिकररञ्जिताऽत्मानः ।
बभुरुदकनागभग्ना वेलातटशिखरिणो यत्र ॥ १०-५७

‘विद्रुममणिकृतभूषा’ ‘आणि उदकनागभग्ना’ हे दोन हेतू येथे सांगितले असल्याने हेतुश्लिष्ट अलंकार झाला आहे. मल्लिनाथ येथे तुल्ययोगिता अलंकार मानतो.

**२० अपह्नुति अलंकार**

अपह्नुहतीचा अर्थ लपविणे असा आहे. हा अलंकार सादृश्यावर आधारलेला आहे. प्रकृताचा त्यांत निषेध करून मग अप्रकृताचा आरोप केलेला असतो. यांत दोहोमधील सादृश्य प्रतीत करून देण्याचा कवीचा हेतु असतो, भामहाचे लक्षण असें.

अपह्नुहतिरभीष्टा च किञ्चिदन्तर्गतोपमा ।
भूतार्थापह्नरवादेषा क्रियतेऽस्याभिधा यथा ॥ ३-२१

अनुक्रमणिका

अपह्नुतती तेंव्हा अभीष्ट होते कीं, ज्यावेळी कांही उपमा अंतर्गत असते. यांत वास्तविक अर्थाला लपविणे हा भाग असल्याने हिला अपह्नुति म्हणतात. भट्टि असे निदर्शन देतो –

भृतनिखिलरसातलः सरत्नः शिखरिसमोर्मिरोहितान्तरीक्षः ।
कुत इह परमार्थतो जलौधो जलनिधिमीयुरतः समेत्य मायाम् ॥ १०-५८

येथे मायाम् या पदाने अन्तर्गत उपमा निर्दिष्ट केली आणि विद्यमान अर्थाचा असह्नतव केला आहे. म्हणून अपह्लाति अलंकार झाला आहे.

**१४ विशेषोक्ति अलंकार**

कोणत्याहि कार्याच्या सिद्धीकरिता जितकी साधनें अपेक्षित आहेत त्यापैकी कोणाला तरी सोडून दुसऱ्या कारणाने कार्य सिद्ध होत असेल तर ती विशेषोक्ति होय. ज्यावेळी कारण परिपूर्ण असते त्यावेळेस कार्य घडून येते. जर अर्धवट कारण असूनहि कार्य घडून येत असेल तर ती विशेषोक्ति होय म्हणून भामह विशेषोक्तीचे लक्षण असें देतो –

एकदेशस्य विगमे या गुणान्तरसंस्थितिः ।
विशेषप्रथमायासौ विशेषोक्तिर्मता यथा ॥ ३-२३

विशेषतेच्या अभिवृद्धीकरिता एका गुणाची हानि झाल्यावर दुसऱ्या गुणाचे जें वर्णन केले जातें त्याला विशेषोक्ति म्हणतात. भट्टि विशोषोक्ति अलंकारांचे निदर्शन पुढीलप्रमाणे देतो.

शचिरहितमपि प्रभूतकान्तिं विबुधहृतश्रियमप्यनष्टशोभम् ।
मथितमपि सुरैर्दिवं जलौघैः समभिभवन्तमविक्षतप्रभावम् ॥ १०-५९

येथे शशी इत्यादि एकदेशाची हानी झाली असताना देखील प्रभूतकान्ति या गुणान्तराने स्तुति केली असल्याचे वर्णन केले आहे. म्हणून विशेषोक्ति अलंकार झाला आहे. मल्लिनाथ येथे विरोध अलंकार मानतो.

**२२.व्याजस्तुति अलंकार**

व्याज म्हणजे कपट. व्याजस्तुति या शब्दाचा अर्थ व्याजाने म्हणजे कपटाने स्तुति किंवा व्याजरूप स्तुति असा आहे. व्यंजनेवर आधारलेला हा एक अलंकार आहे. भामहाने दिलेले लक्षण असें –

दूराधिकगुणस्तोत्रव्यपदेशेन तुल्यताम् ।
किञ्चिद्विधित्सोर्या निन्दा व्याजस्तुतिरसौ यथा ॥ ३-३१

भट्टि व्याजस्तुतीचे निदर्शन असें देतो —

क्षितिकुलगिरिशेषदिग्गजेंन्द्रान् सलिलगतामिव नावमुद्वहन्तम् ।
धृतविधुरधरं महावराहं गिरिगुरुपोत्रमपीहितैर्जयन्तम् ॥ १०-६०

येथे क्षितिधारण करणाऱ्या दिग्गजापेक्षा जलनिधिची स्तुति केली व त्याची "महावराहं जयन्तम्" ही गोष्ट सांगण्याकरिता निन्दा केली आहे. मल्लिनाथ येथे अतिशोयक्ति व उपमा यांचा संकर मानतो.

**२३ उपमारूपक अलंकार**

भामहाने या अलंकाराचे दिलेले लक्षण असें —

उपमानेन तद्भावमुपमेयस्य साधनम् ।
यां वदत्युपमामेतदुपमारूपकं यथा ॥ ३-३५

जर उपमानाबरोबर उपमेयाचा तद्भाव म्हणजे भेद वर्णन करीत सादृश्याचे कथन केले असेल तर तेथे उपमारूपक अलंकार होतो. उपमेय उपमानाचा अभेद हे रूपकाचे लक्षण आहे व त्यालाच येथे उपमारूपक म्हटलें आहे. म्हणून दोहोंत विषय भेद दाखविणे कठीण आहे. याच कारणामुळे पलीकडल्या अलंकारिकांनी या अलंकाराला मानले नाही. भट्टीचे निदर्शन असें —

गिरिपरिगतचञ्चलापगान्तं जलनिवहं दहतं मनोऽभिरामम् ।
गलितमिव भुवो विलोक्य रामं धरणिधरस्तनशुक्लचीनपट्टम् ॥ १०-६१

मल्लिनाथ उत्प्रेक्षा व रूपकांचा संकर मानतो.

**२४ तुल्ययोगिता अलंकार**

भामह या अलंकाराचें लक्षण असें देतो —

न्यूनस्यापि विशिष्टेन गुणसाम्यविवक्षया ।
तुल्यकार्यक्रियायोगादित्युक्ता तुल्ययोगिता ॥ ३-२७

गुणसाम्य सांगण्याच्या इच्छने विशिष्टाबरोबर न्यूनाचें समान कार्यकारित्व प्रतिपादन करणे म्हणजे तुल्ययोगिता होय. विशिष्ट आणि न्यूनांत गुणभेद राहिलच. जर त्यांच्यात गुणभेद राहणार नाही तर त्यांना विशिष्ट आणि न्यून म्हणायचेच कशाला? तरी देखील त्यांच्यांत साम्य सांगावयाचे असेल तर ही गोष्ट तेव्हाच संभव आहे कीं दोघेहि एकच कार्य करतात

भट्टीचे या अलंकाराचे निदर्शन असें —

> अपरिमितमहाद्भुकतैर्विचित्रश्च्युतमलिनः शुचिभिर्महानंलङःघ्यैः ।
> तरुमृगपतिलक्ष्मणक्षितीन्द्रैः समधिगतो जलिधिः परं बभासे ॥ १०-६२

येथे न्यूनगुण अशा सुग्रीवादिकांचा जलनिधीशी महाद्भुतता ह्या गुणाचें साम्य सांगण्याकरिता भासन हे दोहोंतील तुल्य असे कार्य सांगितले आहे. मल्लिनाथ सम अलंकार सांगतो.

### २५ निदर्शना अलंकार

निदर्शनाचा अर्थ आहे उदाहरण. जेथे कोणतेहि उदाहरण वचनाने नाही तर केवळ कार्याने सूचित केल्या जाते तेथे हा अलंकार होतो. येथे यथा, इव, वति इत्यादि सादृश्य वाचक शब्दांचा प्रयोग नसतो. अर्थात् सादृश्य व्यंग्य राहते. म्हणून भामह याचे असें लक्षण देतो.

> क्रिययैव विशिष्टस्य तदर्थस्योपदर्शनात् ।
> ज्ञेया निदर्शना नाम यथेववतिभिर्विना ॥ ३-२३

यथा, इव, वतिशिवाय केवळ क्रियेच्या द्वारां विशिष्ट अर्थाचे प्रदर्शन म्हणजे निदर्शना नामक अलंकार होय.

भट्टि निदर्शन देतो —

> न भवति महिमा विना विपत्तेरवगमयन्निव पश्यतः पयोधिः ।
> अविरतमभनत् क्षणे क्षणेऽसौ शिखरिपृथुप्रथितप्रशान्तवीचिः ॥ १०-६३

येथे निदर्शना अलंकार आहे कारण प्रतिक्षण पर्वताप्रमाणे महान् आणि विस्तीर्ण प्रशांत होण्याच्या क्रियेने 'महिमा विपत्तिशिवाय प्राप्त होत नाही.' हा अर्थ कळतो. तसेच येथे यथा, इव, वा हें शब्दहि नाहीत. मल्लिनाथ येथे उत्प्रेक्षा सांगतो.

### २६ विरोध-अलंकार

विरोध म्हणजे खरोखर विरोधाभास आहे. विरोधाभासांत सत्य असतें पण ते सत्य अशा तऱ्हेने मांडलेले असतें की, त्यांत विरोध आहे असे वरवर पाहतांना दिसतें. मात्र विचारांती त्या विरोधाचा परिहार करता येतो. भामह विरोधाचे लक्षण असे देतो —

> गुणस्य वा क्रियाया वा विरुद्धान्यक्रियाभिधा ।

या विशेषाभिधानाय विरोधं तं विदुर्बुधा ॥ ३-२५

विशेषता सांगण्यांकरिता गुण अथवा क्रियेच्या विरूद्ध अन्य क्रियेचे वर्णन असेल तर त्याला विद्वान् लोक विरोध असें म्हणतात.

भट्टि असे निदर्शन देतो —

मृदुभिरपि बिभेद पुष्पबाणैश्चलशिशिरैरपि मारूतैर्ददाह ।
रघुतनयमनर्थपण्डितौऽ सौ न च मदनः क्षतमाततान नार्चिः ॥ १०-६४

पुष्पबाणांचे जे मार्दव व मरुतांचे जलसंसर्गाचे जें शल्य त्यांनी दाह करणे ह्या परस्परविरूद्ध क्रिया आहेत.

**२७ उपमेयोपमा अलंकार**

एका वेळेस उपमेय उपमान बनते व दुसऱ्या वेळेस उपमान उपमेय बनत असेल तर तेथे उपमेयोपमा अलंकार होतो. भामहाने केलेली या अलंकाराची व्याख्या अशी —

उपमानोपमेयत्वं यत्र पर्यायतो भवेत् ।
उपमेयोपमां नाम ब्रुवते तां यथोदितम् ॥ ३-३७

जर पर्यायाने उपमानाला उपमेय व उपमेयाला उपमान सांगितले जात असेल तर तेथे उपमेयोपमा अलंकार होतो.

भट्टि निदर्शन देतो —

अथ मृदुमलिनप्रभौ दिनान्ते जलधिसमीपगतावतीतलोकौ ।
अनुकृतिमितरेतरस्य मृत्योर्दिनकरराघवनन्दनावकार्ष्टाम् ॥ १०-६५

येथे पर्यायाने सूर्य व राम हे उपमानोपमेय होत असल्याने उपमेयोपमा अलंकार झाला आहे.

**२८ सहोक्ति अलंकार**

भामह सहोक्तीचें लक्षण असें देतो —

तुल्यकाले क्रिये यत्र वस्तुद्वयसमाश्रये ।
पदेनैकेन कथ्येते सहोक्तिः सा मता यथा ॥ ३-३९

अनुक्रमणिका

जेथे एकावेळेस दोन क्रिया दोन वस्तूंशी संबंधित असतात परंतु त्यांचे प्रतिपादन एका शब्दाने होते तेंव्हा सहोक्ति अलंकार होतो.

भट्टि असे निदर्शन देतो –

अपहरदिव सर्वतो विनोदान् दयितगतं दधदेकधा समाधिम् ।
घनरुचि ववृधे ततोऽन्धकारं सह रघुनन्दनमन्मथोदयेन ॥ १०-६६

येथे अन्धकार व मन्मथाश्रित तुल्यक्रियांचे ववृधे या एकाच पदाने कथन केले आहे. म्हणून येथे सहोक्ति अलंकार झाला.

**२९ परिवृत्ति अलंकार**

भामहाच्या मतानुसार परिवृत्ति या अलंकारांत दोन बाबी असायला हव्यात.

१.अविशिष्टाच्या त्यागाने विशिष्टाची प्राप्ति व

२.अर्थान्तरन्यासाची सत्ता म्हणजे एका अर्थाच्या ठिकाणी दुसऱ्याच्या न्यास नंतरच्या आलंकारिकांनी अर्थान्तरन्यासाची सत्ता असणे ही गोष्ट आवश्यक मानला नाही. विनिमयाच्या प्रकारांमध्येहि भेद केला आहे.

भामहाने परिवृत्तीचें केलेलें लक्षण असें –

विशिष्टस्य यदादानमन्यापोहेन वस्तुतः ।
अर्थान्तरन्यासवती परिवृत्तिरसौ यथा ॥ ३-४१

अन्य वस्तूंच्या परित्यागाने विशिष्ट वस्तूंची प्राप्ति होत असेल व एका अर्थाच्या ठिकाणी दुसरा अर्थ आला असेल तर ती परिवृत्ती होईल. भट्टि असें निदर्शन देतो.

अधिजलधि तमः क्षिपन् हिमांशुः परिददेशेऽथ दृशां कृतावकाशः ।
विदधदिव जगत् पुनः प्रलीनं भवति महान्हि पराऽर्थ एव सर्वः ॥ १०-६७

'दृशां कृतावकाश' या पदाने विशिष्ट वस्तूचें आदान 'तमः क्षिपन्' या पदाने इतर वस्तूंचा परित्याग व 'भवति महान् हि परार्थ एव सर्वः' या वाक्याने दुसरा अर्थ साधला असल्याने येथे परिवृत्ति अलंकार झाला आहे. मल्लिनाथ येथे अर्थान्तरन्यास अलंकार सांगतो.

**३० ससन्देह अलंकार**

कधी उपमेयाला उपमानाहून भिन्न व कधी अभिन्न मानणे ससन्देहाचे साधक होय. उपमेय उपमान परस्परभिन्न आहेत किंवा नाही यांचा निश्चय न होणे याला संदेहाव्यतिरिक्त काय नांव देणार? ज्यांत संदेह असेल तो ससंदेह होय.

भामह ससन्देहाचें लक्षण देतो ते असें –

उपमानेन तत्त्वं च भेदं च वदतः पुनः ।
ससन्देहं वचः स्तुत्यै ससन्देहं विदुर्यथा ॥ ३-४३

जर प्रशंसेकरिता उपमानासहित उपमेयाचा अभेद व भेद वर्णन करीत संदेहयुक्त वचन असेल तर तो ससन्देह होय.

भट्टि निदर्शन देतो –

अशनिरयमसौ कुतो निरभ्रे शितशरवर्षमसत् तदप्यशाङःर्गम् ।
इति मदनवशो मुहुः शशाङेः क रघुतनयो न च निश्चिकाय चन्द्रम् ॥ १०-६८

**३१ अनन्वय अलंकार**

उपमेय व उपमान या दोन वस्तु भिन्न असतात. याउलट एकच वस्तु उपमान व उपमेय आहे असे सांगितल्या गेले असेल तर तेथे अनन्वय अलंकार होतो. अनन्वयांत कोणत्यातरी वस्तूची अद्वितीयता सांगणे अभिप्रेत असते. भामह याचे लक्षण याप्रमाणे देतो –

यत्र तेनैव तम्य स्यादुपमानोपमेयता ।
असादृश्यविवक्षातस्तमित्याहुरनन्वयम् ॥ ३-४५

भट्टि असें निदर्शन देतो –

कुमुदवनचयेषु कीर्णरश्मिः क्षततिमिरेषु च दिग्वधूमुखेषु ।
वियति च विललास तद्वःदिन्दुर्विलसति चन्द्रमसो न यद्ववदन्यः ॥ १०-६९

चन्द्रः चन्द्रः इव विललास असा येथे भावार्थ आहे म्हणजे चन्द्र हाच उपमान व उपमेय आहे असे वर्णन आहे. म्हणून येथे अनन्वय अलंकार झाला आहे.

अनुक्रमणिका

**३२ उत्प्रेक्षावयव अलंकार**

उत्प्रेक्षावयव हा कोणताहि स्वतंत्र अलंकार नसून तीन अलंकारांचे मिश्रित रूप आहे म्हणून दुसऱ्या अलंकार ग्रंथांत या अलंकाराचा निर्देश नाही. श्लिष्ट, उत्प्रेक्षा व रूपकाचे मिश्रण असल्याने याला अलंकार संसृष्टि मानणे अधिक संगत होईल. असे भाष्यकार देवेन्द्रनाथ शर्मा म्हणतात. भामहाने दिलेले लक्षण असें –

श्लिष्टस्यार्थेन संयुक्तः किञ्चिदुत्प्रेक्षयान्वितः ।
रूपकर्थेन च पुनरुत्प्रेक्षावयवो यथा ॥ ३-४७

भट्टि असे निदर्शन देतो –

शरणमिव गतं तमो निकुञ्जे विटपिनिराकृतचन्द्र रश्म्यरातौ ।
पृथुविषमशिलान्तरालसंस्थं सजलधनद्युति भीतवत् ससाद ॥ १०-७०

येथे भीतवत्साद उपमाश्लेष म्हणजे श्लिष्ट, शरणमिव गतम् उत्प्रेक्षा व 'विटपिनिराकृतचन्द्ररश्म्यरातौ' हे रूपक आहे म्हणून येथे उत्प्रेक्षावयव अलंकार झाला आहे.

**३३ संसृष्टि अलंकार**

भामह यांचे लक्षण असें देतो –

वरा विभूषा संसृष्टिर्बह्व लङःकारयोगतः ।
रचिता रत्नमालेव सा चैवमुदिता यथा ॥ ३-४९

अनेक रत्नांनी रचिलेल्या मालेंप्रमाणे अनेक अलंकारांच्या योगाने संसृष्टि अलंकार निष्पन्न होतो. देवेन्द्रनाथ शर्मा म्हणतात अनेक अलंकारांनी बनलेला संसृष्टी मानल्यानंतर भामहाने पूर्वी सांगितलेला उत्प्रेक्षावयव अलंकार का मानला कळत नाही.

संसृष्टि अलंकाराचें भट्टीने दिलेले निदर्शन असें –

अथनयनमनोहरोऽभिरामः स्मर इव चित्तभवोऽप्यवामशीलः ।
रघुसुतमनुजो जगाद वाचं सजलधनस्तनयित्नुतुल्यघोषः ॥ १०-७१

येथे उपमा, श्लिष्ट, विरोध, इ. अनेक अलंकारांची संसृष्टि झाली आहे. स्मरः, इव येथे उपमा, चित्तभवोऽपि येथे श्लेष, चित्तभवोऽपि अवामशीलः येथे विरोध अलंकार आहे.

अनुक्रमणिका

**३४ आशी अलंकार**

आशीः अलंकार कांही लोकांनी मानला आहे. भामहाने आपले सहमत दाखविले व त्याचा केवळ उल्लेख केला आहे.

> आशीरपि च केषाञ्चिदलङःकारतया मता ।
> सौह्ट्दिस्याविरोधोक्तो प्रयोगाःस्याश्च तद्यथा ॥ ३-५५

आशीः अलंकाराचें दंडीने दिलेले लक्षण असें —

> आशीर्नामाभिलषिते वस्तुन्याशंसनं यथा । २-३५७

ईप्सित वस्तूच्या प्राप्तीकरीता अभिलाषेचे प्रगटन किंवा प्रिय मित्र इत्यादींकरिता शुभ प्रार्थना करणे म्हणजे आशीः अलंकार होय. भट्टीचें निदर्शन असें —

> पतिवधपरिलप्तलोलकेशीर्नयनजलाऽपह्नतऽजननौष्ठरागाः ।
> कुरु रिपुवनिता जहीहि शोकं क्व च शरणं जगतां भवान् क्व मोहः ।१०-७२

येथे शुभाशंसा प्रगट केल्यामुळे आशीः अलंकार झाला आहे. मल्लिनाथ येथे काव्यलिंग मानतो.

**३५ हेतु अलंकार**

भामहाला हा अलंकार मान्य नाही. त्याचें खंडन करीत तो म्हणतो.

> हेतुश्च सूक्ष्मो लेशोऽथ नालङःकारतया मतः ।
> समुदायाभिधानस्य वक्रोक्त्यभिधानतः ॥ १-८६

हेतु, सूक्ष्म व लेश ह्यांत वक्रोक्ति नसल्याने त्यांना अलंकार मानूं नये. दंडि या अलंकाराविषयी म्हणतो —

> हेतुश्च सूक्ष्मे लेशोऽथ वाचामुत्तमभूषणम् । २-२३५

याचे भट्टीने दिलेले निदर्शन असें —

> अधिगतमहिमा मनुष्यलोके बत सुतरामवसीदति प्रमादी ।
> गजपतिरुरुशैलश्रुडःगवर्ष्मा गुरुरवमज्ञति पङःकभाक् न दारु ॥ १०-७३

येथे गजपतीचा हेतुद्वाराने निर्देश केल्याने हेतु अलंकार झाला. मल्लिनाथ येथे दृष्टांत अलंकार सांगतो.

### ३६ निपुण अलंकार

> बोद्धव्यं किमिव हि यत्त्वया न बुद्धं किंवा ते निमिषतमप्यबुद्धिपूर्वम् ।
> लब्धात्मा तव सुकृतैरनिष्टशङःकी स्नेहौघौ घट्यति मां तथापि वक्तुमं ॥ १०-७४

येथे अर्थावगाढत्वामुळे निपुण अलंकार झाला आहे. जयमंगल म्हणतो उदात्त अलंकारांत निपुणाचा समावेश करावा. शेषराज शर्मा म्हणतात – वस्तुतः येथे वैचित्र्य नाही म्हणून कोणताच अलंकार नाही. मल्लिनाथ प्रेय अलंकार सांगतो.

## आ] माधुर्य

भट्टिकाव्याचा अकरावा सर्ग माधुर्य गुणाचे निदर्शन आहे. 'अथ माधुर्यगुणस्यापि काव्यशोभाकरत्वात् अस्मिन् सर्गे तत् प्राधान्येन लंकावृतांतं वर्णयन् आदौ तावत् प्रभातं वर्णयति' । असे मल्लिनाथाने आपल्या या सर्गाच्या टीकेत प्रारंभीच म्हटलें आहे.

माधुर्य गुणाचें स्वरूप आलंकारिकांनी विशद केले आहे. ते थोडक्यांत असें –

माधुर्य हा काव्यगुण आहे. उपलब्ध आलंकारिकांत सर्वात प्राचीन असलेल्या भरताने श्लेष, प्रसाद, समता इ. जे दहा काव्यगुण दिले आहेत त्यांत माधुर्याचा अंतर्भाव केला आहे. भरतांनी माधुर्याचें केलेले लक्षण असें –

> बहुषु यत्कृतं काव्यमुक्तं वापि स्वभावतः ।
> नोद्वेजयति तस्माद् हि तन्माधुर्य प्रकीर्तितम् ॥

अनेकदा देखील वाचले किंवा गायिले असतांना जे काव्य श्रोत्याचे ठिकाणी उद्वेग निर्माण करीत नाही अशा काव्यामध्ये माधुर्य गुण असतो असा भरतांच्या म्हणण्याचा अभिप्राय आहे. भरताना अनुसरून दंडि आणि वामन यांनीहि दहा काव्यगुण मानले आणि त्यांची लक्षणें दिली ती लक्षणे वेगळ्या शब्दांत रचलेलीं असलीं तरीहि भरतांचाच अभिप्राय व्यक्त करतात. उदा.

> मधुरं रसवद् वाचि वस्तुन्यपि रसस्थितिः ।
> येन माद्यन्ति धीमन्तो मधुनेव मधुव्रताः ॥

या दंडीच्या माधुर्य गुणाच्या वर्णनांत वाचि म्हणजे भाषेमध्ये वस्तुन्नि म्हणजे वर्णनीय वस्तूमध्ये मनाला आनंद देणारी रसवत्ता असली पाहिजे आणि मधाकडे भ्रमर जसे सारखे आकृष्ट होतात तशी रसिकांची मनें काव्यांकडे आकृष्ट झाली पाहिजे अशा प्रकारचा जो काव्यगत धर्म त्याला दंडीने माधुर्य म्हटले आहे. भरतोक्त

अनुक्रमणिका

दहा गुणांचे वामनानें शब्दगुण आणि अर्थगुण असें विभाग केलेले आहेत. तदनुसार शब्दगत माधुर्याचें "पृथक्पदत्व माधुर्यम्" आणि अर्थगत माधुर्याचें - 'उक्तिवैचित्र्यं माधुर्यम्' असे लक्षण केले आहे शब्द आणि अर्थ यांच्या ठिकाणी मन ओढून घेण्याची शक्ति असावी, त्याने उद्वेलग व्हावा अशाप्रकारचें काव्य माधुर्य गुणाने युक्त असते असाच यांतून एकूण निष्कर्ष निघतो. दहा काव्यगुण मानणाऱ्या उत्तरकालीन लेखकांनी देखील आपल्या लक्षणांत या धर्माचा निर्देश केला आहे. उदा. भोज म्हणतो, 'या पृथक्पदता काव्ये तन्माधुर्य प्रकीर्तितम्' । तर वाग्भट म्हणतो —

सरसार्थपदत्वं यत् तत् माधुर्यमुदाहृत्तम् ।

दहा गुण न मानता माधुर्य, ओजस् आणि प्रसाद हे तीनच गुण मानणारा आलंकारिकांचा दुसरा एक वर्ग आहे. त्यांच्या मते रसास्वादकालीं अनुभवास येणारी चित्तद्रुती हे माधुर्याचें स्वरूप आहे. जें शब्दार्थस्वरूपकाव्य अशा चित्तद्रुतीचा अनुभव आणून देते ते काव्य माधुर्यगुणाने युक्त होय, असे त्याचे मत आहे. या आलंकारिकांनी माधुर्याचे केलेले हे वर्णन फलरूपाचें आहे. असे असलें तरी दहा गुण मानणाऱ्या आलंकारिकांच्या माधुर्याविषयक मताशी त्यांचा विरोध येत नाही. कारण अशी चित्तद्रुती व्हावयास काव्याच्या ठिकाणी असमस्तता किंवा अल्पसमस्तता म्हणजेच पृथक्पदत्व असावें लागतें आणि रसास्वादाकरिता उक्तीच्या ठिकाणी आवश्यक असलेली लोकोत्तरता म्हणजेच उक्तिवैचित्र्य असावे लागते. असाच या वर्गाचाहि अभिप्राय असतो.

रसदृष्टीने पहाता, शृंगार, करुण आणि शांत या रसांनी युक्त असलेल्या काव्यांत माधुर्याचे प्राधान्य असते.

आल्हादकत्वं माधुर्य शृंगारे द्रुतिकारणम् ।
विप्रलंभे च करुणे शांते चातिशयान्वितम् ॥ (काव्य प्र. उ. ८, ६८-६९)

अले मम्मट म्हणतो तर —

शृंगारे विप्रलंभाख्ये करुणे च प्रकर्षवत् ।
माधुर्यमार्द्रता याति यतस्तत्राधिकं मनः ॥ (ध्वन्यालोक, उ. २, का. ८)

असे आनंदवर्धन म्हणतो.

वरील विवेचन लक्षांत घेऊन भट्टिकाव्याच्या अकराव्या सर्गाचे निरीक्षण केले असता तो सर्ग माधुर्य गुणाचें उत्तम निदर्शन होऊ शकतो. असे निःसंशयपणे म्हणता येते या सर्गात लंकेतील प्रभातकालाचें वर्णन आहे. मात्र हे वर्णन करीत असतांना कवीने केवळ निसर्गाचे स्थूल स्वरूपाचे वर्णन केले नाही. उलट प्रभातकाळी निद्रेतून जाग्या झालेल्या लंकावासिनी स्त्रियांच्या विलासोत्तर भावभावनाचे एक पुट या वर्णनाला जोडले असल्याने प्रभातवर्णन शृंगाराने युक्त झाले आहे. रसदृष्टीने शृंगाराला आवश्यक असलेल्या माधुर्यगुणाचा त्यांत सहजच आविष्कार झाला आहे. शब्ददृष्टीने पृथक्पदत्व आणि अर्थदृष्टीने उक्तिवैचित्र्य यांचा प्रत्यय या सर्गात पदोपदी येतो. उदाहरण म्हणून खालील कांही श्लोक घेता येतील.

तमः प्रसुप्तं मरणं सुखं नु मूर्छा नु माया तु मनोभवस्य ।
किं तत् कथं वेत्युपलब्धसंज्ञा विकल्पयन्तोऽपि न संप्रतीयुः ॥ ११-१०

वक्षः स्तनाभ्यां मुखमाननेन गात्राणि गात्रैर्धटयन्नमन्दम् ।
स्मरातुरो नैव तुतोष लोकं पर्याप्तता प्रेम्णि कुतो विरुद्धा ॥ ११-११

यांत पृथक्पदता स्पष्ट दिसून येते. हे आणि असेच कांही श्लोक वाचीत असतांना कालिदासाच्या भाषाशैलीची अनेकदा आठवण येते. श्लोक २४ तव ३७ ही उक्ति वैचित्र्यरूप माधुर्याची उदाहरणें देता येतील. अशाप्रकारे साहित्यशास्त्रांतून विवेचिलेला माधुर्यगुण या सर्गामध्ये भट्टीने सर्व अंगांनी निदर्शित केला आहे. म्हणून माधुर्याचे हे चांगले निदर्शन आहे असे म्हणता येते.

## इ] भाविक

भट्टिकाव्याचा बारावा सर्ग भाविकत्वाचें निदर्शन म्हणून भट्टीने लिहिला आहे. त्याकरिता भाविक म्हणजे काय याचा प्रथम आपण विचार करून त्याचा प्रस्तुत सर्गात भट्टीने कसा उपयोग केला आहे हे बघूं.

आलंकारिकांच्या भाषेंत सांगावयाचे म्हणजे काव्य आस्वाद्य व्हावयास त्यांत भाविकत्व किंवा भाविक अलंकार असला पाहिजे. भूतकालीन किंवा भविष्यकालीन कोणताहि प्रसंग असो, कवि जेंव्हा आपल्या शब्दांनी तो प्रत्यक्षवत् उभा करतो तेंव्हा येथे भाविक अलंकार असतो. उद्भट, मम्मट किंवा विश्वनाथ यांनी भाविकांचे केलेले लक्षण दोन ओळींचे असले किंवा त्यांनी उदाहरण एका अनुष्टुभाचे दिलेले असलें तरी त्यांत वरील आशय पूर्णतया सामावलेला आहे. ही गोष्ट आपल्याला विसरता येत नाही. उद्भट-मम्मटांच्या या छोट्या लक्षणामागे फार मोठी परंपरा आहे.

आपले चिरंतन आचार्य दंडी आणि भामह यांनी भाविकांचे लक्षण केले आहे. तेथून प्रारंभ करून आपण मम्मटापर्यंत येऊ म्हणजे भाविक अलंकारामागील आशय स्पष्ट होईल. दंडीचें लक्षण असें –

भाविकत्वमिति प्राहुः प्रबन्धविषयं गुणम् ।
भावः कवेरभिप्रायः काव्येष्वासिद्धिसंस्थितः ॥
परस्परोपकारित्वं सर्वेषां वस्तुवर्णनम् ।
विशेषणानां व्यर्थानामक्रिया स्थानवर्णना ।.
उक्तिक्रमबलाद् व्यक्तिः गंभीरस्यापि वस्तुनः ।
भावायत्तमिदं सर्वमिति तद्भाविकं विदुः ॥

भाविकत्व हा प्रबंधाचा गुण आहे. भाव म्हणजे कवीचा अभिप्राय – हा भाव काव्याला अखेरपर्यंत व्यापत असतो. काव्यवस्तूची निरनिराळी अंगे परस्परांना उपकारक असणे, व्यर्थ विशेषणांचा वापर नसणे, उचित वर्णन

असणे आणि गंभीर वस्तूचीहि उक्तिक्रमाच्या सामर्थ्याने अभिव्यक्ति होणे या सर्व गोष्टी भावावरच अवलबूंन असतात. म्हणूनच हा अलंकार "भाविक" या सार्थ नांवाने ओळखला जातो. भामहाचें लक्षण असें –

भाविकत्वमिति प्राहुः प्रबन्धविषयं गुणम् ।
प्रत्यक्षा इव दृश्यन्ते यत्रार्था भूतभाविनः ॥
चित्रोदात्ताद्भुशतार्थत्वं कथायास्वभिनीतता ।
शब्दानाकुलता चेति तस्य हेतु प्रचक्षते ॥ भामह ३-५२ / ५३

भाविकत्व हा प्रबंधाचा गुण आहे ज्याठिकाणीं भूत किंवा भावी अर्थ प्रत्यक्षाप्रमाणे दिसावयास लागतो तेथे भाविक – अलंकार असतो. काव्यार्थाच्या ठिकाणीं चित्रता, अद्भूतता आणि उदात्तता असणे, कथेच्या ठिकाणीं अभिनीतता असणें आणि उक्तीच्या ठिकाणीं अनाकुलता असणे या गोष्टी समेतत्वाने भाविकाच्या हेतु होतात.

ही दोन्ही लक्षणे काय सांगतात? भाविकांतून कवीचा अभिप्राय प्रकट होतो. असें दंडी म्हणतात तर तो अभिप्राय होत असतांना काव्यार्थ प्रत्यक्षवत् दिसतो असे भामह म्हणतात. दोघ्यांच्याहि मते भाविकाच्या ठिकाणी अभिव्यजनक्षमता असते. भाविकाची अभिव्यंजनक्षमता दंडीने “उक्तिक्रमबलाद् व्यक्तिः गंभीरस्यापि वस्तुनः” या शब्दांत सांगितली, तर भामहांनी “कथायाः स्वभिनीतता” या शब्दांत सांगितली. उद्भटांनी भामहाच्या ग्रंथावर “भामहविवरण” नांवाची टीका लिहिली. ती उपलब्ध नाही. पण त्याचा “काव्यालंकारसारसंग्रह” हा ग्रन्थ उपलब्ध आहे. भामहांचा ग्रंथहि “काव्यालंकार” याच नांवाचा आहे. उद्भटांनी आपला सारसंग्रह लिहितांना भामहांच्या अनेक कल्पना घेतल्या असल्या पाहिजेत हे उघड आहे. त्यांनी भाविकाचे लक्षण करतांना भामहांचाच आशय थोडक्यात सांगितला. तो असा –

प्रत्यक्षा इव यत्रार्था दृश्यन्ते भूतभाविनः ।
अत्यद्भुषताः स्यात् तद्वाच्यमनाकुल्येन भाविकम् ॥

काव्यालंकार- सारसंग्रह- ६-६

भामहांच्या लक्षणांतील विस्तार कमी करून उद्भटांनी भाविकाचे सार येथे भामहांच्याच शब्दांत ग्रथित केले आहे. काव्यार्थाचे प्रत्यक्षायमाणत्व हा भाविकाचा विशेष आहे. मम्मटांनी अलंकारांची पुष्कळशी लक्षणे उद्भटाच्या ग्रंथातून उचलून परिष्कृत केलेली आहेत. त्यांनी काव्यप्रकाशात भाविकांचे लक्षण दिले आहे. ते असें –

‘प्रत्यक्षा इव यद्भावाः क्रियन्ते भूतभाविनः तद्भाविक्रम् । (का. प्र. १०-११४) भामह, उद्भणट आणि मम्मट या तिघांनीहि भाविकांचे लक्षण सारखेच केले आहे. तेंव्हा तिघांचाहि अभिप्राय एकच आहे हे उघड आहे. मम्मटांच्या भाविक अलंकारात भामह आणि दंडी दोघांच्याहि लक्षणांचा समन्वय झालेला आहे असे दिसते. ‘प्रत्यक्षा इव यद्भावाः क्रियन्ते भूतभाविनः’ हे भामहाचे म्हणणे घेऊन त्यांतील “भाव.” यांचे विवरण वृत्तीमध्ये ‘भावः कवेरभिप्रायः’ असें दंडीच्या शब्दांत मम्मटांनी दिलें आहे.

भाविक हा प्रबंधगत अलंकार संपूर्ण काव्यार्थाला व्यापून असतो. आलंकारिकांनी उदाहरण दोन ओळीचें दिलें आहे. म्हणून अलंकाराचें क्षेत्र दोन ओळीपुरतेच मर्यादित असते असे मानण्याचें कारण नाहीं. अलंकारग्रंथातील उदाहरणे लक्षणांतील मुख्य मुद्दा दाखविण्यापुरतीच असतात. तो मुद्दा तेथून समजावून घेऊन त्याचा उपयोग विदग्ध वाङमयाच्या अभ्यासांत करावयाचा असतो. मम्मटांनी स्वतःच 'भावः कवेरभिप्रायः' असे दंडीचे शब्द वापरले आहेत. भाविक अलंकाराचा प्रस्तुत आशय प्राचीन ग्रंथकारांनी व टीकाकारांनीच स्पष्टपणे उकलून दाखविला आहे. उद्भटाच्या भाविक लक्षणाचें विवरण करतांना प्रतिहारेन्दुराज म्हणतात, भाविक-अलंकारांत वाणीची अनाकुलता असते. तीमुळेच काव्यार्थाचा झटिति प्रत्यय (झगित्यर्थप्रतीतिकारिताः येत असतो. तत्र वाचामनाकुलता व्यस्तबंधरहितलोकप्रसिद्धशब्दनिबन्धनात् झगित्यर्थप्रतीतिकारिता'' । (उद्भ्टावरील प्रतिहारेन्दुराजाची टीका, बनहट्टीप्रत पा. ७९) प्रत्यय कशाचा असतो आणि कसा येतो? त्यावर प्रतिहारेन्दुराज सांगतात –

झगित्यर्थप्रतीतिकारिता । तस्यां हि सत्यां कवेः सम्बन्धी यो भावः आशयः शृङःगारादिरससंवलितचतुर्वर्गोपायभूतिविशिष्टार्थोल्लेखी स कविना इव सहृदयैः श्रोतृभिः स्वाभिप्रायाभेदेन तत्तत्काव्यप्रतिबिम्बितरूपत या साक्षात्क्रियते । श्रोतृणामपि तथाविधस्वच्छशब्दानुभवद्रावितान्तःकरणात्मनां सहृदयानां स्वाभीप्रायप्रतिमुद्रा तत्र सङःक्रामति । अतः कवेर्योऽसावभिप्रायः तद् गोचरीभूताः भूतभाविनोऽपि पदार्था तत्र सहृदयैः श्रोतृभिः स्वाभिप्रायाभेदेन प्रत्यक्षा इव दृश्यन्ते ... तदेवंविधहेतुनिबन्धनं कविश्रोतृभावसंमीलनात्मकं भाविकं द्रष्टव्यम् । अत एव चात्र कविसंबन्धिनो भावस्य श्रोतृभावाभेदाध्यवसितस्य पुरस्फुरद्रूपस्य विद्यमानत्वात् भाविकव्यपदेशः । भावोऽस्मिन् विद्यते इति भाविकम्' । (बनहट्टीप्रत पान ७९-८०)

भाविक अलंकारांत वाणीची अनाकुलता अत्यंत आवश्यक असते त्यामुळे अर्थप्रतीति तात्काळ होते. ही अर्थप्रतीति तात्काळ झाली म्हणजेच मग शृंगारादि संवलित अशा पुरुषार्थोपायभूत विशिष्ट अर्थाला उल्लिखित करणारा कवीचा जो भाव म्हणजे आशय, तो कवीप्रमाणेच सहृदय श्रोत्यालाहि स्वाभिप्रायाशी अभिन्नतेने प्रतीत होऊन त्या काव्यांत प्रतिबिंबीत झाल्यामुळे साक्षात्कृत होतो. उक्तीच्या स्वच्छतेमुळे रसिकांचे अंतःकरण विद्रावित होऊन श्रोत्याच्या स्वाभिप्रायाची मुद्रा त्याठिकाणी संक्रमित होते. अशाप्रकारें कवीच्या अभिप्रायाला गोचर झालेलें भूत, भावी पदार्थ सुद्धा त्या काव्यांत सहृदय श्रोत्यांना स्वाभिप्रायाशी अभिन्नत्वाने आणि म्हणून प्रत्यक्षाप्रमाणे प्रतीत होतात... म्हणून भाविकाचे जे हेतू सांगितले आहेत त्या हेतूंनी युक्त असलेला अलंकार (म्ह. भाविक अलंकार) कवि आणि श्रोता या दोघांच्याहि संमीलनाची भूमि आहे. कवीशी संबद्ध असलेला आणि श्रोत्याने स्वाभिप्रायाशी अभिन्नत्वाने ग्रहण केलेला भाव तेथे प्रत्यक्ष स्फुरतांना दिसतो. म्हणून या अलंकाराला भाविक म्हणतात. त्यामध्ये भाव असतो म्हणून भाविक.

काव्यप्रकाशाच्या संकेतटिकेंत माणिक्यचंद्रानीहि म्हटले आहे 'भूतभव्यार्थानां लोकोत्तरत्वेन अद्भुपतत्वात् अव्यस्तसंबन्धशब्दसन्दर्भसमर्पितत्वाच्च प्रत्यक्षायमाणत्वम् । कवेभविः आशयः श्रोतरि प्रतिबिम्बित्वेन अस्ति इति भावः । ' यामध्येहि वरील आशयच ग्रथित केला आहे. मम्मटानंतर रूय्यकांनी सुद्धा भाविकाच्या विवेचनांत म्हटले आहे. 'कविगतो भावः आशयः श्रोतरि प्रतिबिम्बत्वेन अस्ति इति भावो भावना पुनः पुमः चेतसि विनिवेशनं सोऽवास्ति ।...' (अलंकारसर्वस्व पा. २०० त्रिवेंद्रम् प्रत १९२५). भाविक अलंकाराचें स्वरूप व कार्य याबबतींत सर्वच आलंकारिकांचे एकमत यावरून दिसून येते. [प्राचार्य श्री. ल. पांढरीपांडे गौरवग्रंथ – डॉ. देशपांडे, ग. त्र्यं. 'अलंकारांचे स्वरूप व कार्य.']

अनुक्रमणिका

यानंतर भाविकाविषयी 'कंठाभरणांत' काय विवेचन आहे हे बघू. भाविकाला कंठाभरणांत शब्दगुण, अर्थगुण व अलंकार समजून त्यांचे विवरण केले आहे. त्याला शब्दगुण मानून भोजराज पुढीलप्रमाणे विवेचन करतो –

'भावतो वाक्यवृत्तिर्या भाविकं तदुदाहृतम्' ।

जसे – एह्यंहि वत्स रघुनन्दन पूर्णचन्द्र

चुम्बामि मूर्धनि चिरं च परिष्वजे त्वाम् ।
आरोप्य वा हृदि दिवानिशमुद्वहामि
वन्देऽथवा चरणपुष्करकद्वयं ते ॥

येथे प्रकर्षवशात् किंवा अनौचित्याने नमस्कार करणे किंवा 'चरणपुष्करकद्वयम्' इ. पदाने भाविक अलंकार द्योतित होतो.

भाविकाला अर्थगुण समजून त्याचें विवेचन तो असे करतो –

'साभिप्रायोक्तिविन्यासो भाविकत्वं निगद्यते ।'
यथा –दृष्टिं हे प्रतिवेशिनि क्षणमिहाप्यस्मद्गृ'हे दास्यसि
प्रायेणास्य शिशोः पिता न विरसाः कौपीरपः पास्यति ।
एकाकिन्यपि यामि तद्वरमितः स्त्रोतस्तमलाकुलं
नीरन्ध्रास्तनुमालिखन्तु जरठच्छेदा नलग्रन्थयः ॥
अत्र तमालमालावलयितसरित्तीरकृतसंकेतायाः कुलटायास्तनौ भाविनां
परपुरुषनखक्षतानां नलग्रन्थ्या लेखव्याजगोपनेन साभिप्रायभणनं भाविकम् ॥

भाविकाला अलंकार समजून असे लिहितो –

स्वाभिप्रायस्य कथनं यदि वाप्यन्यभावना ।
अन्यापदेशो वा यस्तु त्रिविधं भाविकं विदुः ॥
मते चास्माकमुद् भेदो भिद्यते नैव भाविकात् ।
व्यक्ताव्यक्तोभयाख्याभिस्त्रिविधः सोऽपि कथ्यते ॥

नंतरच्या आलंकारिकांनी त्याला अलंकार म्हणून मान्यता दिली आहे. विश्वनाथ त्याचे लक्षण असें करतो –

अद्भुतस्य पदार्थस्य भूतस्याथ भविष्यतः ।
यत्प्रत्यक्षायमाणत्वं तद्भायविकमुदाहृतम् ॥ '

भाविक अलंकाराचें हे स्वरूप व कार्य लक्षांत घेतल्यानंतर भट्टीने बाराव्या सर्गात त्याचा कसा उपयोग केला आहे इकडे वळू भाविकांचे एक स्वरूप म्हणजे त्याला केवळ अलंकार मानणे व दुसरे म्हणजे तो प्रबंधाचा गुण मानणे यापैकी बाराव्या सर्गात तो प्रबंधाचा गुण या स्वरूपांत संपूर्ण सर्गाला व्यापून आहे.

'कथायाः स्वभिनीतता' म्हणजे ती घटना प्रत्यक्ष घडत आहे. अशी शब्दांची योजना करण्याची कवीची शक्ति. 'हनुमंताने लंका नगरीचा विध्वंस केला, जनस्थानांत राहणाऱ्या खर-दूषणादि राक्षसांचा संहार झाला, प्रत्यक्ष सभाभवन देखील जाळल्या गेले. लंकेची झालेली ही दुरवस्था पाहून रावणाची माता कैकसी विभीषणाला रावणाकडे पाठविते. ह्या घटनेपासून प्रस्तुत सर्गाला प्रारंभ झाला आहे. अमृत आणि विष हे सहोदर जगताला कष्टदायक असणाऱ्या हलहलाचें प्रशमन अमृताने व्हावे व देवांना आनंद व्हावा तसे हे विभीषणा ! लोकांना पीडा देणाऱ्या, गर्वोद्धत व तुझा सहोदर असलेल्या ह्या रावणाला उपदेश करून शांत कर. अरे, हिमव्याप्त, जमिनीवर पडलेली, निर्माणाकरिता तारका ज्याप्रमाणे उत्पातकारक म्हणून कष्टप्रद ठरते त्याप्रमाणे विषादग्रस्त जमिनीवर बसलेली व केस मोकळे सोडलेली ही सीता लंकावासी राक्षसांना भय उत्पन्न करणारी आहे म्हणून तिला रामाकडे परत पाठव असा त्याला उपदेश कर.' या विषयावर वारंवार विचार करणारा विभीषण मातेने प्रेरणा दिल्यावर बराच वेळ विचार करून रावणाकडे जातो.

द्वादश सर्गाच्या वर दिलेल्या वर्णनाच्या सहा श्लोकांत भट्टीने उदात्तार्थाचे प्रकटन केले आहे. असें टीकाकार जयमंगल व शेषराज शर्मा म्हणतात. ह्या सहा श्लोकांत विभीषणाचें जे वर्णन केले आहे, त्याच्या द्वारां भट्टीने आपल्या समोर विभीषणाचें चित्र उभे केले आहे विभीषण कसा होता? भट्टि वर्णन करतो –

विनिद्रम्, कृतदेवतार्चम्, दृष्टयैव चित्तप्रशमं किरन्तम्, आविष्कृताङगप्रतिकर्मरम्यम् – विभीषण विनिद्र म्हणजे जागा होता तर रावण मदान्ध म्हणजे कार्याकार्यविवेक नष्ट झालेला व म्हणूनच झोपला होता.

कृतदेवतार्चम् – विभीषण देवतांचे पूजन करणारा म्हणजे त्यांचा मित्र होता तर रावण शत्रु होता.

दृष्टयैव चिन्तप्रशमं किरन्तम्. त्याची दृष्टि एवढी स्नेहपूर्ण होती कीं केवळ दृष्टिक्षेपाने तो इतरांच्या अंतःकरणांना शांत करणारा म्हणजे आनंदित करीत होता.

आविष्कृताङगप्रतिकर्मरम्यम् – ह्या विशेषणाने त्याचे व्यक्तिमत्व दाखविले. तो प्रसाधनांचा वापर करीत होता. परंतु केवळ त्याच्यामुळे सुंदर होता असे नाही तर त्याचें अंतःकरणाहि तेवढेच उठावदार होते. त्याचें बाह्यशरीरच सुंदर होते असें नाही तर त्याची एकूण वर्तणूक इ आकर्षक होती, असें येथे सुचविलें आहे.

विष आणि अमृत हे दोघे सहोदर, तसे रावण आणि विभीषण सहोदर. विष समुद्रमंथनापासून प्रथम बाहेर पडलें नंतर अमृत, म्हणून विष क्रमांकाने मोठे. परंतु त्याचें प्रशमन मागाहून जन्मलेल्या अमृताने होते त्याप्रमाणे रावण वयाने मोठा असला तरी अमृताप्रमाणे गुणवान् असल्याने त्याची आई कैकसी त्याला रावणाला उपदेश करावयाला पाठविते. अमृत देवांना आनंद देणारे त्याचप्रमाणे विभीषणहि देवतांची पूजा करणारा म्हणून 'नाकसदाम् आनन्दनः' हे विशेषण वापरले आहें.

सीता मुळांत चांगली असेल परंतु राक्षसकुळाचा विध्वंस तिच्यामुळे घडून येणार आहे. म्हणून तिला ‘जनस्य त्रासकरीम्’ १२-३ असें शब्द भट्टि वापरतो. तशीच तारका मुळांत चांगली परंतु ती लोकांना भीति उत्पन्न करणारी म्हणून त्रासदायक असते. म्हणूनच ‘येन सीतां जहाति तथा कुर्याः’ । रावण सीतेला परत पाठवील असा उपदेश रावणाला कर असें कैकसी सांगते.

हलाहलाचे पचन करावयाला ज्यावेळेस देवदानवांपैकी कोणीहि तयार नव्हते त्यावेळेस शंकरांनी विष प्राशन केले. त्या विषाप्रमाणे भयंकर असणाऱ्या रावणाचें प्रशमन रामचन्द्रहि करील, त्यापूर्वी विभीषणाने रावणाला सीता परत पाठविण्याचा उपदेश करावा म्हणून कैकसी त्याला सांगते. चवथ्या श्लोकांतील ‘कुलानन्द’ हे विशेषण अधिक समर्पक आहे. विभीषण कुळाला आनंद देणारा होता तर रावण दुःख देणारा होता.

पाचव्या श्लोकांत लंकेची झालेली दुरवस्था वर्णन केली आहे. म्हणून तिच्या रक्षणासाठी विभीषणाला पाठविणे ही कल्पना उठून दिसते सुधी :- विभीषण विद्वान् होता. रावणाच्या कृत्याबद्दल तो सतर्क होता त्याविषयी दीर्घ कालपर्यंत विचार करीत होता ही गोष्ट "चिकीर्षिते क्षेमंकरे पूर्वतरं स तस्मिन् ॥ १२ /६ याहून दिसते. आईने प्रेरणा दिल्यावर देखील तो अधिक विचार करतो.

वरील सहा श्लोकांत केलेल्या वर्णनांत भट्टीने आपल्यासमोर विभीषणाचें चित्र उभे केले आहे.

यानंतर प्रहस्त, रावण, विभीषण, मातामह, कुंभकर्ण इ. च्या भाषणांत चित्राद्भुतार्थाचें वर्णन आले आहें. या मन्त्रनिर्णयाख्यानांत शब्दांची अतिशीलता व कुशलता हें गुण दिसून येतात.

ज्यावेळेस विभीषणाने सभेंत प्रवेश केला त्यावेळेस अत्युज्ज्वल सिंहासनावर रावण बसला होता व वाली, खर इ. चा झालेला नाश, शहर जाळल्यानंतर नोकरांसहित अक्षकुमाराचा वध झाल्यानंतर शत्रुसेना समुद्र पार करण्याची इच्छा करीत असतांना कसें वागावे या बाबतींत मंत्र्यांना योग्य सल्ला विचारीत होता.

याच ठिकाणीं भट्टीने एका जुलमी राजाचें चित्र रेखाटलें आहे. स्वतःच्या दूतांना ताडन करण्याचा अधिकार राजांना असतो परंतु शत्रूंच्या दूतांना तो ताडन करू शकत नाही. रावण तसें करीत होता ही गोष्ट दौवारिकाऽभ्याहतशक्रदूतम् १२/७ यावरून दिसून येते. त्याचे द्वारपाल इंद्राच्या दूतांना मारीत होते. शत्रूला त्याचे भय वाटत होते. यांत आश्चर्य नाही परंतु त्याचेहि लोक त्याला भीत असत. विभीषणाला रावणाच्या सभेंत मानाचें स्थान होते. सभेमध्ये प्रवेश करण्याकरिता त्याला राजाच्या आज्ञेची गरज नव्हती हे ‘अनावेदितसंप्रविष्टः’ १२/८ यावरून दिसून येते.

नवव्या व दहाव्या श्लोकांत रावणाचें चित्र भट्टि आपल्यापुढे रेखाटतो. प्रलयकालीन अग्नीच्या धूमराशीप्रमाणे रावण दिसत होता. अग्नितुल्य अत्युच्च सिंहासनावर तो आरूढ झाला होता. प्रलयकालीन मेघाप्रमाणे भयंकर, स्वभावाने तीक्ष्ण व अग्नीकणांप्रमाणे त्याचें नेत्र होते. स्नेहपूर्ण नेत्राने पाहिल्यावर देखील शेषनागाचें भय उत्पन्न करणारी त्याची दृष्टि होती. अंधकाराच्या आकारासारखी त्याची आकृति होती. तरी स्वतःच्या बलाने, तेजाने जगतांत प्रसिद्ध असलेल्या सूर्याला तो जिंकत होता.

अनुक्रमणिका

सर्ग १२ श्लोक १९ - 'सस्थाणुकैलासधरः' हे रावणाचें विशेषण आहे. कारण त्याने शिवासहित कैलास पर्वत उचलला होता अशी कथा आहे ही कथा रामायणाच्या उत्तर कांडांत वर्णन केली आहे. ती अशी – कुबेराला जिंकल्यावर रावणाने त्याच्याकडून पुष्पक-विमान घेतलें आणि तो कैलासपर्वतावर उतरला व स्कंधाचें जन्मस्थान असलेल्या "शरवणांत" गेला. पुष्पक विमान मार्गातच टाकून दिले. तो जेंव्हा स्वतःच्या तालांत गायन करीत होता तेंव्हा तेथे शिवाचा दूत नंदी आला व पुष्पक मध्येच कसें टाकले असें विचारू लागला. पुढे म्हणाला - "तूं येथून निघून जा या पर्वतावर शंकर नृत्य करीत आहेत. सुपर्ण, नाग, यक्ष, देव गंधर्व, राक्षसादि सर्व भूतमात्रांना अगम्य हा पर्वत आहे. तू येथे कसा आलास ?" हें ऐकताच रावणाला भयंकर क्रोध आला आणि म्हणाला "कोण हा शंकर". नंतर तो पर्वतावरील रस्त्यावर मधोमध गेला. तो तेथे नन्दी, शंकराच्या जवळच बसलेला आढळला. माकडासारखा त्याचा चेहरा पाहून रावण जोरांत हसला तेंव्हा नन्दीने शाप दिला कीं, "तुझ्या विनाशाकरिता माकड जन्माला येतील". त्याचे हें शब्द न ऐकताच रावण पर्वतावर जाऊन म्हणतो, - हा शंकर एखाद्या राजाप्रमाणे कोणाच्या प्रभावाने येथे नित्य नृत्य करतो. ज्या तुझ्या पर्वताने माझ्या पुष्पकाची गति कुंठित केली त्याला उपटूनच टाकतो. असें म्हणून त्याने हात पसरविले व पर्वत तोलून उचलला त्याबरोबर देवगण कंपित झाले. पार्वती घाबरली व भीतीने महेश्वराला बिलगली. तेंव्हा शंकराने पायाच्या अंगठ्याने पर्वत दाबला. त्याबरोबर रावणाचें हात दाबल्या गेले व तो जोरांत ओरडला. त्याचे ते ओरडणे त्रैलोक्यांत ऐकायला गेले. तेंव्हा त्याचें मंत्री त्याला म्हणतात, "हे दशानना नीलकण्ठ उमापति महादेवाला प्रसन्न करून घे. त्याच्याशिवाय इतर कोणीहि रक्षण करू शकणार नाही." त्याने एक सहस्त्र वर्षे शिवाची स्तुति केली. शंकर प्रसन्न झाले व म्हणाले, - "तुझ्या शौर्य व वीर्यावर मी प्रसन्न झालो आहे. पर्वताने कष्टी झाल्यावर तूं जो करून ओरडलास, त्याने लोकत्रय भयकंपित झाले (की कोणतें भय उत्पन्न झाले.) म्हणून तूं रावण नावाने प्रसिद्ध होशील." नंतर रावणाने उःशाप मागितला. शंकराने चन्द्रहास नावाचें एक खड्ग त्याला दिलें. व सांगितले कीं, हे खड्ग कधीहि नष्ट होणार नाही व ज्यावेळेस ते नाश पावेल त्या वेळेस ते माझ्याकडे परत येईल.

अमरतेमुळे मृत्युलोकाला जिंकणारे तेजस्वी देवगण तृष्णेने व्याकुळ होऊन मोत्यांचा वर्षाव करणाऱ्या मेघाकडे जातात त्याप्रमाणे यमलोकाला वश केलेले राक्षसगण रत्न देणाऱ्या विभीषणाकडे गेले. "जितमृत्युलोकाः" या विशेंषणावरून यमलोकाला देखील रावणाने जिंकले होते असें दिसतें सभेमध्ये सर्वांचे स्थान निश्चित असलें तरी जेंव्हा एखादी प्रतिष्ठित व्यक्ति येथे प्रवेश करते तेंव्हा सर्व लोक आपापलें स्थान सोडून तिला जागा देतात. येथेहि तसेच झाले आहे. विभीषणाने प्रवेश करताच सर्वांनी त्याला स्थान दिले. आता रावण हात पसरवून बोलावयाला सुरुवात करतो त्याचा हात एकाद्या सांपासारखा दिसला, त्याने दहाहि बोटांत अंगठ्या घातल्या होत्या त्या सांपाच्या जिव्हेसारख्या लखलखीत होत्या कारण सोन्याचें किरण त्यांतून निघत होते.

सभेमध्ये राजाचे जे प्रधानादि लोक असतात ते त्याला सल्ला देतात. त्यांत दोन प्रकार दिसतात. कांही राजाला आवडेल तसें बोलतात मग तें राजाचा विनाश घडवून आणणारे असेल किंवा नसेलहि. याउलट कांही लोक राजाला त्याचें म्हणणें पटो अथवा न पटो, त्यांच्या मनापासून त्यांना जें पटेल तेंच ते सांगतात. ते राजाला उपकारक असतें रावणाच्या सभेत असें दोनहि प्रकारचे लोक आहेत. पूर्वी उल्लेख केलेल्या बाबींवर रावण सल्ला विचारतो. तेव्हा प्रहस्तादि म्हणतात, "अरे राक्षसश्रेष्ठा, पंडितम्मन्य अशा इन्द्रालाहि तूं जिंकलेस। एका यःकश्चित् मानवाचें पारिपत्य करावयाला सभा कशाला बोलावलीस? " हे सर्व बोलत असतांना कोणी बाहु तर कोणी मांड्या थोपटतात. कोणी छातीला तर कोणी स्कंधाला स्पर्स करतात. कोणी धनुष्य, खड्गय, गदा, त्रिशूल इ. शस्त्रे

अनुक्रमणिका

परजतात. सर्वांना आवेश चढतो. हे सर्वजण रावणाला जे हवेहवेसें वाटतें तसें बोलणारे लोक आहेत. उलट विभीषण, मातासह हे स्वतःला काय वाटते ते बोलणारे आहेत.

प्रहस्तादिकांचे वर दिलेले भाषण ऐकून विभीषणाने बोलावयाला प्रारंभ केला. तो म्हणाला, - "रावणाने युद्धाला प्रवृत्त व्हावे यादृष्टीनें आपल्या प्रतिष्ठेला अनुरूप जें कांही सांगावयाचे तें तुम्ही सांगितलें तें प्राणांशी व्यवहार करणाऱ्या वीर पुरुषांना सांगायलाच हवें. परंतु गुह्यवादांत बुद्धि प्रधान असते, शौर्य नाही. मन्त्रांतहि शौर्यालाच प्राधान्य असेल तर बुद्धि निरवकाश होईल. तिला स्थानच राहणार नाही. इन्द्राला जिंकणाऱ्या रावणाने एका यःकश्चित् मनुष्याला भिण्याचें कारण काय? यावर समस्त लंकापुरी नष्ट करणाऱ्या हनुमानानेच उत्तर दिलें आहे. ज्याचा दूत एवढा सामर्थ्यसंपन्न त्याचा स्वामी किती बलसंपन्न असेल याचा जरूर विचार करावयाला पाहिजे. वधाला योग्य असणारा हनूमान् आपल्या प्रमादाने लंकादहन करतो असें असेल तर ब्रह्मास्त्रबंधन देखील प्रमादच असावा असे तुमचें मत आहे काय? ज्या हनुमंताने ब्रह्मास्त्रबंधनहि खंडित केलें त्याला काय करणे अशक्य आहे? किंवा अशा दूताचा वध करणे तरी आपल्याला शक्य आहे काय यासंबधी विचार करा. "

पलीकडे तो म्हणतो, 'जगांत असख्य आश्चर्यकारक गोष्टी आहेत. त्यांत असणारे लोक जिताभिमान आहेत. म्हणून केवळ स्वतःविषयी अभिमान धरू नयें, असे म्हटले आहे. आपल्या कार्यात उत्तम यत्न करा व नितिसंपन्न बना. विद्वानांचा अपमान करू नका. नितीनेच कार्ये साध्य होत असतात. म्हणून अनीतीचें आचरण करू नका.' पुढील श्लोकांत असाच उपदेश करीत भट्टी एक सुंदर सुभाषित सांगतो – विजिगीषु राजाचें वर्तन कसें असावे याविषयी विभाषण म्हणतो –

> वृद्धिक्षयस्थानगतामजस्रं वृत्तिं जिगीषुः प्रसमीक्षमाणः ।
> घटेत सन्ध्यादिषु यो गुणेषु लक्ष्मीर्न तं मुञ्चति चञ्चलापि ॥ १२-२६

राज्यश्री चंचल आहे हे खरे तथापि जो राजा, वृद्धि, क्षय व स्थान यांचे फल म्हणून प्राप्त झालेल्या आपल्या व शत्रूंच्या वृत्तीचा निरंतर विचार करतो व संधि, विग्रह यान, आसन. संश्रय, द्वैधीभाव या गुणांच्या बाबतींत योग्य प्रकारे प्रयत्न करतो. त्या जिगीषु राजाला राज्यश्री चंचल असली तरी सोडत नाही. पलीकडे विभीषण म्हणतो, शत्रु जर नीतिभ्रष्ट, अजितेन्द्रिय, व म्हणूनच कामक्रोधादि अंतःशत्रूंनी पीडलेला असेल तर त्याच्या वृद्धीची उपेक्षा करावी कारण असी वृद्धि अप्रीतींचें कारण होऊन परिणामी सर्वाचा समूळ नाश करते. उलट प्रजांचा ज्याच्यावर अनुराग आहे व म्हणून फलानुसारी असा स्वतःचा क्षय देखील विजिगीषु राजाने सहन करावा. संधीचा स्वीकार करावा. विभीषण याठिकाणीं असे सुचवितों कीं, तुमचा शत्रु राम तो नीतिसंपन्न व जितेन्द्रीय आहे. सध्या त्याची दुरवस्था दिसत असली तरी ती उपेक्षणीय नाही. उलट रावणावर त्याच्या प्रजांचा अनुराग नाही. म्हणून त्याने रामाची उपेक्षा करणे योग्य दिसत नाही. तर त्याची सीता त्याला परत देऊन टाकावी व योग्य मार्गाचे अवलंबन करावे संधि व विग्रह करणाऱ्या राजाला जर अनुकूल असा शत्रूचा क्षय व स्वतःची वृद्धि दिसून येत नसेल तर योग्य कालाची प्रतिक्षा करीत आसनाचा अवलंब करावा कारण शेवटी स्वतःची वृद्धि व शत्रूचा क्षय साधणे ही गोष्ट प्रमुख आहे. संधि करू इच्छिणाऱ्या विजिगीषूने स्वतःची वृद्धि साधावी किंवा एकांतांत विषादिदानांनी शत्रूला जर्जर करावे, त्याच्या लोकांना देशादींचे दान देऊन आकृष्ट करावे किंवा त्याच्या शत्रूंशी

त्याचा कलह करवून संधि- भंग करावा. अनुरागाचे प्रदर्शन करून आपल्या शत्रूंच्या मध्ये परस्पर विद्वेष उत्पन्न करून शत्रुमंडळांत फूट पाडावी आणि येन-केन –प्रकारेण आपली वृद्धि साधावी.

एखादा चांडाळ डुकराचा वध करू शकत नाही व कुत्र्याला सोडून देतो किंवा ते दोघेहि त्याला हवे असल्याने त्यांना परस्परांकडून मारवितो. त्याप्रमाणे विजिगीषु राजाने शत्रूंना मारण्यास असमर्थ म्हणून व दुर्बल राजाकडून ठार होऊ शकत नाही म्हणून – शत्रूंमध्यें परस्पर कलह उत्पन्न करून स्वतः दुर्गादिकांची वृद्धि करून आसनाचा अवलंब करावा. केवल प्रयाणाने शत्रू जिंकण्यासारखा असेल तर आपल्या देशाचें संरक्षण करून प्रयाणाचें आचरण करावें. शत्रूचा नाश व शत्रूकडून आपल्या दूर्गादिकांचे रक्षण आपण करू शकण्यास समर्थ ठरत नसेल तर दुसऱ्या बलवंताचा आश्रय करावा किंवा संधि व विग्रह दोनही बाजूंनी विचार करून एका शत्रूशी संधी व दुसऱ्याशी विग्रह करावयाला पाहिजे. जयाभिलाषी राजाने याप्रमाणे शत्रूचें व स्वतःचे बलाबल अजमावीत संधि – विग्रहादि षड्गुहणांचा विचारपूर्वक प्रयोग करावा.

यानंतर विभीषण रावणाला उद्देशून म्हणतो, "राजा, तू तर लोकांत अप्रीति उत्पन्न केलीस व राजसमूहाला प्रकुपित केलेस म्हणून तुझी वृद्धि शुभकारक वाटत नाही. याउलट रामाच्या बाबतीत दिसते. त्याने लोकांचा अनुराग संपादन केल्याने राजमंडल त्याच्यावर संतुष्ट आहे म्हणून राम तुझ्यापेक्षा वरचढ भासतो. तुला आपली ही न्यूनता दूर करावयाला पाहिजे. तुला जिंकणाऱ्या वालीला देखील एका बाणाने ठार केले. सुग्रीवाला राजा बनविले. राजा, त्याचवेळेस तुझ्या कार्याचा नाश झाला. माझ्या प्रतापानेच शत्रुनाश झाला असें म्हणत असशील तर ऐक – राजा, पूर्वीसारखा लोकांवर प्रभाव पाडणारा तुझा पराक्रम आता राहिला नाही. रावणा, तू रामाशी युद्ध करणे उचित नाही. कारण तूं कामक्रोधादि षड्व र्गाच्या अधीन झाला असून मूर्ख परिवाराने घेरलेला आहेस. ज्याचे मित्र नष्ट झाले आहेत अशा निन्दित गुणवान् जनांनी तूं युक्त आहेस. तुझे रामाशी युद्ध म्हणजे हत्तीशी युद्ध करणे आहे. नम्र जनांनी उपभोग्य असलेल्या रामचंद्राला तूं शरण जा. म्हणजे तुझी भीति नाहिशी होईल." या श्लाकाने ही संधी सांगितला आहे. त्याचें लक्षण असें –

> प्रवृत्तंमन्त्रिणाक्रान्तो राजा बलबताबलः।
> सन्धिनोपनमेत्तूर्ण दण्डकोशात्मभूमिभिः॥

रावण आणि रामाचे संधान होणेहि युक्त आहे हे दाखवीत तो म्हणतो रामचन्द्र सीतेचें अपहरण झाल्याने व आम्ही अक्षयकुमारादि आमच्या बांधवांच्या मरणाने संतप्त आहोत. याकरिता संतप्त लोखंडाचा संतप्त लोखंडाशी संधि व्हावा त्याप्रमाणे आमच्या शत्रूंशी आमचा संधि व्हावा म्हणून तूं सीतेला सोडून दे. संधिशिवाय आमचें जीवित टिकू शकणार नाही. दोन व्यक्तींचा विग्रह योग्य नाही तर एक हीन व दुसरी अधिक अशा दोन व्यक्तींचा संधि कसा योग्य होईल? कच्चे घट परस्परांच्या अभिघाताने नष्ट होतात त्याप्रमाणे दोन तुल्यबल शत्रु मृत्यूला प्राप्त होतील परंतु तुम्ही दोघे सारखे दिसत नाही. राम उत्साह शक्तीने युक्त असून त्याचें मण्डल अनुरागयुक्त आहे. याउलट तूं इन्द्रादि अनेक उत्तमोत्तम शत्रूंनी वेढलेला आहेस. म्हणून रामाशी तू संधि करावास विग्रह करू नये. वादितोषन्यायाने, रामाची हीनता जाणवत असली तरी व तूं स्वतःला अधिक मानीत असला तरी तुमचा विग्रह योग्य नाही. ही गोष्ट पटवून देण्यास पुढील श्लोकांत एक उत्तम सुभाषित सागितले आहें –

अनुक्रमणिका

दण्डेन कोशेन च मन्यसे चेत् प्रकृष्टमात्मानमरेस्तथापि ।
रिक्तस्य पूर्णेन वृथा विनाशः पूर्णस्य भङ्गेर बहु हीयते तु ॥ १२-४३

राजा, तूं स्वतःला चतुरंग बल व खजिन्यांनी शत्रुपेक्षा वरचढ मानीत असशील तथापि हीन शत्रूचा पूर्णाकडून विनाश होणे निष्फळच आहे व पूर्णाचा पराजय होणेहि हानिकारकच आहे. तात्पर्य वृथा संकट ओढवून घेण्यापेक्षा व ज्याला जिंकून कांहीच फळ नाही त्याला जिंकण्यापेक्षा संधि करणेच श्रेयस्कर आहे. आपल्यापेक्षा कमी (बलवान्) असणाऱ्या शत्रूला जिंकण्यातही विजयाचें फल मिळतें असे म्हणत असशील तर ऐक ज्याचे अनुचर दुःखित आहेत त्याने संदिग्ध अर्थात प्रयत्न करावा परंतु तुझ्यासारख्या कृतकृत्य असणाऱ्या राजाने संशयजनक कर्मात यत्न करू नये कारण लक्ष्मी त्याच्यावर प्रेम करीत नाही. संपत्तीच्या लालसेने दरिद्री मनुष्य स्वतःची स्थिती न जाणता कर्मात प्रवृत्त होवो परंतु तुझ्यासारख्या कृतकृत्य असलेल्या राजाने प्रस्तुत कर्मात प्रवृत्त होणे अनुचित आहे असा येथे विभीषणाचा अभिप्राय आहे. ज्याच्यावर प्रकृतिमंडळ अनुरक्त आहे अशा राजाने फळ प्राप्त करण्याकरीता शक्तिविषयक अशा निर्दोष व अनेक प्रयोजनयुक्त कर्माचा विग्रहाने आरंभ करावा. याच्या उलट जर असेल तर त्याचें प्रयास निष्फळ होतात. रामाशी विग्रह केल्याने माझेहि असेच होईल असें म्हणत असशील तर ऐक. नीतिज्ञ रामाला तूं जिंकू शकत नाहीस. त्याच्याशी विग्रह करशील तर क्षयादि दोष निश्चित आहेत, फलप्राप्ति मात्र कांही नाही. याचा शेवट शुभकारक नाही. म्हणून रामाशी तूं युद्ध पुकारू नये. त्यामुळेच आम्हा सर्वांचे कल्याण होईल. रामाच्या सुनीतीचें वर्णन करीत तो म्हणतो, अरे, रामाच्या बाणाने वालीचा वध करून काय साधलें नाहीं? त्याने सर्व मिळविलें तुझ्या मित्राचा (वालीचा) नाश, रामाच्या अनुकूल मित्राचा (सुग्रीवाचा) लाभ, म्हणून तो रामाच्या संकटांत ससैन्य त्याचा उपजीव्य व होणे इत्यादि बरेच कांही मिळविलें.

भेदनीतीचा अवलंब करून सुग्रीवाला अनुकूल करू इच्छित असशील तर ऐक. सुग्रीव लोभाने किंवा भयाने रामाला जाऊन मिळाला नाही कीं, जेणेकरून राम-सुग्रीवांत तूं भेद उत्पन्न करशील. क्रोध, लोभ, भय, अपमान हे चार हेतू भेद, निर्माण करू शकतात. त्यापैकी येथे लोभ व भय यांचा निर्देश केला आहे. सज्जनांनी चोखाळलेल्या मार्गाने जाणारा व राज्य प्राप्त केलेला सुग्रीव प्रत्युपकार करण्याच्या इच्छेने रामाला येऊन मिळाला आहे. सुग्रीवांच्या अनुचरांना देखील तूं वश करू शकत नाहीस. कारण ते केवळ फळ खाणारे म्हणजे मिष्टान्नाची लालसा नसलेले, जलप्रवाहाजवळ लतागृहांत राहणारे म्हणजे रम्य प्रासादांची अभिलाषा नसलेले, देवांगनांशी रममाण होण्यांत अनभिज्ञ म्हणजे तुझ्याकडे असलेल्या देवललनांची इच्छा नसलेले, पशु योनीचें असल्याने इन्द्रनीलादि रत्नांचा हव्यास नसलेले हनूमान् नीलादि श्रेष्ठ वानरांत देखील भेद उत्पन्न करू शकत नाही. अशा वर्णनाच्या भट्टिकाव्यांतील ४९ व्या श्लोकांत परिकर- अलंकार आहे कारण सर्वत्र साभिप्राय विशेषणें वापरली आहेत. भारवीच्या किराताजुनीयांत असाच एक श्लोक आहे. तो असा —

महौजसो मानधना धनार्चिता धनुर्भृतः संयति लब्धकीर्तयः ।
न संहतास्तस्य न भिन्नवृत्तयः प्रियाणि वाञ्छन्त्यसुभिः समीहितुम् ॥

(किरात. १-१९)

सुग्रीवाने पुत्रवत् पालन केलेला व यौवराज्यपदावर बसविलेल्या अंगदांत देखील भेद उत्पन्न करणे शक्य नाही. रामापेक्षा वरचढ किंवा रामासारखा दुसरा कोणीहि बलाढ्य मला दिसत नाही. कीं, ज्याचा आश्रय करून

अनुक्रमणिका

आपण जय मिळवावा. तुला वरदान देऊन प्रत्यक्ष ब्रह्मदेव देखील पश्चात्ताप पावला कीं, हे मी काय केलें, इन्द्रादि देवगण तर प्रथमच विरूद्ध गेले आहेत म्हणून आम्हाला सहाय्य करणारा कोणीच दिसत नाही. दुर्गाचा आश्रय करणे देखील अयुक्त आहे. दुर्गाचा आश्रय करणाऱ्यांना देखील फार दिवस गेल्यानंतर पार्ष्णिग्राह (पृष्ठवर्ती शत्रु) इ. हानीचें कारण उत्पन्न होतें. संपूर्ण जगताशीच आमचें वैर उत्पन्न झाले आहें. हे दशानना, दुर्गांचा उपरोध करणाऱ्या शत्रूची बराच काळ निघून गेला तरी हानि होत नाही. अशा रितीने सर्व बाजूंनी विचार केल्यावर रामाशी संधि करणे हाच एकमेव उपाय आहे असें वाटते. '

विभीषणाचें हे भाषण ऐकल्यानंतर तें अतीव उपयुक्त आहे असें समजून रावणाचा माल्यवान् नांवाचा मातामह बोलावयाला प्रारंभ करतो. त्याच्या वार्धक्याचें चित्र रेखाटतांना भट्टि म्हणतो —

प्रोन्नम्य देहं परिणामनभ्रम् ।
स्खलद्वलिर्वार्धककम्प्रमूर्धा ॥ १२-५५

परिणामनभ्रम् म्हणजे वृद्धात्वामुळे वाकलेलें शरीर, प्रोन्नम्य म्हणजे बोलण्याच्या आवेगाने ते ऊंचावून, स्खलद्वलिः म्हणजे त्याच्या शरीरावर वळ्या पडल्या होत्या व वार्धककम्प्रमूर्धा म्हणजे वृद्धपणामुळे त्याचे मस्तक कंपित झालें होते. भट्टीने वापरलेली ही सर्वच विशेषणे आपल्यासमोर माल्यवान् उभा करतात.

माल्यवान् म्हणतो 'अरे, राम एकटा असून पादचारी आहे, त्याच्या हातात केवळ धनुष्य असून तो एक मनुष्य आहे. असें असतांनाहि ज्याने अनेक मायावी व आकाशगत चौदा हजार राक्षसांचा विध्वंस केला त्याला तुम्ही केवळ एक मनुष्य समजता काय? तुम्ही संतप्त केलेल्या देवतांसह ऋष्यश्रृंग व ब्रह्मर्षींनी, जिंकण्याला अशक्य असें मनुष्याचें रूप घेतलेल्या रामाला वानरांसह आमचा विनाश करण्यांकरिता उत्पन्न केलें आहे. इन्द्राच्या वज्रप्रहारांनीहि चूर्ण न होणाऱ्या नमुचि नामक दैत्याच्या मस्तकाचा, केवळ जलाच्या फेसाने भेद केला त्याप्रमाणे हा मानव रूप धारण केलेला राम देवांच्या कार्याचे साधन आहे हे जाणायला हवे. स्त्रियांनी सहन करण्यासारखे नख कोठे? व पर्वताप्रमाणे असणारी हिरण्यकशिपूची छाती कोठे? परंतु देवांची ही नीति बघा कीं नृसिंहाचें रूप धारण करून त्याने हिरण्यकशिपूचें वक्षःस्थळ फाडलें. हे राजन्, प्रमात करणारा आचारहीन तूं मूनींच्या शत्रुत्वाचें कारण झाला आहेस. कुळांत शांति नांदावी असें वाटत असेल तर विभीषणाने सांगितल्याप्रमाणे आचरण कर. '

माल्यवानांच्या घोषाने निद्रेतून उठलेला व सर्व भाषण ऐकलेला कुंभकर्ण आकाशांतील जलपूर्ण गर्जना करणाऱ्या मेघाप्रमाणे बोलावयाला लागला. माल्यवानाच्या आवाजाने कुंभकर्णाचा निद्राभंग होणे ही कल्पना येथे एकदम नवीन आहे. इतरत्र कोठेहि आढळत नाही. तसेच माल्यवानाच्या वृद्धावस्थेतहि त्याच्या ह्या आवाजाचें — कीं ज्यामुळे कुंभकर्णाची निद्रा भंग होते — आश्चर्य वाटते. 'स्फुरद्घटनः साऽम्बुरिव'- ह्या विशेषाने कुंभकर्णाच्या आवाजाची यथार्थ कल्पना येते. तो म्हणतो, - 'राजा, दुर्गादी कर्मांचा आरंभ म्हणजे उपाय, देश व काल, मनुष्यद्रव्यसंपत्ति, आपत्तिप्रतीकार आणि अर्थसिद्धि या पाचांना मन्त्रांग म्हणतात. हे राक्षसराज, जो जयाभिलाषी राजा क्रियेच्या उपाय इ. च्या बाबतीत योग्य कालाचे व देशाचें अतिक्रमण करीत नाही. त्याचेच कार्य सिद्ध होते. याउलट विशिष्ट काळ निघून गेल्यावर जो यत्न करतो त्याची कार्यसिद्धी होत नाही. ऐन मध्याह्नी सूर्य उष्णतेचा

व चन्द्र रात्रीच्या वेळी शैत्याचा त्याग करील. परंतु लोकांचा तिरस्कार करणारा मनुष्य, अनर्थ हाच ज्याचें मूळ आहे असा दुरभिमान सोडणार नाही. सीतेला रामाकडे पोचविणे हाच तुझ्या रक्षणाचा खरा उपाय आहे आणि नेमका तोच तुला नको आहे असें येथे विभीषण सुचवितो. राजा, परहिंसादि क्रूर क्रिया व परस्त्रीगमन हीं पुण्यक्षयाचीं कारणे आहेत असें विद्वज्जन सांगतात, ही दोनहि तुला दुष्टफळ देतील. वास्तविक तूं याचकांना काय दिलें नाहीस? किंवा कोणत्या विषयांचा अनुभव प्राप्त करून दिला नाहीस? याप्रमाणे कृतकृत्य झालेल्या माझा तुझ्याकरिता मृत्यु निश्चित असेल तर मी काय मिळविले नाही? सर्वच प्राप्त केलें. प्रहस्तादि लोकांनी दिलेल्या दुर्नीतीने वागल्यास काय फल प्राप्त होईल? कांहीच नाही. प्रत्यक्ष युद्धांत मी माझ्या पराक्रमाने रामाचा प्रतीकार करीन.' एवढे बोलून तो निद्रिस्त झाला. नंतर विभीषण रावणाला म्हणतो - 'कारणाशिवाय उत्पन्न झालेली धूळ व कठोर आणि चंचल वायूने झाकाळलेल्या दिशा अस्वाभाविक मृग व पक्षी यांच्या शब्दांनी जणूं आपल्या मृत पतीला बोलवीत आहेत असें प्रतीत होते. धूसर किरणांनी युक्त असलेला सूर्य केसर पसरलेल्या सिंहाच्या मुखाकृतीप्रमाणे लोकांत भय उत्पन्न करणाऱ्या छिद्राला विस्तारीत लोकांना खाण्यांकरिता जणू उदित होत आहे. भृगुवंशांत उत्पन्न झालेल्यांचा कुलगुरु शुक्र अगस्त्यासहित विन्ध्य पर्वताच्या शिखररूपी मार्गावर गेला आहे. दिवसा बृहस्पति दिसत आहे व उल्का पृथ्वीला कंपित करीत आहे. मेलेल्या राक्षसांचे मांस खाण्याकरिता कठोर शब्द करीत, ओरडत व प्रदीप्त अग्नीच्या मुखाप्रमाणे भयंकर दिसणारे श्रृगाल इ. जंतु निर्भय होऊन लंकेच्या चारहि दिशांना फिरत आहेत. गोप, पुष्टस्तन असून कमी दूध देणाऱ्या गायीचें स्वाभाविक रंगाने रहित व नीरस दूध काढतात. हवनीय घृताक्त काष्ठसंपन्न अग्नि कीडे व केसांमुळे पेट घेत नाही. ही सर्व दुश्चिन्हें पाहून मोठ्या स्नेहाने रावणा, तुलां असें सांगतो कीं, तूं सीतेला परत पाठव. कारण –

वदन्ति दुःखं ह्यनुजीविवृत्ते स्थिताः पदस्थं परिणामपथ्यम् ॥ १२-७४

सेवक स्वामीला आरंभी दुःखकारक वाटत असलें तरी परिणामी हितकारक असेंच सांगत असतो. अरे, जोपर्यंत राम छिन्नविच्छिन्न अंगांनी, रणांगणावर पसरलेल्या, मेलेल्या फाडलेल्या तसेच चूर्णित, लज्ञित व तीक्ष्ण शस्त्रांनी कापलेल्या राक्षसांच्या द्वारां गृध्र व श्रृगाल यांना तृप्त करीत नाही तोपर्यंत त्याला शरण जा.'

विभिषणाचें हे सर्व भाषण ऐकून रावणाला अर्थातच भयंकर क्रोध आला. बरोबरच आहे 'उपदेशो हि मूर्खाणां प्रकोपाय न शान्तये' । अविवेकी माणसाला केलेला उपदेश हा त्याचा संताप वाढविण्यास कारणीभूत होतो. शांत करण्यास नव्हे. रावण संतापून म्हणतो, 'हे पुलस्त्याच्या नराधमा, पाण्यांतून दगड तरून जाईल. झाडाचें पान शक्य नाही. सूर्यापासून अंधकार व चन्द्रापासून अग्नि प्रस्रवेल आणि श्रेष्ठ व जयशील असा मीं युद्धांत दुसऱ्याकडून जिंकल्या जाईल तर यांच्या सारखा मला समज. पाण्यातून दगड तरणें, सूर्यापासून अंधकार प्रस्रवणें, चन्द्रापासून अग्नि प्रस्रवणे ह्या गोष्टी जशा अशक्य तसेच मला जिंकणेहि अशक्य समज. आमच्या संपत्तीमध्ये सुखी नसणारा, गुप्तरूपाने विरोधी असणारा, सत्काराच्या वेळेस दोषाचा आविष्कार करणारा. भिन्न विचार, भिन्न आचार व भिन्न वचन असणारा तुझ्यासारख्या अधम नातेवाईक पृथ्वीवर कोणाच्याहि वशांत नसावा. म्हटलेच आहे –

'मनस्यन्यद्वचस्यन्यत्कर्मण्यन्यद् दुरात्मनः ' ।

बंधुजन निरंतर आपलीच समृद्धि इच्छितात परंतु आपल्या तुल्य बंधूच्या लक्ष्मीची इच्छा धरीत नाहीत. तसेच ते शत्रूला नमस्कारहि करतील परंतु ईर्ष्येने जळणाऱ्या हृदयाने आपल्या बंधूच्या समृद्धीला सहन करीत नाहीत. हे विभीषणा, लंकादहन इ. विषयात तूं आज मोठ्या हर्षाने तुझे अंतःकरण उघडे केलेस. हा शत्रूंनी घेरलेला आहे. अशी माझ्याविषयी तुझी मिथ्या बुद्धि आहे. 'तुला धिक्कार असो' असें बोलून रावणाने विभीषणाच्या मस्तकावर लाथ हाणली. तरीहि तो क्षमेने क्रोध, धैर्याने शोक, नम्रतेने गर्व, बुद्धीने मोह व उत्साहवश असल्याने असामर्थ्याला आपल्या ताब्यांत आणून चार मन्त्र्यांसहित आसनावरून उठला. रावणाला म्हणाला, 'हे महाराज, माझ्याविना तूं सुखांत रहा कारण –

'मूर्खातुरः पथ्यकटूननश्नन् यत्साऽऽमयोऽसौ भिषजां न दोषः ॥ १२-८२

मुर्ख रोगी पथ्यभूत कटु पदार्थ खात नाही व रोगयुक्त होतो तो दोष वैद्याचा नाही. अरे विवेकहीन, आत्माभिमानी, स्वामी यथार्थ ज्याने कथन करावे त्याचा द्वेष करतो व कानांना सुखकारक परंतु परिणामी अहितकारक वचनांनी संतुष्ट होतो. खरोखर, हा हितचिंतक आश्रितांचा महान् अनर्थ आहे,' इ बरेच बोलून व सभात्याग करून विभीषण रामाकडे निघून गेला.

आतापर्यंत आपण भट्टिकाव्यांतील बाराव्या सर्गाचा विचार केला. त्यांत असें दिसून येतें कीं, भाविक अलंकार प्रबंधाचा गुण या स्वरूपांत संपूर्ण सर्गाला व्यापून आहे. विशिष्ट घटनेचें वर्णन वाचत असतांना जणूं ती आपल्यासमोर घडत आहे असा भास होतो. विभीषण, माल्यवान्, कुंभकर्ण, रावण, प्रहस्तादि मंत्रिगण यांचे वर्णन वाचत असतांना त्या त्या व्यक्ति आपल्या डोळ्यासमोर उभ्या राहतात या सर्वांचे वर्णन करण्याकरिता भट्टीने भाविक अलंकाराचा पुरेपूर उपयोग करून घेतलेला आहे असें दिसतें.

### ई] भाषासम

भट्टिकाव्याचा तेरावा सर्ग भट्टीने भाषासमाचें निदर्शन म्हणून लिहिला आहे. भाषासमालाच भाषाश्लेष असेहि म्हणतात. भाषाश्लेष हा श्लेषाच्या आठ प्रकारांपैकी एक भेद आहे. रुद्रट श्लेषाचे प्रकार पुढीलप्रमाणे देतो –

वर्णपदलिंगभाषाप्रकृतिप्रत्ययविभक्तिवचनानाम् ।
अत्रायं मतिमद्भिर्विधीयमानोऽष्टधा भवति ॥

यांच्यापैकी भाषाश्लेष दोन विभागांत विभागल्या गेला आहे. पहिला प्रकार असा –

यस्मिन्नुच्चार्यन्ते सुव्यक्तविविक्तभिन्नभाषाणि ।
वाक्यानि यावदर्थं भाषाश्लेषः स विज्ञेयः ॥

यांत अनेक अर्थ अनेक भाषांमध्ये कवि सांगतो. दुसऱ्या प्रकाराचें लक्षण असें –

वाक्ये यत्रैकस्मिन्ननेकभाषानिबन्धनं क्रियते ।
अयमपरो विद्वद्भिर्भाषाश्लेषोऽत्र विज्ञयः ॥

नामीसाधु टीकाकारांचे देखील असेच मत आहे –

'पूर्वत्रानेकार्थोऽनेकाभिर्भाषाभिरुक्तः इह त्वेक एवार्थो
बह्वीतभिर्भाषाभिरुच्यते इति तात्पर्यार्थः' ।

भाषाश्लेषाच्या या दुसऱ्या प्रकारालाच भाषासम असें नांव आहे. याचे लक्षण व वर्गीकरण याप्रमाणे केले आहे.

संस्कृतप्राकृतमागधपिशाचशूरसेनापभ्रंशभाषाणां संकरे भाषाश्लेषः ।

भट्टिकाव्याच्या तेराव्या सर्गाच्या प्रारंभी जयमंगल असे म्हणतो, 'काव्यं संस्कृतप्राकृतापभ्रंशभेदात् त्रिविधम् । तत्र शब्ददेशीयपदयोः प्राकृतभाषयोरपभ्रंशस्य च संस्कृत भाषायां समावेशासंभवात् । शब्दसमायाः प्राकृतभाषायाः समावेशः । तमार्यगीत्या स्कन्धलक्षणया दर्शयन्नाह' ।

भट्टिकाव्याच्या तेराव्या सर्गातील श्लोकांत आलेले कित्येक शब्द संस्कृत व प्राकृतांत सारखेच आहेच. उदाहरणाकरिता आपण एक दोन पद्यें घेऊं.

चारुसमीरणरमणे हरिणकलंककिरणावलीसविलासा ।
आबद्धराममोहा वेलामूले विभावरी परिहीणा ॥ १३-१

या श्लोकांत 'चारुसमीरणरमणे' आणि 'वेलामूले' हीं दोन पदें संस्कृतांत आणि प्राकृतांत सारखीच आहेत 'चारुसमीरणरमणे' हे ङि प्रत्यय लागून संस्कृतांत सप्तमीचे रूप आहें. तसेच प्राकृतांतील सप्तमीचें वैकल्पिक रूप आहें.

बद्धो वासरसंगे भीमो रामेण लवणसलिलावासे ।
सहसा संरम्भरसो दूरारुढरविमण्डलसमो लोले ॥ १३-२

या पद्यांतील बद्धो, भीमो आमि सरंभरसो ही जशी संस्कृतांतील प्रथमेचीं रूपे आहेत तशीच प्राकृतांतील प्रथमेची रूपें आहेत. वरील उदाहरणांत आणि यांत भेद असा कीं येथे बद्धो, भीमो इत्यादिकांत दिसून येणारा ओकार हा संस्कृत व्याकरणाच्या दृष्टीने सांहितीक विकार आहे. उलट प्राकृतांत बद्धो, भीमो ही सरळ प्रथमेचीच रूपे आहेत.

प्रणिपत्य ततो वचनं जगाद हितमायतौ पतिर्वारीणाम् ।

गंगाऽवलम्बिबाहू रामं बहलोरुहरितमालच्छायम् ॥ १३-८

या श्लेकांतील पूर्वार्ध शुद्ध संस्कृतांत आहे. उत्तरार्धात गंगाविलंबिबाहू येथे भाषासम आहे. हा शब्द प्राकृतांत ‘सुभिस्सुप्सु’ या प्राकृत व्याकरणांतील सूत्राने दीर्घ होतो. संस्कृतांतील प्रथमेचें रूप ‘बाहुः’ असें होऊन पलीकडे रामम् मधील रकार आल्याने विसर्गाचा रेफ होऊन तो दीर्घ होतो. येथे देखील संस्कृतांतील सांहितीक विकार होऊन भाषासम निर्माण झाला आहे. अशाप्रकारें इतर अनेक उदाहरणे देता येतील. म्हणून हा सर्ग भाषासमाचें योग्य निदर्शन आहे.

## उ] सौशब्दय

चवदावा आणि उरलेले सर्व सर्ग भट्टीने सौशब्दय या गुणाचें निदर्शन म्हणून लिहिले आहेत. मल्लिनाथाची सौशब्दयाची व्याख्या अशी –

‘सुपां तिङांच व्युत्पत्तिः सौशब्दयं परिकीर्त्यते’ । त्याने दिलेलें निदर्शन असें –

आशामंडलमिद्धमुद्धतकथैरभ्रंकषैवैभवे
रक्षन्सुप्रजसः प्रजास्त्रिभुवनक्षेमंकरप्रक्रियः ।
दुष्टानां भुवि निग्रहीतुममलैराद्यंभविष्णुर्गुणै –
र्भूम्ना संचरतेऽद्य काकतिकुले रुद्रावतारो हरिः ॥

माघकाव्यांतील टीकेंत देखील त्याने या गुणाचे विवेचन केले आहे. ते असें –

पुरीमवस्कन्द लुनीहि नन्दनं मुषाण रत्नानि हरामरांगनाः ।
विगुह्य चक्रे नमुचिद्विषा बली य इत्थमस्वास्थ्यहर्दिवं दिवः ॥
अत्र तिङवैचित्र्यात्सौशब्दख्यो गुणः ।
‘सुपां तिङां परावृत्तिः सौशब्दमिति लक्षणात् ।

(शिशु. सर्ग १, श्लो. ५१)

अनुक्रमणिका

# तिङन्त कांड

अनुक्रमणिका

# तिङन्त कांड

## कथानक व रचनापद्धती

### कथानक

नंतर कामपीडित रावणाने गुप्तचरांकडून शत्रूच्या शक्तीचा अंदाज घेऊन लढण्याकरिता सेना पाठविल्या. त्याने मायानिर्मित रामाच्या मस्तकाने सीतेला मोहित केले. रावणाच्या आज्ञेने पूर्वद्वारावर प्रहस्त, दक्षिणद्वारावर महापार्श्व व महोदर, पश्चिम द्वारावर मेघनाद गेले आणि उत्तर द्वारावर स्वतः रावण गेला. भीषण नेत्रांचा विरूपाक्ष शहराच्या मध्यभागी थांबला. हे सर्व ऐकून रामचंद्राने देखील लढण्याच्या इच्छेने प्रस्थान केले. वानरसेना देखील युद्धाच्या अभिलाषेने शोभू लागली. यावेळी अनेक प्रकारचे अपशकुन झाले. रावणाने युद्धाच्या इच्छेने शत्रु उपस्थित झाला आहे असे ऐकून राक्षसांच्या उत्साहाचे संवर्धन केले. त्यानंतर वानर व राक्षस यांचा घनघोर संग्राम झाला. राक्षसपुरीचे एकेक द्वार करोडो वानरांनी रोखले. एकट्या सुग्रीवासोबत छत्तीस करोड वानर होते. तेंव्हा वानरसेनापतींचे राक्षस सेनापतींशी द्वंद्व युद्ध सुरू झाले. अंगद व मेघनादांची लढाई जुंपली. त्यावेळी वालिपुत्र अंगदाने आपली युद्धनिपुणता दाखविली. राघवधुरंधर रामचंद्राने देखील अनेक राक्षसांचा संहार केला. ही विपत्ति बघून इंद्रजित् संतापला व त्याने सर्पास्त्राचे आव्हान केले. त्यामुळे सर्व वानरासंह राम-लक्ष्मण देखील आच्छादित झाले व मूर्छित होऊन जमिनीवर पडले. हे बघून वानरसेना शोकविव्हल झाली. इंद्रजित् कोठे आहे हे देखील कळत नव्हते. तेंव्हा सुग्रीवाने अभिमंत्रित केलेल्या जलाने डोळे धुतल्यानंतर विभीषण व सुग्रीवांना तो आकाशांत आहे हे दिसले. इंद्रजिताला मारायला सुग्रीवाने पर्वत उचलताच तो युद्ध सोडून रावणाकडे गेला. रावणाला सर्व वृत्तांत सांगितला. तो अत्यंत प्रसन्न झाला. लक्ष्मणासह रामाला अशा मूर्छित अवस्थेंत बघून सीता मला अनुकूल होईल असा विचार करून पुष्पक विमानांतून रावणाने तिला राम-लक्ष्मणांना दाखविले. ती देखील दुःखाने मूर्छित झाली. परंतु त्रिजटा नावाच्या रावणाच्या बहिणीने तिला सावध केले व अशोकवनिकेंत पोचविले. हे नागास्त्र आहे. याचा प्रतिकार गरुडाचे ध्यान आहे असें विभीषणाकडून ऐकून रामाने नागशत्रु गरुडाचे ध्यान केले. ध्यानानंतर ताबडतोब गरुड आला. त्याच्या आगमनाने नागपाश शिथिल झाले. लक्ष्मण सावध झाला. नंतर वानरांचे समूह अत्यंत प्रसन्न होऊन युद्ध करण्यासाठी लंकेला गेले. वानर व राक्षस यांचा तुमुल कलह झाला. महाबली हनुमंताने धूम्राक्ष नामक राक्षसाला ठार केले. रावणाच्या आज्ञेने अकंपन राक्षसाने हनुमानाशी युद्ध व पराक्रमाचे प्रदर्शन केले. तालवृक्षाच्या प्रहाराने हनुमंताने त्याला यमसदनी पाठविले. नंतर प्रहस्त युद्ध करायला आला. त्याला नील नामक वानराने शिलाप्रहाराने मृत्यूच्या स्वाधीन केले. संतुष्ट होऊन वानरांनी लंकेचा आश्रय केला. राक्षसांनी रावणाला प्रहस्ताच्या मृत्यूची सूचना दिली.

प्रहस्ताच्या मृत्यूने रावण भयभीत झाला. त्याने कुंभकर्णाला जागवायला राक्षसांना पाठविले. दंड इत्यादींच्या प्रहारांनी कुंभकर्ण जागृत झाला आणि स्नान, पान, भोजनादि उरकून तो रावणाजवळ आला. रावणाने त्याला क्रमाक्रमाने समुद्रातरणापासून आरंभ करून रामाचा संपूर्ण पराक्रम निवेदन केला. व शत्रूच्या नाशासाठी जाण्याची विनंती केली. सल्लामसलतीच्या वेळी आपण माझे ऐकले नाही त्याचा हा दुष्परिणाम आहे, असे त्याने परिणामी हितकारक बोलताच रावणाला भयंकर संताप आला. घडलेल्या घटना विसरून युद्धास जाण्यासाठी रावणाणे त्याला भाग पाडले. ज्यावेळी तो युद्धभूमीवर जाण्यासाठी निघाला त्यावेळी पृथ्वी कंपायमान

होत होती, झाडे उन्मळून पडत होती, व पर्वत विचलीत झाले होते. सर्वत्र उत्पात घडावयाला लागले. त्याची वानरांशी जोरदार लढाई जुंपली. कोणालाहि तो हार जात नाही असें पाहून रामाने ज्या बाणानी खर, वाली, मारीच व दूषणाला यमसदनी पाठविले त्याच ऐन्द्र बाणाने कुंभकर्णाला संपविले. तो मरून पडला त्यावेळी दोन हजार वानर सैन्य चेंगरले. तेंव्हा देवतांनी रामाची स्तुति केली. राक्षस भयाने पळू लागले. रावणाला अतीव दुःख झाले हे पाहून देवांतकासह रावणाची चार मुले रणांगणांत आली. अंगदाने नरांतकाला, हनुमंताने देवांतकाला, लक्ष्मणाने अतिकायाला तर नीलाने युद्धोन्मत्ताला ठार मारले. हनुमंताने त्रिशिरा नामक राक्षसाचा वध केला. हे ऐकून रावण दुःखित झाला. तेंव्हा इंद्रजिताने त्याचे सांत्वन करून ब्रह्मास्त्र प्राप्त करण्यासाठी अग्नीची पूजा केली. ब्रह्माने त्याला शस्त्र व रथ देखील दिला. इंद्रजिताने त्या रथावर चढून अदृश्य रूपांत सदुसष्ट करोड वानरांना ठार मारले व रामलक्ष्मणांना मूर्छित केले. इंद्रजिताने लंकेमध्ये जाऊन आपला हा पराक्रम दाखविण्यासाठी रावणाला रणांगणांत पाठविले. जांबवान सावध झाला. त्याने व विभीषणाने मृतजीवनी (मेलेल्याला जीवंत करणारी), संधानकरणी (क्षतांचे संधान करणारी) आणि विशल्यकरणी (रुतलेल्या बाणाला काढणारी) या औषधि आणायला हनुमंताला पाठविले. परंतु नक्की त्या वनस्पती कोणत्या आहेत, हे न कळल्याने त्याने पर्वतच उचलून आणला. औषधीच्या प्रभावाने वानरसेना पूर्ववत् सावध होऊन पुनः युद्धास प्रवृत्त झाली. तेंव्हा कुंभ व निकुंभ नामक कुंभकर्णाच्या मुलांनी लंकेचे रक्षण करून वानरांचा वध केला. अंगदाशी राक्षसांचा भयंकर संग्राम झाला. रामचंद्राच्या अभिप्रायावरून अंगदाचे रक्षण करण्याकरिता सुग्रीवाने कुंभाला तर हनुमंताने निकुंभाला मारले. यावेळी प्रधान योद्धे मारले गेले होते. त्यामुळे रामाची प्रसन्नता आणि मेघनादादि राक्षसांचा शोक वाढला.

यानंतर बांधवांच्या मृत्यूमुळे राक्षसराज रावण (अतिकायादि आपल्या मुलांना व मत्त, युद्धोन्मत्तादि आपल्या भृत्यांना स्मरून) विलाप करू लागला. ज्यांच्या मृत्यूची कधी शक्यता देखील नव्हती. अशा कुंभकर्णादिंना स्मरून अनेक प्रकारांनी आपल्या पराजयाचे तो वर्णन करू लागला. निष्फल अभिलाशी रावणाला नम्रतापूर्वक विभीषणाने केलेल्या नीतिसमूहांचे स्मरण झाले. असा विलाप करीत असतांना त्याला शत्रूविषयी क्रोध निर्माण झाला. नर व वानरांना मारून टाकण्यासाठी त्याने उत्साहाचा अवलंब केला. तो म्हणाला, प्रथम लंकेवर आक्रमण करणाऱ्यांना ठार करून देवतांसह इन्द्राला जिंकायला जाईन नंतरच लंकेत परत फिरेन. तेवढ्यांत रावणाजवळ येऊन इंद्रजित् म्हणाला, 'मी शत्रूंचा नाश करेन.'

मंगलाचरण, ब्राह्मणांची व ब्रह्माची पूजा इत्यादि आटोपून शस्त्रास्त्रांसह इंद्रजित् युद्धासाठी जाऊ लागला. तेंव्हा योद्धयांनी रणवाद्यें वाजविली. त्यावेळी अनेक अपशकून दृष्टीस पडले. परंतु तिकडे दुर्लक्ष करून राक्षसांनी मोठ्या उत्साहाने युद्ध केले. याप्रमाणे वानरसमूहाशी राक्षससमूहाचा घनघोर संग्राम झाला. इंद्रजिताने अतिशय वेगाने शरसंधान केले व आकाशांत जाऊन मायामयी सीतेचे शीर तरवारीने कापतांना दाखविले. हनुमंताने हा शोकजनक वृत्तांत राम लक्ष्मणांना सांगितला. त्यावेळी शोकाकुल होऊन ते विलाप करू लागले. परंतु विभीषणाने येऊन सांगितले कीं, तो आपल्याला मोहित करून निकुंभिला नांवाच्या अग्निशाळेत गेला आहे. तेथे तो हवन करून ब्रह्मशिर नांवाचे अस्त्र आणि रथ प्राप्त करील. ते कार्य समाप्त होण्यापूर्वीच त्याच्या मृत्यूचे निर्धारण ब्रह्मदेवाने केले आहे. तेंव्हा रामचंद्राच्या आज्ञेने इंद्रजिताच्या हवनांत विघ्न उपस्थित करण्यासाठी पुष्कळ वानर निकुंभिलेत गेले. तेथे अनेक रक्षक राक्षसांनी त्यांना रोखले. याप्रकाराने राम व रावणांच्या सेनांचे तेथे भयंकर युद्ध झाले. रक्षकांना जिंकून लक्ष्मण व विभीषण शीघ्रतेने आंतमध्ये घुसले. तेथे एकाग्रचित होऊन मंत्रोच्चारण करीत हवन करणाऱ्या इन्द्रजिताला त्यांनी पाहिले. लक्ष्मणाने त्याला गर्जना करून ललकारले. त्यामुळे संतापून

इंद्रजिताने आपल्या काकाची विभीषणाची – कूलदूषक म्हणून निर्भत्सना केली. विभीषणाने देखील त्याने ठेवलेल्या दूषणांचे युक्ति-युक्त वाणीने निराकरण आणि रावणाच्या प्रमाद-समूहाचे प्रतिपादन केले. त्यामुळे इंद्रजिताने चिडून विभीषण व लक्ष्मणावर बाणांचा वर्षाव केला. नंतर इंद्रजित् व लक्ष्मणांचे भय उत्पन्न करणारे युद्ध जुंपले. लक्ष्मणाने त्याचा सारथी, रथ व कांही क्षणांतच इंदजितालाहि संपविले. तेव्हा वानरांसह समस्त देवगण संतुष्ट झाला. रामाने लक्ष्मणाला आलिंगण दिले. व त्याच्या मस्तकाचे अवघ्राण केले. राक्षससेना रावणासह रडूं लागली. रावण सीतेला मारायला धावला परंतु त्याच्या आप्तांनी त्याला परावृत्त केले. तेंव्हा रावण युद्धाची तयारी करूं लागला. ब्राह्मणांची पूजा करून त्याने युद्धाला प्रारंभ केला. सर्व दिशांनी धुळीचे लोट उठले. रक्ताचे पाट वाहायला लागले. रावणांचा संहार करण्यांकरता रामाने अतुल पराक्रम गाजविला पहाडासारख्या विशालकाय राक्षसांच्या प्रेतांनी पृथ्वी आच्छादित झाली. देवता आणि गंधर्व रामाची स्तुती करूं लागले. विलाप करीत रावणाची निंदा करू लागल्या. पुनः दोनहि सैन्यांत धूमश्चक्री सुरू झाली. राम-रावणाचे भीषण युद्ध चालू झाले. रावणाने लक्ष्मणांवर शक्ति फेकून त्याला मूर्छित केले. तेंव्हा रामाने, हनुमंताने आणलेल्या औषधीने त्याला पुनरुज्जीवित केले. रथावर आरुढ होऊन लढणाऱ्या रावणाशी पृथ्वीवरून लढणाऱ्या रामाचे युद्ध अनुचित आहें, असें जाणून इंद्राने रथासह आपल्या सारथ्याला (मातलीला) रामाकडे पाठविले. रामाने अर्थातच त्याचा स्वीकार केला. रामरावणाचा अपूर्व संग्राम झाला. ब्रह्मदेवाने रावणाच्या वधासाठी ज्या अस्त्राची योजना केली होती त्याचे स्मरण मातलीने रामाला करून दिले. त्या अस्त्राने रामाने रावणाला ठार केले. वानरांना, देवांना आनंद झाला. देवांनी रामाची प्रशंसा केली. विभीषण मात्र रावणाच्या मृत्यूने कष्टी झाला.

शोकपरायण विभीषणाने विलाप केला आणि नीति अनीताचा विचार नसल्याने रावणाची अशी दुरावस्था झाली असा दोषहि त्याने रावणाला दिला. रावणाच्या प्रतापाचे त्याने वारंवार स्मरण करून भाग्याला दूषण दिले. अंतःपुरांतील स्त्रिया व लंकानिवासी देखील अत्यंत दुःखपूर्ण अंतःकरणाने विलाप करू लागले. नंतर रामाने विभीषणाचे सांत्वन केले व विभीषणा, तुझ्यासारख्या ज्ञानी पुरुषाने रावणाच्या मृत्यूचा शोक करूं नये. रावण अत्यंत दानशील, इंद्रादीच्या अग्रभागी शोभणारा, नित्य यज्ञ करणारा व युद्धांतून पळून न जाता प्राणत्याग करणारा होता. असे बोलून त्यांनी पुढील कर्तव्याचा उपदेश देखील केला.

रामचंद्राने विभीषणाचे सांत्वन केल्यानंतर रावणाला चंदन लावून व अलंकार घालून त्याच्या और्ध्वदेहिक संस्कारासाठी विभीषणाने राक्षसांना उपकरणादि एकत्र करण्याची आज्ञा दिली. राक्षसांनी देखील त्याच्या आज्ञेप्रमाणे सर्व सामग्री जमविली. विभीषणाचा शोक दूर करण्यासाठी त्याचे सांत्वन केले व लंकेचे पालन करण्यासाठी त्याचा उत्साह वाढविला. तेंव्हा विभीषणाने रावणाचा अग्निसंस्कार करून जलदानादि क्रिया पार पाडल्या. रामचंद्राने सुवर्ण कलशांतील जलाने सिंचन करून विभीषणाला नीतीने राज्यकारभार करण्याचा उपदेश केला.

नंतर हनुमान सीतेजवळ गेला. त्याने रावणादि राक्षसांच्या वधाचे वर्णन केले. तिच्यावर पहारा करणाऱ्या राक्षसींना दंड करण्याची इच्छा त्याने प्रगट केली. परंतु अनुचरांच्या वधाची अनीच्छा सीतेने दाखविली. 'सीता आपल्या दर्शनाची इच्छा करीत आहे हे रामाला त्वरित कळविण्याची सूचना द्या' असे तिने सांगितले. हनुमंताने रामाला हा निरोप सांगताच 'सीतेला अलंकृत करून घेऊन या' अशी आज्ञा त्याने विभीषणाला दिली. विभीषणाने अशोकवनिकेंत जाऊन सीतेला प्रणाम करून रामाचा निरोप सांगितला. त्याप्रमाणे सीता रामाजवळ आली व रडू

लागली. परंतु रामाने तिच्या चारित्र्याविषयी संशय घेऊन तिला परत जाण्याची आज्ञा दिली. सीतेने आपल्या चारित्र्याच्या पावित्र्याचे प्रतिपादन मोठ्या ओजस्वी वाणीने केले. पावित्र्य प्रकाशित करण्याकरिता लक्ष्मणाला तिने चिता रचण्याची आज्ञा दिली. अग्नीला उद्देशून ती म्हणाली 'हे अग्ने, मी दूषित असेन तर माझे भस्म कर आणि मी निष्कलंक असेन तर माझे रक्षण कर.' असें बोलून तिने अग्नीत प्रवेश केला.

तेंव्हा अग्नीने सीतेला उठवून रामाच्या जवळ तिच्या पावित्र्याविषयी खात्री देऊन सांगितले कीं, 'एखाद्या सामान्य स्त्रीप्रमाणे हिला समजू नकोस.' त्याचवेळी भगवान वृषभवाहन (महादेव) कमलासन (ब्रह्मदेव) आणि विमानांतून दशरथ देखील तेथे आले. तेंव्हा रामाने त्यांना नमस्कार केला. त्यांनी सीतेचे पवित्र चरित्र वर्णन केले. त्यावेळी देवेन्द्र तेथे आला. त्याच्या आशीर्वादाने युद्धांत मारल्या गेलेले वानर जिवंत झाले आणि उड्या मारीत झाडांवर चढू लागले.

तेंव्हा रावणाला ठार करणाऱ्या दशरथनंदन रामचंद्राने प्रसन्नचित्त हनुमंताला माता, भरत, नोकर, मंत्री आणि नागरीकांना सांत्वन देण्याकरिता अयोध्येला जाण्यासाठी सांगितले. तसेच वाटेंत लागणाऱ्या देशविदेश, मनुष्य, गंगादि नद्यांचे सविस्तर वर्णन केले. हनुमंताने प्रस्थान केल्यानंतर रामाने सुग्रीव आणि विभीषणाला अयोध्येंत येण्यासंबंधी विचारले त्या दोघांनी आपली संमती दाखविली. अशा गप्पा करीत रामाने इतरांबरोबर रात्र घालविली. नंतर सैनिकांसोबत पुष्पकविमानांत चढून ते अयोध्येकडे जावयाला निघाले. मार्गामध्ये सेतु, महेन्द्र, मलय, विन्ध्य, माल्यवान्, ऋष्यमूक, दण्डकारण्य, पम्पा इ.चे वर्णन करीत रामचन्द्र सीतेबरोबर अयोध्येजवळ येऊन पोचले. नंतर हनुमंताकडून राम आल्याचे वृत्त समजल्याने आनंदाश्रूंनी ज्याचे डोळे भरून आले आहेत असा भरत, मंत्री, माता आणि अयोध्यावासी लोकांबरोबर रामांजवळ येऊन पोचला. अयोध्यावासी जनांनी घेरलेल्या भगवान् रामचंद्रांनी आपल्या लहान भावांबरोबर अयोध्या नगरीत प्रवेश केला. त्यानंतर स्वतःला राज्याभिषेक व भरताला यौवराज्यभिषेक करविला. पलीकडे रामाने अश्वमेध यज्ञाला प्रारंभ केला.

**रचनापद्धती**

रामाची युद्धविषयक हालचाल जाणून घेण्यास रावणाने शुक नांवाचा दूत रामाकड पाठविल्याचा उल्लेख रामायणांत (सर्ग २०) येतो. तो भट्टिकाव्यात नाही. तसेच लंकेला जाण्याकरिता समुद्राने वाट द्यावी म्हणून रामाने समुद्राच्या काठी उपवेशन केले असे रामायण (सर्ग २१) सांगते. भट्टिकाव्यांत असें वर्णन नाही.

भट्टिकाव्याचा संपूर्ण एक सर्ग (१६ वा) रावणविलापः या नांवाचा आहे. त्यांत आपल्या नातेवाईकांच्या मृत्यूमुळे दुःखित झालेल्या रावणाचा विलाप कवीने वर्णन केला आहे. रामायणांत असें वर्णन नाही. ह्या वर्णनाने कवीने रावणाची असमर्थता प्रगट केली आहे.

रामायणांत (सर्ग ११०) रावणाच्या मृत्युनंतर रावणाच्या स्त्रियांचा विलाप वर्णन केला आहे. भट्टिकाव्यात तो नाही. तसेच रामायणांतील मंदोदरीचा विलाप (सर्ग १११) भट्टिकाव्यांत नाही. परंतु विभीषणाचा विलाप वर्णन करण्यासाठी भट्टिकाव्यांचा (१८ म. का) एक सर्ग लिहिला आहे, यावरून असें वाटते कीं, पत्नीप्रेमापेक्षा बंधुप्रेमाला भट्टि अग्रक्रम देत असावा. या संपूर्ण सर्गामध्ये भट्टीने 'वर्तमाने लट्' या लकाराची विविध रूपें देखील

अनुक्रमणिका

दिली आहेत. क्वचित् वर्तमानाव्यतिरिक्त रूपें सुद्धा आढळतात. [डॉ. कु. बी. एस्. गोडसे - 'भट्टीने उपयोजिलेल्या लट् लकाराची काही वैशिष्ट्ये' हा आमचा लेख पहा; 'विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक' १९७६, पृ. ४५]

रामायण व भट्टिकाव्य दोहोंतहि रावणाच्या वधानंतर लंकेचा अधिपति या नात्याने विभीषणाला राज्याभिषेक केल्याचा उल्लेख मिळतो. परंतु रामायणांत (सर्ग ११२) लक्ष्मणाने तर भट्टिकाव्यांत (१९ / २३ भ. का.) रामाने अभिषेक केल्याचा उल्लेख मिळतो. रामायणांत (सर्ग १२५) अयोध्या जवळ दिसू लागल्यानंतर रामाने हनुमंताला पाठविल्याचा उल्लेख आहे. भट्टिकाव्यांत (२२/ १ भ.का.) रामाने हनुमंताला लंकेहूनच अयोध्येत पाठविल्याचा उल्लेख आहे. शिवाय त्याला अयोध्येचा मार्गहि सांगितल्याचा उल्लेख (२२/२-१६) मिळतो.

यानंतर राम व लक्ष्मण सीतेसह अयोध्येत परत जातात आणि राम राज्यावर बसतात. भट्टिकाव्य येथे समाप्त होते. महर्षीच्या महाकाव्याचा याठिकाणी एक टप्पा म्हणजे युद्धकांड संपून उत्तरकांडाला प्रारंभ होणार आहे. त्यांत रामचंद्र परंधामाला जाईपर्यंतचा कथाभाग आलेला आहे. राम निजधामाला जाण्याच्या वर्णनाने महर्षीचे रामायण महाकाव्य शोकपर्यवसायी मानतात. तर जगत्त्रयाला त्राहि भगवन् करून सोडणाऱ्या रावणासारख्या दैत्याचा वध झाल्याने सर्व देवगण, अप्सरा, पितर आकाशांतून पुष्पवृष्टी करीत असतांना, रामचंद्राला राज्याभिषेक होऊन त्या आनंदातच यज्ञ करण्याकरिता ते उत्सुक असतांना भट्टि भट्टिकाव्यांचा शेवट करतो. अशा वर्णनाने भट्टीचे महाकाव्य सुखपर्यवसायी मानतात. हा या दोन महाकाव्यांत फार मोठा भेद आहे.

## लकारपरिचय

भट्टीने प्रसन्नकांडानंतर तिङन्तकांडाचे विवेचन केले आहे. एकून लकार दहा आहेत. परंतु लेट् लकार छंदोमात्रविषय असल्याने भट्टिकाव्यांत केवळ नऊ लकारांचा प्रयोग दिसतो. तिङन्तकांडात नवहि लकारांच्या वेगवेगळ्या रूपांचा परिचय आपल्याला होतो. सर्गानुसार त्यांचा परिचय असा –

सर्ग चवदामध्ये भूतानद्यतनपरोक्ष लिट्लपकाराची वेगवेगळ्या धातूंची रूपे आली आहेत. सर्ग पंधरामध्ये भूतसामान्ये लुङः लकाराची रूपें सर्ग सोळामध्ये लृट् लकाराची 'लृट् शेषे च' या सूत्राने होणारी तसेच अन्य कांही सूत्रांनी होणाऱ्या लृट् लकारांची रूपें आली आहेत. आणि सर्वत्र 'स्यतासी लृलुटोः' या सूत्राने स्य आणि तास् प्रत्यय झाले आहेत. सर्ग सतरामध्ये अनद्यतनलङःलकाराची रूपें आली आहेत. गेलेल्या रात्रीचा पश्चार्ध व आगामी रात्रीचा रात्रीचा पूर्वार्ध मिळून एक दिवस होतो त्याला अद्यतन व तद्भिन्न जो असतो त्याला अनद्यतन असे म्हणतात. क्वचित् याहून भिन्न असलेल्या अनद्यतन – अर्थात झालेल्या लङः लकाराचीं रूपे देखील आली आहेत. सर्ग अठरामध्ये 'वर्तमाने लट्' लकाराचीं रूपें तसेच कोठे वर्तमानाहून अन्य अर्थात आलेली रूपें देखील आहेत. सर्ग एकोणवीसमध्ये सर्वत्र विधि निमन्त्रण, आमन्त्रण, अधीष्ट, संप्रश्न, प्रार्थना या अर्थात झालेल्या लिङः लकाराचीं विविध रूपें आहेत. त्यामधील विशेष देखील तेथे सांगितले आहेत. सर्ग वीस मध्ये लोट् लकाराचा विलास आहे. 'लोट् च' या सूत्राप्रमाणे तो वर दिलेल्या विधि इ. अर्थात व क्वचित् त्याहून अन्य अर्थात देखील आहे. सर्ग एकविसमध्ये लृङः लकाराचा विलास आहे. त्यांत हेतुहेतुमद्भावादी लिङःनिमित्त असतांना व क्रियेची फलनिष्पत्ती नसतांना भविष्यत् अर्थात लृङः लकार होतो. तर सर्ग बावीसमध्ये लुट् लकाराची विविध रूपें मिळतात. ती 'अनद्यतने लुट्' या सूत्राप्रमाणे अनद्यतन भविष्यत् अर्थात होत असतात.

वरील सर्व लकारांच्या निदर्शनांची वैशिष्ट्येंहि भट्टीने त्या विशिष्ट ठिकाणी दिली आहेत.

## उपसंहार

आतापर्यंत आपण वैयाकरणाच्या दृष्टीतून लिहिल्या गेलेल्या भट्टिकाव्याचा विश्लेषणात्मक अभ्यास केला. संस्कृत वाङःमयात भट्टिकाव्य आणि याच प्रकारच्या इतर काव्यांचे एक वैशिष्ट्यपूर्ण असे स्थान आहे. रघुवंश, किरातार्जुनीय, शिशुपालवध इ. महाकाव्ये आणि भट्टिकाव्य व त्याप्रकारचीं महाकाव्यें यांच्यामध्ये प्रयोजनाचा भेद आहे. तो असा कीं, रघुवंशादिक महाकाव्यें प्रामुख्याने रसाविष्काराचे प्रयोजन पुढे ठेवतात. त्या काव्याच्या व्यासंगाने येणारी व्युत्पन्नता हे त्यांच्या अभ्यासाचे गौणफल होय. उलट भट्टिकाव्य आमि तत्सदृश इतर काव्यें यांचे प्रधान प्रयोजन शास्त्रव्युत्पत्ति करून देणे हें आहे. त्यांतून जो रसास्वाद प्राप्त होतो तो त्याचें गौण प्रयोजन आहे म्हणूनच रघुवंशादिकांची सरसता किंवा रसभावाविष्कार भट्टिकाव्यांत आढळत नाही म्हणून भट्टिकाव्य इ. काव्यांचे मोल कमी लेखण्यांत येते व त्यांना हीन पदवी देण्यांत येते ते तेवढेसे बरोबर वाटत नाही.

काव्यांत रसभाव हे प्रधान आहेत हे मान्यच आहे. पण काव्याचे प्रयोजन व्युत्पत्ति हेहि असूं शकतंत असें, साहित्यमीमांसकांनी म्हटले आहे.

"चतुर्वर्गफलावाप्तिः सुखादल्पधियामपि काव्यादेव" । हे अग्निपुराणांतील वचन किंवा "धर्मार्थकाममोक्षेषु वैचक्षण्यं कलासु च" । हे भामहाचें वचन असेच दाखविते कीं, रसास्वादाच्या आनंदाबरोबर कवि व्युत्पत्तीची दृष्टी समोर ठेवूनहि काव्य लिहू शकतो. म्हणूनच माझ्या समजुतीप्रमाणे मम्मटाने 'सद्यःपरनिर्वृति' च्या बरोबरच "कान्तासंमित उपदेशहि" प्रयोजनरूपाने मानलेला आहे किंबहुना साहित्य मीमांसकांचा एक वर्ग असाहि आहे की, जो काव्यनिर्मितीला शास्त्रव्युत्पत्तीचे साधन मानतो.

स्वादुकाव्यरसोन्मिश्रं शास्त्रमप्युपयुज्यते ।
प्रथमालीढमधवः पिबन्ति कटुभेषजम् ॥

हे वचन व्युत्पत्तीला प्रधान मानणाऱ्या साहित्यमीमांसकांचे प्रतिनिधित्व करते. म्हणूनच संस्कृत काव्यवाङःमयाकडे दृष्टिक्षेप केल्यावर असें दिसते कीं, कांही काव्यांची निर्मिती रसदृष्टीला समोर ठेवून झाली आहे तर इतर कांही काव्याची निर्मिती शास्त्रदृष्टीला समोर ठेऊन झाली आहे. प्रस्तुत पुस्तकांत अभ्यासार्थ घेतलेले भट्टिकाव्य या दुसऱ्या वर्गात मोडते. म्हणून या काव्याचा अभ्यास आणि परीक्षण शास्त्रव्युत्पत्तीच्या दृष्टीतूनच प्राधान्याने झाले पाहिजे. इतर दृष्टीने झालेले त्याचे परीक्षण हे उपांग असावे असे माझे मत आहे. यादृष्टीने प्रस्तुत पुस्तकांत विश्लेषण केले आहे.

भट्टिकाव्य निःसंशयपणें व्याकरणाशी संबद्ध आहे. त्यांतहि पाणिनीय व्याकरणाला समोर ठेऊन ते रचले आहे. भट्टिकाव्य पाणिनींच्या अष्टाध्यायीचे अनुसरण करते असें त्या काव्याच्या श्लोकाश्लोकावरून लक्षांत येते. अष्टाध्यायींत, निर्देशिलेल्या प्रमुख शब्दप्रयोगांची ते ओळख करून देते. ही सर्व रूपें त्यांतील प्रकृति आणि प्रत्यय या दृष्टीने पाणिनीने तीन ते पांच अध्यायांतून विवेचिलेली आहेत आणि पदापदांतील कारकसंबंध आणि सामासिक

विशेष हे दुसऱ्या अध्यायांत आले आहेत. या सर्वांची ओळख भट्टीने शक्यतोवर सूत्रक्रमाने करून दिली आहे. हा भट्टिकाव्याचा महनीय विशेष आहे म्हणूनच या काव्याच्या अध्ययनाने पाणिनीय व्याकरणांतून आलेल्या पहिल्या पांच अध्यायांतील सर्व विशेषांची तयारी होते. एवढेच नाही तर त्यांत व्युत्पन्नता सहजतेने प्राप्त होते. या पांच अध्यायांत आलेले संज्ञा, नियम, पदविधि, धातूंना लागणारे प्रत्यय, प्रातिपदिके, व त्यांचे विकार, नामसाधित प्रातिपदिकें या सर्वांची त्या त्या वैशिष्ट्यांसह निदर्शने भट्टिकाव्यांत आलीं आहेत आणि भट्टीने प्रस्तुत काव्यांत शब्दांची योजना अशाच प्रकारें केली आहे कीं, त्यामुळे या पांच अध्यायांतील विशेषांचे दर्शन या काव्यांतून व्हावें.

भट्टिकाव्याच्या निर्मितीसंबंधी एक मनोरंजक कथा ऐकिवांत आहे. भतृहरि नांवाचा एक वैयाकरण एकदा आपल्या शिष्यांना झाडाखाली व्याकरण शिकवीत बसला असतांना गुरु शिष्यांच्या मधून एक हत्ती गेला. या विघ्नामुळे भर्तृहरीने व्याकरणशास्त्राचे अध्यापन स्थगित केले. पण शिष्यांनी प्रार्थना केल्यावरून अप्रत्यक्ष रीतीने व्याकरण शिकविण्यासाठी त्याने एक वर्षाच्या आंत एक महाकाव्य लिहिले तेच हे भट्टिकाव्य होय.

भट्टिकाव्याच्या निर्मितीची ही दंतकथासुद्धा हेच दाखवितें कीं, भट्टिकाव्य व्याकरणव्युत्पन्नतेचे प्रयोजन ससोर ठेऊन लिहिण्यांत आले आहे. अभिप्रेत असलेली ही त्याची व्याकरणव्युत्पन्नता कशाप्रकारची आहे याचे विवेचन प्रस्तुत पुस्तकाच्या अधिकार कांडांत अष्टाध्यायी आणि भट्टिकाव्य यांच्या तुलनेतूनहि दाखविले आहे. शिवाय भट्टिकाव्यांतील वैशिष्ट्यपूर्ण रूपें, त्यांत आढळणारे कांही दोष यांचेहि प्रतिपादन करून वैयाकरणांच्या पाणिनीय संप्रदायांत भट्टिकाव्याचे किती महत्त्व आहे. याची कल्पना माधवीयधातुवृत्ति, सिद्धांतकौमुदी व तत्त्वबोधिनी, व्याकरणावरील प्रधान ग्रंथांतील उतारे देऊन दाखविले आहे. तेंव्हा भट्टीने आपल्या काव्यांतून केलेले पाणिनीय सूत्रांचे अनुसरण आणि उत्तरकालीन वैयाकरणांनी भट्टीच्या वचनांचा आपल्या ग्रंथातून अनेकदा घेतलेला परामर्श हे भट्टिकाव्याने शास्त्रव्युत्पन्नतेला दिलेल्या प्राधान्याचेच निदर्शक आणि त्याच्या काव्याचे प्रतिपादक ठरतात.

याचा अर्थ असा नव्हे कीं, भट्टिकाव्यांतील पद्यें व्याकरणाच्या शुष्क कारिका आहेत. भट्टिकाव्याच्या प्रसन्न कांडांतील अलंकार निदर्शनांवरून त्याचे अलंकारशास्त्राचे नैपुण्य प्रतीत होते, आणि असेहि म्हणावेसे वाटते कीं, भट्टिकाव्य ज्याप्रमाणें व्याकरणाचे निदर्शन आहे. त्याप्रमाणे तत्कालिन अलंकारशास्त्राचेहि निदर्शन आहे. भट्टि हा भामहपूर्वकालीन आहे, असें अभ्यासकांचे मत असल्याचे मी पुस्तकांत सांगितलेच आहे. भरतोत्तर परंतु भामहपूर्वकालीन अलंकारशास्त्राचे स्वरूप कसे होते हे पाहावयाचे असल्यास भट्टीचे प्रसन्नकांड हे एक महत्त्वाचे साधन होईल असे म्हणता येते. कांही ठिकाणी दंडि व भामह यांच्या अलंकारांच्या लक्षणाचे चांगल्या प्रकारचीं निदर्शनें म्हणून भट्टीचें प्रसन्नकांडांतील श्लोक देता येतील इतके चांगले ते कांड उतरले आहे. हे प्रसन्न कांडांत दाखविले आहे. तेंव्हा भट्टि हा केवळ क्लिष्ट आणि शुष्क पद्यरचना करणारा एक लेखक असे न मानता त्याच्या ठिकाणी काव्यज्ञता व अलंकारांतील वैचित्र्य निर्मितीचें सामर्थ्य आहे हे स्पष्ट दिसून येईल. भट्टिकाव्य हे एक क्लिष्ट काव्य आहे. भट्टिकाव्याने क्लिष्टकाव्याचा एक पायंडा निर्माण करून ठेवला आहे असा कांही अभ्यासकांचा आक्षेप आहे. त्याचे जणूं कांही प्रसन्नकांड लिहून भट्टीनेच समाधान केले आहे.

राजशेखराने आपल्या काव्यमीमांसेत कवींची वर्गवारी करतांना शास्त्रकवि, काव्यकवि आणि उभयकवि असें वर्ग दिले असून त्याचीं लक्षणें अशी दिलीं आहेत –

अनुक्रमणिका

प्रतिभाव्युत्पत्तिमांश्च कविः कविरित्युच्यते ।
स च त्रिधा ।

शास्त्रकविः, काव्यकविः, उभयकविश्च । तेषामुत्तरोत्तरीयो गरीयान्' इति श्यामदेवः । 'नि' इति । यायावरीयः । यथा स्वविषये सर्वो गरीयान् । न हि राजहंसः चन्द्रिकापानाय प्रभवति, नापि चकोरः अद्भ्यःव क्षीरोद्धरणाय । यच्छास्त्रकविः काव्ये रससम्पदं विच्छिनत्ति । यत्काव्यकविः शास्त्रे तर्ककर्कशमपि अर्थम् उक्तिवैचित्र्येण श्लथयति । उभयकविस्तु उभयोरपि गरीयान् यदि उभयत्र परं प्रवीणः स्यात्' । [राजशेखर, काव्यामीमांसा – काव्यपाककल्पः पृ. १९]

भट्टिकाव्यांतून प्रतीत होणारे भट्टीचे प्रभुत्व आणि प्रसन्न कांडांतून दिसून येणारे त्याचे आलंकारिकत्व या दोनहि गोष्टी विचारांत घेऊन कित्येकांनी भट्टीला उभयकवींचें स्थान दिले आहे. [मित्र, रामललित, A Literary Study of Bhattikavya अलाहाबाद विद्यापीठांत समर्पित प्रबंध] माझ्या मतें हेहि तेवढेसे बरोबर नाही. भट्टि हा व्याकरणशास्त्रांत निष्पाण आहे पण तो शुष्क वैयाकरण नाही. तो आलंकारिकहि आहे. हे प्रसन्नकांडावरून दिसते. पण तो केवळ अलंकारांच्या व्याख्या देणारा आलंकारिकहि नाही. या दोनहि शास्त्रांतील त्याची निपुणता दिसते पण तो नीरस शास्त्रज्ञ नाही. भट्टिकाव्यांतील माधुर्य गुणाकरिता लिहिलेले प्रभातवर्णन, द्वितीय सर्गातील शरद् वर्णन इ. वर्णने विचारांत घेतांना भट्टिकाव्यांत रसवत्ता आहे हे निश्चित प्रत्ययास येते. मात्र असे असले तरी त्याला उभयकवित्व प्रदान करता येईल असें मला वाटत नाही. याचें एक कारण असें की त्याने आपल्या काव्यनिर्मितीवर एक बंधन घालून घेतले आहे.

दीपतुल्यः प्रबन्धोऽयं शब्दलक्षणचक्षुणाम् ।
हस्तामर्ष इवान्धानां भवेद् व्याकरणादुते ॥ [भट्टि, भट्टिकाव्य २२-२३]

या पद्यांतून त्याने स्वतःवर घालून घेतलेले बंधन स्पष्ट दिसतें. हे बंधन त्याने घालून घेतले नसते तर त्याची प्रतिभा काव्यवैचित्र्य आणि रसवत्ता यांच्या प्रदेशांत स्वैरसंचार करण्यास समर्थ झाली असती असे वर निर्देश केलेल्या प्रसंगावरून दिसून येते. पण त्याने आपली काव्यशक्ति व्याकरण शास्त्राच्या सेवेत रुजू केली आहे हे लक्षांत घेता आपण एवढेच म्हणू शकतो, की हा शास्त्रकवि आहे मात्र त्याच्या ठिकाणी उभयकवित्वाची बीजें दिसून येतात.

सारांश भट्टिकाव्य व तत्सदृश वासुदेवविजय .[या प्रकारच्या काव्यांचा अभ्यास माझ्या प्रबंधात पहा. प्रा. कु. गोडसे, बी एस्. वैयाकरणाच्या दृष्टिकोनांतून लिहिलेल्या कांही संस्कृत काव्यांचा अभ्यास, नागपूर विद्यापीठांत समर्पित प्रबंध] या काव्यासारख्या व्याकरणप्रधान काव्यांनी व्याकरणशास्त्राची व्युत्पन्नता माणसाच्या ठिकाणीं येते. अष्टाध्यायींतील सुमारे १८०० इतकी सूत्रें भट्टिकाव्यांत निदर्शित केली आहेत. तर १११५ इतकी सूत्रें वासुदेव विजयांत आहेत. राहिलेल्या सूत्रांपैकी केवळ वेदाशी संबंधित असलेली सुमारे ६०० इतकी सूत्रे आहेत ज्याचीं निदर्शने मिळत नाहीत. अशी सुमारे ४७१ सूत्रे राहतात. एकूण सूत्रांपैकी बह्वंीश भाग हा दोनहि काव्यांतून निदर्शित झाला असल्यानें पाणिनीय सूत्रांच्या अभ्यासार्थ निदर्शनें म्हणून हीं काव्यें पुरेशी आहेत असें म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. भट्टिकाव्य आणि वासुदेवविजयाने अष्टाध्यायींत निपुणता प्राप्त होते. तर धातुकाव्याने धातुपाठाची तयारी होते. वैयाकरणाला व्याकरणाच्या अध्ययनासाठी या दोहोंची अतीव आवश्यकता आहे.

अनुक्रमणिका

संस्कृताच्या अध्ययनासाठी व्याकरणशास्त्राची नितांत गरज आहे. नव्हे संस्कृत म्हणजेच संस्कारसंपन्न. ही संस्कारसंपन्नता व्याकरणाशिवाय अशक्य आहे. म्हणून संस्कृताच्या तयारीकरिता व्याकरणशास्त्र आणि व्याकरणशास्त्राच्या व्युत्पन्नतेचा सुलभ उपाय म्हणून अशाप्रकारच्या काव्यांची अनिवार्य गरज आहे. या काव्यांचा व्याकरणाच्या विद्यार्थ्याने अभ्यास केला तर त्याची व्याकरणाची बैठक सहजपणे तयार होऊ शकेल असे सांगावेसे वाटते. यादृष्टीने विचार करता प्रस्तुत प्रकारच्या काव्यांवर जें कांही आक्षेप अनेकदा घेण्यांत येतात त्याचे आपोआप निराकरण होते. या आक्षेपांचे सामान्य स्वरूप असे – चवथ्या किंवा पांचव्या शतकांत झालेल्या भट्टिकवीने क्लिष्टकाव्याचा एक निराळाच आदर्श प्रस्थापित केला. पांडित्यप्रदर्शनाव्यतिरिक्त या काव्यलेखनामागे दुसरा कोणताहि हेतु भट्टीच्या काव्यांत नव्हता. शास्त्राकारांनी सांगितलेली सद्यःपरनिर्वृतिः हे काव्याचे प्रमुख प्रयोजन जरी या काव्याच्या मुळाशी असले, तरी ते फक्त एका विशिष्ट मर्यादेपुरतेच. भट्टीच्या संप्रदायांतील काव्यांचे अवगाहन करून पंडितवर्गाला 'परनिर्वृतिः' म्हणजेच आत्यंतिक आनंद लाभण्याची शक्यता आहे. सर्वसामान्य रसिकांना मात्र त्या आनंदाचा वाटा मिळणे अशक्यच. भट्टीने आपल्या महाकाव्याच्या शेवटी स्पष्टपणें म्हटलेच आहे कीं, माझे हे काव्य टीकेच्या साहाय्यानेच कळणे शक्य आहे. याचे वाचन करणाऱ्या बुद्धिहीन लोकांचे मरण ओढवल्यावाचून राहणार नाही. कारण मी हे काव्य विद्वानांसाठीच लिहिले आहे.

अलंकारशास्त्र हें सर्वथा काव्याशी संबद्ध आहे. काव्याची रमणीयता वाढविण्यासाठी उचित अलंकारांची योजना त्यामध्ये सर्वथा आवश्यकच असते. पण भट्टीच्या संप्रदायांतील महाकवि अलंकारांचा उपयोग करण्यासाठी किंवा आपले अलंकारशास्त्रावरील पांडित्य प्रदर्शन करण्यासाठीच काव्यरचना करीत आले. साहित्यशास्त्रांत सांगितलेल्या सर्व अलंकारांचा उपयोग करणे एवढेच यांच्या काव्याचे ध्येय. अशा प्रकारच्या काव्यामुळे कवीचें अलंकारशास्त्रावरील प्रभुत्व भरपूर व्यक्त झाले तरी त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या कृत्रिमतेपायीं काव्यांचे काव्यत्व मात्र क्षीण होते. असें 'अर्वाचीन संस्कृत साहित्य' यांत म्हटले आहे. [वर्णेकर डॉ श्री. भा. "अर्वाचीन संस्कृत साहित्य", शास्त्रनिष्ठ काव्यें, प्रकरण ८. पृ. ७३] अनेक अर्वाचीन अभ्यासकांचे भट्टिकाव्य आणि तत्सदृश काव्यांच्या बाबतीत असेच मत आहे. परंतु संस्कृत साहित्यांत शास्त्रकाव्यांचा एक वर्ग आहे आणि त्यांचे प्रयोजन त्या त्या शास्त्रांत विद्यार्थ्यांना सरसपणे आणि सुलभतेने व्युत्पन्न करणे हे आहे. ही गोष्ट लक्षांत घेता वरील आक्षेपाशी सहमत होणे मला कठीण जाते. कोठल्याहि शास्त्राच्या सेवेसाठी निर्माण झालेले काव्य त्या विशिष्ट शास्त्रांतील विदग्धता घेऊनच जन्मास येणार आणि कवीची तीच विदग्धता त्या काव्याच्या अभ्यासकांत संक्रमित होणार य विदग्धतेच्या सौंदर्याचा आस्वाद घेण्याला लागणारी तयारी ज्याच्याजवळ पुरेशी नसेल त्याला त्या काव्यांतील वैदग्ध्य प्रतीत होणार नाही. परंतु तेवढ्यावरून ती काव्यें क्लिष्ट आहेत असे म्हणता येत नाही. काव्यांमध्ये कवीचा जो संस्कार प्रगट झाला असतो. तत्सदृश संस्काराचा अंश ज्यांच्या जवळ आहे अशा वाचकांना त्या काव्यांतील विद्ग्ध तेचे सौंदर्य खात्रीने जाणवेल. तेंव्हा एखादे काव्य शास्त्रनिष्ठ आहे एवढ्यावरून ते क्लिष्ट होय असे सरसहा विधान करता येत नाही, असे मला वाटते. माझ्या मतें ज्या शास्त्राला विषयरूपाने समोर ठेऊन ही काव्यें निर्माण झाली आहेत. त्या शास्त्रांतील वैशिष्ट्यें त्या काव्यांत कितपत उतरली आहेत आणि कवीचें ते प्रयोजन कितपत सिद्ध झाले आहे या दृष्टितूनच अशा काव्यांचे परीक्षण करणे योग्य होईल. असा प्रयत्न भट्टिकाव्याच्या अभ्यासांतून प्रस्तुत पुस्तकात केला आहे आणि तो करतांना व्याकरण शास्त्राची मूळ भूमिका ज्याच्यावर आधारली आहे असा पाणिनीय सूत्रांचा संग्रह समोर ठेऊन त्याच्या तुलनेंत भट्टिकाव्यांतील विविध प्रकारच्या पदसंपत्तीचा रूपें आणि प्रक्रियासहित संपूर्ण आलेख अभ्यासकांसमोर ठेवला आहे.

अनुक्रमणिका

# ग्रंथसूची

## १) संस्कृत –मराठी –हिंदी


| | | |
|---|---|---|
| १. | अर्वाचीन संस्कृत साहित्य | प्रा. वर्णेकर, श्री. भा. |
| २. | अलंकार-प्रदीप | देशपांडे-निजसुरे |
| ३. | अष्टाध्यायीसूत्रपाठ | पाणिनि |
| ४. | काव्यमीमांसा | राजशेखर, हिंदी अनु. पंडित केदारनाथ |
| ५. | काव्यालंकार | भामह, हिन्दी अनु. बिहार राष्ट्र परि. पटना |
| ६. | काशिकावृत्ति | वामन- जयादित्य |
| ७. | काव्यादर्श | दंडि |
| ८. | काव्यालंकारसूत्रवृत्ति | वामन |
| ९. | काव्यप्रकाश | मम्मटाचार्य |
| १०. | किरातार्जुनीयम् | भारवि |
| ११. | कुमारसंभवम् | कालिदास |
| १२. | कौटलीय अर्थशास्त्र | कौटल्य |
| १३. | कंठाभरण | भोजराज |
| १४. | क्षीरतरंगिणी | क्षीरस्वामी |
| १५. | गीर्वाणलघुकोश | |
| १६. | चान्द्र व्याकरण | चन्द्रगोमिन् |
| १७. | तत्त्वबोधिनी | ज्ञानेन्द्रसरस्वती |
| १८. | प्राचार्य श्री. ल. पांढरीपांडे गौरव ग्रंथ | |
| १९. | परिभाषेन्दुशेखर | नागेश, वाडेगांवकर मराठी भाषांतर |
| २०. | प्रबंध - 'वैयाकरणाच्या दृष्टिकोनातून लिहिलेल्या काही संस्कृत काव्यांचा अभ्यास' | प्रा. कु. गोडसे, बी. एस्. |
| २१. | भट्टिकाव्य व त्यावरील विविध टीका | भट्टि श्रीशेषराज शर्मा |
| २२. | भारतीय साहित्यशास्त्र | डॉ. देशपांडे. ग. त्र्यं |
| २३. | भाषावृत्ति | पुरुषोत्तमदेव |
| २४. | मनोरमा व शब्दरत्न, भाग -६ | वाडेगांवकर, रा. दा. |
| २५. | माधवीयधातुवृत्ति | सायणाचार्य |
| २६. | रामायण वाल्मीकि | गोरखपूर प्रत |


अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| २७. | विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक नागपूर | १९७६ |
| २८. | व्याकरण महाभाष्य | पतंजलि |
| २९. | सिद्धांतकौमुदो, बालमनोरमा, | दिक्षित, भट्टोजि |

## इतिहास

| | | |
|---|---|---|
| ३०. | ग्रंथ आणि ग्रंथकार | डॉ. सौ. देशपांडे, प्रज्ञा |
| ३१. | संस्कृत व्याकरणशास्त्रका इतिहास (भाग १ व २) | मीमांसक, युधिष्ठिर |
| ३२. | संस्कृत कविदर्शन | डॉ. व्यास भोलाशंकर |
| ३३. | संस्कृत साहित्यका सोपपत्तिक इतिहास | डॉ. करंबेळकर वि. वा. |
| ३४. | संस्कृत साहित्यका इतिहास | आचार्य उपाध्याय. बलदेव |

## २) इंग्लीश

| | | |
|---|---|---|
| 35. | A dictionary of Sanskrit Grammar | |
| 36. | Bhatti-Kavya, A Study | Dr. Satya Pal Narang |
| 37. | History of Sanskrit Poeties, | Dr. Kane, P.V. |
| 38. | History of Sanskrit Literature | Dr. Day and Dasgupta |